# क्रांतिवीर नागनाथ अण्णा

- ज.य.अहिर



# क्रांतिवीर नागनाथ अण्णा

## भाग १- पूर्वार्ध

(पाचवी आवृत्ती)

सन १९२२ ते १९४७

| लेखक |
जयवंत अहिर, वाळवा.

@
सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

◆ प्रकाशक-
पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथ (अण्णा) नायकवडी
गौरव समिति वाळवे, जिल्हा-सांगली.
पिन - ४१६ ३१३
फोन नं.-२६७५३८,२६७५४०,२६७५४१
फॅक्स -(०२३४२) २६७५३९
ई मेल - hutatmassk@gmail.com
वेब. - hutatmasugars.com

◆ लेखक : जयवंत यल्लापा अहिर,
मु.पो.वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली.

◆ प्रथमावृत्ती : १५ जुलै २००८

◆ दुसरी आवृत्ती : २६ जानेवारी २००९

◆ तिसरी आवृत्ती : २५ फेब्रुवारी २००९

◆ चौथी आवृत्ती : १५ जुलै २०१२

◆ पाचवी आवृत्ती : २२ मार्च २०१८

◆ स्वागतमुल्य : रु. १५०/-

◆ मुद्रक : श्री ऑफसेट प्रिंटर्स
शिवसदन, परांजपे पार्क, माधवनगर रोड
सांगली-४१६ ४३६
फोन नं.०२३३/२६२०५०८,२६२२५०४

◆ रेखाचित्रे : विजय नांगरे व आर्टिस्ट विलास जी. बकरे

◆ प्रमुख वितरक-
पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती,
वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली.(महाराष्ट्र राज्य)

# प्रस्तावना....

आ. ह. साळुंखे
सातारा.

## * विनम्र अभिवादन *

नागनाथअण्णा नायकवडी हे नाव जरी प्रथमदर्शनी एका व्यक्तीकडे बोट दाखवीत असले, तरी ते प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवरून पाहता महाराष्ट्रातील अनेक परिवर्तनवादी चळवळींच्या आधारस्तंभाचे द्योतक आहे. मा. जयवंत अहिर यांनी त्यांच्या आठवणी लिहून आपल्या सध्याच्याही आणि भावी काळातीलही कित्येक पिढ्यांना उपकृत करून ठेवले आहे. जयवंत अहिर दीर्घकाळपर्यंत अण्णांच्या सहवासात राहिले असल्यामुळे या पुस्तकातील आठवणींना ऐतिहासिक मोल प्राप्त झाले आहे.

अहिर यांचे हे पुस्तक हा अण्णांच्या चरित्राचा पूर्वार्ध आहे. स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंतचे संघर्षात्मक चरित्र त्यामध्ये आले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अण्णांनी केलेले प्रबोधनाचे आणि रचनात्मक स्वरूपाचे कार्य उत्तरार्धात येणार असून वाचक त्याचीही वाट पाहत आहेत.

लेखकाने वाळवा गावाचा आणि अण्णांच्या घराण्याचा जो इतिहास सांगितला आहे, तो काही माझ्या अभ्यासाचा विषय नाही, परंतु अण्णांचे स्वातंत्र्यचळवळीतील महान योगदान हा मात्र तुमच्या आमच्या सर्वांच्या दृष्टीने अविस्मरणीय असा ऐतिहासिक ठेवा आणि वारसा आहे. १५ ऑगस्ट १९४७ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना उपजतच स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. एखादी गोष्ट जेव्हा अशा सहजपणाने मिळते, तेव्हा ती गृहीत धरली जाण्याचा धोका असतो. अनेक भारतीयांच्या बाबतीत हे घडल्याचे दिसतही आहे; परंतु हे स्वातंत्र्य आपल्या आधीच्या पिढ्यांना असे आयते मिळालेले नव्हते. अण्णांसारख्या क्रांतिकारकांनी जणू काही धगधगते निखारे आपल्या छातीवर ओढून घेतले आणि मृत्यूच्या दाढेतून स्वातंत्र्य खेचून आणले. ज्यांना स्वातंत्र्याची फळे आयती भोगायला मिळत आहेत, त्यांनी या क्रांतिकारकांविषयी कृतज्ञ रहायला हवे आणि त्यांनी कृतज्ञ रहायचे असेल तर त्यांच्यापर्यंत या धैर्यशील क्रांतिकारकांचा इतिहास पोचला पाहिजे. जयवंत अहिर यांच्या या पुस्तकाने हे कार्य घडून येईल, असा माझा विश्वास आहे.

अण्णांच्या आईंचे वडील लष्करात होते. आईंचे लहानपण कलकत्त्याला लष्कराच्या वातावरणात गेले होते. त्यामुळे आईंमध्ये धैर्य, लढाऊ वृत्ती, स्वातंत्र्य हे गुण लहानपणापासूनच आले होते. दुसऱ्या बाजूला दुसऱ्याच्या वाळल्या पाचोळ्यावरही पाय द्यायचा नाही, अशी निरागस, निःस्पृह वृत्ती वडिलांमध्ये होती. आई आणि वडील या दोघांच्या या स्वभावांचे जे संस्कार अण्णांवर झाले, त्याचे अत्यंत हृद्य आणि भावपूर्ण चित्रण अहिर यांनी केले आहे. अण्णांचे पुढचे सगळे संघर्षमय आणि न्यायप्रिय जीवन समजण्याच्या दृष्टीने चरित्राचा हा भाग फार महत्त्वपूर्ण आहे.

पुढच्या अनेक प्रकरणांतून अण्णांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात अत्यंत धैर्याने, निष्ठेने, तडफदारपणाने, अविचल वृत्तीने जे कार्य केले, त्याचे वर्णन आले असून ते कमालीचे प्रेरणादायक आहे. संसाराची, कुटुंबाची, संपत्तीची, एवढेच नव्हे तर प्राणांचीही पर्वा न करता त्यांनी या आंदोलनात स्वतःला झोकून दिले. आपण आज जे स्वातंत्र्य उपभोगत आहोत, ते सहजासहजी लाभलेले नाही. त्यासाठी अनेक व्यक्तींनी फार मोठा त्याग केलेला आहे. आणि नागनाथ अण्णांचा अंतर्भाव अशा लोकांमध्ये अगदी अग्रभागी होतो. मृत्यू त्यांना अनेकदा अगदी चाटून गेला. पण तरी ते निर्भयपणाने आपण निवडलेल्या वाटेवर चालत राहिले. माघार म्हणून कधी घेतली नाही.

त्यांच्या चरित्रातील असंख्य रोमहर्षक आठवणी अहिर यांनी नोंदविल्या आहेत. त्या आठवणी अंगावर शहारेही आणतात आणि मनाला थरारूनही सोडतात. एका महान चरित्राने आपण भारावले जातो.

आज अण्णांच्या त्या महान त्यागमय चरित्रापुढे विनम्रपणे नतमस्तक होताना एक समाधान आहे. समाजाच्या मनात त्यांच्या कार्याविषयी अपार कृतज्ञता आणि आदर आहे, याचा आनंद आहे. मी या प्रसंगी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना स्वास्थ्यपूर्ण दीर्घायुरारोग्य चिंतितो.


आ. ह. साळुंखे

सातारा.

# लेखकाचे मनोगत

भारतीय जनतेवर दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या इंग्रजी सत्तेला या देशातून हुसकून लावण्यासाठी या देशात सन १८५७ साली मोठा उठाव झाला. त्यानंतर १९४२ साली देशव्यापी मोठे स्वातंत्र्य आंदोलन झाले. स्वातंत्र्यासाठी अभूतपूर्व झालेला लोकलढा म्हणून या आंदोलनाची जगाच्या इतिहासात नोंद आहे. या आंदोलनाचे महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस आदी महान नेत्यांनी नेतृत्व केले. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, बाबुगेनू सारख्या थोर क्रांतिकारकांनी या लोक आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून क्रांतिसिंह नाना पाटील, हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग, डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड, ना.यशवंतराव चव्हाण, पद्मभूषण वसंतराव दादा पाटील, बाबूजी पाटणकर, किसन वीर यांच्या बरोबर अनेक क्रांतिकारकांनी या आंदोलनात मोठी मर्दुमकी गाजवली. त्या लढ्याचा तेजस्वी इतिहास अनेक इतिहासतज्ज्ञ, अभ्यासक व स्वातंत्र्य योध्यांनी लिहिला आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या प्रतिसरकारच्या सशस्त्र लढ्याबद्दल या तज्ज्ञांनी ग्रंथरूपाने, वृत्तपत्रे व मासिकांतून खूप लेखन केले आहे. परंतु या लढ्यातील ज्या काही थोर क्रांतिकारकांना योग्य न्याय मिळाला नाही, त्यांपैकी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी हे एक आहेत. चळवळीतील त्यांच्या जीवनातील अनेक रोमहर्षक प्रसंग व घटना प्रकाशात आणण्याचा हा एक प्रयत्न केला आहे.

नागनाथ अण्णांनी १९४२ च्या लढ्यात सर्वस्वाचा त्याग करून उडी घेतली. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या खांद्याला खांदा लावून जिवावर बेतणारी अनेक कामे केली. ती करत असताना अविस्मरणीय अशा घटनांना व प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. त्या सत्य घटनेवर कुणीतरी एक चांगले पुस्तकरूपाने लिखाण करावे. त्या लिखाणातून तरुण पिढीला स्फूर्ती मिळेल अशी अनेक वेळा जाणकारांनी चर्चा केली, पण प्रत्यक्ष ती गोष्ट अमलात आली नाही.

तसा माझा व नागनाथ अण्णांचा परिचय विधानसभेच्या १९५७ च्या निवडणुकीच्या प्रचारामुळे झाला. पण तो फारसा घनिष्ठ नव्हता. माझे

मित्र दत्ता शेळके (दादा) यांचे मात्र अण्णांच्या बरोबर घरच्या सारखे संबंध होते. त्याला कारण त्यांचे वडील खंडू सखाराम शेळके हे स्वातंत्र्यसंग्रामातील अण्णांचे सहकारी होते. अण्णांना खेळाची खूप आवड. ते चांगल्या खेळाडूंना प्रोत्साहन द्यायचे, हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे खो-खो च्या संघामध्ये आम्ही दोघेही खेळत होतो. त्या वेळी खो-खो च्या खेळात वाळवा गाजत होते. आमचा खो-खोचा संघ नंबरातला होता म्हणून अण्णांचे आम्हा खेळाडूंच्याकडे विशेष लक्ष गेले. त्यातून आम्हा सर्व खेळाडूंचे व त्यांचे घनिष्ठ संबंध तयार झाले. पुढे एस.एस.सी. परीक्षा पास झाल्यानंतर आम्हा दोघांना त्यांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालयात सेवक म्हणून घेतले. गेली ४०-५० वर्षे आम्ही या महामानवाच्या सहवासात आहोत. आम्ही १.३.२००३ ला विद्यालयाच्या सेवेतून निवृत्त झालो. आमच्या आगोदर वसंतराव पवारही विद्यालयाच्या सेवेतून निवृत्त झाले असलेतरी त्यांनी व मी अण्णांच्या विधायक कामात व त्यांच्या सेवेत शेवटच्या श्वासापर्यंत राहण्याचा निर्धार केला आहे.

एक दिवस सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम वाळव्याला 'वनश्री नानासाहेब महाडीक महिला पतसंस्थेच्या' उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला आले होते. वाळव्यात आल्यानंतर नागनाथ अण्णांना भेटल्या शिवाय डॉ. पतंगराव कदम जाणार नाहीत याची आम्हा कार्यकर्त्यांना खात्री असल्यामुळे आम्ही त्यांची साखर शाळेत वाट बघत बसलो होतो. पतसंस्थेचा कार्यक्रम संपल्यानंतर ते अण्णांना भेटण्यास आले. बोलता बोलता डॉ. पतंगराव कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, ''अरे बाबानो, ४२ च्या आंदोलनाचा अण्णांचा इतिहास फार मोठा आहे. तो इतिहास नवीन पिढीला दिशा देणारा स्फूर्तिदायी असा आहे. तो कुणीतरी लिहा.'' असे म्हणत त्यांनी सर्व कार्यकर्त्यांच्याकडे नजर फिरवली आणि एकदम माझ्याकडे बघून म्हणाले, ''अरे जया.... तू सतत अण्णांच्या बरोबर असतोस तू त्यांना सर्व प्रसंग विचार आणि ते सांगतात तसे लिहून काढ. त्याचे आपण पुस्तक छापू.'' सर्वांचे पुढे सहकार मंत्र्यांनी माझ्यावर त्या लिखाणाची जबाबदारी टाकली. मी नाही म्हणू शकलो नाही. माझी पंचाईत झाली. मी काही लेखक नाही, काय करावे या विचारात काही दिवस निघून गेले. पुढे हुतात्मा किसन अहिर सूतगिरणीच्या कामाबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.आर.आर.पाटील (आबा) यांचेकडे मा.वैभव काका, वसंत पवार(सर) व मी गेलो होतो. तिथेही अण्णांच्यावरील लिखाणाचा

विषय निघाला. त्यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले. हे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. हे पुस्तक लिहिले गेलेच पाहिजे. डॉ.पतंगराव कदमांचे व ना.आर.आर.आबांच्या बोलण्याचा विसर पडेना. शेवटी मी लिखाण करण्याचा निर्णय घेतला ! अण्णांचे सवडी प्रमाणे साखर शाळेत जाऊन दोन-दोन तास त्यांच्याकडे बसू लागलो आणि १९४२ च्या संग्रामातील एक-एक प्रसंग समजून घेतला. सत्य प्रसंगापासून बाजूला न जाता मला जमेल त्या शब्दांत मी लिखाण केले. ते लिहिलेले लिखाण अण्णांना वाचून दाखवायचे अगोदर कुणालातरी वाचून दाखवले पाहिजे म्हणून मी माझी आई कृष्णाबाई, मुलगी ज्योत्स्ना व पत्नी जयश्री यांना ते वाचून दाखवत असे. त्या लिखाणाला त्यांनी चांगली प्रतिक्रिया देऊन माझ्या उत्साहात भर घातली. नंतर ते लिखाण अण्णांना वाचून दाखवत असे. त्या वेळी अण्णांचे जवळ त्यांचे सेवक उत्तम घोलप, मन्सुर चाऊस, तानेखान, माने, अशोक चव्हाण वगैरे असायचे त्यांच्या कडून व अण्णांचेकडून चांगले लिहिल्याची दाद मिळायची. माझे मित्र वसंत पवार व दत्ता शेळके यांना अण्णांचेवर पुस्तक लिहितोय हे समजल्यावर त्यांनी माझे मनोधैर्य चांगलेच वाढवले. जरूर लिहा. पाहिजे ती मदत आम्ही तुम्हांला करू. विशेष बाब ही गोष्ट वैभव नायकवडी (काका) यांना कळाल्यानंतर त्यांनी स्वत: मला तगादा सुरू केला. आहो 'जयामामा तुम्ही अण्णांचे बद्दल लिहिताय ते लवकर लिहा. आपण ते छापून घेऊ' अशा प्रकारे मला अनेक मंडळींनी सहकार्य केले त्यांचा नामोल्लेख करणे गरजेचे आहे. लिहिलेल्या लिखाणाचे शुद्ध लेखनाची तपासणी माझे मित्र एस.आर.पाटील व मुलाणी सर यांनी केली. कारखान्याचे कार्यकारी संचालक एस.डी.वावरे साहेब, सेक्रेटरी भांगरे साहेब, उत्पादन विभागातील माने साहेब, कॅशिअर विलास पाटील, अकौंट विभागातील वानखडे साहेब, विठ्ठल गुंजवटे, टायपिंगचे व डिटीपी काम प्रवीण कांबळे व माणिक कुलकर्णी यांनी केले. तसेच डॉ. सुषमा अरुण नायकवडी, सौ.नंदिनी वैभव नायकवडी, डॉ. हेमंत पडिया, डॉ.मिना पडिया, डॉ.टकले, सौ.टकले, श्री.आनंदा शिंदे, राजेंद्र पांडुरंग मुळीक, विश्वास महादेव मुळीक, विजय प्रकाश अहिर, डॉ. अनिल मुळीक, पांडुरंग बाबू नायकवडी, रामचंद्र बाळू लोहार, वसंत वाजे (इंजि.), महेश कांबळे, सर्व वाळवा. श्री.सदाशिव तुकाराम खोत, संजय येवले-पडवळवाडी, बाळासाहेब नायकवडी (पं.स.सदस्य,चरण), पांडुरंग सरोदे (सर), दिलीप गणपती देसावळे(मामा) अशा अनेकांच्या प्रोत्साहनाने हे मी थोडे फार

लिखाण करू शकलो. यातील काही लेख शंकर पांडू पाटील मु.पो.पाडळी, ता.शिराळा यांनी महाराष्ट्र टाइम्स व लोकसत्ता दैनिकांतून छापून आणण्याचे काम केले. तसेच श्री.व्ही. वाय.(आबा) व रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य श्री.गणपती शंकर ढवण-अतीत, ता.जि.सातारा यांनी अत्यंत मौलिक सहकार्य केले.

माझ्यावर सख्या भावा सारखे प्रेम करणारे माझे मित्र स्व. अरूण (भैय्या) नायकवडी व माझे चुलत बंधू स्व. प्रकाश अहिर(सर) आज असते तर या दोघांनी अण्णांच्या या चरित्र ग्रंथाबद्दल जो आनंद व्यक्त केला असता. तो मी शब्दांत वर्णन करू शकलो नसतो.

कांही निवडक घटनांची-प्रसंगांची माहिती नागनाथ अण्णांचे मुलाखतीतून, सरकारी कागद पत्रांचे आधारे व काही पुस्तकांच्या साहाय्याने, या पुस्तकासाठी आधारभूत माहिती अण्णांचे १९४२ मधील सहकारी कै.वाय.सी.पाटील, कै.राजूताई बिरनाळे, कै.अनंत ज्ञानू ढगे (पाटील) ढगेवाडी, कै.तुकाराम नाना खोत, कै.एस.बी.पाटील कामेरी, तसेच हयात असलेले श्री. खंडू सखाराम शेळके, श्री. बचू पोरवाल (शेडजी) यांचे कडून मिळाली ती तुमच्यापुढे ठेवली आहे. या लिखाणातून सामान्य वाचकांना तरुणांना भावी काळाची उज्ज्वल दिशा मिळेल ही अपेक्षा.

मी अनेक थोरामोठ्यांचे वाढदिवस पाहिले आहेत, ऐकले आहेत. परंतु लोकांच्या आग्रहाखातर आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी पहिल्यांदाच वाढदिवस साजरा करायला संमती देणारी माणसं हाताच्या बोटावर मोजण्या इतपत असतील त्यांपैकी क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी हे एक आहेत. ते आज १५.७.२००८ रोजी वयाची ८६ वर्षे पूर्ण करून ८७ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. अशा वेळी त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन होण्याचा सुयोग आला. हे माझे परम भाग्य म्हणावे लागेल.

!! सर्वांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार. !!

**- जयवंत अहिर.**



# भावपूर्ण श्रद्धांजली

‘ माझ्या विचारांना सुसंस्कारांचे अधिष्ठान दिले
त्या क्रांतिवीर डॉ. नागनाथ (अण्णा) नायकवडी
यांनी ज्यांच्यामुळे मला जवळ केले,
त्यांनी इतिहास वाचला होता का हे मला माहीत नाही.
पण त्यांनी इतिहास घडवला. त्या थोर
हुतात्मा किसन अहिर, क्रांतिवीरांगणा लक्ष्मीबाई नायकवडी
व क्रांतिसिंह नाना पाटील
यांच्या पवित्र चरणावर भावपूर्ण अर्पण....., ’

- जयवंत य. अहिर

|| आशीर्वाद ||



अरं ! माझ्या बाबांनो... पैशाचा ढिग एका बाजुला ठेवा !
अन् दुसऱ्या बाजूला माणूस ठेवा !
दोघांनाही बोलवा.... कोण येतयं बघा...!!

- क्रांतिवीरांगना लक्ष्मीबाई नायकवडी



‘आपल्या भाकरीतली अर्धी भाकरी
दुसऱ्याला द्या....
आणि
खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी
संघर्षाला तयार व्हा.....,




अण्णांच्या ८६ व्या वाढदिवस प्रसंगी '' क्रांतिवीर नागनाथ अण्णा'' या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करताना माजी न्यायमुर्ती बी. जी. कोळशे-पाटील,
उपस्थित - एन. डी. पाटील, सौ. कुसुमताई नायकवडी, क्रां. डॉ नागनाथ अण्णा, जयवंत अहिर, प्राचार्य पी. बी. पाटील,
आ. ह. साळुंखे, प्रकाश आवाडे, निवेदिता माने व हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याचे चेअरमन मा. वैभव (काका) नायकवडी





वडील- रामचंद्र(बापू) व बंधू- शामराव(आप्पा)   आई- लक्ष्मीबाई सोबत क्रांतिवीर नागनाथअण्णा



क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा व सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी



क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील
सह कार्यकर्ते क्रांतिवीर नागनाथअण्णा व इतर



हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्याचे भूमीपूजन करताना मा. श्री. बिरनाळे,
श्री माने, पी.डी. गुणे, क्रां. नागनाथ अण्णा, बाळासाहेब कदम व उपस्थित मान्यवर




क्रांतिसिंह.नाना पाटील यांच्या प्रकृतीची चौकशी करताना वाळवे येथे क्रांतिवीर नागनाथअण्णा मा.यशवंतराव चव्हाण, गृहमंत्री, भारत सरकार, मा. वसंतदादा पाटील, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मा. वाय. सी. पाटील, मा.रावसाहेब कळके



हुतात्मा किसन अहिर अर्धपुतळा उद्घाटन प्रसंगी मा. बाबूराव जाधव मा. रावसाहेब कळके, क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी, मा. ना. यशवंतराव चव्हाण, कॉ. दत्ता देशमुख, क्रांतिवीर नागनाथअण्णा व राजारामबापू पाटील



उजवीकडून क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. यशवंतराव चव्हाण,
कॉ. दत्ता देशमुख, मा. जयवंत अहिर व इतर.



हुतात्मा किसन अहिर यांच्या पादुकावर सोनवडे येथे फुले वाहताना
क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. चामुंडराय पाटील, मा. खंडू शेळके व मा. जयवंत अहिर



किर्लोस्कर ट्रॅक्टर संबंधी माहिती सांगत असताना पी. डी. गुणे व उपस्थित क्रां. नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतिसिंह नाना पाटील, पुरुषोत्तम रंगाचार्य महाराज व इतर मान्यवर.



डावीकडून स्वातंत्र्यसैनिक मा. शाम पाटील, मा. खंडू शेळके, मा. डी. बी. पाटील क्रांतिवीर नागनाथअण्णा व मा. गोविंद सव्वाशे.



अण्णाचे फॅमिली डॉक्टर: डॉ.आनंद गायकवाड व सौ. गायकवाड



आमदार गणपतराव देशमुख व क्रांतिवीर नागनाथअण्णा.



क्रांतिवीर नागनाथअण्णा व सौ. कुसुमताई नायकवडी यांचा सत्कार करताना
मा. शामराव सव्वाशे, मा. वसंत पवार, मा. जयवंत अहिर व कार्यकर्ते.



क्रांतिवीर नागनाथअण्णा व न्यायमूर्ती पी. बी. सावंत, सौ. सावंत, सौ. कुसुमताई, श्रीमती राजुताई बिरनाळे



: काकी–हौसाबाई, सौ. कुसुमताई, क्रांतिवीर नागनाथअण्णा, : नातू–दिग्विजय कदम, गौरव नायकवडी, जयदीप कदम, मोहिल पाटील, नात– सुप्रिया कदम, प्रतिमा नायकवडी : नातू–वीरधवल, चि. वैभव, सून–नंदिनी, सून–सुषमा, नातू–अभिजित, चि. अरुण, मुलगी–प्रगती, जावई–उमाजी पाटील, सून–सुमन, नातू–केदारज्योती, चि. किरण, मुलगी–विशाखा, जावई–सुरेश कदम



क्रांतिवीर नागनाथअण्णा यांच्या ८० व्या वाढदिवशी सत्कार करताना
प्रा. ग. प्र. प्रधान, श्री. वसंत पवार, निळू फुले (भाऊ), मा. एन. डी. पाटील, मा. जयवंत अहिर,
सौ. कुसुमताई नायकवडी, कॉ. बाबूराव गुरव व मा. वैभव नायकवडी, (दि. १५ जुलै २००१)



क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. तुकाराम नाना खोत, मा. देवास (अनुसे) व कार्यकर्ते



भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'पद्मभूषण' पुरस्कार स्विकारताना क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी.



राष्ट्रपती भवनातील अशोका हॉलमध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णांचे अभिनंदन करताना पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह



भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्याहस्ते 'पद्मभूषण' पुरस्कार स्विकारताना क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी.




क्रांतिसिंह नाना पाटील पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करताना मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोबत क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी, सौ. कुसुमताई नायकवडी, ना. शरदचंद्रजी पवार, कृषीमंत्री(भारतसरकार) ना. पतंगरावजी कदम, ना. बाळासाहेब थोरात, ना. मदन पाटील, मा. आर. आर.(आबा) पाटील, व वैभवकाका नायकवडी.



हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर उभारण्यात आलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण प्रसंगी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील व क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी बातचीत करताना



शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी 'डी.लीट' पदवी प्रदान कार्यक्रमात कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे डॉ. सुखदेव थोरात, डॉ. सुधामुर्ती.

# पाचव्या आवृत्तीच्या निमित्ताने....

२३ फेब्रुवारी, हुतात्मा संकुलावर काळाने पुन्हा हल्ला केला पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचे सहकारी आणि त्यांचे चरित्रकार जयवंत अहिर उर्फ जयामामा अनंतात विलिन झाले. हा धक्का जिव्हारी लागणारा असा होता. जयामामा आणि हुतात्मा संकुल यांचे नाते अखंड होते. १९५७ पासून मामा अण्णांच्या संपर्कात आले आणि १९६४-६५ मध्ये त्यांचे संबंध दृढ होत गेले. अण्णांच्या स्वातंत्र्यानंतरच्या चळवळीत जया मामांनी हिरीरिने भाग घेतला अण्णांना त्यांनी अत्यंत जवळून पाहिले, न्याहाळले आणि त्यांना शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचे चरित्र साकारले.

जयामामा यांनी लिहिलेले अण्णांचे चरित्र ऐतिहासिक दृष्ट्या अधिक विश्वसनिय आहे. कारण ते चरित्र लिहित असताना त्यातील प्रत्येक घटना मामानी अण्णांकडून तपासून घेतली आहे. त्यातील अनेक घटनांचे ते स्वतः प्रत्यक्षदर्शी पूरावा आहेत त्यामुळे हे चरित्र म्हणजे इतिहासाचे अस्सल दस्ताऐवज आहे. मूळात अण्णांचे जीवन विलक्षण गतिमान आहे. त्यामुळे लेखकाच्या लेखनालाही तेज प्राप्त झाले आहे. चरित्र नायकाचे जीवन ओजस्वी असेल तर लेखकाच्या शब्दालाही धार येते. नेमके या चरित्र लेखनाबाबत असेच घडले आहे.

लौकिक अर्थाने हे चरित्र पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांचे असले तरी ते केवळ एका व्यक्तिचे नसून १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याचा हा धगधगता इतिहास आहे. या मध्ये नागनाथअण्णा यांच्या बरोबरीने त्यांच्या साऱ्या सहकाऱ्यांच्या पराक्रमाच्या गाथा कथित झाल्या आहेत. एक-एक प्रसंग वाचत असताना अंगावर शहारे येतात. हे चरित्र इतिहासाच्या अभ्यासकांना मार्गदर्शनपर ठरेलच पण देशासाठी कांहीतरी करणाऱ्यांसाठी एक उर्जा स्त्रोत्र ठरेल हे निश्चित.

आज पर्यंत या ग्रंथाच्या चार आवृत्या निघाल्या आहेत आज पाचवी आवृत्ती प्रकाशन करताना मामांची उणिव भासत आहे. पूर्वीच्या चारही आवृत्ती प्रमाणे वाचक याही आवृत्तीचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**वैभव नागनाथ नायकवडी**
अध्यक्ष,
पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी
गौरव समिती वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली.

## अनुक्रमणिका


१) चरित्र नायकाचे गाव.................................................. १

२) चरित्र नायकाचे मूळ घराणे ........................................ ५

३) चरित्र नायकाचा जन्म व बालपण................................. ८

४) शिक्षण........................................................................ १४

५) इंग्रजी जुलमी सत्तेच्या विरुद्ध बंड .................................. २१

६) राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात बेधडक उडी..................... २५

७) टपाल गाडी लूट.......................................................... ३७

८) हत्यार मिळवण्याचा निर्धार............................................. ३९

९) पे स्पेशल ट्रेन लूट....................................................... ५४

१०) भूमिगतांची सुटका मित्राला फटका.................................. ५९

११) प्रतिसरकार क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे योगदान............. ६३

१२) सातारचे चार गट........................................................ ६७

१३) सांगाव बंदुका गडप.................................................... ७१

१४) धुळे खजिना लूट (१४ एप्रिल १९४४)............................ ८०

१५) हत्यारांसाठी गोव्यावर दुसरी स्वारी................................. ९९

१६) सासरवाशीण तडफदार शूरकन्या शेवंता.......................... १०२

१७) उल्लेखनीय तुळसीचा कट्टा............................................ १०५

१८) सातारा जेल फोडून पसार............................................. १०८

१९) गोटखिंडी गावचा वेढा पार............................................ १२८

२०) गिल्बर्टच्या हातावर तुरी (२६ जानेवारी १९४५)................ १३२

२१) सांगाव बंदुका कोर्ट केस.............................................. १३७

२२) 'पुढारी'कार........................................................ १३९
२३) देशांतर्गत फौजी संघटना (१५ डिसेंबर १९४५)..................... १४१
२४) काळ आला होता; पण वेळ आली नव्हती.................... १५१
२५) सोनवड्याची लढाई (२५ फेब्रुवारी १९४६)..................... १५५
२६) दोन क्रांतिकारकांचा बळी (२२ मे १९४६)..................... १६९
२७) पोलिस खबऱ्याला शिक्षा............................................. १७६
२८) चलो हैद्राबाद............................................................ १७८
२९) क्रांतिसिंह सहकाऱ्यांसह प्रकट.......................................... १८१
३०) क्रांतिवीर नागनाथ अण्णा व एक लाखाचा निधी ............... १८४
३१) दैनिक 'नवयुग' विशेषांकातील दि.१२ मे१९४६ चा लेख.... १८८
३२) अभिप्राय......................................................................... १८९
३३) कांही महत्त्वपूर्ण मुलाखती............................................. २१६
३४) संदर्भ ग्रंथ सूची............................................................. २१७
३५) वंशावळ......................................................................... २१८
३६) हस्ताक्षर......................................................................... २२०
३७) क्रांतिवीर......................................................................... २२२

# चरित्र नायकाचे गाव

वाळवे गावाचे नाव वाळवा का पडले? या बद्दल गावातील वयस्कर जाणकार गावकऱ्यांच्या कडून एक आख्यायिका ऐकायला मिळते. फार वर्षांपूर्वी हा परिसर घनदाट जंगलाने व्यापला होता. हरतऱ्हेच्या मोठ मोठ्या उंच झाडांनी, वेलींनी इथले रान फुललेले होते. या घनदाट अरण्यातून कृष्णा नदी दुथडी, तुडुंब भरून वाहत होती. कृष्णा काठचे हे जंगल फळा फुलांनी बहरलेले होते. या जंगल झाडीत हरतऱ्हेचे रंगी-बेरंगी पक्ष्यांचे थवेच्या थवे आपली घरटी बांधून रहात होते. हरणांचे कळपाबरोबर इतर वन्य प्राणीही स्वच्छंद मनाने या ठिकाणी वावरत होते. अशा या मोहिनी घालणाऱ्या सुंदर वनात फिरत फिरत वाल्मीकी ऋषी आपल्या शिष्यगणांबरोबर आले होते. त्यांना हा परिसर खूप आवडला म्हणून त्यांनी येथे थोडे दिवस वास्तव्य करण्याचे ठरवले. आपल्या मनातील इच्छा त्यांनी शिष्यगणांजवळ व्यक्त केली. शिष्यगणांना आनंद झाला. त्या सर्वांनी इथेच रहाण्याचा निर्णय घेतला. आणि थोड्याच दिवसांत या ठिकाणी त्यांनी सुंदर आश्रम उभा केला. आश्रमाचे नित्य नियमाचे दैनंदिन कार्यक्रम सुरू झाले. हळू हळू वाल्मीकी ऋषीच्या आश्रमाची कीर्ती चोहीकडे पसरू लागली. जंगलामध्ये भटकणाऱ्या माणसांनी आश्रयासाठी आश्रमाच्या आसपास आपल्या झोपड्या बांधल्या आणि ते तिथे एकत्र राहू लागले. थोड्याच दिवसांत आश्रमाचे रूपांतर छोट्या खेड्यात होता होता गावात झाले.

पुढे कालांतराने काळाच्या ओघात वाल्मीकी ऋषी व त्यांचे शिष्यगण इथून निघून गेले. परंतु त्या काळात तिथे राहणाऱ्या लोकांनी वाल्मीकींची आठवण म्हणून त्या परिसरातील गावाला वाल्मीकी हे नाव दिले. अशिक्षित शेतकऱ्यांना वाल्मीकी ऋषीच्या नावाचा उच्चार करता येईना म्हणून ते लोक वाल्मीकी वरून या गावाला वाळवा म्हणू लागले. पुढे वाढत्या लोकांनी गरजेपोटी जंगल झाडी तोडली आणि तिथे सुपीक जमिनीचे पठार तयार केले. मर्यादित झाडी शेताच्या बांधावर जाऊन बसली. आजही काही जुनी माणसे वाल्मीकी ऋषीचे त्या काळातील पाण्याचे झरे या गावात आहेत म्हणतात. असे या गावाच्या नावासंबंधी एक मिथक आहे.

महाराष्ट्र सरकारने सर्व्हे करून ग्रामीण भागातील गावांची माहिती गोळा करून ती प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये वाळवे गावाबद्दल महाराष्ट्र स्टेट गॅझिटर जिल्हा सांगली पान नं.७५२ व ७५३ वर वाळवे गावाची माहिती दिली आहे. त्यात ते म्हणतात, ''शिराळा जिंकल्यानंतर शिवाजी महाराजांनी १६५९ मध्ये वाळवा काबीज केला. सन १६८४ मध्ये सुलतान मुअज्जम यांच्या नेतृत्वा खाली मुघल सैन्यानी कृष्णा नदीच्या काठी तळ ठोकला होता. या नंतर संभाजी राजांनी वाळवा हे गाव कोल्हापूरला जोडले. उदाजी चव्हाण यांच्यामुळे या गावची नासधूस झाली. त्या वेळी पंत प्रतिनिधींनी संभाजी राजे व उदाजी यांच्या कॅम्पला चकित केले. यशवंतराव थोरात हे या झटापटीत मारले गेले. या प्रसंगानी वाळवा येथील मराठे राजे वाळवा जिल्हा सोडून उत्तरेस वारणा व शाहू येथे गेले. त्यानंतर कुसाजी भोसले यांना इस्लामपूर येथे वाळवा ठाण्याचा चार्ज दिला. मोहमेडी लोकांनी येथील लोकांना हुसकाऊन लावले. रामचंद्र पंत आमात्य यांनी १६९० साली हे ठाणे विशाळगड व पन्हाळगड यांच्या अंमलखीत आणले. थोरात सरकारचे कुटुंब हे प्रथम छत्रपती शाहू १७०८ ते १७४९ यांच्या काळात निदर्शनास आले होते. कुसाजी भोसल्यांचे पहिले उल्लेखनीय थोरात सरकार हे त्यांचे सरनोबत होते. वाळवे जिल्ह्याचा चार्ज पुन्हा बाळाजी बाजीराव तिसरे पेशवे (१७४०- १७६१) यांनी थोरात सरकारना दिला. तो अंमल ब्रिटिश राजवटीत १८१८ पर्यंत मिळाला. १७९० च्या महसूल नोंदीत वाळवा गावचा उल्लेख एका रायबाग सरकारातील परगणेचे मुख्य केंद्र म्हणून आढळतो व त्यांचा महसूल सुमारे ७५०००/- रु. होता.''

रंगो बापूजी गुप्ते यांचे १८५७ च्या लढ्याचे गुप्ततेचे मुख्यालय सज्जनगड असले तरी वाळवे गावी मुख्य केंद्र होते.

या शिवाय १८७५ मध्ये कृष्णेला मोठा पूर आला होता. त्या वेळी  गावाची वस्ती १/२ कि. पश्चिमेस सरकवली आहे. तरी देखील येथील लोक या परिस्थितीचा फायदा घेऊ शकले नाहीत. 'जागृत सातारा' या पुस्तकाच्या पान नं.४८ व ४९ वर उल्लेख केल्या प्रमाणे वाळव्याच्या छोट्या काँग्रेसचे 'मिनी अधिवेशन' ज्याला म्हणता येईल ते १८९३ साली वाळवे येथेच राष्ट्रीय सभेचे जनक ह्युम साहेब यांचे नेतृत्वाखाली २६ नोव्हेंबर १८९३ रोजी झाले. प्रतोद, वृत्तसार केसरी, इंद्रप्रकाश, ज्ञानप्रकाश यांच्या वृतपत्राचा सारांश असा देता येईल.

ह्युमसायबांनी वाळव्याच्या सभेची दाद इंडिया मासिकातून बरीच दिली होती. दादासाहेब करंदीकर व रावसाहेब लिमये यांनी खटपट केल्यावर मार्गन ब्राऊन यास घेऊन ह्युमसाहेब वाळव्यास आले. थोरात सरकारांचे वाड्यात चहापानाचा कार्यक्रम झाला. इस्लामपूरचे मंत्री व निजामचे सरदार रायरंभाराव व दत्ताजीराव हजर होते. शेतकऱ्यांच्यासह सरदार इनामदार काँग्रेसच्या कार्यास साह्य करत असल्याबद्दल आपणांस आनंद होत असल्याचे ह्युम सायबांनी बोलून दाखवले.

या अधिवेशनाचा मंडप कृष्णेच्या दक्षिण भागास घातला होता. क्षेत्रफळ दहा हजार चौरस फूट होते. सातारा, वाई, तासगाव, कराड, बेळगाव, इचलकरंजी, कोल्हापूर, पुणे वगैरे ठिकाणाहून २०० मंडळी अधिवेशनास आली होती. त्यात लोकमान्य टिळक, गोखले, ना.म.जोशी, आपटे, साने, कुलकर्णी, रानडे होते. ज्ञान प्रकाश, प्रतोद विद्याविलास वृत्ताचे रिपोर्टर होते. दहा हजार शेतकरी समूह हजर होता. रावसाहेब लिमये स्वागत करताना म्हणाले,''ही सभा राष्ट्रीय सभेचे चित्र आहे. आज जो शेतकरी येथे जमला आहे त्यावरून राष्ट्रीय सभा म्हणजे काय हे त्यांना कळले आहे किंवा नाही हे कोणासही अनुमान करता येईल. मग कुबिरांनी सुचवले आणि देसाईंनी अनुमोदन दिले'' तेव्हा सरदार भाऊसाहेब थोरात हे अध्यक्ष झाले नंतर बोरगावच्या चिटणिसांनी सभा शेतकऱ्यांचा फायदा कसा करेल हे सांगून ह्युम सायबांना मानपत्र देण्याचा ठराव मांडला. त्याला का.व्य.तगारे यांनी अनुमोदन दिले. मग वाळव्याच्या लोकांचे मानपत्र गणेश हरी हर्डीकर यांनी वाचले. नंतर  दत्तोपंत पारसनीस कृत कीर्तिध्वज पुस्तकासह अर्पण करण्यात आली. बळवंतराव कोल्हटकरानी ह्युमसायबांच्या उद्योगाविषयी आवेशपर वाणीने चांगला ग्रह उमटविला मग ह्युमसाहेब म्हणाले, ''काँग्रेस श्रीमंत लोकांकरिता स्थापली नाही. ती गरिबांकरिता की, ज्यास खावयास पोटभर अन्न नाही अशांकरिता आहे. ही सभा एक प्रकारचे सरकार आहे. तिला मदत करा. काँग्रेसशी

एकनिष्ठपणे वागत जा म्हणजे गरीब शेतकरी, मजूर यांचे दु:ख निवारणार्थ ती उपयोगी पडेल. हे मी खात्रीने सांगतो.'' लोकमान्य टिळकांनी सभेची प्रशंसा करुन सांगितले. काँग्रेस गरिबांकरता आहे आपल्या दु:खाचे निवारण करणारी माणसे तिच्याद्वारे उत्पन्न होतील, नंतर सातारचे सहस्रबुद्धे, करंदीकर व तासगावचे नातू बोलले. त्या सभेत दोघा शेतकऱ्यांनी महाराज आमची पिके टोळांनी खाल्ली. आमचा सारा कमी करा असे सांगितले. पुढे वाळव्याच्या या छोट्या काँग्रेसच्या मिनी अधिवेशना सारखी अनेक अधिवेशनं ठिकठिकाणी झाली.

थोर पुरुषांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कर्तबगार माणसांचा असा सुंदर सुसंस्कृत विचारांचा समृद्ध वाळवा गाव आणि ते मंतरलेले दिवस होते.

# चरित्रनायकाचे मूळ घराणे

ही कथा सुरू होते ८६ वर्षांपूर्वी वाळवे नावाच्या एका खेड्यात सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या एका थोर स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिवीराची.

वाळवे गाव सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात, पवित्र अशा कृष्णा काठच्या सुपीक प्रदेशात वसलेले आहे. या गावाला ब्रिटिश आमदानीत फार महत्त्व होते. चरित्र नायक क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांचा जन्म वाळवे गावात झाला असला तरी त्यांच्या घराण्याचा मूळ पुरुष रायाजी हे मुंगी पैठण मध्ये रहात होते. सध्या हे नगर औरंगाबाद जिल्ह्यात आहे. मुंगी पैठण हे महाराष्ट्रातील पवित्र नगर असून, गोदावरीच्या काठावर वसलेले आहे. सातवाहनकाळी ही नगरी सातवाहन राजाची राजधानी होती. त्या काळात सातवाहन राजाने विद्या व कलेला राजाश्रय दिलेला होता. पुढे सातवाहन राज्यानंतर वाकाटाक, चालुक्य, राष्ट्रकूट, या वंशाच्या काळात पैठण दुर्लक्षित झाले. त्यानंतर यादव काळात या नगराचे महत्त्व धर्मपीठ म्हणून वाढले. काही काळ या नगरीचा ''दक्षिण काशी'' म्हणूनही उल्लेख होत होता. यादवानंतर पैठणवर ब्राम्हणी, मोगल, निजामशाही, मराठे व पुन्हा निजामशाहीचे आधिपत्य होते. जुन्या काळात अनेक संत व कवी पैठण मध्ये वास्तव्य करून होते. त्यांपैकी चक्रधर, एकनाथ, भानुदास, मुक्तेश्वर, बहेरा ज्ञानदेव, चिमणा पंडित इ. सध्याच्या परिस्थितीत काही तीर्थक्षेत्रे जायकवाडी धरणाच्या पाण्याखाली गेली आहेत. एकनाथाचे मंदिर पैठण नगरीच्या उत्तरेस गोदावरी नदीच्या काठी असून त्याचे समोर एकनाथांची समाधी आहे.

या समाधीच्या दोन्ही बाजूंस हरिपंडित व चक्रमाणी यांच्या समाधी आहेत. गोदावरीचा घाट अतिशय सुंदर असून त्याला नाग घाट म्हणतात. यापैकी एका घाटावर ज्ञानेश्वर महाराजांनी रेड्याकडून वेद म्हणवून घेतला अशी आख्यायिका आहे. याशिवाय जरतारी कापड विणकामात पैठण अग्रेसर आहे. येथे महाराष्ट्रातील भरजरी वस्त्रकलेचा एक उत्कृष्ट पारंपरिक प्रकार आहे. गृहलक्ष्मीचा साज पैठणीने संपन्न करण्याची परंपरा महाराष्ट्रात दिसून येते. गेली दोन हजार वर्षे पैठण हे या कलेचे केंद्र आहे. पैठण नावावरून पैठणी हे नाव या महावस्त्राला मिळाले. जुनी पैठणी सोळा हात लांब व चार हात रुंद असून तिच्या काठ पदरावर वेलबुटी किंवा पशुपक्ष्यांच्या प्रतिमा असत. त्या महावस्त्राचे वजन ३ किलो ३०० ग्रॅम पर्यंत असे. एका पैठणीसाठी साधारणत: बावीस तोळे चांदी बरोबर सहा, आठ, बारा ते क्वचित प्रसंगी आठरा मासे (१७.४) सोने वापरण्यात येई. अशी तयार झालेली पैठणी सुमारे १०० वर्षांपर्यंत टिकत असे. अशा ह्या पवित्र नगरीत नायकवडी घराण्याचा मूळ पुरुष रायाजी आनंदाने रहात होता. त्या ठिकाणी त्यांना ३२ एकरांचे वतन होते.

इ.स.९६७ मध्ये रायाजी व मुस्लिमांच्या मध्ये युद्ध झाले त्यात रायाजींनी सात मुसलमानांना ठार मारले. या घटनेमुळे रायाजींना मुंगी पैठण सोडावे लागले. तेथून ते दक्षिणेकडे निघाले ते सरळ कृष्णा-कोयनेच्या पवित्र अशा संगमाच्या कराड नगरीत येऊन दाखल झाले. तिथे स्वबळावर ३० एकरांचे वतन मिळविले. परंतु कराड नगरीत ते फार काळ राहू शकले नाहीत. पुढे ते कराड नगरी सोडून कृष्णा-वारणेच्या खोऱ्यात, येलूर या गावात येऊन स्थायिक झाले. थोड्याच दिवसांत रायाजींना दोन पुत्र झाले. त्यांच्या थोरल्या मुलाचे नाव यसाजी व धाकट्याचे नाव कुशाजी पुढे रायाजींच्या कर्तृत्वाने त्यांचेकडे येलूर गावची पाटीलकी आली. त्यामुळे त्यांना बोगर पाटील या नावाने लोक ओळखू लागले. थोड्याच दिवसात काही कारणामुळे गाव कामगार तलाठी व कुलकर्णी यांचे बरोबर रायाजींच्या मुलांचे भांडण झाले. त्या भांडणात कुलकर्ण्यांचा पाय तोडला. या घटनेमुळे कुशाजींनी गाव सोडले आणि ते वाळव्याला येऊन स्थायीक झाले. वाळव्यात आल्यानंतर त्यांना एक पुत्र झाला त्याचे नाव आप्पाजी. अशा पद्धतीने पुढे नायकवडी घराण्याचा वंश वाळव्यात वाढत होता. आप्पाजींचा पुत्र बाळू, बाळूला पाच मुले झाली त्यापैकी थोरला पिराजी, शिवाजी, जोती, केदार, लिंबाजी यापैकी थोरल्या पिराजीचा वंश वाढला, त्यांना एकच पुत्र झाला. त्यांचे नांव नारायण, नारायणचा पुत्र जोती, जोतीचा पुत्र गणपती, गणपतीला चार पुत्र झाले. थोरला कृष्णा, दुसरा रामचंद्र, तिसरा चंद्रोजी (निवृत्ती) आणि चौथा ईश्वरा ऊर्फ यशवंता अशी

त्यांची नावे होती. त्यापैकी थोरले कृष्णा चुलत्याच्या वट्यात दत्तक गेले व तिसरे चंद्रोजी (निवृत्ती) प्लेगात वारले आणि चौथे ईश्वरा ऊर्फ यशवंता त्यांची तब्येत बिघडल्यामुळे लग्नानंतर थोड्याच दिवसांत अल्पशा आजाराने मरण पावले. साहजिकच रामचंद्र नायकवडी हे आपल्या मूळ घराचे व शेती जमिनीचे वारस झाले.

रामचंद्र गणपती नायकवडी हे चरित्र नायक नागनाथ अण्णांचे वडील, त्यांना सर्वजण बापू म्हणत होते. बापू अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक, गोरगरिबांना मदत करणारे, सच्चा सचोटीचे शेतकरी म्हणून आसपासच्या चार खेड्यांत त्यांचा नाव लौकिक होता. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई, त्यांचे माहेर मिरजवाडी होते. लक्ष्मीबाईचे वडील, संभाजी साळुंखे हे लष्करात सुभेदार होते. रामचंद्र (वडील) व लक्ष्मीबाई (आई) या दोघांना एकूण चार अपत्ये झाली. पैकी पहिली दोन लहानपणीच अल्पशा आजाराने मरण पावली होती. तिसरे चरित्र नायक नागनाथ अण्णा आणि चौथे शामराव आप्पा. दोन मुलगे, पत्नी लक्ष्मीबाई असा छोटासा परिवार वाळवे गावात आनंदाने रहात होता.


# चरित्रनायकाचा जन्म व बालपण

पावसाळ्याचे दिवस होते. कुंडलच्या दिशेला पाऊस उठलेला दिसत होता. सूर्य मावळतीकडे झुकलेला,रानातून घराकडं येण्याची घाई शेतकऱ्यांची दिसत होती. घराच्या ओढीनं बैलं झपाझप पावलं उचलत होती. रानपाखरांचे रंगीबेरंगी थवे आपली घरटी जवळ करत होती पांढऱ्या,काळ्या ढगांच्या मधून दिवस डोंगराआड झाला. हळूहळू अंधार प्रकाशाला गिळत होता आणि त्याच वेळी आकाशात चंद्र उगवला होता, त्याला काळ्या कुट्ट ढगांनी आपल्या पोटात दडवला होता. पाऊस रिमझीम पडत होता. रानातून गारठून आलेले शेतकरी शेकोटीजवळ विसावले होते. त्यांच्या अंगात थोडीशी ऊब आली होती. ती मंडळी सोप्याला बसून पान खात होती. बाया बापड्या भांडी कुंडी करून स्वयंपाकाच्या नादाला लागल्या होत्या. तर काही म्हातारी माणसं चिलीम ओढत होती. पावसाचा जोर जरा कमी झाला म्हणून बापू (चरित्र नायकाचे वडील) त्यांना लहान थोर सर्वजण बापू म्हणत होते. ते सोप्यातून उठले आणि जनावरांना चारा पाणी करण्यासाठी गोठ्यात गेले. पावसामुळे गारठलेली जनावरे थोडं थोडं पाणी प्याली. बापूंनी त्यांना वैरण टाकली. जनावरांची दावी निट असल्याची एकदा खात्री केली आणि हात पाय धुऊन माजघरात आले, जेवणाचे ताट तयार होते. जेवण झाल्यावर बापू सोप्यात माचावर झोपले. चरित्रनायकाची आई लक्ष्मीबाई आणि आजी यांनीही जेवण केले आणि माजघरातील अंथरुणावर लक्ष्मीबाई कलंडल्या. त्यांच्या आई जवळच होत्या. रोजच्या पेक्षा मुलीचे वेगळेपण

त्यांनी ओळखलं म्हणून त्या त्यांच्या जवळ बसलेल्या होत्या. थोड्या वेळाने मुलीचा डोळा लागला. तिच्या अंगावर पाघरूण घातलं आणि त्याही तेथेच कलंडल्या. शेजारी कंदील बारीक करुन ठेवलेला होता.

मध्यान टळून गेली तरी अजूनही पावसाच्या सरीवर सरी चालूच होत्या. तासाभराने पाऊस थांबला. आता मात्र अधून-मधून चार दोन काळे ढग सोडले, तर आकाश पांढऱ्या शुभ्र ढगांनी व्यापलेले होतं. चंद्रमा मावळतीकडे झुकलेला स्पष्ट दिसत होता. कृष्णामाई तुडुंब भरून वहात होती. अजूनही ती शांतच होती. मधेच चंद्रमा आपले तोंड कृष्णामाईच्या तुडुंब भरलेल्या पाण्याच्या आरशात पहात होता. अधे-मधे वीज कडाडत होती. मध्येच चंद्र काळ्या ढगाआड दडायचा, पांढऱ्या ढगातून बाहेर यायचा, असा लपाछपीचा त्याचा खेळ चालू होता. बघता बघता ढगानं आकाश अंधारून आलं आणि मुसळधार पाऊस पडू लागला. घटकाभरात तो थांबला आणि पहाटेचा गार वारा सुरू झाला. आभाळात लुक लुक चांदण्या दिसायला लागल्या. चांदण्या रात्री मोत्यांचा सडा पडावा असा भास होऊ लागला. पहाटेच्या गार वाऱ्यानं गोठ्यातली जनावरे जागी झाली. त्यांच्या गळ्यातील सोन साखळीतली घुंगरं बोलू लागली. खुराड्यातल्या कोंबड्यानं बांग दिली. घराघरांतल्या सासरवासीनी जाग्या झाल्या. गोड गीतांच्या आवाजानं घरातील जाती फिरू लागली. ती पोटातलं पांढरं शुभ्र पीठ देऊ लागली. एक घटका झाली, जात्याची घरघर शांत झाली. बघता-बघता तांबडं फुटलं, बाया बापड्या अंगण झाडून सडा टाकत होत्या, तर काही बायाबापड्यांची गाई म्हैशीच्या पाडसांना सावरता सावरता पंचायत होत होती. त्यांनी त्यांची एकदाची दावी खुंट्याला बांधली आणि दुधाच्या कासांड्या घरात घेऊन गेल्या. इकडे दिवसाचा गोंडा फुटला. वळचणीच्या निवाऱ्याला बसलेली रंगी बेरंगी पाखरे आकाशात भुर्रकन उडून गेली. आकाशात सोनेरी किरणांबरोबर सोन्याचा दिवस उगवला. तो दिवस १९२२ सालातील जुलै महिना, तारीख १५ होती. या शुभदिनी लक्ष्मी मातेने सद्दृढ अशा एका सुपुत्राला जन्म दिला. जुलमी इंग्रजी सत्तेच्या सिंहासनाला हादरा देणारा क्रांतिसूर्य नागनाथ नायकवडी (अण्णा) यांचा वाळवा, ता.वाळवे जि. दक्षिण सातारा (सध्याचा सांगली जिल्हा) या ठिकाणी जन्म झाला. नागनाथाच्या मातोश्री लक्ष्मीबाई या, मुलाच्या बारशाची आठवण सांगताना त्या म्हणाल्या, ''नागनाथांच्या बारशाचा कार्यक्रम सुरू होता. त्यावेळी मुलाचे नाव काय ठेवायचे याची चर्चा जमलेल्या आया बायांत सुरू होती. मी त्यांना सांगितले मुलाचे नाव नागनाथ ठेवा. मी नागदेवतेला नवस बोलले आहे. हे नागदेवते, मला मुलगा होऊ दे. मी मुलाचे नाव नागनाथ ठेवेन''

हे त्यांनी सांगितल्यावर सर्वांना ते नाव पसंत पडले. पाळण्यात आपल्या बाळाकडे पाहून लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''माझं बाळ मोठं होऊ दे. त्याचं साऱ्या प्रीतीमीत नाव गाजूदे.'' लक्ष्मीबाईंचा आशीर्वाद खरा ठरला.



चरित्रनायकाचे नामकरण

साऱ्यांना या नवजात अर्भकाने मोहून टाकले. शरीर धष्ट पुष्ट होते. रुंद कपाळ, तरतरीत नाक, तेजस्वी डोळे, काळेभोर जावळ, गव्हाळी रंग, शरीराचा बांधा मजबूत, दिवसेन दिवस, महिने मागं टाकत बाळ वाढू लागले. अंगणात खेळू बागडू लागले. नागनाथ सर्वांचा लाडका मुलगा होता. त्यांच्यात मुलखाचा अवखळपणा होता. त्यांना कशाचीही धास्ती वाटत नव्हती. सवंगड्यांबरोबर हुदुड्या मारण्यापासून ते सूर पारंबी, विटी दांडू खेळण्यापर्यंत त्यांना सर्व खेळ आवडत होते. त्यांनी अनेक मित्र मिळवले होते. एका फिरस्त्या भविष्यकाराने अण्णांच्या आईला सांगितले तुमच्या मुलास पाण्यापासून धोका आहे. तेंव्हा त्याना पाण्या पासून जपा. म्हणून आई अण्णांना पाण्यापासून फार जपायच्या. तरी अण्णा चोरुन मारुन पोहायला शिकले आणि खेळायला जातो म्हणून मित्रांचे बरोबर नदीला, विहिरीला पोहायला जायचे.

आष्टे गावाखाली एकूण तेरा वाड्या आहेत. त्या पैकी मिरजवाडी हे नागनाथांचे आजोळ. त्यांना आजोळला आजोबांचेकडे जायला, तिथे एक-दोन दिवस रहायला फार आवडायचे. त्यांचे आजोबा मिलिटरीत सुभेदार हुद्द्यावर काम करत होते. नोकरी निमित्त ते कलकत्त्यात असताना १९०१ साली लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. त्यांचे बालपण व इयत्ता चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण कलकत्ता येथे झाले. त्यांचे बालपणी मोठ मोठ्या मिलिटरी ऑफिसरांच्या मुला-मुलींच्या सहवासात, खेळण्या बागडण्यात गेले. त्यांनी लहान वयात हजारो रायफलधारी घोडेस्वारांच्या परेड जवळून पाहिल्या होत्या. बंदूक व तोफांचे आवाज, विमानातून होणारे बॉम्ब वर्षाव, मिलिटरी कॉलनी वरून जाणारा विमानांचा ताफा (तांडा), लोकांची होणारी धरपकड, गोळीबार, लाठी चार्ज, अश्रुधुरांची नळकांडी असे हे प्रकार त्यांनी अनुभवले होते. त्यामुळे त्यांना कसलीच भीती वाटत नव्हती. लक्ष्मीबाईंचं धाडस वाखाणण्यासारखं होतं. आईचे वडील जेवढे प्रेमळ, तेवढेच रागीट होते. असाच एक वेळचा प्रसंग. लहानपणी नागनाथ अण्णा आजोबांचे बरोबर औदुंबरच्या यात्रेत गेले होते. जत्रेतून फिरता फिरता आजोबांनी नागनाथला विचारले, ''अरे नागनाथा, तुला खायला काय पाहिजे? 'ते म्हणाले,' ''आजोबा, मला चिरमुऱ्याचे लाडू द्या.' आजोबा कडाडले. थोबाडात देण्यासाठी त्यांनी हात उगारला,'असलं घाणेरडं खायला मागतोस?' रुसलेल्या नागनाथला समजावत ते म्हणाले,'' ''अरे बाबा खायचे तर काजू, बदाम, पेढे खायचे असतात. बघ त्या चिरमुऱ्याच्या लाडवावर कशा माशा घोंगावताय आणि ते बघ, पेढे, काजू, बदाम कसे काचेच्या बंद बरणीत ठेवलेत. काजू, बदाम, पेढे खाल्ल्यावर अंगात ताकद वाढते.'' असे समजावत त्यांनी त्याला काजू, बदाम, पेढे खायला घेऊन दिले. परत एक वेळ त्यांना प्रेमाने ताकीद केली. पुन्हा चिरमुऱ्याचे लाडवासारखे पदार्थ खायला मागायचे नाहीत. अशा संस्कारात नागनाथ अण्णा घडत होते.

नागनाथ अण्णांचे वडील रामचंद्र गणू नायकवडी यांना लहान थोर सर्व मंडळी बापू म्हणत होते. ते सरळ स्वभावाचे शेतकरी होते. तसेच ते आसपासच्या चार खेड्यापाड्यांत, गोरगरिबांना मदत करणारा सच्चा सचोटीचा प्रामाणिक तत्त्वनिष्ठ, न्यायप्रेमी, सत्यनिष्ठ शेतकरी म्हणून परिचित होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक गोर गरिबांचे प्रपंच मार्गी लावले होते. आपल्या मुलांनीही आपल्याप्रमाणे प्रामाणिकपणे वागावे म्हणून त्यांना सतत सांगत होते. बापू जसे प्रेमळ होते तसेच चुकीसाठी रागाने बेफाम व्हायचे. त्यावेळी ते मागचा पुढचा काहीच विचार करत

नसत. एक वेळचा नागनाथ अण्णांचे बालपणातला जिवावर बेतलेला प्रसंग, त्यांचे शेत अगदी घराला जवळ आहे. सहज शेताकडे फेर फटका मारावा आणि ओल्या भुईमुगाच्या शेंगा खाव्यात म्हणून शेताकडे गेले. शेतातून फिरून झाल्यावर परत येता-येता भुईमुगाच्या चार शेंगाचे वेल उपटले आणि शेंगा खात खात घराकडे यायला लागले होते. घरा शेजारी रानातच जनावरे बांधली होती. बापू (वडील) बैलांना वैरण पाणी करत होते. एवढयात शेजारचा शेत मालक ज्ञानू (दादा) नायकवडी लांबून ओरडतच बापूंच्याकडे यायला लागला. ''अहो राम बापू, बघाकी तुमच्या नागनाथाने आमच्या शेतातले भुईमुगाचं वेल उपटले.'' पुढे तो शेतकरी काय बोलतोय याकडे लक्ष न देता बापू रागाने ओरडत पळतच नागनाथाचे जवळ गेले आणि मागचा-पुढचा विचार न करता हातातले खुरपे मुलाचे मानेवर इतक्या जोराने मारले की नागनाथाचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यांनी हात मानेवर आडवा केला म्हणून वार हातावर बसला. हातावर खोलवर जखम झाली. सारा हात रक्तबंबाळ झाला. नागनाथ अण्णांचे रडण्याने व बापूंच्या जोर जोरात बोलण्याच्या आवाजाने गल्ली गोळा झाली. रस्त्याने जाणारे-येणारे लोक जमा झाले. बापूंच्या व नागनाथ अण्णांचे आजू बाजूला तोबा गर्दी झाली. बापू रागाने बेफाम झाले होते. ते आणखीन नागनाथ अण्णांना मारण्याच्या पवित्र्यात होते, एवढ्यात गर्दीतून बापूंचा समवयस्क शेतकरी आला. पाहिल्यांदा त्याने बापूच्या हातातले खुरपे हिसाकावून घेतले आणि मुलाला सोडवून घेतले. तो शेतकरी बापूंना रागवून म्हणाला, ''आरं रामबापू, चार वेलासाठी पोराच्या जिवावर उठलास? तुला कधी कळायचे, किती केलं तरी ती खायची वस्तू आणि पोर लहान हाय, त्याला काय कळतयं?'' 'पोर लहान हाय' म्हटल्यावर बापूंचा रागाचा पारा जास्तच चढला आणि त्या मित्राच्या दंडाला धरून त्याला म्हणाले, ''तू याला लहान आहे म्हणतोयस, मग इथं आपला चार एकर भुईमूग असताना तालीच्या पलीकडं जाऊन दुसऱ्याच्या शेतातल वेल उपटायचं याला कसं कळलं आणि 'वर लहान हाय म्हण.' आरं बाबा याला शेंगा खायच्या होत्या तर यानं आपल्या शेतातलं एका सवन कितीही वेल उपटले असते तर याला कोण काय म्हटले असते का?'' अशा स्वभावाच्या बापूंच्या मुशीतून नागनाथ अण्णा तावून सुलाखून निघत होते.

रात्रीचं जेवण खाणं झाल्यावर बापू पडवीत पान खात बसलेले होते. बापूंचा राग आता शांत झाला होता. नागनाथ अण्णांच वय लहान असलं तरी त्यांची समज दांडगी होती. त्यांना आपली चूक लक्षात आली होती. ते बापूंच्या

जवळ गेले आणि बापूंना म्हणाले, ''बापू,माझी चूक झाली. यापुढे मी असली चूक कधीही करणार नाही'' बापूंनी नागनाथ अण्णांना जवळ घेऊन पोटाशी धरले. तोंडावरून हात फिरवीत म्हणाले, ''नागनाथ. मी काय सांगतोय ते नीट ऐक आणि त्याप्रमाणं वाग. त्यात तुझ्या आयुष्याचं कल्याण होईल, हे बघ नागनाथ, आलं गेलं, पै पावनं रानचं चिट पाखरु या समद्यानी खाऊन-पिऊन जे राहील ते आपलं. ते आपल्या पोटापुरतं हाय, तवा आपण कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही आणि कुणाच्या सुतळीच्या तोड्याची अपेक्षा करायची नाही.'' बापूंच्या या एका साध्या वाक्यात रामायण, महाभारत, साधुसंतांची आणि सत्त्वशील थोर पुरुषांची सर्व तत्त्वे भरून उरल्यात हे नागनाथ अण्णांनी ओळखलं आणि त्यांनी आपल्या वडलांचेकडून प्रामाणिकपणा सचोटी, साधेपणा, नि:स्पृहता, सत्यानं वागणं, अडीअडचणीत असणाऱ्या गोरगरीब, पीडित, दीनदुबळ्या लोकांना मदत करणे हे गुण घेतले. आईकडून स्वाभिमान, करारीपणा, अन्यायाविरुद्ध कसल्याही संकटाची पर्वा न करता बंड करण्याची प्रवृत्ती घेतली होती. अशी नागनाथ अण्णांच्या जीवनाची जडण-घडण आईच्या मायेत व वडिलांच्या कडक शिस्तीच्या संस्काराखाली होत होती.

# शिक्षण

नागनाथ अण्णांना एक धाकटे भाऊ होते. त्यांचे नाव शामराव होते. त्यांना सर्वजण आप्पा म्हणत होते. आप्पांचा स्वभाव शांत व मनमिळाऊ होता. नागनाथ अण्णा मूळचेच बंडखोर, त्यागी वृत्तीचे, दुसऱ्याच्या आनंदात स्वतःचा आनंद बघण्याची दिव्य दृष्टी, परोपकारी वृत्ती, नेतृत्वाचे गुण उपजतच त्यांच्या अंगात होते. त्याच बरोबर ते कुशल संघटक होते. अन्यायाची चीड असणारे तापट व हेकेखोर स्वभावाचे होते. त्यांच्या वडिलांची परिस्थिती खाऊन-पिऊन समाधानाची होती पण रोकड पैशाची चण-चण असायची. नागनाथ अण्णांचे शाळेत जाण्याचे वय झाल्यावर बापू म्हणाले, ''नागनाथ, तुम्हा दोघांना शाळेत घालण्याइतपत माझी परिस्थिती नाही, तुमच्या दोघांपैकी एक जणाने शाळेला जायचं आणि एकानं माझ्याबरोबर शेती भातीचा उद्योग करायचा. हे तुम्ही दोघांनी ठरवा आणि मला काय ते सांगा.'' नागनाथ अण्णा म्हणाले, ''बापू, मी शाळेला जाणार.'' शामराव आप्पांना लहानपणापासूनच गाडी बैलाचे वेड होते. त्यामुळे ते म्हणाले, ''बापू , मी तुमच्या बरोबर रानात येणार, मी शाळेला जाणार नाही.'' साहजिकच नागनाथ अण्णांचे बापूंनी शाळेत नाव घातले. ते शाळेला जायला लागले. बापू म्हणाले, ''नागनाथ, आपल्याला जास्त शाळा शिकून काय नोकरी करायची नाही. चावडी चवथरा भरायपुर्ती शाळा शीक आणि कुस्ती खेळ.'' लक्ष्मीबाई करारी बाण्याच्या होत्या. त्यांनी आपल्या मालकांना (बापू) ठामपणे सांगितले, ''नागनाथला खूप शिकवायचे. मध्येच त्याचे शिक्षण बंद करायचे नाही. मी त्याला कलेक्टर करणार हाय.''

नागनाथ अण्णांनी वयाच्या आठव्या वर्षापासून नाना पाटलांचे कडून भारतमातेच्या स्वातंत्र्याचे धडे घेतले. त्यांनी १९३० सालची चळवळ जवळून पाहिली. नाना पाटलांचे वाळव्याला जाणे येणे होते. वाळव्याच्या माळावरच्या मारुतीच्या देवळाच्या पटांगणात नाना पाटील यायचे. शड्डू मारून छत्रपती शिवाजी महाराजांच्या

नावाची घोषणा द्यायची. घोषणा ऐकून जो मुलगा प्रथम यायचा, त्याच्या हातात तिरंगा झेंडा द्यायचा व त्याला रांगेत सर्वांत पुढे उभे करायचे, फेरी काढायची, जाहीर सभा घ्यायचे व पुढल्या गावाला जायचे. हा रिवाज सर्व गावांसाठी नाना पाटलांनी केला होता. वाळव्यातला मान मात्र नागनाथ अण्णांनी कधीही सोडला नाही. नाना पाटील अत्यंत साध्यासोप्या अशा बोली भाषेत, शेतकऱ्याला समजेल अशा पद्धतीने लोक जागृतीच्या सभा घेत. ज्या ज्या वेळी नाना पाटलांच्या अशा सभा वाळव्यात झाल्या त्या त्या सभा नागनाथ अण्णांनी सर्वांच्या पुढे बसून ऐकल्या होत्या. तेव्हापासूनच देशस्वातंत्र्याचे बाळकडू नागनाथ अण्णांनी आपलेसे करून घेतले होते. नाना पाटलांच्या भाषणांनी त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरवले होते. वाळव्याचे विनायकराव (दादा) थोरात हे १९३० सालच्या राष्ट्रीय चळवळी पासून स्वातंत्र्याच्या संग्रामात आघाडीवर काम करत होते. ते महात्मा गांधीचे सच्चे सचोटीचे शिष्य होते. १९३० सालच्या राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली. ती शिक्षा ते येरवडा जेल मध्ये भोगत होते. अशा देश भक्ताच्या बद्दल नागनाथ अण्णांचे मनात आदर भाव होता. आपला देश स्वतंत्र झाला पाहिजे ही जाणीव लहानपणीच त्यांच्यात आली होती. देश प्रेमाचे निखारे असेच फुलत राहिले.



क्रांतिसिंहांची घोषणा ऐकून प्रथम तिरंगा मिळवण्यासाठी धावणारे अण्णा

नागनाथ अण्णांचा नित्य नियमाने आपल्या घरात पाणी भरणे, नंतर गांवदरीच्या शेताकडे फेर फटका मारणे, दररोजच्या दररोज वेळेवर शाळेला जाणे, अभ्यास करणे, तालमीत जाऊन दररोज व्यायाम करणे हे दररोजचे कार्यक्रम नियमितपणे चालू होते. याला एक वेळचा अपवाद. आईच्या आग्रहामुळे शाळा चुकवली. आई म्हणाल्या, "आज यल्लामा देवीची यात्रा आहे. देव कचात पडणार, देवाला निवद नारळ दे आणि देव कसा कचात पडतोय ते बघ, देवीच्या पाया पडून घरी ये." म्हणून आईच्या आग्रहाने त्यांनी

शाळा चुकवली. त्यांचे इतर वर्ग मित्र शाळेला गेले आणि रेणुकामातेच्या यात्रेच्या कार्यक्रमालाही आले. ही गोष्ट ज्यावेळी त्यांच्या लक्षात आली. आईचं ऐकून आपण शाळेला गेलो नाही ही चूक केली. ते तडक आईजवळ गेले. त्यांनी आईला विचारले, ''माझी तू शाळा का चुकवलीस? सांग. देवीची यात्रा म्हणून सांगितलस, माझ्या बरोबरीची पोरं शाळेलाही गेली आणि देवीच्या यात्रेलाही आली. तू मात्र माझी शाळा निष्कारण चुकवलीस. असे का केलेस? सांग.'' म्हणून नागनाथ अण्णांनी आईच्या पुढे खूप धिंगाणा घातला. आईच्या पुढ्यात थय थय नाचायला लागले. आईला त्यांची समजूत घालता घालता नाकी नऊ आले. शेवटी आई म्हणाली, ''यापुढे मी कधीही तुला शाळा चुकवायला सांगणार नाही. आता तर शांत हो,'' असे म्हटल्यावर त्यांचा राग थोडासा शांत झाला. याउपर त्यांच्या वडिलांचा स्वभाव वेगळा होता. त्यांनी मात्र नागनाथ अण्णांना शाळेला गेल्याचे कधीही विचारले नाही. पण दररोज रात्री झोपण्यापूर्वी नागनाथ दूध पिऊन झोपलाय का नाही याची चौकशी न चुकता करत होते. दूध पिऊन झोपलाय म्हटलं तर ठीक. नाहीतर झोपेतून उठवून बापू त्यांना गोड बोलून दूध प्यायला लावायचे, दूध प्यायला तर ठीक. नाहीतर रागावून दूध प्यायला लावायचे. वेळ प्रसंगी थोबाडात देणार पण दूध पिल्याशिवाय त्यांना झोपू देणार नाहीत असा त्यांचा कटाक्ष होता.

सहाव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण अण्णांनी वाळव्यात केले. अण्णांचा पहिला मित्र सखाराम मकदूम हा वडार समाजातील, तर दुसरा वर्ग मित्र बंडा गायकवाड चांभार समाजातील होता. असे अनेक जाती, धर्माचे त्यांचे मित्र होते. त्या काळात ग्रामीण भागात शिवा-शीव पाळली जाई, नागनाथ अण्णांच्या डोक्यात जातीयतेचा, भेद भावाचा विचार कधीही आला नाही. ते आपल्या मागासवर्गीय मित्रांना घरी जेवायला बोलवत. आपल्या बरोबरीने त्यांना जेवायला खायला वाढत. त्यांच्यासाठी वेगळी भांडी आपल्या घरात त्यांनी कधीही ठेवली नव्हती. एक वेळ अण्णांचे चर्मकार समाजातील जिवलग मित्र बंडा गायकवाड हे अण्णांचे घरी जेवले आणि रात्री तेथेच झोपले. सकाळी लवकर उठून आपल्या घरी गेले. अण्णांचे वडील बापू सकाळी कामानिमित्त चांभार वाड्यात गेले होते. तेथे बापूंना बंडा गायकवाड दिसला. बापूंच्या मनात विचार आला. रात्री हा पोऱ्या आपल्या घरात जेवला. तो आणि नागनाथ एका अंथरुणात झोपले होते आणि हा चांभार वाड्यात कसा? बापूंनी घराकडे गेल्यावर अण्णांना विचारले, ''अरं नागनाथ, रात्री आपल्या घरी आलेला पावणा चांभार वाड्यात कशाला गेलाय? त्यावर अण्णा म्हणाले, ''अहो बापू तो चांभार वाड्यातच राहतो.'' बापू म्हणाले,''मग तो चांभाराचा हाय?'' नागनाथ अण्णा म्हणाले,''होय,''बापू म्हणाले, ''लेका जरा जपून. हे लोकांना कळलं तर आपलं घर वाळीत टाकतील.''बापू असं म्हणायचे कारण त्या वेळी कडक सोवळे ओवळे, जात पात, शिवा शीव पाळली जायची.

सहाव्या इयत्तेची परीक्षा पास झाल्यावर फायनलच्या परीक्षेसाठी व अभ्यासासाठी नागनाथ अण्णा आष्टे गावात आपल्या आजोबांच्या बहिणीकडे गेले. अण्णांचे जेवण रोज मिरजवाडीहून आजोबा घेऊन येत असत. अभ्यासासाठी मात्र त्यांनी आष्ट्यात एक वेगळी स्वतंत्र खोली घेतली होती. ते तसे हुशार. गणित, भूमिती या विषयांना त्यांना १०० पैकी शंभर गुण मिळायचे. त्यांचे वर्ग शिक्षक हणमंत गणेश नवांगुळ होते. ते राष्ट्रीय विचाराचे होते. त्यांनी नागनाथ अण्णांच्या मनावर राष्ट्रीय विचार रुजवले. त्यांना परकीय सत्तेची जाणीव करून दिली आणि त्यांच्याकडून स्वातंत्र्यसंग्रामाचे धडे गिरवून घेतले. अशा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण होत होते. त्यांनी शिक्षणाबरोबर आपल्या प्रेमळ स्वभावातून सन्दे सर, बाबर गुरुजी बाबू जोशी, गोविंद जोशी, भास्कर कुलकर्णी, घारे गुरुजी असे अनेक हुशार मित्र आपलेसे केले होते.

फायनलची परीक्षा पास झाल्यावर नागनाथ अण्णा पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. कोल्हापूर ही इतिहासप्रसिद्ध नगरी. महाराष्ट्राची दक्षिण काशी, छत्रपती शाहू महाराजांची राजधानी. अखंड भारतात शाहू छत्रपतींनी पुरोगामित्वाचा कोल्हापुरात तसेच महाराष्ट्रभर झेंडा फडकत ठेवला होता. शाहू छत्रपती पुरोगामी व द्रष्टे राजे होते. राज्यात सक्तीचे प्राथमिक शिक्षण त्या काळात त्यांनी सुरू केले. देशात सामाजिक समतेचा न्यायाचा पहिला झेंडा छत्रपती शाहू राजांनी आपल्या राज्यात रोवला. सर्व जातिधर्मांच्या मुलांचेसाठी मोफत वसतिगृहे काढली. त्यामध्ये मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लीम बोर्डिंग अशी वेगवेगळ्या जाती धर्मांच्यां विद्यार्थ्यांच्यासाठी शिक्षणाची सोय केली. सदर वसतिगृहांना व शैक्षणिक संस्थांना अर्थ साहाय्य व मोफत जमिनी दिल्या. दलितांचे करिता शिक्षणात व सरकारी नोकऱ्यात सवलती दिल्या. आपल्या संस्थानात अस्पृश्यता निवारण कायदा लागू केला. मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण केले. सत्यशोधक समाज चळवळ सुरू केली. काहीही झाले तरी बहुजन समाजातील मुलांनी शिकलेच पाहिजे असा त्यांचा दंडक होता.

अशा पुरोगामी शाहू महाराजांच्या राजधानीत शिक्षण घेण्याकरता नागनाथ अण्णा आले व त्यांनी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये प्रवेश घेतला आणि शिक्षणासाठी राजाराम हायस्कूलमध्ये नाव दाखल केले. राजाराम हायस्कूल जुने होते. त्या हायस्कूलमध्ये नामदार गोपाळकृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे, भास्करराव जाधव, माधवराव बागल अशा थोर विद्यार्थ्यांचा वारसा होता. हे विद्यार्थी पुढे नामवंत समाजसेवक धुरंधर राजकारणी म्हणून नावारूपाला आले. राजाराम हायस्कूलमध्ये त्या काळात इंग्रजी दुसरी व इंग्रजी तिसरी या इयत्ता एका वर्षात करता येत होत्या. त्याप्रमाणे नागनाथ अण्णांनी एकाच वर्षात दोन इयत्तेच्या परीक्षा दिल्या व चांगल्या मार्कांनी पास झाले. इंग्रजी इयत्ता ६ वीच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसून पहिल्या नंबरची ५ रुपयांची स्कॉलरशिप त्या काळात

मिळवली. कोल्हापुरात शिक्षण घेत असताना नागनाथ अण्णांना नवनवीन गोष्टींचे ज्ञान झाले. त्यांना अनेक जिवाभावाचे मित्र मिळाले. कोल्हापुरात त्या काळात राष्ट्रसेवा दलाचा जोर होता. डिसेंबर १९३९ मध्ये कोल्हापूर मध्ये सोनतळी येथे सेवा दलाच्या दहा दिवसांच्या शिबिराला हजर राहून, त्या वेळी राष्ट्रसेवा दलाने निरनिराळ्या खेळांचे सामने ठेवले होते. त्या सर्व खेळांत प्रथम क्रमांक मिळवला. मुळातच क्रांतीचा पिंड असणाऱ्या नागनाथांनी गावोगाव जाऊन दरी (कपाऱ्यात) हिंडून राष्ट्र सेवा दलाच्या अनेक शाखा स्थापन करण्याची क्रांती केली. त्याच वेळी विद्यार्थ्यांची विद्यार्थी संघटना बांधली आणि १९४० च्या सुमारास कामेरी येथे, खासदार प्रिन्सिपॉल खर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची परिषद घेतली. त्या परिषदेला प्रमुख पाहुणे चामुंडराय पाटील व शिंदे महाराज हजर होते. त्या परिषदेमध्ये चामुंडराय पाटील यानी "हुतात्म्यांची मनीषा कोण पुरी करणार" ही कविता इतकी प्रभावी म्हटली की, त्याचा लोकांच्यावर चांगलाच प्रभाव पडला. कविता तर गाजलीच शिवाय त्या कवितेमुळे परिषदही गाजली. त्या परिषदेतून तरुण विद्यार्थ्यांना राष्टप्रेमाचे धडे देण्याचा नागनाथ अण्णांचा दृष्टिकोन होता तो पुरेपूर साध्य झाला. हेच विद्यार्थी पुढच्या काळात देश स्वातंत्र्याच्या कामात खूप उपयोगी पडतील असा दूरवरचा विचार त्यांच्या मनात होता. आपल्या शिक्षणाबरोबर दुर्गम भागातील, खेड्या पाड्यांतील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून आपले मित्र सखाराम मकदम, बंडा गायकवाड, वाय.सी.पाटील, कै.शिक्षण महर्षी बापूजी साळुंखें सारख्या मित्रांच्या साहाय्याने अनेक व्हॉलंटरी शाळा काढल्या व त्या उत्तम प्रकारे चालवल्या, पहिली व्हॉलंटरी शाळा शिराळपेट्यातील दुर्गम अशा झोळंबी गावात सुरु केली. या शाळेत सखाराम मकदम हे शिक्षक होते. त्याच भागात मेणी गावात दुसरी शाळा सुरु केली. त्या शाळेवर बाबर गुरुजी हे शिक्षक होते. हे दोघेही वाळवे तालुक्यातील गोटखिंडी गावचे सुपुत्र, स्वातंत्र्याच्या संग्रामात या गोटखिंडी गावातील जनतेने नागनाथ अण्णांना चांगली साथ केली होती आणि आजही नवीन पिढीने तो वारसा पुढे चालू ठेवला आहे.

शिराळा पेट्यात खराळे गावात तिसरी व्हॉलंटरी शाळा सुरू केली. त्या शाळेत वाळव्याचे यशवंत पेटकर (पवार) हे शिक्षक म्हणून काम करित होते. अशा प्रकारे पाटण, शिराळा, कराड या ठिकाणी २० च्या आसपास व्हॉलंटरी शाळा काढल्या होत्या. त्या शिक्षण संस्थेला श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ नाव होते. हे नाव अण्णांच्या वडिलांचे होते. १९४२ च्या चळवळीत अण्णांनी भाग घेतल्यावर त्या सर्व शाळा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेला जोडल्या. १९३९-४० च्या सुमाराला छत्रपती शाहू महाराजांच्या पवित्र नगरीत नागनाथ अण्णांची व कर्मवीर अण्णांची प्रथम ओळख झाली. पुढे अनेक विधायक कामातून, भेटी गाठीतून, कर्मवीरांचे घनिष्ठ संबंध आले ते कर्मवीरांच्या शेवटच्या क्षणापर्यंत दृढ होते.

कोल्हापूरला शिक्षण घेत असताना देशाच्या स्वातंत्र्य आंदोलन पर्वात नागनाथ अण्णा अनेक मोर्चे संघटित करण्याचे काम करीत असत. भूमिगत कार्यकर्त्यांच्या जेवण खाण्याच्या व्यवस्थेबरोबर त्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचेही काम नागनाथ अण्णा करत असत. शिक्षण आणि स्वातंत्र्याच्या लढ्याला मदत करणे हा त्यांचा मूळचा पिंडच होता. तासगावचा मोर्चा यशस्वी झाला. तासगावच्या मामलेदारला गांधी टोपी घालून त्यांचे हस्ते तिरंगा फडकवला. तासगावच्या मोर्चानंतर त्याच पद्धतीने इस्लामपूर कचेरीवर मोर्चा काढण्याचा कार्यक्रम ठरवला व कार्यकर्ते कामाला लागले. त्याही कामात नागनाथ अण्णांनी हिरीरीने भाग घेतला. इंग्रजी सत्तेने इस्लामपूर मोर्चावर जोराचा प्रतिकार केला. लाठी हल्ला, अश्रुधुराला लोक जुमानत नाहीत म्हटल्यावर गोळीबार केला. लोक दाही दिशांना पळून गेले. त्या गोळीबारात कामेरीचा बारपटे व किर्लोस्करवाडीचा पंड्या इंजिनियर हे हुतात्मा झाले. मा.यशवंतराव चव्हाण यांच्यावर वारंट होते म्हणून त्यांनी कामेरीपर्यंत मोर्चाला साथ दिली. वाळव्याचे लोक मोर्चात गाठ पडतील आणि आपण मोर्च्यात आलो होतो ही गोष्ट वडिलांना समजेल म्हणून नागनाथ अण्णाही कामेरी पर्यंतच मोर्चात होते. मोर्चा कामेरीहून पुढे गेला. मोर्चाचे काय होते ते समजण्यासाठी क्रांतिवीर नागनाथ अण्णा व कै.माजी उप पंतप्रधान यशवंतराव चव्हाण मागे राहिले. त्यावेळी दोघांची जी ओळख झाली, मैत्री झाली ती अगदी मा.यशवंतराव चव्हाण हयात होते तोपर्यंत होती.

कोल्हापूर मध्ये शिक्षणाबरोबरच सामाजिक कामाच्या रगाड्यातून वेळ काढून अण्णा नियमितपणे व्यायामासाठी जिमन्यॅशियमध्ये जात असत. त्यातून त्यांना अनेक साथीदार मिळाले. त्यांपैकी कागलचे घाटगे घराण्यातील नानासाहेब घाटगे यांची मैत्री अत्यंत जिव्हाळ्याची झाली ती आजतागायत आहे. त्या मित्रांचे त्यांना पुढे चळवळीच्या कामात अत्यंत मोलाचे साहाय्य झाले. पुढे नानासाहेब घाटगे भारताचे नामवंत शास्त्रज्ञ म्हणून नावारूपाला आले. आजही ते त्यांना पूर्वी इतकेच मानाने वागवतात. नागनाथ अण्णा व पी.डी.गुणे हे सुद्धा जिवा-भावाचे मित्र. एक वेळ शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या जेवणाच्या कार्यक्रमात खूप गोंधळ झाला म्हणून दुसऱ्या वर्षीच्या स्नेहसंमेलनाची जबाबदारी या दोघांनी घेतली. त्या वेळी मुलांना जेवण तर उत्तम दिलेच, शिवाय मुलांच्या पैशाची बचत करून त्यांना काही पैसे परत दिले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणाले, ''विद्यार्थी दशेत माझे पी.डी.गुणे सायबांचे घरी जाणे येणे होते. त्यावेळी त्यांचे वडील श्री.दत्तात्रय गुणे व आई सौ.गोपीकाताई हयात होत्या त्यावेळी असाच विषयाने विषय निघाला आणि गुणे सायबांचे वडील म्हणाले, 'नागनाथ असाच श्राध्दाच्या जेवणाचा कार्यक्रम आमच्या घरी होता म्हणून आईने माझ्या वडीलांना आकरा ब्राम्हणांना जेवायला बोलवा म्हणून सांगितले. इकडे वडील रस्ता आणि गटारी साफ करणाऱ्या मागास जातीच्या अकरा लोकांना जेवायला घरी घेऊन आले. येवढ्यात आईची पुन्हा हाक आहो....

ऐकलत का ! स्वंयपाक तयार आहे. कुठाय ती ब्राम्हण मंडळी? त्यांची मला पूजाअर्चा करायची आहे. त्यावेळी त्या अकरा लोकांच्याकडे हात करुन वडील म्हणाले, 'हेच माझे ब्राम्हण आहेत. यांना जेवायला वाढ.' त्या वेळी विशेष म्हणजे माझ्या आईने कसलेही आढेवेढे न घेता आनंदाने त्यांना पोटभर जेवायला वाढले.'' ही गोष्ट ऐकून मी चकीत झालो'' ही मंडळी ब्राम्हण असूनही त्यांनी अशा जुन्या काळात केलेले धाडस विशेष होते. त्यातून अण्णांची व गुणे साहेबांची मैत्री अधिक दृढ झाली. ती आजतागायत आहे. गुणे साहेब पुढे किर्लोस्कर कंपनीत चेअरमनच्या पदावरून रिटायर झाले. ते किर्लोस्कर कंपनीचे विश्वस्त म्हणून काम करतात. गुणे साहेब, नागनाथ अण्णा व नानासाहेब घाटगे आजही एकमेकांना आवर्जून भेटतात व जुन्या आठवणीत रमून जातात.

नागनाथ अण्णांनी हायस्कूलमध्ये शिक्षणात आपल्या वर्गात नेहमी वरचा नंबर ठेवलेला होता. गणित, भूमितीसारख्या विषयांत त्यांना १०० पैकी १०० गुण मिळत होते. मॅट्रिकच्या अभ्यासाबरोबर कुस्ती व इतर मैदानी खेळांतही ते तरबेज होते. अनेक वेळा त्यांनी खेळामध्ये आणि अभ्यासात पहिले नंबर मिळवले होते. नागनाथ अण्णांच्या अंगी खिलाडू वृत्ती, निःस्पृहता, बाणेदारपणा, प्रामाणिकपणा या गुणांबरोबर त्यांच्याकडे लोकसंघटन करण्याचे जबरदस्त कौशल्य होते. त्यांचे बोलणे सहज, सुंदर, सुबोध आणि थेट होते. त्यात कसलाही दिमाख नाही. भौतिक सुखापासून दूर रहाणे. या गुणांच्यामुळे सर्वांना ते हवेहवेसे वाटत. त्यांचा लोकसंग्रह मोठा होता.

नागनाथ हे शिक्षकांचे आवडते विद्यार्थी होते. वसतिगृहातील सर्व विद्यार्थी जेवलेल्याची चौकशी करताना सुप्रिटेंडेंटस् मावशीबाईंना, ''नागनाथ जेवून गेले का?'' म्हणून विचारत. नागनाथ जेवून गेले म्हणून मावशीबाईंनी सांगितले की सर्व विद्यार्थी जेवल्याची खात्री व्हायची. कारण नागनाथ हा विद्यार्थी कधीही इतर विद्यार्थ्यांच्या अगोदर जेवायचे नाहीत. ते नेहमी सर्वांच्या शेवटी जेवत असत. सुट्टीत वाळव्याला गेले तर वाळव्याहून येताना मुलांच्यासाठी भुईमुगाच्या शेंगाचे पोतेच घेऊन येत असत. ते पोते खाण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांसाठी खुले असायचे. ज्यांना शेंगा खायची इच्छा होईल त्याने नागनाथ अण्णांच्या खोलीत जायचे व मनमुराद शेंगा खायच्या. असा कार्यक्रम नागनाथ अण्णा बोर्डिंगमध्ये रहात होते तोपर्यंत चालूच असायचा. प्रिन्स शिवाजी बोर्डिंगच्या अडचणीच्या काळात विद्यार्थ्यांना कार्यकर्त्यांच्या घरी वार लावून जेवणासाठी पाठवत असत. त्या परिस्थितीतही नागनाथ अण्णा अनेकांच्या घरी वार लावून जेवले आहेत. ज्या ज्या घरात नागनाथ अण्णा जेवले त्यांची ते अजूनही आठवण सांगतात. (ही सत्य घटना स्वत: पी.डी.गुणे यांच्या मुलाखतीतून)

# इंग्रजी जुलमी सत्तेच्या विरुद्ध बंड

अण्णा एक दिवस शाळेतून आल्या नंतर प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मध्ये, आपल्या एक नंबरच्या खोलीत महात्मा गांधीजींची 'हरिजन' ही नियतकालिका वाचत बसले होते. त्यांच्या वाचनात मुंबई येथे ७, ८ व ९ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरणार आहे व त्या अधिवेशनाला महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद व इतर अनेक नेते मार्गदर्शन करणार आहेत ही बातमी वाचनात आली. त्याच वेळी या भावी क्रांतिवीराने अधिवेशनाला मुंबईला जायचा निर्णय घेतला व आपल्या मित्रांना त्या अधिवेशनास येण्यास प्रवृत्त केले. आपल्या चार मित्रांसोबत ६ ऑगस्टला कोल्हापूरहून मुंबईला निघाले, मिळेल त्या वाहनाने उन्हा-तान्हात रखडत कोल्हापूर-सातारा-पुणे-कल्याण गावांना मागे टाकत मुंबईला दादरला पोहचले, तिथे व्हेटरनरी कॉलेजवर मित्राच्या खोलीत आले. मित्राने त्यांचे आनंदाने स्वागत केले. मुंबईला का आलोय हे त्यांनी मित्राला सांगितले. तो मित्रही स्वातंत्र्य चळवळीच्या बाजूचा होता. दुसऱ्या दिवशी नागनाथ अण्णांनी सर्व मित्रांना सकाळी लवकर उठवले व त्यांना घेऊन गवालिया टँकवर अधिवेशनच्या ठिकाणी पोहचले, अधिवेशनासाठी तिकिटाने प्रवेश होता हे तिथे गेल्यावर त्यांना समजले. या सर्वांच्याकडे तिकीट काढण्यासाठी पैसे नव्हते. अण्णा अधिवेशनात प्रवेश कसा मिळवावयाचा या विचारात होते. एवढ्यात त्यांचे मित्र म्हणाले."आता इथवर आलोय तर चला जिवाची मुंबई करुया."

अण्णांचा तिथून पाय निघेना त्यांनी मित्रांना सांगितले,"मी अधिवेशनासाठी आलोय. मी मुंबई बघायला येणार नाही. तुम्ही जाणार असाल तर जावा." सर्व मित्र मुंबई बघायला गेल्यावर अण्णांनी अधिवेशनाच्या ठिकाणाला चहूबाजूने एक फेरफटका मारला. अधिवेशनाला आत जाण्याच्या प्रवेशाची जागा निश्चित केली. पूर्वेच्या बाजूला अधिवेशनालगतच आंब्याचे एक झाड होते. आसपास कोणी नसल्याची खात्री केली आणि त्या झाडावर नागनाथ अण्णा चढले व अलगद उडी मारून अधिवेशनात प्रवेश घेतला. पुढच्या रांगेत बऱ्याच खुर्च्या रिकाम्या होत्या म्हणून ते पुढच्या रांगेत बसले. योगायोगाने अधिवेशनातील स्वयंसेवकांचा व त्यांचा ड्रेस एकच होता. खाकी हाप पँट व पांढरा हाप शर्ट त्यामुळे त्यांनी विना तिकीट प्रवेश केल्याचा कोणालाही संशय आला नाही. पहिल्या दिवशी महात्मा गांधी व इतर काँग्रेस नेत्यांची भाषणे झाली. ती नागनाथ अण्णांनी काळजी पूर्वक ऐकली. या अधिवेशनात इंग्रजांनी भारत सोडावा (क्वीट इंडिया) असा ठराव पास झाला. दुसऱ्या दिवशीही नागनाथ अण्णांनी अधिवेशनात त्याच मार्गाने प्रवेश घेतला. त्या दिवशी पंडित जवाहरलाल नेहरूंचे भाषण फार प्रभावी व जोशपूर्ण झाले. पंडित नेहरू इंग्रजांच्या विरोधात बोलताना रागाने लाल भडक झाले होते. ते जोशाने समोरच्या फळीवर हात आपटून भाषण करत होते. अण्णांनी तेही भाषण काळजीपूर्वक ऐकले. भाषण संपल्यानंतर लोकांनी महात्मा गांधीजींच्या सह्या घेण्यासाठी त्यांच्या भोवती गर्दी केलेली होती. अण्णांच्याही मनात गांधीजींची सही घेण्याची इच्छा झाली. त्यांनी आपली पॉकेट डायरी गांधींच्या समोर धरली. त्यांच्या सोबतच्या माणसाने सहीसाठी पाच रुपये मागितले. अण्णांच्याकडे पैसे नव्हते. ते तसेच त्यांच्या तोंडाकडे बघत उभा राहिले. गांधीजींच्या शेजारी बसलेल्या शेठजींच्या लक्षात ही गोष्ट आली. त्यांनी आपल्या कोटाच्या खिशातील पांच रुपयांची नोट काढून दिली व महात्मा गांधींची सही घेऊन अण्णांचेकडे पॉकेट डायरी दिली. अधिवेशनात नेत्यांनी लोकांना 'करेंगे या मरेंगे'(करा किंवा मरा) संदेश दिला व दुसऱ्या दिवशी आझाद मैदानावर खुले अधिवेशन व जाहीर सभेचा कार्यक्रम जाहीर करून अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन संपवले.


अधिवेशन संपल्यावर नागनाथ अण्णा व्हेटरनरी कॉलेजच्या आपल्या मित्रांच्या खोलीवर आले. त्यांच्या बरोबर आलेले मित्रही त्या खोलीवर आले होते. त्या सर्वांना अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत सांगून दुसऱ्या दिवशी आझाद मैदानावर खुले अधिवेशन आहे असे सांगितले. सकाळी लवकर उठून अंघोळपाणी, नाष्टा करून मित्रांसह आझाद मैदानाकडे निघाले. दादरला आल्यानंतर पहातायत तर

जनता आणि पोलिसांची धुमश्चक्री. जाळ पोळ, लाठीमार, अश्रुधुरांची फुटलेली नळकांडी हा काय प्रकार आहे हे नागनाथ अण्णांनी जमलेल्या जमावातील एकाला विचारले, त्यांनी सांगितले कॉंग्रेसच्या नेत्यांना पकडले आहे. त्यांना कुठे डांबून ठेवलय याचा पत्ता नाही. फक्त महात्मा गांधींना पुण्याला आगाखान पॅलेसमध्ये ठेवल्याचे कळाले. पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद वगैरे नेत्यांना कोठे ठेवले? त्यांचे काय केले? याची काहीच माहिती मिळेना म्हणून लोकांनी चिडून बसला, ट्रामगाड्यांना, पोलिस स्टेशनला आगी लावल्या, तारा तोडल्या. लोकांचा जमाव आवरेना म्हणून पोलिसांनी लाठी चार्ज केला. नागनाथ अण्णांनी आपल्या मित्रांना एकत्र बोलावले व त्यांना म्हणाले, ''चला, आता आपण इथं थांबण्यात काहीही अर्थ नाही. निष्कारण पकडलो गेलो तर आपल्याबद्दल सहकाऱ्यांना काहीच माहिती मिळणार नाही. आपण तातडीने कोल्हापूरला निघायचे व तेथे गेल्यानंतर आपापल्या भागातील गावो गावचे शेतकरी संघटित करून त्यांचे पर्यंत महात्मा गांधी,पंडित जवाहरलाल नेहरू यांचा (करेंगे या मरेंगे) करा किंवा मरा हा दिलेला संदेश पोहचवायचे काम करायचे.'' असा मनाचा पक्का विचार करून त्यांनी मुंबई सोडली.


कोल्हापूरला आल्यानंतर अण्णा आपल्या मित्र मंडळींना भेटले. त्यांना स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी प्रवृत्त केले. मुंबईचा सर्व वृत्तांत बैजवार सांगितला. ''आपल्या सारख्या तरुणांनी आता गप्प बसणे ही बाब आपल्याला नामुष्कीची आहे. आपण आता बालवयात किंवा म्हातारपणाच्या अवस्थेत असतो तर आपली कितीही इच्छा असती, कितीही देश प्रेम असतं, तरी स्वातंत्र्य संग्रामात आपण काहीही काम करू शकलो नसतो पण योगायोगाने आपण २०-२२ मधले तरुण आहोत. आपल्याकडे चांगल वाईट कळण्याइतपत जाणतेपण आहे. मित्रांनो, आपण आता स्वस्थ बसायचे नाही. असेल नसेल तेवढ्या शक्तीनिशी आपली भारत माता स्वतंत्र होईपर्यंत लढत रहायचे. स्वस्थ नाही बसायचे. चला, उठा. लागा कामाला.''

मुंबईहून आल्यानंतर वाळव्याला जाण्यापूर्वी अण्णा जोतिबाला जाऊन आले, कोल्हापूरला शिक्षणाला आल्यापासून त्यांच्यावर बापूंनी (वडिलांनी) जोतिबाला जाण्याची जबाबदारी सोपवली होती. नायकवडी घराण्याचे जोतिबा कुलदैवत होते. पूर्वी वाळव्यात अण्णा असताना बापू किंवा आई नियमितपणे पोर्णिमेला जोतिबाला जात होते. बापू बऱ्याच वेळी पायी चालत जोतिबाला जायचे किंवा आपली बैलगाडी घेऊन जायचे. जोतिबाला येता जाता बापू आपल्या बहिणीकडे जायचे. जोतिबाच्या

रस्त्यावर ऐतवडे खुर्द हे गाव आहे. त्या गावात त्यांची भोपळे पाटलांच्यात बहीण दिली होती. तिघा भावांत एकूलती एक बहीण होती. तिच्यावर बापूंचे फार प्रेम होते. शेवटपर्यंत बापू आपल्या बहिणीला कधीही विसरले नाहीत. जोतिबाच्या डोगंराव नायकवडी लोकांचा गुरव गोविंदराव म्हणून एक सरळ सज्जन माणूस होता. त्यांचेकडे आठवणीने बापू वाळव्याहून जोतिबाला जाणाऱ्या माणसांकरवी शिदा पाठवत असत. अण्णा कोल्हापूरहून गोविंदरावचे घरी जात. गोविंदरावनी केलेला निवद नारळ ते जोतिबाला देऊन कोल्हापूरला येत. वाळव्यात आल्याबरोबर बापू जोतिबाला गेला होतास का? असे विचारतात म्हणून वाळव्याला येण्यापूर्वी ते जोतिबाला गेले होते.



अण्णांचा मुंबई येथील अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनात प्रवेश.



अधिवेशनातील नेत्यांची भाषणे ऐकण्यात मग्न असणारे अण्णा.

# राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात बेधडक उडी

क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा जीवनपट हाच मुळी १९४२ च्या स्वातंत्र्याच्या संग्रामाचा अलौकिक धगधगता भव्य असा रोमहर्षक इतिहास आहे. अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ७, ८ ऑगस्टच्या अधिवेशनात जाऊन कोल्हापूरला प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मध्ये नागनाथ आले होते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय पुढचे शिक्षण घ्यायचे नाही आणि आपल्या जीवनातील महत्त्वाची बाब म्हणजे लग्न करायचे नाही असा मनाचा ठाम निर्णय घेऊन ते वाळव्यास आले. रात्री बापू शेताकडून आल्यावर बापूंच्या बरोबर ते अंगणात बोलत बसले. त्यांनी बापूंना (वडिलांना) मुंबईच्या अधिवेशनाचा इत्थंभूत वृत्तांत सांगितला. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरूंचा "करेंगे या मरेंगे" या संदेशाचाही बापूंच्या जवळ आवर्जून उल्लेख केला आणि त्यांना म्हणाले, "आमच्या सारख्या विशीतील तरुणांनी देशावर एवढे मोठे संकट असताना गप्प बसणे म्हणजे आम्हांला ही गोष्ट लाजीरवाणी आहे. तेव्हा मी माझी कोल्हापूरची ट्रंक व वळकटी घेऊन आलोय. देश स्वतंत्र झाल्याशिवाय मी पुढचं शिक्षण घ्यायचं नाही असा निर्णय घेऊन आलोय. इथून पुढे देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घ्यायचा ठरवला आहे. ही गोष्ट तुमच्या कानावर घालण्यासाठी आलोय." बापूंना आपल्या मुलाचा स्वभाव चांगला माहीत होता. तो चळवळीत अंगचुकारपणा न करता पुढच्या आघाडीने पळून (नेटाने) काम करणार. स्वातंत्र्य चळवळीच्या बऱ्या वाईट बातम्या बापूंच्या कानावर आल्या होत्या, जर आपल्या मुलाचंही या चळवळीतून काही बरं वाईट झालं तर, नुसत्या कल्पनेने बापूंच्या अंगावर काटा उभा राहिला.

नागनाथ अण्णा बापूंच्या जवळ आलकट-पालकट घालून बसलेले होते. बापूंनी शांतपणे अण्णांचे सर्व म्हणणे ऐकले व जवळच पडलेला जोडा उचलला, फडा फडा अण्णांच्या मांडीवर चार पाच जोडे मारले आणि ते म्हणाले, "तू अस कर. आम्हा दोघांना (मला, तुझ्या आईला) गोळ्या घाल आणि तुला काय करायचे ते कर." नागनाथ अण्णांनी शांतपणे विचार केला. बापूंच हे रागावणं आहे ते प्रेमापोटी आहे. आपल्या डोळ्यांदेखत आपल्या मुलाचं बरं वाईट बघण्याची पाळी आपल्यावर यायला नको म्हणून बापू असे बोलत आहेत हे त्यांनी ओळखले. बापूंना व आईला आपणाकडून त्रास झाला नाही पाहिजे आणि आपल्या डोक्यात असणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीत आपण भाग घ्यायचाच असा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर त्यांनी आंघोळ केली, घरात नेहमीप्रमाणे पाणी भरलं, बापूंच्या बरोबर गप्पा मारत न्याहरी केली, आईला कोल्हापुरातील सुख दु:खाच्या दोन गोष्टी सांगितल्या जेणे करून रात्रीचा झालेला प्रकार मी डोक्यातून काढलेला आहे हे बापूंना दाखवावयाचे होते. एक दोन दिवस गेल्यावर आई बापूंना परत कोल्हापूरला शिक्षणासाठी जातो असे सांगून त्यांनी कोल्हापूर गाठले. कोल्हापुरात आल्या आल्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मधल्या आपल्या एक नंबरच्या खोलीत ट्रंक व वळकटी मित्रांच्या ताब्यात दिली आणि जिवाची बाजी लावून १९४२ च्या स्वातंत्र्याच्या लढ्यात उडी घेतली. नागनाथ अण्णांनी उन्हा-तान्हात रखडत, कधी उपाशी-तापाशी राहून खेड्यापाड्यांत हिंडून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात बेधडक उड्या मारणारे सहकारी मिळवले. काही दिवसांनी त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटलांची भेट घेतली. लहानपणी त्यांच्याकडूनच स्वातंत्र्याचे बाळकडू घेतले होते. नागनाथ अण्णा स्वातंत्र्याच्या संग्रामात पडल्यानंतर त्यांना अनेक सवंगडी मिळाले त्यांत कुंडलच्या अनेक मंडळींचा संबंध आला. त्या मध्ये नाथाजी लाड जसे महत्त्वाचे होते तसेच जी.डी.बापू लाड हेही तितकेच महत्त्वाचे होते. त्यांची आणि नागनाथ अण्णांची अतूट मैत्री जमली. त्यातून लोक त्यांना धनाजी संताजीची जोडी म्हणू लागले, या दोघांनी कुठलीही गोष्ट मनावर घेतली की ती यशस्वी होणारच. या दोघांची इंग्रजांनी धास्ती घेतली. नागनाथ नायकवडी व जी.डी.बापू लाड ही जोडी म्हणजे आपल्या सत्तेच्या गर्दनीवर टांगती तलवार अशी ही जोड गोळी आहे. हे ब्रिटिशांनी ओळखले. नाना पाटलांच्या बरोबर त्यांचाही बदोबस्त करायलाच पाहिजे असे ब्रिटिशांना वाटू लागले. इंग्रजांना न भिता या दोघांनी हळू हळू स्वातंत्र्य प्रेमी जनतेची संघटना वाढवली. त्यातून देशभर भूमिगतांचे मोहोळ उठायला लागले. १९४२ च्या चळवळीला उधान यायला लागले. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारच्या चळवळीने

नागनाथ अण्णा व जी.डी.बापू या दोघांच्या मार्गदर्शनाखाली जुलमी इंग्रजी सत्तेला हादरे देण्याचे गनिमी कावा तंत्र अवलंबले होते. त्यामुळे जनमानसांत त्यांची धनाजी संताजी म्हणून ख्याती पसरली.

त्याच सुमारास कुंडल येथे ग.दि.माडगुळकर यांचे वडील शिक्षकाची नोकरी करत होते. त्यांच्या घरी नेमिनाथ उपाध्ये हे नागनाथ अण्णांचे मित्र काम करीत होते. त्या मित्राच्या संगतीने अण्णांचा व ग.दि.माडगुळकर यांच्या आई वडिलांचा परिचय झाला. त्या परिचयातून ग. दि. मां. चे व अण्णांचे संबंध दृढ झाले. पुढे चळवळीच्या काळात, ग.दि.मा. कोल्हापूरमध्ये मंगळवार पेठेत दत्त मंदिराजवळ रहात होते. तिथेच जवळ, लता मंगेशकर आपल्या वडिलांच्या बरोबर रहात होत्या. तसा गदिमां चा व दीनानाथ मंगेशकर कुटुंबाचा घरोबा होता. क्रांतिवीर नागनाथ अण्णा व त्यांचे इतर भूमिगत कार्यकर्ते ग.दि. माडगुळकरांच्या घरी आपली हत्यारे व दारुगोळा सामान ठेवत होते. अनेक वेळा त्यांच्या घरी ते जेवायलाही थांबत होते. दोन्ही कुटुंबांची परिस्थिती सर्वसाधारण होती पण ही कुटुंबे मनाने फार मोठी होती. क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणतात, ''मला अजूनही आठवतय ग.दि.मा. बसल्या-बसल्या कविता करायचे आणि लताबाईना बोलवायचे व आम्हा पुढे त्यांना कविता गायला सांगायचे. लताबाई त्यावेळी लहान होत्या तरी खूप सुंदर आवाजात कविता म्हणायच्या जुन्या काळा पासून ग.दि.मा. बरोबर माझी मैत्री होती ती त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत होती. आजही त्यांच्या मुलाबाळांचे व माझे संबंध चांगले आहेत.''

महाराष्ट्रभर हिंडून नागनाथ अण्णांनी अनेक भूमिगतांशी जिवाभावाचे संबंध जोडले होते. कासेगावचे बाबूजी पाटणकर, वाटेगावचे बर्डे गुरुजी, कराडचे यशवंतराव चव्हाण, शेख काका, किसन वीर, उंडाळकर दादा, सांगलीचे वसंतराव दादा, धोंडीराम माळी, कोल्हापूर भागातील वसंतराव सावंत, जीवनराव सावंत, संतराम पाटील, शंकरराव नलवडे, गणपतराव भोसले, शाम लहुजी पाटील, दिनकराव यादव, नगरचे कॉ.दत्ता देशमुख, धुळयाचे व्यंकटराव धोबी, उत्तमराव पाटील, शिराळपेट्यातील वाय.सी.पाटील, अंता पाटील, पांडू गायकवाड, कामेरीचे एस.बी.पाटील, बोरगावचे आत्माराम बापू, अंकलखोपचे बाळकू बिरनाळे पैलवान, धुळ्याचे उत्तमराव पाटील, कुंडलचे शाहीर निकम, ऐतवड्याच्या राजूताई पाटील (बिरनाळे) व नामदेव कराडकर यांच्या सारख्या अनेक क्रांतिकारकांचे भांडार अण्णांनी जमवलेले होते.

अण्णा, बापूंना सांगून कोल्हापूर जाऊन जवळजवळ चार एक महिन्याचा कालावधी लोटला होता. ठरल्या प्रमाणे बापू वाळव्याच्या माणसाकडून जोतिबाच्या गुरवाकडे नैवेद्य नारळाचा शिदा पाठवत होते. आपल्या मुलाची चौकशी करत होते पण

जोतिबाहून परत आलेला माणूस नागनाथ गुरवाच्या घरी आला नव्हता असे बापूंना सांगत होता. बापू हवालदील झाले. नागनाथ कुठे आहे, कुठे नाही त्याचा बापूंना काही केल्या पत्ता लागेना. एक दिवस गोविंद सव्वासे (आबा) यांना त्यांनी नागनाथांच्या शोधासाठी पाठवले. गोविंद सव्वासे (आबा) हे गृहस्थ बापूंच्या घराजवळ रहात होते. त्यांनी अण्णांचे सोबत स्वातंत्र्याच्या चळवळीचे काम करणाऱ्या मित्रांना त्यांचा पत्ता विचारला. त्या मित्रांनी त्यांना सांगितले दोन दिवसांपूर्वी नागनाथ अण्णा कुंडलला भेटले होते. आत ते कोठे भेटतील म्हणून त्यांनी विचारले त्यावर मित्र म्हणाले ते आम्हांला निश्चित सांगता येणार नाही. गोविंद सव्वाशे (आबा) सकाळी लवकर उठले. बायकोकडून चार भाकरी पदरात बांधून घेतल्या व जुनेखेडातून नावेने पलीकडे पुणदी गावात जाऊन मधल्या मार्गाने कुंडलला जाण्यासाठी जुनेखेडच्या नदी काठी पाणवठ्याला येऊन बसले. नाव पलीकडे पुणदीच्या पाणवठ्याला नुकतीच गेली होती. ती अलीकडच्या पाणवठ्याला यायला आवकाश होता, म्हणून ते भाकरी खात बसले होते. जुनेखेडच्या सहकाऱ्यांना भेटण्यासाठी म्हणून नागनाथ अण्णा पुणदीच्या पाणवठ्यावर आले होते. त्यांना गोंदू आबा आपणाला शोधावयास आलेल्याची काहीच कल्पना नव्हती आणि इकडे गोंदू आबांनाही आपलं सावज पुणदीच्या पाणवठ्याला आले आहे हे माहीत नव्हते. ते आपल्या विचारात खाली मान घालून भाकरी खात होते, भाकरी खाता खाता कुत्र्यांना मध्येच एखादा भाकरीचा तुकडा टाकत तर मध्येच नदीतील माशांना एखादा तुकडा टाकत होते आणि मनात नागनाथ कुठे सापडेल याचा विचार करत होते. पुणदीवरून सुटललेली नाव नदीच्या मध्य पात्री आल्यावर नावेकडे त्यांचे लक्ष गेले. त्यांची नजर घारीसारखी तीक्ष्ण होती. त्यांनी नागनाथ अण्णांना ओळखताच फडक्यात भाकरी गुंडाळली आणि पाणवठ्यावर धुणं धुणाऱ्या स्त्रियांच्या व आंघोळ करणाऱ्या पुरुषांच्या गर्दीत ते आपल्या सावजाला पकडण्यास दबा धरून बसले. इकडे नागनाथ अण्णा आपल्या सहकाऱ्यांना कुठे कसे भेटायचे या विचारात होते. ते नेहमी प्रमाणे नावेतून उडी मारून खाली उतरले तसे गोंदू आबांनी नागनाथ अण्णांचे मनगट गच्च पकडले व त्यांना म्हणाले, ''आता कुठं जातोयस वाघा. चल, तुला बापूंनी बोलवलय'' नागनाथ अण्णा गोंदू आबांना म्हणाले, ''मी वाळव्याला येणार नाही. मी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या कामात आहे आणि हे काम मला बापू करू देत नाहीत. म्हणून मी वाळव्याला येणार नाही.'' ते म्हणाले,''आरं बाबा, तुला बापूंचा निरोप हाय. जी काय चळवळ वळवळ करायची हाय ती इथं वाळव्यात माझ्या डोळ्यापुढं राहून कर.'' ''आबा, खरं सांग.... तू म्हणतोय तसं बापू म्हणाले का?'' नागनाथ अण्णांनी विचारले. त्यावर गोविंद आबांनी होय होय खरं आहे असं

ठासून उत्तर दिले. ''तसे आहे तर मग वाळव्याला येईन,'' असे अण्णा म्हणाले व त्या प्रमाणे ते वाळव्यास आले. बापूंच्या म्हणण्याप्रमाणे वाळव्यात राहून १९४२ ची संघटना व्यापक करण्यास सुरुवात केली. एक एक साथीदार स्वातंत्र्य संग्रामाच्या लढ्यात सामील करून घेऊ लागले. कामानिमित्त बापू सुतार मेट्यात जायचे त्या त्या वेळी रामू तेल्याच्या दारात नागनाथ अण्णा बसलेले बापूंनी अनेक वेळा पाहिले होते. एक दिवस बापूंनी त्यांना विचारले, ''आरं नागनाथ, रोज त्या तेल्याच्या कट्ट्यावर कशाला बसतोयस?'' बापूंना ते म्हणाले, ''रामू तेली चळवळीत येतोय का ते पहातोय.'' बापू म्हणाले, ''आरं, माझ्या बाबा, साठ साळी संगत भोळी. माळी, तेली गरीब माणसं कधी चळवळ करतील का? कधी तुला हे कळायचे? अस कर, तू पाठीमागच्या अहिर गल्लीत जा. तिथ किसन पैलवान,खंडू शेळके, नारायण कदम, रामू अहिर (मास्तर) एका पेक्षा एक हत्तीसारखी तरणी बांड पोरं हायत त्यांना भेट.'' त्यांना हा बापूंचा सल्ला महत्त्वाचा वाटला म्हणून त्यांनी पाठीमागच्या अहिर गल्लीत बैठका घ्यायला सुरुवात केली. त्यांची आपसातली किरकोळ भांडण आपल्या कौशल्यावर मिटवली. एके दिवसी रात्री सर्वांची त्यांनी तालमीत बैठक घेतली, त्यांना आपला देश काय? त्यावर राज्य कोण करतय? आपण इंग्रजांच गुलाम कसे आहोत? वगैरे पद्धतीने त्यांचा स्वाभिमान जागा केला. त्या स्वाभिमानाचे राष्ट्रीय प्रेमात रूपांतर केले आणि त्यांना स्वातंत्र्य चळवळीत ओढून घेतले. मग काय नागनाथ अण्णांच्या हाताला सारी रत्नचं रत्नं लागली.

अहिर गल्लीतील किसन पैलवान, खंडू शेळके, नारायण कदम, रामू अहिर (मास्तर) या मंडळींच्या बरोबर अनेक गल्लींतील मुलं अण्णांना सहकार्य करू लागली. या ग्रुप बरोबर, इनामदार आप्पा(परुळेकर), सखाराम घोरपडे(काका), किसन देसाई, पांडू खंडागळे, पांडादेव(गावडे) कुबेर नवले वगैरे स्वातंत्र्य लढ्याला उघड पाठिंबा देणारी सोन्यासारखी माणसं मिळाली, माणसानं माणसं वाढत गेली. शेजारी पडवळवाडीचे तुकाराम नाना खोत (वस्ताद), महादेव अनुसे (देवास), मारुती बाड, कदम(भाऊ), करमाळकर तात्या वगैरे चळवळीत सामिल झाली. हळू-हळू अण्णांनी आपल कार्यक्षेत्र वाढवलं. अंकलखोपचे बाळकू बिरनाळे, जक्राराईवाडीचे गंगाराम गायकवाड, नामदेव गायकवाड, लाडेगावचे विष्णू देसाई (कॅप्टन), दत्तू पाटील, शंकर सावळा नाईक (आत्रे)आणि विठू पाटील (घोडेवाला), ढगेवाडीचे अंता पाटील, बाळू काईगडे, बाळकू दलाल, शिराळचे पांडू गायकवाड, वाय.सी.पाटील, आरळा माधवराव गायकवाड, आष्टा मारुती गायकवाड, बच्चू पोरवाल (शेडजी) अशी अनेक कार्यकर्त्यांची फळी एकत्र करून त्यांच्यात देशप्रेमाची जागृती केली व सेवादलाच्या माध्यमातून

त्यांचे संघटन बांधले. संपूर्ण वाळवे तालुका, शिराळा पेठा, कुंडल, पलूस, येळावी, तासगाव, मिरज पूर्व व पश्चिमेचा भाग ते म्हैशाळ पासूनचा भाग कर्नाटकातील ब्याकूड पासून बेळगाव पर्यंतचा भाग, कागल, सांगाव व कोल्हापूरचा शहराचा परिसर, कोडोली पासून कुंभोज पर्यंतचा वारणाकाठ, शिराळा पेट्यातील वारणेचा दोन्ही काठांवरच्या परिसरातील जिवाला जीव देणारी हजारो माणसं नागनाथ अण्णांनी मिळवली. पंडित नेहरु , महात्मा गांधी यांना आपल्या चळवळीचे प्रमाण मानून क्रांतिसिंह नाना पाटलांचे नेतृत्व स्वीकारून स्वातंत्र्याचा संग्राम ते लढत होते.

अनेक वेळा जीविताशी आलेल्या संकटांशी तोंड देत वाटचाल करणाऱ्या आपल्या मुलाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला वडील बापूंनी व आई लक्ष्मीबाईंनी मनापासून समजून उमजून पाठिंबा द्यायला सुरुवात केली. जसजसे दिवस पालटत होते तसतसे नवनवीन तरुण स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेत होते. पुढे ब्रिटिश सत्तेच्या विरोधातील त्याच्या अनेक कारवायांमुळे या सर्वांच्यावर इंग्रज सरकारने पकड वारंट बजावली होती.

छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही अण्णांची दैवतं असून क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, हुतात्मा भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, बाबू गेणू, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, संत गाडगेबाबा, साने गुरुजी ही स्फूर्तिस्थानं आहेत.

या स्वातंत्र्य संग्रामाचे लोण खेड्यापाड्यांतही पोहचले होते. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या मामलेदार कचेरीवर मोर्चा काढायचा व तेथे तिरंगा फडकवयाचा असा निर्धार केला होता. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामाला सुरुवात होऊन पुरता एक महिना झाला असेल नसेल तोवरच इस्लांपूरचा मोर्चा काढण्याचे प्रमुख कार्यकर्त्यांनी ठरवले. नावाला वाळवे तालुका म्हणून असलेल्या तालुक्याचे कोर्ट कचेरीचे कामकाज इस्लामपूर या मध्यवर्ती ठिकाणावर चालत होते. गेले सात आठ दिवस वाळवा तालुक्याच्या सर्व खेड्यापाड्यांत, वाड्या वस्त्यांतून नाना पाटील, पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, यशवंतराव चव्हाण, विनायकराव पंढरीनाथ थोरात (दादा), पांडुरंग दादा पाटील (गोटखिंडी) आदी कार्यकर्त्यांनी तुफान प्रचार करून इस्लांपूरच्या मामलेदार कचेरीवरचा मोर्चा संघटित केला होता. १० सप्टेंबर १९४२ या दिवशी गावो गावांतून, वाड्या वस्त्यांवरून, दऱ्या कपारींतून महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू , क्रांतिसिंह नाना पाटील, छत्रपती शिवाजी महाराज, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल वगैरे राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नावांच्या गगनभेदी घोषणा देत सत्याग्रही शेतकऱ्यांच्या तुकड्यांवर तुकड्या इस्लामपूर कचेरीच्या रोखानं येत होत्या. अधे मधे रस्त्यातच वेगवेगळ्या खेड्यांतून आलेल्या तुकड्या एकमेकांत येऊन मिसळत होत्या. त्यांची

भली मोठी एकच एक तुकडी होत होती. सकाळ पासून इस्लामपूरच्या दिशेला अशा तुकड्यांची रीघ लागली होती. या सर्व तुकड्या त्या दिवशी इस्लांपूरच्या मामलेदार कचेरीवर चालून जाणार होत्या आणि मामलेदार कचेरीवर ताबा घेऊन तिरंगा फडकाविणार होत्या. आठवड्या पूर्वीच तासगाव तालुक्यातील शूर शेतकऱ्यांनी गोविंदराव खोत, सुंदरगिरजी महाराज, कुराडे काका यांच्या नेतृत्वाखाली तासगावचा मोर्चा यशस्वी केला होता. त्या उठावासाठी तासगाव तालुक्यात गावो गाव फिरून नागनाथ अण्णा व जी.डी.बापू, गणपत कोळी, वि.स.पागे, स्वामी रामानंद भारती, नाना पाटील, कुराडे काका, वसंतराव दादा पाटील सारख्या आनेक कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून जनता संघटित केली आणि तासगाव तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना बरोबर घेऊन तासगावच्या मामलेदार कचेरीला घेरले होते. तासगावच्या मामलेदारास गांधी टोपी घालून तासगाव कचेरीवर तिरंगा फडकविला होता. ही बातमी सातारा जिल्ह्यातील खेड्यापाड्यांत वाऱ्यासारखी पसरली होती. सर्व जिल्हाभर उत्साहाला उधाण आले होते. सातारा जिल्ह्यातील प्रत्येक मामलेदार कचेरीवर तिरंगा फडकवण्याचे भूमिगतांनी ठरवले होते. प्रत्येक तालुक्याच्या मामलेदार कचेरीवरील मोर्चा यशस्वी करून शेवटी सातारा जिल्ह्याच्या कलेक्टर कचेरीवर तिरंगी निशाण लावायचा भूमिगतांचा मनसुबा होता आणि त्याचाच एक भाग म्हणून इस्लामपूरच्या मोर्चाचा घाट घातला होता. इस्लामपूरच्या ईशान्य दिशेला कचेरी होती. दक्षिणाभिमुखी असलेल्या या कचेरीच्या समोरून पूर्व पश्चिम असा एक रस्ता जातो. या रस्त्याला इस्लामपूर हायस्कूलच्या ग्राउंडकडून येणारा दक्षिणोत्तर रस्ता मामलेदार कचेरीजवळ येऊन मिळतो व या दोन्हीही रस्त्यांना दक्षिण बाजूला अग्नेयकडून येऊन ईशान्येला जाणारा एक रस्ता छेदून जातो. या रस्त्यामुळे एक त्रिकोण तयार झालेला असून या त्रिकोणातच मामलेदार कचेरी समोर विस्तीर्ण पटांगण आहे. एका वेळी चाळीस पन्नास हजार माणसं मावू शकतील एवढे हे पटांगण मोठे आहे. त्या दिवशी बारा वाजल्यापासून पटांगण हळू हळू गजबजू लागले होते. त्यातच शिराळ पेठा व तासगाव तालुक्यातील हजारो शेतकरी सामील झाले होते. किर्लोस्करवाडीचे कामगारही स्वयंस्फूर्तीने उठावात सामील झाले होते. अजून कामेरी, कुरळूपकडच्या सत्याग्रही शेतकऱ्यांच्या तुकड्या येणार होत्या. त्या तुकड्यांचे नेतृत्व पांडू मास्तर व यशवंतराव चव्हाण वगैरे नेते करत होते. हा मोर्चा संघटीत करण्यामागे पांडू मास्तर (येडेनिपाणी) यांचे फार मोठे योगदान होते. साडेतीनच्या सुमाराला कामेरी, कुरळपच्या तुकड्या विजयाच्या घोषणा देत मामलेदार कचेरीच्या रोखाने पांडू मास्तर यांच्या नेतृत्वाखाली येऊ लागल्या. मैदान खचाखच भरले होते. आवारात ठाण मांडून बसलेल्या सत्याग्रही शेतकऱ्यांनी राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नावांच्या घोषणांनी एकच

जल्लोष उडवून दिला. तासगावच्या मोर्चाने गोरे अधिकारी चिडले होते. त्या मोर्चाने इंग्रज सरकारी यंत्रणा अपमानीत झाली होती. स्वतःच्या हातने मामलेदार कचेरीवर तिरंगा निशाण लावलेल्या मामलेदाराला त्यांनी कमी केले होते. आजचा मोर्चा यशस्वी होऊ द्यायचा नाही असा सरकारी अधिकाऱ्यांनी चंग बांधला होता. त्यादृष्टीने त्यांनी कडक यंत्रणा ठेवली होती. जिल्ह्यातून जादा पोलिसांची कुमूक मागवली होती. बंदोबस्तावर देखरेख करण्यासाठी व मोर्चा मोडून काढण्यासाठी स्वतः डी.एस.पी., सि.एम.एस.येट्स हजर होते. हा इस्लामपूरचा उठाव यशस्वी झाला तर जिल्ह्यातल्या इतर भागांत याची लागण होणार होती आणि त्याची परिणती सर्व राज्य कोसळून पडण्यात होणार होती. म्हणून कुठल्याही परिस्थितीत इस्लामपूरचा उठाव अत्यंत कठोरपणे मोडून काढण्याचे कुटिल कारस्थान अधिकाऱ्यांनी रचले होते. कुरळपची सत्याग्रही शेकऱ्यांची तुकडी येताच मामलेदार कचेरी जवळ जमलेल्या अथांग जनसमुदायाने ज्या विजयाच्या घोषणा केल्या त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांची माथी भडकली. त्यात जमाव अफाट जमलेला होता. तासगावच्या उठावाची पुनरावृत्ती होण्याची भीती सरकारी अधिकाऱ्यांना वाटू लागली. सरकारी यंत्रणेने पुढचा धोका ओळखला आणि ते एकदम जमावा समोर आले. उठाव मोडण्याचे नियोजन अगोदरच केलेले होते. जमावाला उद्देशून विचारले, "तुमचे पुढारी कोण? तुमचे म्हणणे काय आहे?" अधिकाऱ्यांच्या या प्रश्नाबरोबर नाना पाटील, पांडू मास्तर, आदी नेते सरकारी अधिकाऱ्यांच्या समोर गेले. पोलिसांच्या तुकड्या मामलेदार कचेरीच्या आवारा बाहेर वीस पंचवीस यार्डवर सज्जच होत्या. पोलिस अधिकाऱ्यांनी नेत्यांना ताब्यात घेतले व ते त्यांना कचेरीच्या बाजूला घेऊन निघाले. जमाव बिथरला. तो कचेरीच्या दिशेने घोषणा देत जोशाने बेधडक पुढे सरकू लागला. कानठळ्या बसविणाऱ्या सत्याग्रहींच्या त्या जयघोषांनी तो मामलेदार कचेरीचा परिसर दणाणून गेला. वाळवे तालुक्यातला शेतकरी बेडर आहे, धडाडीचा आहे, स्वाभिमानी आहे, मागे हाटणारा नाही, याची पोलिस अधिकाऱ्यांना पुरती कल्पना होती, शेतकरी सत्याग्रहींच्या पासून नेत्यांना अलग केले तर या शेतकऱ्यांच्यात एक संघपणा राहणार नाही याची पोलिस अधिकाऱ्यांना कल्पना होती आणि तसेच घडले. नेते अलग झाल्याबरोबर शेतकऱ्यांच्यात जो गोंधळ उडवून देण्याकरिता एकदम लाठी चार्ज आणि अश्रुधुरांची नळकांडी फोडण्याचे सुरू केले. लाठी मारानेही जमाव मागे हटत नाही असे लक्षात येताच अचानक गोळी बाराला सुरुवात केली. क्षणार्धात किर्लोस्कर कामगारांचे नेतृत्व करणारे उमा शंकर पांड्या व कामेरीच्या शेतकरी तुकडीतील आलेले सत्याग्रही विष्णू बारबट्टे घायाळ होऊन पडले. बंदुकीच्या फैरी झडतच होत्या. निःशस्त्र शेतकऱ्यांचे नीतिधैर्य ब्रिटिश सत्तेच्या जुलमी

पोलिसांच्याकडून होणाऱ्या बेमालूम गोळीबारामुळे खचले. जिवाच्या भीतीने ते सैरावैरा पळत सुटले. बघता बघता मामलेदार कचेरीसमोरचे विस्तीर्ण पटांगण निर्मनुष्य झालं, सारा शुकशुकाट झाला. शेतकरी सत्याग्रहींनी मिळेल तिथे आसरा घेतला काही शेतकरी गावाबाहेर आपापल्या गावाच्या दिशेने पळत सुटले. गोळीबार, गोळीबार चोहीकडे एकच हाहाकार उडाला होता. इस्लामपूर गावात आणि गावाच्या बाहेरच्या बाजूला हजारो सत्याग्रही शेतकरी येऊन थांबले होते. मूठभर पोलिसांनी हजारो शेतकऱ्यांचा जमाव निव्वळ बंदुकीच्या जोरावर क्षणार्धात उधळून लावला होता आणि दोन बळी घेतले होते. या घटनेचा एका तरुणाच्या मनावर कमालीचा परिणाम झाला होता. तो तरुण विचार करत होता. अशा पद्धतीने शेतकऱ्यांचे, कामगारांचे बळी देऊन आपण काय साधणार आहोत? समोरच्या माणसाच्या हातात शस्त्र आहे, तो क्रूर आहे. निष्ठुर आहे. दया माया न दाखवता समोरच्या माणसावर शस्त्र चालविणारा आहे. केवळ हजारो, लाखोंच्या संख्येने अशा माणसांसमोर बेडरपणे जाऊन उभे राहून आपण काहीही साधणार नाही. उलट आपण काही हाकनाक शेतकऱ्यांना गमावून बसायचे काय? अशा जुलमी सत्ताधारी सत्तेचा कुठल्या मार्गाने, कुठल्या पद्धतीने मुकाबला केला पाहिजे? असे त्या तरुणाला वाटू लागले, जशास तसेच, ठोशाला ठोसा, शस्त्राला शस्त्रानच उत्तर दिले पाहिजे. पण तो पडला गांधीजींचा सच्चा सचोटीचा अनुयायी. गांधीजींच्या विचारांचा त्याच्या कोवळ्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. गांधीजींच्या विधायक कार्याचा संदेश तो प्रत्यक्ष कृतीत कुवतीप्रमाणे आणत होता. खेड्या पाड्यांत हिंडून खादीचा प्रचार करत होता आणि स्वतः आपल्या अंगावरचे सर्व कपडे खादीचेच वापरत होता. इस्लामपूरच्या उठावावर जुलमी पोलिस अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबाराचे त्याच्या मनात द्वंद्व सुरू होते. कठोर संघर्ष सुरू झाला होता. तासगाव आणि इस्लामपूरच्या उठावाने आपण काय साधले? त्याच्या मनाची सारखी घालमेल होत होती. उठाव करायचा, मामलेदार कचेरीवर जायचे आणि झेंडा लावायचा त्याशिवाय स्वातंत्र्याची चळवळ पुढे जायची नाही. सोन्यासारखी माणसं मात्र हाकनाक जिवाला मुकली. सत्याग्रही मार्गाने स्वातंत्र्याचा लढा कसा यशस्वी करणार आहोत? त्यांच्या मनात अनेक प्रश्नांचे काहूर उठले होते. त्यांचे तेच मनाशी उत्तरे शोधत. बरोबरीच्या सहकाऱ्यांबरोबर चर्चा करत होते. आपली उत्तरे आणि सहकाऱ्यांनी दिलेली उत्तरे पडताळून पहात होते. इस्लामपूरच्या उठावाची वाताहात त्यांनी डोळ्यांनी पाहिली होती. केवळ हातात शस्त्र नव्हते म्हणून वाळवे तालुक्याचा लढाऊ शेतकरी दाहीदिशा पळून गेल्याचं केविलवानं दृश्य डोळ्यासमोर तरळत होते. त्या दिवसापासून त्या तरुणाचे मन बेचैन होते. दऱ्या खोऱ्यांतून खेड्यापाड्यांतून

मुलूख पायाखाली तुडवत स्वातंत्र्य संग्रामासाठी कार्यकर्ते जमा करत होते. शेकडो कार्यकर्ते जमा झाले होते. इस्लामपूर उठावापासूनची त्यांच्या मनाची बेचैनी अद्याप शमली नव्हती. अलीकडे त्यांना राहून राहून तीव्रतेने सारखं वाटत होत की, निर्दयी ब्रिटिश सरकारबरोबर आपण शस्त्रानच लढलं पाहिजे. असे विचारचक्र ज्या तरुणाच्या मनामध्ये सुरू झाले त्या तरुणाचे नाव नागनाथ नायकवडी. नेमके त्याच वेळी बंगालच्या सूर्यसेन, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस आदी क्रांतिकारकांच्या संबंधीचे वाङ्मय त्यांच्या वाचनात आले. मग तर त्यांना अगदी प्रकर्षान वाटू लागलं की आपण फौजी संघटना उभारायला हवी. लोकांना शस्त्र चालवायला शिकवले पहिजे. लष्करी डावपेच शिकविले गेले पाहिजेत आणि महात्मा गांधींच्या नीतिधैर्याने आणि सुभाषचंद्र बोसच्या मनगटशाही चढाईनं ब्रिटिश सरकारच्या एका ठाण्याचा कब्जा घेऊन त्या ठिकाणी आपलं म्हणजे लोकांचं सरकार स्थापन करता आले पाहिजे, प्रति सरकार उभारल गेलं पाहिजे. इंग्रजी सत्ता मोडून काढण्याकरिता सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना बाहेरून आली तर आपली शेतकऱ्यांची देशांतर्गत फौज त्यांना मदत करायला तयार पाहिजे. तरच तासगाव किंवा इस्लामपूर सारख्या उठावाला काही अर्थ आहे. अण्णांच्या मनात विचारांचे थैमान सुरू झाले. वाळव्याच्या एका कुलवंत शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेला, आभाळा एवढं मन मोठं असलेला, हिमालयासारखा धीर गंभीर असलेला, अथांग महासागरासारखा शांत स्वभावाचा आणि गोर गरिबांच्या अस्मितेला कोणी हात घातला तर तितक्याच जोरात उसळी मारणाऱ्या या मुलाने बेचाळीस साली विद्याभ्यासाचा त्याग करून देश स्वातंत्र्याच्या संग्रामात भाग घेतला आणि लढ्याचा एक थोर शिल्पकार म्हणून नागनाथ नायकवडी प्रसिद्धीस आले आणि लोकांनी त्यांना क्रांतिवीर पदवी दिली. इंग्रजी सत्तेचे धाबे दणाणायला लागले. इंग्रजांनी या क्रांतिवीराचा बंदोबस्त करण्याचे ठरविले आणि त्यांना पकडण्यासाठी स्पेशल पोलिस पथकाची नेमणूक केली. जंग जंग पछाडले, पण क्रांतिवीर नागनाथ हे पोलिसांच्या हाती लागेनात म्हणून त्या काळात क्रांतिवीराला पकडून देणाऱ्याला ५०० रु. बक्षिसाचे आमिष दाखवले आणि प्रत्येक पोलिस स्टेशनच्या हद्दीत ते जाहीर केले. शेवटी अण्णांच्या आई व वडिलांना पकडून नेले. येरवड्याच्या तुरुंगात त्यांना डांबले. धाकट्या भावासही मारहाण केली. तरीही क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी आपली जिद्द सोडली नाही. इंग्रजांनी त्यांच्या घरादाराची जप्ती केली. शेजारपाजाऱ्यांना त्यांच्या शेतीत काम करण्यास मज्जाव केला. गाव गुंडांना जेल मधून मोकळे सोडले. त्यावेळी गाव गुंडांना एकच अट घातली-क्रांतिकारक नागनाथ नायकवडी यांना पकडून आमच्या हवाली करा किंवा परस्पर त्यांचा काटा काढा. येन-केन प्रकाराने त्यांना पकडण्यासाठी

प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण उपयोग काहीच झाला नाही. उलट नागनाथांचा जनमाणसांत आदरभाव निर्माण झाला. लोकच त्यांना संरक्षण देऊ लागले. रात्री अपरात्री पोलिस गावात छापा टाकायला आले तर बहिर्जी नाईक या गुप्त संघटने मार्फत सावधानतेचा निरोप आपसूक जनताच त्यांना देऊ लागली. इंग्रजांचा वाढता धोका थोपवण्यासाठी, इंग्रजी सत्तेला नामोहरम करण्यासाठी म्हणून फौजी संघटना उभारायची अण्णांना आता घाई झाली होती. फौजी संघटनेशिवाय ब्रिटिश साम्राज्यशाहीला कमी अधिक प्रमाणात का होईना हादरा देऊ शकत नाही याबद्दल त्यांच्या मनाची बालंबाल खात्री झाली होती. फौजी संघटनेसाठी लागणाऱ्या माणसांची त्यांच्याजवळ कमतरता नव्हती. पण?

पण खरी अडचण शस्त्रांची होती आणि ही शस्त्रं कोठून मिळवायची ? कशी मिळवायची? त्यातून एक दोन शस्त्रे मिळवून भागणार नव्हते. फौजी संघटनेसाठी हजारो हत्यारांची आवश्यकता होती. इतकी शस्त्रं आणायची कोठून? अण्णा व त्यांच्या भोवती जमलेल्या हजारो तरुणांच्या पुढे आव्हान होते. तरी पण ते स्वस्थ बसणारे क्रांतिकारक नव्हते. शस्त्रे मिळवण्यासाठी त्यांनी गंभीर विचार चालू केला. काही खाजगी व्यक्तींच्या जवळ लायसेन्सच्या बंदुका असल्याचं समजून आलं; परंतु काही खाजगी व्यक्तींच्या जवळ लायसेन्सच्या बंदुका होत्या; परंतु या पैकी बरीच मंडळी मागून बंदुका देणाऱ्यांपैकी नव्हती. त्या वेळी, विशेषत: ब्रिटिश सरकारच्या मर्जीत असणाऱ्या लोकांनाच बंदुकीचे लायसन्स दिली जात होती. अशा बंदुकांची संख्याही अल्प होती. पलीकडे वाळवे तालुक्या लगतच्या कोल्हापूर संस्थानमध्ये सरदार, इनामदार मंडळींकडे शिकारीकरिता बाळगलेल्या बऱ्याच बंदुका होत्या त्या मिळोत ना मिळोत क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा ब्रिटिश सरकारच्या वर्मावर घाव घालण्यासाठी फौजी संघटना उभारण्याचा बेत पक्का होता.

भूमिगतांचा वाढता जोर पाहून पोलिसांनी गाव गुंडांना हाताशी धरले आणि भूमिगतांना नामोहरम करण्यास सुरुवात केली. सरकारने तुरुंगात डांबून ठेवलेल्या दरोडेखोर क्रिमीनल गुंडांना मोकळे सोडले. त्यांच्या करवी महात्मा गांधी व नाना पाटलांच्या नावाचा जयजयकार करत गावो गाव दरोडे घालण्यास सांगितले. भूमिगतांना मदत करणाऱ्या गावकऱ्यांना त्रास द्यायला सुरुवात केली येन-केन प्रकारे स्वातंत्र्य सैनिकांना हैराण करण्याचे कुटिल कारस्थान ब्रिटिश सत्ताधीशांनी केले. ब्रिटिश पोलिस व फरारी दरोडेखोर यांच्या संगनमताचा धोका लक्षात घेता दरोडेखोर व गाव गुंडांचा बंदोबस्त करण्याकडे भूमिगतांनी मोर्चा वळवला. भूमिगत चळवळ चालू असताना इंग्रजधार्जिण्या मंडळींना शह देण्यासाठी व गोरगरिबांना गाव गुंडांच्या त्रासातून वाचवण्यासाठी जून १९४३ साली कामेरी येथे प्रतिसरकार स्थापण्याच्या हेतूने व्यापक

बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीत फितुरांचा बंदोबस्त करणे, गरिबांना न्याय देणे, गावातील सावकारशाही मोडून अनिष्ट प्रथा दूर करणे, गावागावांत सभा घेऊन न्यायदान मंडळे भरवणे, अशा तऱ्हेचे विचार मांडण्यात आले. दे.भ.बर्डे गुरुजी, वैद्य धन्वंतरी, डी.जी.देशपांडे, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, वाय.सी.पाटील, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड, बाबूराव कोकाटे, घोरपडे मास्तर, बाबूजी पाटणकर, बाबूराव चरणकर, दत्तोबा लोहार, गणपतराव पाटील, ईश्वरा लाड, किसन अहिर, बाबू जंगम, पांडु तात्या बोराडे, बापूराव जगताप (गोवा-लिंब) भिकोबा साळुंखे, विष्णू डोईफोडे, एस.बी.पाटील, रामू मास्तर, काका घोरपडे, तुकाराम खोत, इनामदार आप्पा, खंडू शेळके, अंता पाटील असे अनेक कार्यकर्ते प्रतिसरकारच्या बैठकीला हजर होते. प्रतिसरकारामार्फत वारसा हक्काचे दावे सुद्धा तडजोडीने मिटवीत, चोऱ्या, दरोडे थांबविले जात असत. स्वच्छता, ग्रामसफाई, न्यायदान इ.कामे केली जात होती. राजूताई या रणरागिणीप्रमाणे गर्जत या सर्व कामांत आघाडीवर असत. प्रतिसरकारच्या उभारणीमध्ये ग्राम राज्याची कल्पना स्पष्ट होती. ग्राम राज्य उभे करायचे तर पैसा पाहिजे. गाव गुंडांना वठणीवर आणण्यासाठी शस्त्रे पाहिजेत. एक वेळ कराड तालुक्यातील चरेगावात नाना पाटील, महात्मा गांधी यांच्या नावाच्या घोषणा देत एका रात्रीत बत्तीस घरे फोडली. तेव्हा भूमिगतांनी त्या दरोडेखोरांना चोपून काढले व दरोड्यातील माल परत लोकांना परत करण्यास भाग पाडले. दरोडेखोरांनी प्रतिकारासाठी भूमिगतांच्यावर गोळीबार केला. त्या गोळीबाराकरिता ज्या गोळ्या वापरल्या होत्या त्या काडतुसांच्यावर ३०३ असे शिक्के होते त्यामुळे भूमिगतांची पक्की खात्री झाली ब्रिटिश पोलिस व दरोडेखोरांचे संगनमत आहे. याला आवर कसा घालायचा? त्यासाठी भूमिगतांच्या कडेही हत्यारे पाहिजेत. क्रांतिवीर अण्णांच्या मनात हत्यारे मिळवण्याचे विचार सतत घोळत होते. एक दिवस ते कोल्हापुरात आपल्या खोलीत हत्यारे कशी मिळवायची याचा विचार करीत होते त्यांनी ती खोली कागलच्या घाटगे फौजदाराच्या 'मालती' बंगल्यात भाड्याने घेतली होती. नानासाहेब घाटगे यांचे फौजदार घाटगे हे नात्याने सख्ख्ये चुलते लागत होते. त्यांना भेटण्यासाठी नानासाहेब आले होते त्यावेळी त्यांची व अण्णांची भेट झाली. अनेक विषयांवर नानासाहेब घाटगे व नागनाथ अण्णा बोलत होते. बोलता बोलता हत्यारांचा विषय निघाला. नानासाहेब घाटगे म्हणाले, ''आमच्या कागल गावालगतच हातकणंगले पेट्यात कसबे सांगाव हे गाव आहे. त्या गावी चार शस्त्रधारी पोलिसांचे आऊट पोष्ट आहे. तिथल्या चार बंदुका व त्याला लागणारी काडतुसे तुम्ही प्रयत्न केलात तर नक्की मिळतील'' नागनाथ अण्णांचे विचारांचे चक्र बंदुका मिळवण्यासाठी फिरू लागले.

# टपाल गाडी लूट

स्वातंत्र्याचा वणवा पेटला होता. आता भूमिगत चळवळीला उधान आलं होतं. गावो गावची तरणी बांड पोरं स्वातंत्र्य संग्रामात बेधडक उड्या घेत होती. क्रांतिकारक सांगतील ती कामं फत्ते करत होती. तरुणांना साधन सामुग्री देण्यास पैसा उभा करण्याची निकड वाटत होती. भूमिगतांना शस्त्रे देण्यासाठीही पैशाची गरज होती. या-त्या कारणाने खर्च सतत वाढतच होता. यावर काहीतरी उपाय हा काढलाच पाहिजे. म्हणून नागनाथ (अण्णा) नायकवडी, आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर खलबते करत होते. नागनाथ (अण्णा) नायकवडी हे खाजगी संपती लुटण्याच्या विरोधात होते हे त्यांच्या सहकाऱ्यांना चांगले माहीत होते. ताबडतोबीने सरकारी खजिना लुटायाचा म्हटलेतर त्या खजिन्याला एवढ्या कडेकोट संरक्षणात ठेवलेले असायचे की हल्ला करून लुटायचे म्हटले तर हत्यारांचा तुटवडा. काय करावे या विचारातून एक तूर्त सोपा मार्ग म्हणून पोष्टाची थैली पळवण्याचा विचार पुढे आला. ही गोष्ट खरोखरच जरा सोपी होती. कारण पोष्टाच्या थैलीबरोबर एकच हत्यारबंद पोलिस असतो आणि ती थैली सर्व्हिस गाडीतून नेली जात होती. एके दिवसी कोल्हापूरच्या एका कार्यकर्त्याने नागनाथ नायकवडी यांना बातमी दिली. दररोज कोल्हापूरहून टपालाची थैली कोडोलीला जाते. नागनाथनी सर्व बाजूंनी या गोष्टीचा विचार केला. ही एक नामी संधी आहे असे सहकाऱ्यांना त्यांनी सांगितले व ते टपाल गाडी लुटण्याच्या तयारीला लागले. प्रथम या कामासाठी

नागनाथ अण्णांनी आपल्या शाम पाटील वगैरे निवडक सहकाऱ्यांची निवड केली. कोडोली टपाल गाडी लुटण्याचा दिवस नक्की केला. दोघा सहकाऱ्यांना बरोबर घेऊन नागनाथ अण्णा गाडी लुटण्याच्या ठिकाणी पुढे जाऊन थांबले. मोटार गाडी कोल्हापूरहून सुटल्यावर टोप संभापूर स्टॉपवर थांबणार होती. त्याच ठिकाणी टपाल गाडी लुटण्याचे निश्चित केले होते. गाडी थांबल्यावर गाडीत बसून आलेल्या सहकाऱ्यांनी टपाल गाडी बरोबर आलेल्या हत्यार बंद पोलिसाला मिठी मारून पकडून ठेवावयाचे. बाकीच्या क्रांतिकारकांपैकी चौघांनी रायफलीच्या धाकाने पॅसेंजरना रोखून धरायचे, एका क्रांतिकारकाने ड्रायव्हरला केबीन मधून खाली ओढून घ्यायचे व नागनाथ अण्णांनी गाडीत चढून पोलिसाची बंदूक काढून घ्यायची व बाकीच्या सहकाऱ्यांनी पोष्टाची थैली हस्तगत करून एका पाठोपाठ एक असे गाडीतील तिघांनी गाडीतून खाली उतरायचे आणि सर्वांनी मिळून शेजारच्या जोंधळ्यातून जोतिबाच्या दिशेला पोबारा करावयाचा. लोकांचा प्रतिकार झाला तरच रायफलचे हवेत बार काढून लोकांना धमकावयाचे असे नियोजन ठरले. ठरल्याप्रमाणे सर्वांनी आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडली व मिशन फत्ते झाले. जोतिबाच्या डोंगराला वळसा घालून सर्व क्रांतिकारक पन्हाळ्याच्या पायथ्यालगतच्या वाघ बिळाच्या जंगलात विसावले. कारण वाघाच्या भीतीमुळे त्या जंगलात कोणीही माणसं फिरकत नव्हती. त्या ठिकाणी त्यांनी पोष्टाची थैली फोडली. त्या पोष्टाच्या टपाल गाडीच्या लुटीतून विशेष अशी रक्कम हाताला लागली नाही. तात्पुरत्या खर्चाची व्यवस्था झाली.

# हत्यार मिळवण्याचा निर्धार

वाईचे किसन वीर, येड्याचे पांडू मास्तर वगैरे चार क्रांतिकारकांनी पुण्यातील येरवडा जेल मधून पलायन केले होते. ते भूमिगत कार्यकर्ते पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी त्यांना चकवा देत असत. त्यांपैकी पांडू मास्तर हे  नागनाथ अण्णांचे वाळवे गावाच्या शीव वस्तीवर आश्रयासाठी आले होते. येवढे मोठे स्वातंत्र्य सैनिक पण त्यांच्या जवळ स्वत:च्या संरक्षणासाठी रिव्हालवर सारखे एखादे हत्यार नाही याची नागनाथ अण्णांचे मनाला खंत वाटत होती. त्या दिवसापासून हत्यार मिळवण्याची कल्पना त्यांच्या मनात आली.

इस्लामपूर उठावापासून फौजी संघटनेचे विचार नागनाथ अण्णांच्या मनात ठाण मांडून होते. फौजी संधटनेशिवाय इंग्रजी राजवटीला आपण नामोहरम करू शकत नाही. फौजी संघटनेला लागणाऱ्या माणसांची त्यांच्याजवळ कमतरता नव्हती. खरी अडचण शस्त्रांची होती. खाजगी बंदुका लुटून आणि एखाद्या आऊट पोष्टवर हल्ला करून मिळवलेल्या बंदुकांची जमावाजमव ही फौजी संघटना उभारण्यासाठी अगदीच तोकडी होती म्हणून ते हत्यार शोधाच्या प्रयत्नात होते.

नागनाथ अण्णा यांना हत्यार मिळवण्याची दुर्दम्य इच्छा स्वस्थ बसू देईना. हत्यार आणण्याचा धाडसी बेत त्यांनी मनात ठरवला आणि हत्यार मिळाल्या शिवाय परत यायचं नाही असा मनोमनी ठाम निर्णय घेतला आणि कोल्हापूर मधील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मध्ये आपल्या खोलीवर आले. अंघोळ केली, खादीचं

धोतर नेसले खादीचाच अंगरखा घातला. त्यावर खादीचा कोट डोक्यावर गांधी टोपी, पायात कोल्हापुरी चप्पल सरकवलं आणि ११ नोव्हेंबर १९४२ रोजी निघाले. हत्यार आणायच म्हटलेवर पैसे पाहिजेत. यांच्या खिशात एक दमडीही नाही आणि म्हणे हत्यार घेतल्याशिवाय परत येणार नाही. नागनाथ अण्णा स्वतःच्या मनाला प्रश्न विचारत होते व त्याचे अचूक उत्तर शोधत होते. कोल्हापूर सोडताना आपल्याकडे थोडे फार पैसे असावेत म्हणून कोडोलीच्या आर.एस.पाटील या मित्राला शंभर रुपये मागितले त्याने ट्रंक उघडली व त्यातील शंभर रुपयाची नोट आनंदाने त्यांच्या हातावर ठेवली. पैसे कोटाच्या खिशात घातले व ते हत्याराच्या शोधात बाहेर पडले. व्यंकटराव महाडीक नावाचे त्यांचे मित्र शिक्षणासाठी कसबे बावड्यामध्ये रहात होते. त्या मित्राकडे त्यांनी हत्यारांचा विषय काढला. व्यंकटराव महाडीक म्हणाले, ''हत्यार मिळेल पण त्यासाठी मुगळीला (ता.गडहिंग्लज) माझ्या विचारे मामांच्याकडे गेले पाहिजे.'' नागनाथ अण्णांच्या मनासारखं झालं. ते म्हणाले, ''ठीक आहे, चला, आपण तुमच्या मामाकडे जाऊया'' मुगळी गाव गडहिंग्लज तालुक्यात होते. दोघेही गडहिंग्लज पर्यंत सर्व्हिसच्या मोटार गाडीतून प्रवास करत पोहोचले. गडहिंग्लज पासून मुगळी हे गाव सहा मैलांवर होते. कोल्हापूरहून निघून ते दोघे गडहिंग्लजला पोहोचले त्यावेळेस दिवस मावळतीकडे झुकलेला होता. मुगळीची मधली पायवाट रानावनातून ओढ्या नाल्यातून झाडा झुडपांतून जाणारी होती. पण व्यंकटरावांच्या पायाखालची ती वाट होती. दोघांनी गडहिंग्लज सोडले व मुगळीच्या पायवाटेने झपाट्याने चालायला लागले. दीड दोन मैल गेल्यावर दिवस डोंगरा आड गडप झाला आणि अंधार पडायला लागला. रानावनातील रान पाखरांची किलबील थांबली. रात किड्यांनी किरकिर करायला सुरुवात केली. दोघेही भराभरा पाय उचलून चालत तर कधी दुडक्या चालीनं, पळत मुगळी गावाला जवळ करत होते. मध्येच थांबून व्यंकटरावांनी नागनाथ अण्णांना सूचना केली. ते म्हणाले, ''इथून पुढे चार एक फर्लांग रस्ता ओढ्या नाल्याचा, पांदीचा आहे. मध्येच ओढ्याच्या काठावर किर्र झाडी आहे. माझ्या पाठीमागने जरा जपून पाय टाका.'' खरं म्हणजे मुगळीची चार एक फर्लांगची ती वाट दिवसा अंगावर शहारे आणणारी आहे आणि हे दोघेच मात्र ती वाट सूर्यास्तानंतर तुडवत चालले होते. स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी हत्यार पाहिजे होते त्यासाठी हे त्यांचं धाडस होतं. रस्त्यात अनेक अडचणींना तोंड देत पाऊल पुढे टाकत होते.मध्येच कोल्हेकुईचा आवाज यायचा, टिटव्या ओरडायच्या, रान मांजरे अधून

मधून पळायची, घुबडांचे आवाज, पांदीच्या पाण्यात सळसळत एखादा लांबडा प्राणी जायचा. नागनाथ अण्णांच्या डोक्यात एकच विचार. हत्यार मिळवावयाचे. त्यामुळे त्यांना कशाचीही पर्वा नव्हती. ते एक सारखे वाट मागं टाकत पुढचे पाऊल पुढेच टाकत. महाडिकांच्या मागोमाग चालले होते. पांदीची वाट पार करून एकदाचे दोघेही मोकळ्या माळाच्या वाटेला लागले. चांदण्यांचा अंधूक प्रकाश पडला होता. मुगळी गाव आता हाकेच्या अंतरावर आले होते. गांवातील लमण दिव्याचा उजेड दिसायला लागला. कुत्र्यांचे भूकणे कानावर यायला लागले आणि एकदाचे दोघे मुगळी गावात पोहचले. गावात मध्यवर्ती ठिकाणी मारुतीच्या देवालयाच्या पूर्वेला व्यंकटराव महाडिकांच्या विचारे मामांचा चौसोपी वाडा दक्षिणमुखी होता. रात्री दोघे वाड्याजवळ पोहचले त्यावेळी वाड्याचा मोठा दरवाजा बंद केला होता. दोघांनी एका पाटोपाट एक दिंडी दरवाज्यातून वाड्यात प्रवेश केला. समोरच विचारे मामा कडीपाटावर झोके घेत बसले होते. या दोघांना आलेले पाहून कडीपाटावरून झटदिशी उठले व त्यांच्याकडे जात, ''या व्यंकटराव, या नागनाथ !'' म्हणत त्यांचे स्वागत केले. दोघांनीही विचारे मामांना नमस्कार केला. विचारे मामांचे कोल्हापूरला कामानिमित्त येणे जाणे होते. कोल्हापूरला आल्यावर व्यंकटरावना विचारे मामा भेटत असत. त्यावेळी नागनाथ अण्णांची व त्यांची बऱ्याच वेळा भेट व्हायची. त्यातूनच त्यांची व नागनाथ अण्णांची चांगली ओळख झाली होती. जराशा काळजीतच मामांनी दोघांना विचारलं, ''आरं पोरांनो, इतक्या रात्री कशाला आलात? यायचं तर दिवसाबरोबर यायचं.'' त्यावर दोघेही म्हणाले, ''आम्हांला मुळात कोल्हापूरहून निघायलाच वेळ झाला होता.'' व्यंकटरावना मामा म्हणाले, '' येवढं होत तर तुम्ही दोघांनी आपल्या गडहिंग्लजच्या पाहुण्यांकडे मुक्काम करायचा आणि सकाळी इकडं यायचं. आरं पोरांनो, चारी वेळा काय सारख्या नसत्यात, हातात एखादी काठी नाहीतर ठेंगड तर ठेवायचे. मोकळ्या हातांनी रात्री अपरात्री बाहेर पडणे हे बरोबर नाही. आता पुन्हा असं वागू नका.'' आणि ते म्हणाले, ''व्यंकटराव, पांदीचा रस्ता कसा हाय हे माहीत होत नव्हं?'' व्यंकटराव म्हणाले,''व्हय, पण मामा आम्ही एकाला दोघं होतो म्हणून धाडस केलं.'' विचारे मामा थोडं रागातच म्हणाले, ''एकाला दोघं होता हे खरं हाय. पण इकडं आता नवीन प्रकार चाललेत. वाटमाऱ्या करणाऱ्यांचा सुळसुळाट चाललाय. तुम्ही चुकून वाटमाऱ्यांच्या तावडीत सापडला असता तर? बघा व्यंकटराव, तुमच्या मामीला काय उत्तर द्यायचे ते तुम्हीच द्या.

त्यांचा राग तुम्हांला चांगला माहिती आहे.'' मामांनी आपल्या पत्नीला हाक मारली, ''अहो, ऐकलत का? हे बघा व्यंकटराव व त्यांचा मित्र नागनाथ आल्यात. अहो, पोरं चालून थकल्यात. त्यांना लवकर जेवायला वाढा. दोघांनी हात पाय धुतले. मामांच्या सह तिघंही जेवायला बसले. भूक तर दोघांनाही चांगलीच लागली होती. यथेच्छ भोजन झाल्यावर तिघेही हवेशीर सोप्याला बैठकीवर येऊन बसले. मामांनी सुपारी कातरत मूळ विषयला हात घातला. दोघांना उद्देशून म्हणाले, ''एवढ्या रात्री येण्याचं काय प्रयोजन काढलं होतं?''

विचारे मामांना नागनाथ अण्णांनी इस्लांपूरच्या उठावाचे इत्थंभूत वर्णन सांगितले. ''चार पोलिसांच्या बंदुकीच्या धाकाने दहा हजार सत्याग्रही दाही दिशाला पळून गेले. मामा, हत्यारांच्या अंगात दांडगी ताकद आहे. या जुलमी ब्रिटिश सत्तेला जशास तसे उत्तर द्यायला पाहिजे. त्यांना नमवायचे म्हटले तर त्या जातीला हत्यारानेच उत्तर दिले तरच मामा आपण देशाच्या स्वातं-त्र्यासाठी काहीतरी करू शकू.'' ''गड्यांनो, हे तुमचं म्हणनं खरं हाय पण तुम्ही माझ्याकड कशासाठी आला आहात?'' त्यावर व्यंकटराव म्हणाले, ''मामा, तुम्ही हत्याराचं काम कराल म्हणून नागनाथ अण्णांना मी तुमच्याकडं घेऊन आलोय'' मामा एकदम धीर गंभीर झाले. थोडा वेळ विचार केला आणि एकाएकी बैठकीवरून उठले. पाठीमागे हातात हात घालून इकडून तिकडे येरझाऱ्या घालू लागले, मध्येच हात सोडून डोक खाजवायचे. अशा प्रकारे मामांचा थोडा वेळ विचार चालला होता. येरझाऱ्या घालायचे थांबले आणि एका दमात म्हणाले, ''नागनाथजी हत्यार मिळेल. पण?'' एकदम दोघांनी उत्सुकतेने विचारले, ''पण म्हणजे काय मामा?'', त्या दोघांना मामा म्हणाले, ''पण..... म्हणजे देसाई पावण्यांचेकडे आपण गेलो तर ते आपलं हत्याराचं काम नक्कीच करतील.'' व्यंकटराव महाडिकांचे देसाई हे मेव्हणे. त्यांना व्यंकटरावांची थोरली बहीण दिली होती. ते नुकतेच मिलिटरीतून रिटायर झाले होते. मिलिटरीत ते चांगल्या पदावर काम करत होते. त्यांना हत्याराबद्दलची चांगली माहिती असणार आणि ते आपले काम नक्कीच करतील अशी विचारे मामांना खात्री होती.

विचारे मामांनी दोघांनाही झोपायला जाताना सांगितले, ''आपण सकाळी लवकर उठू, न्याहरी करू, दोन भाकरी पदरात बांधू आणि देसाई पावण्यांच्याकडं जाऊ.'' ते दोघेही झोपायला माडीवर गेले. मामांनी घरात हाक मारली, ''अहो ऐकलत का?'' मामी ओ देत बाहेर आल्या. मामा म्हणाले, ''हे पहा, आम्ही सकाळी

न्याहरी करून देसाई पावण्यांच्याकडं जाणार आहे. तेव्हा तुम्हीही जरा लवकर उठा.'' जास्त लांबड लावलेली मालकांना आवडत नाही हे मामींना चांगलं ठावं होतं. मामी म्हणाल्या, ''ठीक आहे. मी लवकर उठून स्वंयपाक पाणी आवरते. तुम्हांला कधी निघायचे तेव्हा निघा.'' असे सांगून मामी झोपायला गेल्या. सकाळी तिघेही लवकर उठले. अंघोळ पाणी झाल्यावर मामींनी तिघांनाही न्याहरी करायला बोलवले. तिघेही न्याहरी करायला बसले. मामींनी ताटं केली. घरगडी हरिबाला हाक मारली आणि त्याच्या करवी ताटं जेवण खोली मध्ये पाठवली. तिघांनी न्याहरी करायला सुरुवात केली. ते दोघेही मामाला म्हणाले, ''अहो मामा, ही न्याहरी कसली? हे तर जेवणच हाय'' असे म्हणत सर्वजण जेवले. मामांनी निघण्याची तयारी केली. मामांनी दुटांगी धोतर नेसले. अंगात मलमली सदरा घातला. त्यावर उलनचा कोट चढवला कोल्हापुरी फेटा डोईवर गुंडाळला, एकदाचे आरशात बघितले, पायात जोडा ठासून घातला. हातात छत्री आणि पदरात चार भाकरी बांधून घेतल्या. परत एक वेळ कोटाच्या खिशात हात घातला. नोटा असल्याची खात्री केली आणि व्यंकटराव व नागनाथना हाक मारली, ''आरं पोरांनो तुमचं आटपलं का?'' दोघेही तयारच होते. हाकेसरसी ते मामाजवळ आले. मामांनी मामीला हाक मारली, ''अहो ऐकलत का? आम्ही निघालो.'' तशा मामी पदर सावरत चौकटी जवळ येऊन थांबल्या. ''हे बघा महत्त्वाच्या कामगिरीवर आम्ही निघालोय. दोन किंवा तीन दिवस लागतील. आमच्या. गैरहजेरीत कोण आलं तर त्यांची बैजवार व्यवस्था करा.'' मामींनी मान हालवून होकार दिला आणि मामा सोप्याची एक एक पायरी उतरायला लागले. मध्येच हरिबाला हाक मारली, ''ये हरिबा, आम्ही परत येईतो तू वाड्यावर मुक्कामाला थांबायच.'' हरिबा बर म्हणाला. हरिबाचं घर गावाच्या माळावर होतं. मामा वाड्याच्या हाम चौकात आले. त्यानी हरिबाला पुन्हा बोलवलं व म्हणाले, ''हे बघ हरिबा, तुझी वस्ती आहे गावाबाहेर. तवा तू घराला कुलूप घाल आणि बायका पोरांच्यासह समदिजन मी येईपर्यंत वाड्यावर मुक्कामाला असा.'' हरिबा बरं म्हणाला आणि वाड्याचा मोठा दरवाजा उघडायला लागला. दरवाजा टोलेजंग होता. दरवाजा उघडताना करकर झालेला आवाज ऐकून पदर सावरीत मामी सोप्यात येऊन उभ्या राहिल्या. मामा वाड्यातून बाहेर पडले. परत एकवार वाड्यात चौफेर नजर फिरवली. मामींना हातानच जातो म्हणून सांगितले व ते तिघे एकदाचे रस्त्याला लागले, मारुतीच्या देवालयाजवळ आल्यावर मामांनी पायातला अर्धवट जोडा काढला व बाहेरूनच मारुती रायाचे दर्शन घेतले.

दोघांनीही त्याच प्रमाणे नमस्कार केला. गावाच्या हाम चौकात आल्यावर नागनाथ अण्णा मामांना म्हणाले, ''मामा व्यंकटरावांची परीक्षा जवळ आलेली आहे. मी म्हणतो व्यंकटरावांना परत कोल्हापूरला पाठवाव आणि आपण दोघांनी हत्यार आणण्यासाठी देसाई पावण्यांचेकडं जावं.'' त्यावर मामा म्हणाले, ''व्यंकटराव, तुम्ही काय म्हणता? बहिणीला भेटायची इच्छा हाय का?'' ''तसं कायबी मामा माझ्या मनात नाही. परवाच माझी व आक्काची भेट झाली. माझी परीक्षा जवळ आली आहे. मला अभ्यासाची घाई आहे. मी आपला कोल्हापूरला परत जातो,'' असं मामांना व्यंकटराव म्हणाले व त्यांच्या परवानगीसाठी त्यांच्याकडे बघत उभा राहिले.

विचारे मामांनी व्यंकटरावला कोल्हापूरला जायला परवानगी दिली. व्यंकटराव कोल्हापूरच्या वाटेला लागले. पुढे दोघे गावच्या मोटार आड्डयावर आले. थोडयाच वेळात गाडी आली. त्या गाडीतून लिंगनूर पर्यंत दोघांनी प्रवास केला. पुढे शितोळीला चालत जावे लागत होते. मंगसुळी गावापासून लिंगनूर हे गाव सामान गडाच्या पलीकडे १० मैलांवर डोंगर झाडीत दडलेले होते. जुन्या काळात सामान गडावर लोकांचा राबता होता. त्यावेळी या गावाला फार मोठं महत्त्व होते. लिंगनूर पासून चार पाच मैलांवर शिनोळी हे गाव. याच गावात व्यंकटराव महाडिकांची बहीण देसाई इनामदारांना दिलेली होती. लिंगनूरहून शिनोळीला जायला पायी चालत जावे लागत होते. मामा व नागनाथ अण्णा एकच्या सुमारास लिंगनूरला येऊन पोहचले. पुढे पायी चालत मधल्या पायवाटेने शिनोळी गावाकडे निघाले. तास दीड तास चालल्यावर जेवण्याच्या विचारात एका आंब्याच्या झाडाखाली बसले. बहुतेक वाटसरूंचे ते जेवणाचे ठिकाण असावे. आंब्याचे झाड ओढ्याच्या काठावर होते आणि तेथे जवळच वाहता गोड्या पाण्याचा झरा होता. दोघांनी जेवण केले. त्या झऱ्यातील थंडगार पाणी प्याले. तशी वेळ दुपारची उन्हाची होती. मामा नागनाथ अण्णांना म्हणाले, ''नागनाथ, गाव काय आता आपल्या टप्प्यात हाय. नुकतच आपण जेवलोय. अर्धा एक तास आंब्याच्या झाडाखाली विश्रांती घेऊ आणि मग पुढे जाऊ.'' अर्ध्या तासानंतर दोघेही शिनोळी गावाकडे चालत निघाले. साधारण कासराभर दिवस असताना शिनोळी गावात आले. गावाच्या मध्यावर उत्तरेला तोंड करून देसाई इनामदारांचा वाडा होता. चारी बाजूंनी घडीव तोडीचे बांधकाम केले होते आणि वर कोरीव नक्षी रंगीबेरंगी रंगाने रंगवलेली होती. ती वाड्याच्या सौंदर्यात भरच टाकत होती. दोघेही वाड्याजवळ आले. वाड्याचा मोठा दरवाजा बंद होता म्हणून विचारे मामांनी दिंडी दरवाजा उघडला आणि आत प्रवेश केला. पाठोपाठ

नागनाथ अण्णांनीही वाड्यात प्रवेश केला. बाहेरून वाडा जसा टुमदार होता, तसा आतूनही होता. समोरच लोड तक्क्यांच्या बैठकी शेजारी सोनसाखळीने बांधलेला कडीपाट आणि त्यावर झोके घेत देसाई पाव्हणे बसले होते. विचारे मामांना पाहताच देसाई पाव्हणे उठून चार पावले पुढे आले. विचारे मामांचं त्यांनी हसत मुखाने स्वागत केलं. त्यांना आपल्या शेजारी बैठकीवर बसवले आणि नागनाथ अण्णांच्याकडे पहात, ''हे कोण पावणे ? नवीनच वाटतायत.'' मामा म्हणाले, ''हे व्यंकटरावांचे मित्र आहेत.'' मग देसाई पावण्यांनी त्यांनाही बैठकीवर बसण्यास खुणवले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या, नाष्टा झाला. दोघेही चहा पित नसल्यामुळे दोघांनाही दूध दिलं. दीड दोन तास झाले तरी विचारे मामा काय मुद्द्याला हात घालेनात. नागनाथ अण्णांचे डोक्यात हत्यार गच्च बसलेले. अण्णांची सारखी घालमेल चाललेली. रात्रीचे जेवण खाणं झाल्यावर नागनाथ अण्णांना एका स्वतंत्र खोलीत गादी टाकून दिली. त्यांना झोपायला सांगून मामा देसाई पावण्यांच्याकडे हत्याराचा विषय काढण्यासाठी माडीवर गेले. देसाई पावण्यांना थोडक्यात इस्लामपूर उठावाचा वृत्तांत मामांनी सांगितला. ''माझ्याबरोबर व्यंकटरावांचे जे मित्र नागनाथ आलेत त्यांना चळवळीच्या कामासाठी हत्यार पाहिजे, ते तुम्ही त्यांना मिळवून द्याल या भरवशावर त्यांना बरोबर घेऊन आलोय. तुम्ही तेवढ काम कराच.''

रात्री देसाई पावणे व विचारे मामा बराच वेळ बोलत बसले होते याची अण्णांना चाहूल लागत होती. पण नेमकी त्यांची हत्याराबद्दल काय चर्चा झाली कुणाला ठावं? अण्णा सकाळी उठल्याबरोबर घरगड्याकडून प्रातर्विधीसाठी पाण्याचा तांब्या आला. मिश्री मिळाली तोंड धुण्यासाठी गरम पाणी मिळालं. नाष्टा आला, नाष्ट्या पाठोपाठ दुधाचा ग्लास आला. नागनाथ अण्णा, विचारे मामांची वाट बघत सोप्याच्या बैठकीवर बसले होते. त्यांचे सार लक्ष मामांच्याकडे लागले होते. ते आलेली चाहूल लागली खरी पण त्यांनी चौकटीत उभे राहूनच उभ्याउभ्या आतूनच दोन्ही हातांचे अंगठे हालवत खुणेनेच हत्याराचे काम काय होत नाही, तुम्ही परत जावा. मी देसाई पावण्यांच्याकडे दोन एक दिवस रहाणार आहे असे सांगितले. अण्णांनी ठीक आहे म्हणून सांगितले. आपला बाड बिस्तार घेतला आणि वाड्याच्या दिंडी दरवाजातून बाहेर पडले. त्यांनी आपल्या मनाशी विचार केला. आपण एकतर देसाई पावण्यांना नवखे आणि त्यात हत्याराचं काम, देसाई पावण्यांना वाटले असेल

कशाला या भानगडीत आपण पडायचं आणि पाव्हण्यांना तर का पाडायचं? या विचाराने त्यांनी नकार दिला असावा असा अण्णांनी मनात अंदाज बांधला आणि गावाच्या बाहेरची वाट चालू लागले. हत्यार मिळाल्याशिवाय मागं फिरायच नाही हा मनाचा पक्का विचार कायमच होता. गोव्याला हत्यारं मिळतात हे ते ऐकून होते. प्रत्यक्षात गोव्यात हत्यार कोठे मिळतात हे त्यांना माहीत नव्हते.

विचारे मामांच्या कडून हत्यार मिळायची अशा मावळली. त्यात ते देसाई पाव्हण्यांचेकडे राहिले. नागनाथ अण्णा एकटे. त्याना तो भाग नवखा. तिथली माणसं अपरिचित होती. त्यांच्यावर सरकारचे पकड वारंट होते. परंतु हत्यारे मिळविण्याची दुर्दम्य इच्छा शक्ती त्यांना गप्प बसू देत नव्हती. त्यांना इंग्रजीतील एक म्हण आठवली. "Where there is a will, there is a way" वाट चालू लागल्यावर रस्ता सापडतो म्हणतात. त्याप्रमाणे क्रांतिवीर नागनाथ अण्णा हळू हळू गोव्याच्या दिशेने मजल दर मजल करत निघाले. बरेच अंतर चालून झाल्यावर एका वाटेच्या वाटसरूला त्यांनी विचारले, "हा भाग कुठला आहे?" त्यावर वाटसरू म्हणाला, "हा भाग गडहिंग्लज तालुक्याचे शेवटचे टोक आहे आणि तुम्ही आणखीन थोडं चालल्यावर हाकेच्या अंतरावरून सावंतवाडीची सीमा सुरू होईल." ठीक आहे म्हणत ते पुढे चालू लागले. दिवस डोक्यावरून पश्चिम दिशेला कलू लागला होता. ऊन तसं जरा चटका देत होतं. तरी ते पुढे पुढे चालतच होते. मध्येच एक गाडी वाट लागली म्हणून पाऊल वाट सोडली आणि गाडी वाटेने चालायला लागले. थोडे अंतर चालल्यानंतर एक ओढा आडवा आला पण तो कोरडा ठणठणीत होता. त्या ओढ्या लगत एक बाभळीचे झाड होते. त्या झाडाची सावली अशी गर्द नव्हती तरी थोडी विश्रांती घ्यावी म्हणून त्या झाडाच्या फाटक्या सावलीत थांबले आणि हत्याराचा विचार करत करत ओढ्यातील एक दगडाचा गोटा उचलायचा आणि दुसऱ्या गोट्यावर मारायचा आणि परत हत्याराचा विचार करायचा असे अर्धा एक तास चालले होते. ते विचारात येवढे गर्क होते की, येवढ्यात जवळून कोण गेलं असतं तरी विचारांच्या तंद्रीमुळे त्यांच्या लक्षातही आले नसते. पण पोटातल्या भुकेमुळे ते तंद्रीतून बाहेर आले. खायला काही मिळेल का? याचा शोध घेऊ लागले. इकडे तिकडे नजर फिरवता त्यांना थोड्या अंतरावर एक हॉटेलाची टपरी दिसली. त्या दिशेने टपरी पर्यंत ते आले. टपरी दक्षिणेकडे तोंड करून होती. त्या टपरी समोर पूर्व पश्चिम एक बाकडे ठेवले होते. त्या बाकड्याच्या समोर एक पाय

मोडका टेबल, दगडाचा ठेपा देऊन ठेवलेला होता आणि त्या टेबलाला लागून समोर आणखीन एक बाकडे पूर्व पश्चिम ठेवलेले होते. त्या बाकड्यावर एकामेकांसमोर एका बाकड्यावर एक व दुसऱ्या बाकड्यावर दोन अशी तीन माणसे बसलेली होती. त्या बाकड्यांना दक्षिणोत्तर ठेवलेले एक बाकडे रिकामे होतं त्यावर अण्णा पूर्वेला तोंड करून बसले व हॉटेलवाल्या मालकाना दूध मिळेल का? विचारलं. त्यावर हॉटेलवाला त्यांना म्हणाला, ''दूध मिळणार नाही. पण दूधपाणी पाहिजे असल्यास ते मिळेल. दूधपाणी ही गोष्ट अण्णांना पहिल्यांदाच माहिती झाली. ठीक आहे. एक दूधपाणी द्या. दूधपाणी म्हणजे चहा करताना आपण जे साहित्य वापरतो त्यातील चहाची पावडर सोडल्यानंतर जे पेय तयार होईल त्याला दूधपाणी म्हणतात. दूधपाणी तयार होईपर्यंत ते बाकड्यावर बसून होते. त्यांच्या समोरच्या पहिल्या बाकावर बसलेल्या मित्रांच्या गप्पा चालू होत्या. त्यातील पस्तीस एक वर्षाचा सावळ्या रंगाचा हाडापिंडाने मजबूत असलेला माणूस आपल्या मित्रांना सांगत होता मी परवाच शिकारीला गेलो होतो. त्यावेळी त्या जंगलात मला वाघाची दोन बच्ची सापडली. ते दोघे मित्र उत्सुकतेने मित्राला म्हणाले, ''त्या बच्चांचं काय केले?'' तो म्हणाला, ''घराकडे आणली होती. पण, परम्याच्या इनामदाराच्या कानावर ही गोष्ट कुणी घातली कुणास ठाव?'' दुसरा मित्र म्हणाला, ''मग काय झालं?'' ''काय झालं म्हणून काय विचारता? त्यानं माझी वाघाची बच्ची नेली. त्या इनामदारापुढे कुणाचं काय चाललय का राव?'' एवढे ऐकल्याबरोबर अण्णांच्या विचारांना हिरवा कंदील मिळाला. वाघाची बच्ची आणणारा हा माणूस सर्वसामान्य नाही. यांच्याकडून आपलं हत्यारचं काम होणार असा अण्णांना विश्वास वाटला. दूधपाणी घेतल्याबरोबर त्या माणसाजवळ अण्णा गेले व त्याला म्हणाले, ''अहो पावणं, तुमच्याकडं माझं जरा काम आहे. येता का जरा?'' तो माणूस तडक उठला आणि तो अण्णांच्या पाठोपाठ चालू लागला. त्यांनी त्या माणसाला ओढ्याच्या काठी आपण बसलेल्या झाडाच्या सावलीत आणले. त्या इसमाला खाली बसण्यास सांगितले त्या प्रमाणे दोघेही खाली बसले. नागनाथ अण्णांनी आपलं नाव गावासह टपरीच्या हॉटेल पर्यंत कसा पोहचलो आणि स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी हत्याराची कशी गरज आहे आणि आता तुमची वाघाच्या बच्चांची गोष्ट ऐकल्यावर तुमच्याकडून माझं हत्यारचं काम होईल म्हणून मी तुम्हांला इथपर्यंत आणलं. नागनाथ अण्णांची भाषाशैली आणि विश्वासानं केलेल्या कथनाचा त्या माणसावर चांगलाच परिणाम झाला. तो माणूस

म्हणाला,''येवढच काम हाय होय? ठीक आहे. चला माझ्याबरोबर तुमचं हत्यारचं काम हा हा म्हणता करतो.''

नागनाथ अण्णा त्या माणसाच्या पाठोपाठ निघाले. रस्त्यात चालता चालता हे दोघे एकमेकांबरोबर बोलताना त्यांने आपलं नाव महादेव शेट्टी असल्याचे त्यांना सांगितले आणि मी सोनार समाजाचा आहे. माझं गाव बांदा. मी एकटाच रहातो. अजून लग्न केलं नाही आणि इथून पुढे करणार नाही. वगैरे गोष्टींची माहिती चालता चालता त्यांना सांगत होता. गाडीवाट सोडून दोघेही बांद्याकडे पाऊल वाटेने चालत होते. दोन्ही बाजूंना गर्द झाडी होती. वाट नागमोडी चढ उताराची होती. नाल्यात, रस्त्यात चालताना फोपाटा उडत होता. माती लालसर असल्यामुळे दोघांची पायताणं लाल भडक झाली होती आणि दोघे एका पाठोपाठ एक चालले होते. दोघांच्याही डोक्यात विषय हत्याराचा होता. बराच वेळ चालल्यावर गाव जवळ दिसायला लागले. दिवे लागणीच्या सुमारास दोघेही बांद्याला महादेव शेट्टीच्या छोट्याशा घरात आले. हात पाय धुतल्यावर महादेव शेट्टींनी चटई अंथरली. त्या चटईवर अण्णांना बसायला सांगून, 'मी स्वंयपाक करतो. नंतर आपण दोघेही जेवण करू' असे सांगून जेवण होईपर्यंत महादेव शेट्टींनी भाजलेल्या काजूची डिश भरून त्यांना खायला दिली. चपात्या करायला त्याने पीठ मळायला सुरुवात केली. चुलीवर तवा ठेवला. वईलावर तुरीची डाळ शिजत घातली आणि एक एक चपाती भाजायला सुरुवात केली. दोघांना लागतील एवढ्या चपात्या झाल्यावर चुलीवर भात शिजत घातला. नंतर आमटीला फोडणी दिली. एका नारळाचं ओलं खोबरं आमटीत घातलं. दोघेही पोट भरून जेवले. दिवसभर चालल्यामुळे अण्णांना तर फार भूक लागली होती. सकाळी विचारे मामांच्या देसाई पावण्यांकडे नाष्टाच केलेला होता.तसे सकाळचे जेवण चुकले होते. तरी आता रात्रीचे जेवण व्यवस्थित झाले. त्यानंतर स्वयंपाकाची भांडी कुंडी आवरल्यावर महादेव शेट्टी अण्णांना म्हणाले, ''शेजारच्या गावात यात्रे निमित्त नौटंकीचा कार्यक्रम गावकरी करणार आहेत. चला, आपण कार्यक्रम बघायला जाऊ या.'' त्या प्रमाणे दोघेही शेजारच्या गावात कार्यक्रम पहावयास गेले. रात्र मध्यानीला आली तरी कार्यक्रम चालूच होता. काही लोक झोपले होते. काही लोक कार्यक्रम बघत होते. तर काही पेंगत होते. अचानक कार्यक्रमावर पोलिसांची धाड पडली. दोन पोलिस लोकांच्या तोंडावर बॅटरी पाडून चेहरे बघत होते. झोपलेल्या माणसांच्या तोंडावरील चादर बाजूला सारायचे. तोंडावर लाईट पाडायचे.

पाहिजे तो माणूस नसला की परत त्या माणसाच्या तोंडावर होती तसी चादर टाकायचे आणि पुढच्या माणसाकडे जायचे, असा चाललेला प्रकार नागनाथ अण्णांनी पाहिला. त्यांच्या मनात संशय आला. कोणाला ठाऊक एखादेवेळी आपल्याच शोधात पोलिस आले असतील काय? महादेव शेट्टी व अण्णा दोघेही थोड्याशा उंच अशा जागेवर कार्यक्रम बघत बसले होते. इकडे पोलिसांची शोध मोहीम चालू होती. कार्यक्रम चालू होता. पोलिस जवळ यायच्या अगोदरच अण्णांनी पलायन केले व दूरवरच्या टेकडीवर जाऊन बसले. इकडे महादेव शेट्टींनी घराकडे परत जाताना अण्णांची खूप शोधा शोध केली. त्यांचा कोठेच पत्ता लागेना म्हटल्यावर कंटाळून शेवटी ते एकटेच आपल्या घराकडे निघून आले. उंच टेकडीवरून अण्णा कार्यक्रमाकडे लक्ष ठेऊन होते. दुरून कार्यक्रम अजून चालूच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अंधारात ही जागा सोडावी असे त्यांना उचित वाटेना म्हणून फटफटीत होईपर्यंत तिथेच बसून राहिले. तांबडं फुटलं. दिवस दिसायला लागला तरी कार्यक्रम चालूच होता. शेवटी पोलिसांची चाहूल घेऊन महादेव शेट्टी कोठे दिसतात का याचा शोध अण्णा घेऊन सरळ त्यांच्या घरी गेले. महादेव शेट्टी त्यांची वाटच बघत होता. ''अहो नायकवडी साहेब, तुम्हांला किती शोधायचे? अचानक कुठे गडप झालात?'' अण्णा त्यांना म्हणाले, ''अहो मी तिथच होतो. तुम्हांला शोधले. तुम्ही सापडला नाही म्हणून मी तडक तुमच्या घराकडे आलो.'' ''बरं ठीक आहे. चला, रानात जाऊन तिकडेच प्रातर्विधीचा कार्यक्रम उरकून येऊ म्हणून दोघेही जंगलात गेले. प्रातर्विधीचा कार्यक्रम संपल्यानंतर महादेव शेट्टी एका आंब्याच्या झाडाखाली गेले. झाडाची निबार पान घेऊन अण्णांच्या जवळ आले आणि दात घासण्यासाठी अण्णांच्या हातात आंब्याच्या झाडाची पाने दिली. या पानांचे काय करायचे? म्हणून त्याच्याकडे पहात उभे राहिले. महादेव शेट्टींनी आंब्याच्या पानांमधला टणक भाग हातात ठेवून दोन्ही बाजूंची पानं काडली. ती कचाकच चावली व चोथा थुंकून टाकला व पानांच्या मधल्या जाड शिरेचे एक टोक एका हातात धरले व दुसऱ्या हातात दुसरेटोक धरले आणि मध्ये बरोबर गोलाकार करून तोंडातून जीभ बाहेर काढली जिभेवरून तो पानाचा टणक भाग मागे पुढे करून जीभ स्वच्छ केली आणि पाण्याने चुळा भरत तोंड धुतले. अण्णांना हा तसा नवखा प्रकार पहिल्यांदाच पाहायला मिळाला. महादेव शेट्टीं प्रमाणे अण्णांनीही आपले तोंड स्वच्छ धुतले तदनंतर अंघोळ करून दोघेही घराकडे परत आले.

महादेव शेट्टींनी स्वयंपाक करण्यासाठी चूल पेटवली. पांढऱ्या शुभ्र तांदळाच्या पिठाच्या चार भाकरी केल्या. दोघेही न्याहरी करायला बसले. ताटात दही,लसणाची चटणी, हिरव्या मिरचीचा ठेचा वाढला, भातावर रात्रीचीच थोडी थोडी आमटी वाढली. न्याहरी झाल्यावर घराला कुलूप घातले आणि दोघेही हत्याराच्या शोधासाठी बांद्यावरून दोडा मार्गाला निघाले. घनदाट झाडांच्या गर्द सावलीतून चालताना कंटाळा येत नव्हता. चोहोबाजूला हिरवी वनराई, उंच उंच नारळाच्या बागा, आकाशाला भिडलेले कळक, बांबूचे ताटवे, ताटव्यांना हिनवणाऱ्या सुपारींच्या झाडांची रांगच रांग, काजू, आंब्याची वनं, मध्येच खळखळ वाहणारे पांढरे शुभ्र ओहोळाचे पाणी, लहान मोठी पाण्याची तळी, तळ्याच्या काठावरील रंगीबेरंगी फुलांचे ताटवे आणि त्यावर भिरभिरणारी फुलपाखरं, तळ्यावर येणारे जाणारे पाखरांचे रंगीबेरंगी थवे असं हे मोहिनी घालणाऱ्या वनराईतून दोघे बोलत, चालत दोडामार्गच्या सीमेवर पोहचले. रस्त्यात महादेव शेट्टींचा मित्र भेटला. त्याची ख्याली खुशाली विचारून दोघेही पाय वाटेने टेकडी उतरून गाडीरस्त्याला लागले. रस्त्याच्या दुतर्फा मोठ मोठी जंगली झाडं, दुपार झाली होती तरी ती जाणवू नये इतपत रस्त्यात झाडांची थंड सावली पडलेली होती.  हवेत गारठा जाणवत होता. आजू बाजूला भात शेती होती. भात शेतीच्या बांधावर आकाशाकडे झेपावणारी सागाची उंचच उंच झाडे, लहान मोठ्या आजूबाजूच्या टेकड्यांवरही घनदाट वनराई दिसत होती. निसर्ग सौंदर्यानं मन अगदी भरून आले होते. झाले एकदाचे. दोघांनी दोडा गावात प्रवेश केला आणि पूर्व पश्चिम समांतर असलेल्या गल्लीत महादेव शेट्टी, नागनाथ अण्णांना घेऊन बाळ मणेरकर यांच्या घरी आले. बाळ मणेर वैष्णव असले तरी महादेव शेट्टींचे जिवा भावाचे मित्र. अहो मित्र कसले? त्यांच्या वागण्यावरून ते दोघे सख्खे भाऊ असावेत असे नवख्या माणसाला वाटावे. नागनाथ अण्णांच्या दोनच दिवस सहवासात असलेल्या महादेव शेट्टींनी आपल्या मित्राची ओळख करून देताना त्यांचे इतके कौतुक केले की, साताराच्या स्वातंत्र्याच्या संग्रामापासून ते इस्लांपूरच्या उठावापर्यंतचा व दोड्यात पोहचेपर्यंतचा रोमहर्षक इतिहास बाळ मणेरकरांच्या डोळ्यापुढे महादेव शेट्टींनी उभा केला. बाळ मणेर मोहरून गेले. त्यांना आपणाला नवीन एक सातारकर मित्र मिळाला की, त्या साताराच्या कहाण्या सतत कानावर येत होत्या. इकडच्या तिकडच्या गप्पा मारत, कोकम सरबत घेतले आणि महादेव शेट्टी म्हणाले, ''बाळा, चळवळीच्या कामासाठी यांना हत्यार पाहिजे आहेत तू यांच येवढं हत्याराचं काम कर'' बाळ मणेर म्हणाले, ''ठीक आहे.'' तास दोन तास तिघांच्या एकत्रित सहवासात

निरनिराळ्या विषयांवर चर्चा झाल्या. त्यातून पुढे एकमेकांचा परस्परांच्या बद्दलचा विश्वास आणि जिव्हाळा तयार झाला. चार-पाचच्या सुमारास बाळच्या मंडळीने सर्वांच्यासाठी पोहे केले. भाजलेले काजू, फराळ, चहा झाल्यावर परत एक वेळ महादेव शेट्टींनी बाळला हत्याराच्या कामाची आठवण करून दिली आणि जातो म्हणून जायला निघाले. तो म्हणाला, ''अरे महादेवा, माझं गोव्याला सारखं येणं-जाणं आहे आणि तिथं पायलीला पासरी हत्यारं मिळतात, तू उगाच काळजी का करतोयस? मी यांना नक्की हत्यार मिळवून देतो.'' महादेव शेट्टी म्हणाले, ''म्हणून तर बाळा मी तुझ्याकडं त्यांना घेऊन आलोय.''

रात्री अपरात्री बांद्याला जायला नको म्हणून बाळने महादेव शेट्टींना आपल्या घरी आग्रहाने ठेऊन घेतले. सकाळी लवकर उठून तिघेही नाष्टा-पाणी करून घराबाहेर पडले. महादेव शेट्टी बांद्याला परत गेले. नागनाथ अण्णा व बाळ गोव्याकडे निघाले. गोव्यात शिरताना सरहद्दीवर चेक पोष्ट होते. गोव्यावर त्या काळात पोर्तूगिजांची सत्ता होती. दोघेही गोव्यात बाळ मणेरकरांचे मेव्हणे बापू नार्वेकर यांच्याकडे गेले. तिथे एक सातबारी रिव्हॉल्वर व एक इटालीयन पॉकेट पिस्तूल पसंत केले. गोवा सरहद्दीच्या बाहेर हत्यारे पोहच करणाऱ्या एका वाटाड्याला पाच रुपये दिले आणि दोघेही गोव्याच्या चेक पोष्टाचे सरहद्दीच्या बाहेर वाटाड्याची वाट बघत बसले. वाटाड्या जंगलातून डोंगरकपाऱ्यांतून आड वाटेने सरहद्दीच्या बाहेर चोरट्या मार्गाने हत्यार आणत असे, तसा त्याचा नेहमीचाच धंदा होता. त्या दिवशी त्या वाटाड्याची वेळ वाईट लागली. त्याच दिवशी त्याला पोर्तूगीज कस्टम अधिकाऱ्यांने कसे पकडले देव जाणे! तसा गोव्यामध्ये हत्यार देण्या-घेण्याचा खुलेआम धंदा चालत होता पण तो गोव्या पुरता मर्यादित होता. पोर्तुगालहून नाताळच्या सुट्टीला येणारे अधिकारी आपल्या मित्रांना भेट देण्यास म्हणून शेकडो हत्यारं आणत असत. त्यामुळे तसा गोव्यात हत्यारांचा तुटवडा नव्हता. दोन दिवस वाट बघून शेवटी तिसऱ्या दिवशी बाळ मणेरकर पुन्हा गोव्याला गेले आणि एक सातबारी रिव्हॉल्व्हर व एक इटालीयन पिस्तुल पैदा केले. परत चोरट्या मार्गाने हत्यार आणण्यासाठी वाटाड्याला ५ रु. दिले. त्या दिवशी अण्णांच्या जबरदस्त इच्छाशक्ती मुळे हत्यार गोव्याच्या चेक पोष्टाची सीमा पार करून वाटाड्याने सुखरूपपणे बाळ मणेरकरांचेकडे आणून दिले. वाटाड्याला जायला सांगून अण्णा व बाळ मणेरकर जंगलात येऊन त्यांनी एका छोट्याशा टेकडीपाशी हत्यारांची ट्रायल घेतली. दोन्ही

हत्यारे संगमरवरी गारेच्या मुठीची उत्तम पैकी होती. वाटाड्याच्या ५ रुपयांससह दोन्ही हत्यारांची किंमत १०५ रुपये होती. हत्यारे हातात मिळाल्याबरोबर अण्णांना अतिशय आनंद झाला. आपण ठरवल्याप्रमाणे आपली इच्छा पूर्ण झाली. आता कोल्हापूरला केव्हा पोहोचतोय असे झाले होते. हत्यार मिळवायला बाहेर पडलेल्या दिवसापासून त्यांच्या हातात हत्यार पडले तो बरोबर ४४ वा दिवस होता. अत्यंत प्रयत्नाने मिळालेल्या यशाने अण्णांचा आनंद द्विगुणित झाला.

४४ व्या दिवशी १५ डिसेंबर १९४२ रोजी हत्यार सही सलामत हातात पडले खरे, पण त्यावेळी खिसा रिकामा झाला होता. हत्यारे खरेदी करायला पैसे कुठायत? नवखा भाग, आता काय करावे? क्रांतिवीरापुढे मोठा प्रश्न पडला. मनाशी विचार केला आणि बाळ मणेरना विनंती केली. आपण माझ्यासाठी खूप प्रयत्न करून हत्यारे मिळवली माझी तुम्हांला एक विनंती-हत्यारं घेऊन तुम्ही माझ्याबरोबर कोल्हापूरला चला. तेथे तुम्हांला येण्याच्या व परतीच्या भाड्यासह हत्याराचे पैसे देतो. सर्व मित्रांच्या ओळखी करून देतो. येथून पुढेही आपले संबंध सतत येणार आहेत. प्रत्येक वेळी मला इकडे येणे शक्य नाही. वगैरे सर्व चर्चा झाली. बाळ मणेरकर भारी हुशार होता. त्याने अण्णांना पूर्ण ओळखले होते. त्यांने कसलेही आढेवेढे न घेता कोल्हापूरला येण्याची तयारी दाखवली. दोघांनी बाजारातून हत्यारं बसतील या मापाचे दोन भोपळे घेतले ते देट ठेवून बरोबर कापून, खालच्या भागातील भोपळ्या मधील गर काढून टाकला. भोपळ्याच्या पोटात हत्यारं ठेवली. परत भोपळ्याचा देट होता तसा बसवला व भोपळे होते तसे केले आणि धोतराच्या एका टोकाला एक भोपळा याप्रमाणे भोपळे बरोबर बांधले. परत एकावर एक भोपळा ठेवून त्यांचे गाठोडे गच्च बांधले. ते गाठोडे पोत्यात घालून पोते खांद्यावर घेतले. लांबून पाहणाऱ्यांना पोत्यात भोपळे असल्याचे वाटावे अशी त्याची बांधणी केली. बाळ मणेरकारांच्या घरी सांगून दोघे कोल्हापूरला निघाले. त्या काळात पानाचंदच्या सर्व्हिस गाडीने प्रवास करावा लागत होता. दोघेही पानाचंदच्या गाडीत बसले. बाकड्याच्या खाली पोते ठेऊन, त्याला पायाची आटन लावून बसले. ते एकमेकांबरोबर गप्पा मारत होते. गाडी कोल्हापूरच्या दिशेने धाऊ लागली. ती सर्व्हिस गाडी कोल्हापूरच्या जवळ सागर माळाला (आजच्या शिवाजी विद्यापीठा जवळ) आल्यावर दोघेही गाडीतून खाली उतरले व व्ही. शांतारामच्या प्रभात स्टुडिओत आले. तिथे ऐतवडेकर नावाचा नागनाथ अण्णांचा मित्र आर्ट कलाकार म्हणून

स्टुडिओत काम करत होता. त्याला त्यांनी सर्व हकीगत सांगितली. बाळ मणेरकरांची ओळख करून दिली. तिथेच बाबूराव जाधव (आर्ट डायरेक्टर) व डी.बी.पाटील भेटले. त्यांचीही बाळ मणेरकरांची ओळख करून दिली. बाळ मणेरच्या मनात विचार आला जे आपण तंबूच्या पडद्यावर सिनेमे पहात होता ते सिनेमे ज्या स्टुडिओत तयार होतात ते आपणाला समक्ष डोळ्यांनी पहाता आले, आपण धन्य झालो.! त्या दिवशी त्या कलाकार मंडळी ने त्यांचे जेवणाचे डबे आम्हा दोघांसाठी दिले. नुसते डबे दिले नाहीत तर त्यांनी समोर बसून आम्हा दोघांना आग्रहाने पोटभर जेवायला वाढले. स्वत: उपाशी राहून दुसऱ्याला जेवायला वाढणारी माणसं बघून बाळ मणेरकरांना आश्चर्य वाटले आणि आपण नागनाथ अण्णांच्यावर विश्वास ठेवून कोल्हापूरला आलो! आपल्या जीवनाचे सार्थक झाले. त्यांच्या मनाला वाटले धन्य ते नागनाथ व त्यांचे मित्र.

इतकं या मंडळींचं नागनाथ अण्णांच्यावरच प्रेम बघून, देशाच्या स्वातंत्र्यासाठी वेडी झालेली माणसं बघून बाळ मणेर मनात म्हणाले, ''आज नागनाथ अण्णांची खरी ओळख झाली.'' कोल्हापुरात प्रिन्स शिवाजी बोर्डिंग मध्ये गेल्या बरोबर प्रथम हत्याराचे पैसे त्यांनी बाळला दिले. दोन दिवस बाळ मणेरकरांना कोल्हापुरात आग्रहाने ठेवून घेतले. अनेक मित्रांच्या ओळखी करून दिल्या आणि तिसऱ्या दिवशी त्यांना जेवायला घालून परतीच्या भाड्याचे पैसे देऊन, सर्व्हिस गाडीने गोव्याला पाठवले.बाळ मणेरकरांना दोन दिवस कोल्हापूर मध्ये राहिल्याने त्यांच्यात देशसेवेची भावना तर तयार झालीच शिवाय एकमेकांचा परस्परां बद्दलचा जो विश्वास तयार झाला तो महत्त्वाचा भाग होता. त्यातूनच पुढे गोव्याहून शेकडो हत्यारांचा ओघ सुरू झाला.

अशी ही गोव्याहून हत्यार आणण्याची पहिली मोहीम क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या भगिरथ प्रयत्नाने यशस्वी झाली. गोव्याच्या हत्यारांची मोहीम ही घटना सुवर्ण अक्षराने लिहावी अशी आहे. ( ही सत्य घटना स्वतः अण्णांच्या मुलाखतीतून)

# पे स्पेशल ट्रेन लूट

चळवळ दिवसागणीक वाढतच होती. समाजातून निरनिराळ्या जाती धर्मांचे अनेक तरुण स्वत:ला चळवळीत झोकून देत होते. स्वातंत्र्याच्या संग्रामात सामील होत होते. क्रांतिकारकांच्या जबाबदारीत एक सारखी भर पडत होती. स्वातंत्र्याच्या लढ्याला तर अनेक तरुण कार्यकर्त्यांची गरज होती. तसेच आर्थिक पाठबळ हवे होते. क्रांतिकारक सरकारी खजिन्याच्या शोधात होते. पैशाची निकड भागवण्यासाठी क्रांतिकारी सतत एकमेकांच्या संपर्कात रहात होते. पे स्पेशल ट्रेनचा सुगावा नागनाथ (अण्णा) नायकवडी व जी.डी.बापू यांना एके दिवशी लागला. दर महिन्याच्या ७ तारखेला रेल्वे कर्मचाऱ्यांचा पगार घेऊन मिरजेहून पे स्पेशल ट्रेन सुटते. ती रेल्वे कामगारांचा पगार देत देत पुढे पुण्यास जाते. क्रांतिकारकांची नियोजनाची चक्रं फिरायला लागली. पे स्पेशल ट्रेन लुटण्याचा धाडसी निर्णय घेतला. पे स्पेशल ट्रेन लुटण्याचे काम एका दोघांचे नव्हते. या कामी निदान चाळीस एक धाडसी भूमिगत कार्यकर्त्यांची गरज होती. सातारा जिल्ह्यातील चार एक क्रांतिकारकांचे ग्रुप या कामी निवडले. पैकी वाळव्याचा नागनाथ अण्णांचा एक ग्रुप, जी.डी.लाड(बापू) कुंडल यांचा एक ग्रुप व अन्य दोन ग्रुपला सामील केले. जी.डी.लाड, सावळा धनगर, नाथाजी लाड, आप्पा चंद्रू लाड, बंडू दाजी, रामचंद्र आप्पा पाटील सर्व कुंडलचे नागनाथ(अण्णा)नायकवडी, रामचंद्र विभुते, आप्पा पाटील (साखराळे), किसन मास्तर (गोंदी), वस्ताद ज्ञानोबा चौकीवाले, शामराव जाधव, दत्तू ठोबरे, शंकर बागणीकर, एस.बी.पाटील, महादेव जगदाळे (अंबक), दत्तू जाधव घोगाव,

पांडू नाईक (वाझार), पांडुरंग शिंदे (शेणोली), भगवानराव पाटील, वाय.सी.पाटील अशा १९ जणांची एक दिवस सागरेश्वरच्या माळावरती मीटिंग झाली. त्यातून पे स्पेशल ट्रेन कशा पद्धतीने लुटावी, चालती ट्रेन लुटावी की गाडीची चेन ओढून गाडी थांबवून लुटायची यावर अनेक अंगांनी चर्चा झाली. क्रांतिकारकांचे एकमत होत नव्हते. शेवटी मीटिंगमध्ये नागनाथ अण्णा व जी.डी.बापू या दोघांच्याकडे पे स्पेशल ट्रेन लुटीच्या नियोजनाचे काम सोपवले व मीटिंगचे काम संपवण्यात आले. परत आठ एक दिवसांनी याच ठिकाणी मीटिंग घेण्याचे ठरले मीटिंग नंतर क्रांतिकारक आपआपल्या सोईने निघून गेले.

पे स्पेशल ट्रेन लुटीच्या नियोजनाची जबाबदारी नागनाथ अण्णा व जी.डी.बापूंनी स्वीकारली होती. मिरज ते कराड दरम्यानचा रेल्वे प्रवास या दोघांनी त्या ट्रेन मधून दोन एक वेळा केला आणि बारकाईने रस्त्यातले वळसे,चढ उतार, गाडीची गती कोठे कमी होते कुठे वाढते अशा बारीक सारीक गोष्टींचा विचार करून बिचूद व शेणोली हद्दीतील मच्छिंद्रनाथ डोंगराच्या शेजारी स्टेशनच्या पूर्वेला डोंगराच्या नैसर्गिक वळणावर एक खोलगट टेकडीची खोबण तयार होते. त्या खोबणीत एकदम गाडी गडप होते व दिसेनाशी होते.त्या ठिकाणी गाडी थांबवून लुटण्याचा बेत दोघांच्या विचारने ठरवण्यात आला. पे स्पेशल ट्रेन आडवण्याचे नैसर्गिक ठिकाण दोन्ही डोंगराच्या रांगेत होते. एका डोंगराला समांतर वहातुकीचा रस्ता त्याला लागून समांतर छोटी पाणंद व दाट झाडीचा ताटवा. ताटव्याला लागून समांतर रेल्वे ट्रेनचे रूळ, रुळाना लागून दाट झाडी व झाडीला लागून डोंगराचे लहान मोठे चढ उतार व त्याला लागू उंच डोंगर, ताकारी ठेशनच्या पश्चिमेला रुळालगत डोंगर टेकडीची एक सोंड पुढे आलेली होती. किर्लोस्करवाडीहून सुटलेली ट्रेन दीड ते दोन मैल पुढे आल्यावर टेकडीच्या सोंडेला वळसा घालून डोंगराच्या खोबनीत वळत होती, त्यावेळी चढणीमुळे गाडीचा वेग कमी होत होता. दोन्ही बाजूला नैसर्गिक डोंगरांची सोंड बाहेर आल्यामुळे डोंगराच्या पोटात गाडी पूर्ण दडत होती. त्यामुळे पूर्वेकडून व पश्चिमेकडून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना गाडी दिसत नव्हती. इतक्या इत्थंभूत बारकाव्याने पे स्पेशल ट्रेनची लुटीची निवडलेली जागा क्रांतिकारकांच्या कानावर घालून त्याला सर्वांची मान्यता घेतली. जागेच्या निवडीबद्दल दोघांवर क्रांतिकारक खूश होते.

पे स्पेशल ट्रेन लुटण्याचा ७ जून १९४३ हा दिवस निश्चित केला. सर्व क्रांतिकारक ठरलेल्या सांकेतिक स्थळी आले. एकूण चार ग्रुप तयार केले. पहिल्या ग्रुपच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी गाडीच्या पुढच्या इंजिनकडच्या बाजूला झाडीत दोन्ही बाजूला दडून बसावयाचे आणि शेणोली स्टेशनच्या पूर्व बाजूच्या डोंगराच्या

सोंडेवर बसलेल्या टेहळणी करणाऱ्या क्रांतिकारकाकडे लक्ष देऊन रहायचे. दुसऱ्या ग्रुपने किर्लोस्करवाडीच्या पश्चिमेच्या डोंगराच्या बसलेल्या टेहळणी दारावर लक्ष देऊन रुळाच्या दुतर्फा झाडीत दडून बसायचे. तिसऱ्या ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी आपआपल्या जागी डोंगराच्या झुडपात दडून बसायचे व गाडी थांबताच पुढच्या ग्रुपने इंजिनच्या पुढे दगडाचा खिळा रचायचा व पाठीमागच्या ग्रुपने मागच्या बाजूला दगडाचा खिळा रचायचा आणि चौथा ग्रुप नागनाथ अण्णा व जी.डी.बापूंचा. या दोघांनी आपापल्या निवडक हत्यारबंद साथीदारांना बरोबर घेऊन एक जणाने ड्रायव्हरला ताब्यात घ्यायचे व एकजणाने पगाराच्या डब्यावर हल्ला चढऊन पैशाची पेटी घेऊन डोंगर कपारीतून सागरेश्वरच्या घनदाट जंगलात पोबारा करावयाचा. कार्यक्रम यशस्वी झाल्याचे साथीदारांना कळण्यासाठी हवेत एका पाठोपाठ एक याप्रमाणे पाच बार काढावयाचे आणि बाकीच्या साथीदारांनी डोंगराच्या दिशेने पोबारा करावयाचा.

चारीही ग्रुप पे स्पेशल ट्रेनची आतुरतेने वाट बघत बसले होते. किर्लोस्करवाडीहून ट्रेन झाकझुक करत वेग घेत निघाली व ताकारी स्टेशन वरून सुटताच पहिल्या टेकडीवर बसलेल्या टेहळणीदाराच्या नजरेच्या टप्प्यात गाडी आल्याबरोबर त्याने आपली डोक्याची टोपी काढली व उंच हातात घेऊन हालवू लागला. स्वातंत्र्य सैनिक ट्रेनवर झडप घालण्याच्या तयारीत बसले. आली आली म्हणून गाडीने टेकडीच्या सोंडेला वळसा घातला आणि डोंगराच्या खोबनीत प्रवेश केला. येवढ्यात दुसऱ्या डोंगराच्या सोंडेवर बसलेल्या टेहळणीदाराने डोक्याच्या टोपीचा इशारा केला तसे पुढच्या बाजूचे बसलेले भूमिगत भारत मातेच्या, महात्मा गांधींच्या, क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नावाचा जयघोष करत रुळ पट्टीवर दगडांचा खिळा रचला. ड्रायव्हर गडबडला. मुळातच वळशावर वेग कमी झालेली गाडी त्यांने थांबवली. ड्रायव्हर हुशार होता. त्याच्या लक्षात पुढचा काय प्रकार आहे हे ध्यानात आले. तो गाडी पाठीमागे घेऊन गाडीचा वेग वाढवावयाला लागला. तो पर्यंत मागील बाजूस रुळाच्या दुतर्फा बसलेल्या भूमिगतांनी मागच्या बाजूच्या रूळ पट्टीवर दगडाचा खिळा रचला. आता मात्र डायव्हरची पंचायत झाली. त्यांने गाडी थांबवली. गाडी थांबताच ड्रायव्हरला ताब्यात घेतला आणि बघता बघता इतर हत्यारबंद क्रांतिकारकांची कुमक पगाराच्या डब्याला भिडली. डोळ्याचं पातं लवण्याच्या अगोदर हा हा म्हणता खजिन्याची पेटी घेऊन क्रांतिकारकांची टोळी डोंगरकपारीतून झाडीत नाहीसी झाली. इशाऱ्याच्या बंदुकीच्या पाच फैरींचा आवाज ऐकताच सर्वच क्रांतिकारक डोंगराच्या बाजूने पळून गेले.

कसलाही अनुचित प्रकार न होता पे स्पेशल ट्रेन लुटीचा कार्यक्रम फक्त २८ मिनिटांत यशस्वी झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जे नियोजन केले ते नागनाथ अण्णा व जी.डी.बापू या जोडगोळीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होते. चारीही ग्रुपचे क्रांतिकारक मजल दर मजल करत ठरलेल्या डोंगर माथ्याच्या सांकेतिक ठिकाणी येऊन पोहचले. सर्वजण आल्याची खात्री झाल्यावर सर्वां समोर पगाराची पेटी फोडली आणि त्या पेटीतील सर्व रक्कम मोजली. त्यात त्यांना १९७१६ रुपयांची रक्कम मिळाली. घाई गडबडीत एक पेटी गाडीत तशीच राहिली त्यात ७६३३ रुपये होते. (असे नंतर कळाले) पे स्पेशल ट्रेन लुटीत मिळालेली रक्कम एकत्रितपणे प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटलांच्याकडे द्यावी आणि ज्या ज्या वेळी चळवळीला पैशाची निकड लागेल त्या वेळेला प्रतिसरकारच्या यंत्रणेकडून पैसे मागून घ्यावेत अशी कार्यकर्त्यांच्या पुढे नागनाथ नायकवडी यांनी सूचना मांडली. या सूचनेला जी.डी.बापू लाड यांनी पाठिंबा दिला. परंतु ही गोष्ट अन्य दोन ग्रुपला मान्य नव्हती. वाद घालण्याची ती वेळ नव्हती. पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लागलेला होता. आता सांकेतिक ठिकाणी थांबणे धोक्याचे होते. अन्य दोन ग्रुपने खजिन्याच्या समान चार वाटण्या करा म्हणून सांगितले. नागनाथ अण्णांना हे मान्य नव्हते. पण ऐकतो कोण? शेवटी ग्रुपवार समान चार वाटण्या केल्या. वाळवे ग्रुपच्या वाटणीला आलेल्या रकमेला नागनाथ अण्णांनी हातही लावला नाही. त्यांनी आमच्या वाळवा ग्रुपचे वाटणीला आलेले पैसे क्रांतिसिंहाच्याकडे पाठवा म्हणून सांगितले. त्या प्रमाणे क्रांतिसिंहांचे सेक्रेटरी नाथाजी लाड यांच्याकडे रक्कम सुपूर्त केली.


पोलिस घटनास्थळी पोहचण्यास अर्धा तास लागला. तो पर्यंत भूमिगतांचे ग्रुप आपल्या अज्ञातस्थळी सुखरूपणे पोहचले होते. सर्वश्री नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, ज्ञानोबा वस्ताद, रामू कृष्णा विभुते (तेली), एस.बी.पाटील इ.तगड्या जवानांचे इंग्रजांची पगार गाडी लुटण्याचे धाडस म्हणजे साक्षात मृत्यूच्या गुहेत जाण्यासारखे होते. न जाणे या योजनेत यदाकदाचित ढिलाई झाली असती तर? भारत मातेच्या दासशृंखला तोडण्यासाठी त्यांनी गुलामीच्या बेडीवर घातलेला जबरदस्त धक्का होता.

पगाराची गाडी लुटल्यामुळे इंग्रजांचे धाबे दणाणले होते. त्यांनी पगाराची गाडी लुटलेल्या भूमिगतांच्या शोधासाठी पोलिसांचा फौजफाटा वाढविला होता. डी.एस.पी.गिलबर्ट रात्रंदिवस भूमिगतांच्या पाठीमागे हात धुऊन लागला होता. भूमिगत हाताला लागत नाही म्हटल्यावर गोरगरीब जनेतेवर त्याचा राग काढत होता

त्यांना चावडीवर आणून मारहाण करत होता. भूमिगतांच्या घरातील लोकांच्या उघड्या पाठीवर मिठाचे पाणी टाकून चामड्याच्या पट्ट्याने पाठ फोडत होता.

सरकारी मालमत्तेचा नाश करणे, सरकारी खजिने लुटणे अशा स्वरूपाच्या कामांना नागनाथ अण्णांचा पाठिंबा होता. परंतु जनतेची खाजगी मालमत्ता लुटणे अथवा त्यांच्या घरावर दरोडे घालणे या गोष्टींना त्यांचा सक्त विरोध होता. वाईट मार्गाच्या कामात त्यांनी कधीही भाग घेतला नाही. इंग्रजी सत्तेविरोधी अनेक लुटालुटीच्या व विध्वंसक कारवाया केल्या त्यामुळे सर्वश्री नाना पाटील, नागनाथ नायकवडी, जी.डी.बापू, नाथाजी लाड, वाय.सी.पाटील, भगवान पाटील(बप्पा) किसन पैलवान, काका घोरपडे, खंडू शेळके, नारायण कदम, तुकाराम खोत, शंकरराव इनामदार (परुळेकर) इ.कार्यकर्त्यांवर इंग्रज सरकारने पकड वारंट काढले. त्यांना पकडून देणाऱ्यांना हजारो रुपयांची बक्षिसे जाहीर केली.

❋ ❋



पे स्पेशल ट्रेन लूट करताना

भूमिगत देशभक्त- क्रांतिवीर अण्णा व साथीदार

# भूमिगतांची सुटका मित्राला फटका

कोल्हापूर मध्ये नागनाथ अण्णा राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षणासाठी असताना वार्षिक परीक्षा जवळ आली म्हणून प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये आपल्या एक नंबरच्या खोलीत अभ्यास करत बसलेले होते. साधारणपणे १९४२-४३ सालातील तो दिवस, सूर्य मावळतीकडे कलला होता. बोर्डिंगच्या पटांगणावर फुटबॉलचा खेळ चालू होता. लहान थोर सर्व मंडळी खेळ बघण्यात दंग झाली होती. खेळ रंगात आला होता. दोन्ही संघांचे समान गोल झाले होते. शेवटच्या गोलसाठी दोन्ही संघांचे खेळाडू प्रयत्नाची पराकष्ठा करत होते. परंतु यश कोणाच्याच पदरात पडत नव्हते. अखेर दिवस बुडाला आणि सामना थांबवावा लागला. दोन्ही बाजूंच्या बघ्यांनी जल्लोशाने मैदान दणाणून सोडले. अनिर्णीत सामन्यामुळे खेळाडूंनी आनंदाने नाचत घोषणा देत मैदान सोडले.

अण्णांनी हातातले पुस्तक बाजूला ठेवले आणि मैदानावर आले. त्यावेळी झांजड पडायला सुरुवात झाली होती. पाखरांचे थवे आपली घरटी जवळ करत होती. बाजारहाट करून आलेली बाया माणसं आपल्या घराकडं निघालेली दिसत होती. आजूनही रस्त्याचे लामणदिवे लावलेले नव्हते. नागनाथ अण्णा भूमिगतांच्या गुप्त बैठकीसाठी राजारामपुरीतल्या सांकेतिक स्थळी जाणार होते म्हणून त्यांनी आपल्या मित्राकडून सायकल घेतली आणि शिवाजी पेटेतील कॉर्नरला वळून पद्मा राजे गर्ल स्कूलच्या समोरच्या रस्त्यावर आले होते. समोरच काही आंतरावर पोलिस आणि दोन तीन लोकांच्यात कांहीतरी गोंधळ चाललेला दिसला म्हणून त्यांनी थोडा सायकलचा वेग वाढवला आणि जवळ येऊन पहातायत तर कांबळे फौजदार व दोन पोलिस दोन भूमिगत कार्यकर्त्यांना पकडून धक्के देत पोलिस चौकीत घेऊन निघालेले दिसत होते. ते दोघेही

स्वातंत्र्य सैनिक अण्णांच्या चांगले परिचयाचे होते. त्या पैकी एक सोनीचे दत्तू पाटील आणि दुसरे नांद्रेचे बाबू पाचोरे होते.

नागनाथ अण्णांनी त्या दोघांना पोलिसांच्या तावडीतून सोडवायचे ठरवले. त्यांना जवळच्या सायकलची अडचण होती. पोलिसांना संशय न येईल अशा पद्धतीने सायकल मागे वळवली व जवळच मंगळवारात डी.बी.पाटील या मित्राच्या घरात ठेवली. ते धावतच पोलिसांच्या जवळ जाऊन पोहचले. तो पर्यंत पोलिस पद्माराजे गर्ल स्कू लचा चौक सोडून पुढे खरी कॉर्नरच्या चढणीच्या रस्त्याला लागले होते. भूमिगतही आडेवेडे घेत त्यांच्या बरोबर चाललेले होते. नागनाथ अण्णा पोलिसांच्या जवळ जाऊन गया वया करत ''आहो फौजदार साहेब ही खेड्यातली साधी शेतकरी मंडळी दिसतायत त्यांना का पकडलय? सोडा त्यांना.'' एवढे बोलल्या बोलल्या फौजदार कांबळे वस्कन अण्णांच्या अंगावर आला आणि फौजदारी तोऱ्यात म्हणाला, ''कोण रे तू? तुला फाजील चौकशा कशाला पाहिजे? पहिला इथून चालायला लाग.'' तरीही शांतपणे अण्णा म्हणाले ''आहो तसं नव्हं, गरीब बिचारी माणसं दिसतायत म्हणून म्हणतोय सोडा त्यांना. अण्णांच्या या बोलण्याने दत्तू पाटलाना आणि बापू पाचोऱ्यांना थोडाधीर आला, काही झालं तरी नागनाथ अण्णा आपणाला सोडवणार याची त्यांना खात्री वाटली. ते दोघे सहजासहजी पोलिसांचे बरोबर जात नव्हते फौजदार कांबळे तर आता चांगलाच चिडला होता. तो भूमिगतांना धक्के देते पुढे नेत होता. ते सर्वजण बिनखांबी गणपतीच्या मंदिरा पर्यंत आले होते. पोलिस स्टेशन तर हाकेच्या अंतरावर होते. गया वया करून पोलिस दाद देत नाहीत म्हटल्यावर नागनाथ अण्णांनी आक्रमक भूमिका घेतली आणि दत्ता पाटलांना हाक दिली 'काय बघताय तात्या' म्हणत फौजदार कांबळेच्या हातावर आपल्या हातातील तीन सेलच्या बॅटरीने सपासप वार केले तसे ते दोघे कार्यकर्ते पोलिसाच्या तावडीतून निसटले आणि अंधाराचा फायदा घेऊन धूम पळून गेले.

दत्तू पाटील आणि बाबू पाचोरे पोलिसाच्या तावडीतून सुटले; परंतु पोलिसांनी नागनाथ अण्णांना पकडले. कोण रे तू, तुझे नाव काय? '' ते झटदिशी म्हणाले, ''आर.एस.पाटील.'' फौजदार पुढे म्हणाले, ''कुठे रहातोस?'' प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये.'' फौजदार कांबळे रागातच म्हणाले, ''म्हणजे तू शिक्षणासाठी आलायस की असले धंदे करायला आला आहेस. पोलिसांच्या कामात आडथळा करतोस काय, चल तुला पोलिसी खाक्या दाखवतो.'' म्हणत पाटीमागून मानेजवळ सदऱ्याचा गचोटा धरून पुढे धक्के देत त्याना पोलिस स्टेशनकडे घेऊन निघाले.! तसे अण्णा त्यांच्या पुढे पोलिस स्टेशनच्या दिशेने झपाझपा पावले टाकत निघाले. उलट फौजदारला म्हणाले ''चला, मला काय भीती. मी काय गुन्हा केलाय. माझी आणि सायबांची चांगली ओळख आहे. कांबळे साहेब ध्यानात ठेवा. तुमच्याबद्दल

सायबांच्याकडे मी तक्रार करणार तुम्ही गोर गरीब खेडूत शेतकऱ्यांना पकडून त्रास देत होता.'' असे म्हणत पोलिसांच्या पुढे जोराने चालू लागले. तसा पोलिसांनी धरलेल्या गचोट्याचा हात ढिला झाला. तसे एकदम अण्णा गर्रकन मागे फिरले आणि कोटाच्या खिशातील पिस्तुल काडले आणि हवेत दोन बार काडले तसे पोलिस बाजूला पळाले. तरी कांबळे साहेब पोलिसांना म्हणत होता, ''अरे कशाला भिताय हे पिस्तुल इटालीयन बनावटीचे (मॉडेल) आहे.'' तसे पोलिस अण्णांना पकडायला जवळ येऊ लागले. अण्णा, कांबळे फौजदाराकडे बोट करून म्हणाले, ''पुढे ये, तुला खरे आहे की खोटे ते दाखवतो'' असे म्हणून बरोबर नेम धरून त्याच्या हातावर बार टाकला. तसा कांबळे फौजदार ठो...ठो ... बोंबलत पळाला. पोलिसांच्याकडे हात करत अण्णा म्हणाले 'तुम्हालाही दाखवू काय पिस्तुल खरे आहे का, खोटे?' तसे पोलिसही पळून गेले. पुढे अण्णा आपल्या संकेत स्थळी निघून गेले. ज्यांच्यासाठी पोलिस आंगावर घेतले ते तर केव्हांच निघून गेले होते.

रात्रीच्या प्रसंगात सहज नागनाथ अण्णा बोलून गेले खरे पण दुसऱ्या दिवशी पहाटे-पहाटे पोलिसांनी प्रिन्स शिवाजी बोर्डिंगला वेढा दिला. नागनाथ अण्णा त्यावेळी आपल्या एक नंबरच्या खोलीत होते. त्यांना पोलिसांनी वेढा दिलेची चाहूल लागली. आपण ताबडतोब खोली सोडून परागंदा व्हायला पाहिजे म्हणून ते खोलीतून बाहेर पडले आणि गेटच्या दिशेने निघाले. बोर्डिंगमध्ये यायला-जायला तशी चार गेट होती. म्हणून रुम जवळच्या गेटकडे निघाले तर गेटवर हत्यारबंद पोलिस उभा, चारीही गेटची तिच अवस्था होती. तांबड फुटायला लागलं. येणाऱ्या जाणाऱ्या माणसांची तोंडं दिसायला लागली. पोलिसांनी वेढा आवळायला सुरवात केली. हळू-हळू पोलिस बोर्डिंगच्या दिशेने पुढे सरकू लागले. नागनाथ अण्णांना बाहेर पडण्याचा मार्गच राहिला नाही. अण्णांनी विचार केला आणि त्यांच्या चटकन एक मार्ग लक्षात आला. तो मार्ग जीवीताला धोक्याचा होता. तो मार्ग म्हणजे पावसाळ्यात शिवाजी पेठेतील पाणी जाणारा मोरीचा मार्ग ती मोरी २ बाय २ फूटाची अजूनही आहे. त्या मोरीचे एक तोंड प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये आले होते. मोरीचे दुसरे तोंड शिवाजी पेठेच्या पलिकडे उघडणारे असे लांब पल्ल्याचे होते.(त्या ठिकाणी पुर्वी शेती होती.) त्या मोरीतून जाण्याचा पक्का विचार मनात केला. आणि त्या दिशेने झपाझप पावले उचलत निघाले. मित्र मंडळीने त्या गोष्टीला कडाडून विरोध केला. मित्रांच्या मनात नाना विचार येत होते. ते अण्णांना म्हणाले, ''हे पाहा नागनाथ पोलिसांनी पकडले तर पकडू द्या. आम्ही तुम्हाला सोडवून आणू ही मोरी जुनी पुराणी विंचू काट्याची, साप किड्यांची वस्ती असलेली आहे. काय जर धोका झालातर मृत्यूशी गाठ आहे.'' अण्णा म्हणाले, ''मरण आले तर बेहत्तर पण पोलिसांच्या कडून पकडून जाऊन अपमानीत होण्यापेक्षा निघून जाणे मला उचित वाटते. मित्रांनो! तुम्ही काही काळजी करु नका मला कांही होणार नाही तुम्ही निश्चिंत रहा.''

'भारत माता की जय'! म्हणत ते मोरीत घुसले. आणि सरपटत-सरपटत पोलिसांचा वेढा सुखरुप पार करुन आपल्या सांकेतीक स्थळी निघून गेले.

पोलिस संगीना रोखून बोर्डिंग जवळ आले आणि सुपरिंटेंडेंटला म्हणाले, ''तुमचा आर.एस.पाटील विद्यार्थी कोठे आहे? आमच्या ताब्यात द्या.'' रात्रीच्या प्रसंगात सहज नागनाथ अण्णा बोलून गेले खरे पण दुसऱ्या दिवसी पोलिस पार्टी प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये आली आणि आर.एस.पाटलांचा शोध घेऊ लागली. अण्णा आणि पाटील दोघे एकाच खोलीत रहात होते. रात्रीचा प्रसंग आर.एस.पाटलांना काहीच माहीत नव्हता. प्रसंग झाला तो दिवस रविवारचा होता. म्हणून पाटील कोडोलीला आपल्या गावी गेले होते. आज सकाळीच शाळेला जायचं म्हणून बोर्डिंगमध्ये आले आणि त्यांना पोलिसांनी पकडून नेले. पोलिस स्टेशनमध्ये पोलिसानी आर. एस. ना काही न बोलता पहिल्यांदा त्यांची चांगलीच धुलाई केली आणि मग प्रश्नांचा भडीमार चालू केला, ''कांबळे फौजदारवर गोळी बार करतोस काय? कुठाय ते हत्यार? तू त्याना जिवे मारण्याचे ठरवले होतेस!'' आर.एस. ना काय बोलावे हेच कळेना. ते म्हणाले ''आहो रात्री मी माझ्या गावी सुट्टी होती म्हणून गेलो होतो. आज सकाळीच मी बोर्डिंगमध्ये आलोय आणि तुम्ही हे काय माझ्या मागे लावले आहे? कुठाय ते फौजदार कांबळे साहेब? त्यांना तर विचारा. मीच त्यांचेवर गोळीबार केला आहे का? याची पहिली खात्री करा आणि मग मला काय शिक्षा द्यायची ती द्या.'' या ठाम उत्तराने पोलिस जरा ठिकाणावर आले आणि कांबळे फौजदार ज्या सरकारी दवाखान्यात उपचार घेत होते त्या ठिकाणी आर.एस.पाटलांना फरफटत घेऊन गेले. योगायोगाने रात्रीचे दोन्ही पोलिस तिथे हजर होते. त्या तिघांचे समोर त्यांना उभे केले. ''आहो कांबळे साहेब! हीच का रात्रीची व्यक्ती? यावर साहेब व पोलिस म्हणाले, ''ही रात्रीची व्यक्ती नव्हे, मग बिचाऱ्या रंगराव पाटलांना पोलिसांनी सोडून दिले.''

आर.एस.पाटील, कोडोली गावचे. त्यांची परिस्थिती चांगली. त्यांच्या वडलांचे नाव आसपासच्या खेड्यात होते. आर.एस. तसे हुशार विद्यार्थी होते. राष्ट्रीय विचाराचे आसल्यामुळे नागनाथ अण्णांचे ते चांगले मित्र होते. त्यांना माहीत होते. कालचा प्रसंग आपल्या मित्राकडून अनवधानाने झाला आहे. (पुढे आर.एस.पाटलांनी बी.एसी. ॲग्री ही पदवी मिळवली व ते सरकारी नोकरीत कृषी विभागाचे मोठे अधिकारी झाले. ते सरकारी सेवेतून निवृत्त झाले असून त्यांचे कोल्हापूर येथे वास्तव्य आहे. १९४२ च्या प्रसंगामुळे त्या वेळी त्यांना पोलिसांचे कडून खूप त्रास झाला. आज ते स्वातंत्र्य सैनिक म्हणून सन्मानित आहेत. त्यांना भारत सरकार कडून तांम्रपट मिळाला. त्यांना स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शन चालू आहे. विद्यार्थी दशेत त्यांची व नागनाथ अण्णांची जीवा-भावाची मैत्री झाली ती तशीच कायम आहे.)

# प्रतिसरकार

# क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे योगदान

ग्राम राज्याचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून क्रांतिसिंह नाना पाटलांनी जनतेच्या गरजेतून सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन केले. त्यासाठी ३/८/१९४३ रोजी पणुंब्रे येथे प्रतिसरकारच्या कामाची घटना व रुपरेषा ठरवण्यासाठी जी एक दुसरी बैठक झाली. ती क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्या बैठकीला नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, नाथाजी लाड, दे.भ.बर्डे गुरूजी, धन्वंतरी वैद्य, डी.जी.देशपांडे, वाय.सी.पाटील, बाबूराव कोकाटे, घोरपडे मास्तर, बाबूजी पाटणकर, बाबूराव चरणकर, दत्तोबा लोहार, गणपत पाटील, ईश्वर लाड, किसन अहिर, बाबू जंगम, पांडू तात्या बोराडे, बापूराव जगताप (गोवा लिंब) भिकोबा साळुंखे, सखाराम तुकाराम घोरपडे (काका), रामचंद्र संतू अहिर (मास्तर), ढगेवाडीचे अंता पाटील, राजूताई पाटील ऐतवडे, तुकाराम नाना खोत पडवळवाडी, वाळव्याचे खंडू सखाराम शेळके (दाजी) व नारायण कदम असे अनेक कार्यकर्ते हजर होते.

इंग्रजी सत्तेचा जुलूम, गावगुंडांकडून होणारी सर्वसामान्य जनतेची पिळवणूक, सावकारांच्या कर्जात बुडालेल्या सामान्य जनतेचे व शेतकऱ्यांचे सावकारांच्या कडून होणारे अत्याचार, दरोडेखोरांच्याकडून होणारी लूट, वारंवार होणारी स्त्रियांची अडवणूक, स्त्रियांच्यावर होणारे बलात्कार, कब्जे दलाली व भाऊबंदकी यांमुळे भरडणारे लोक, वारसा हक्काचे दावे अशा कितीतरी अन्यायाखाली इंग्रजी राजवटीच्या कारभाराने भारतीय जनता हैराण झाली होती. सर्व क्रांतिकारक एकत्र जमले आणि त्यातूनच

लोकांच्या कल्याणासाठी लोकच चालवतील अशी प्रतिसरकारची क्रांतिसिंह नाना पाटलांनी रचना केली आणि त्याची घटना व एकंदरीत कामाची पद्धत ठरवली. या बैठकीत कार्यकारिणी आणि न्यायदानमंडळ यांच्या कामकाजाचा पाया घातला. कार्यकारिणीच्या आणि न्यायदान मंडळाच्या घटनेवर क्रांतिकारकांनी नियंत्रण ठेवावयाचे, डिक्टेटर, सुपरवायझर, गट नायक, उप गट नायक आणि कार्यकारणीच्या सदस्यांची निवड लोकांच्यातून भूमिगतांनी करायची. न्यायदान मंडळे व राष्ट्रसेवादलाच्या सारखे लोकहिताचे प्रकल्प सुरू करायचे आदेश अशा होणाऱ्या बैठकांतून क्रांतिकारक देत असत. सर्वसाधारण बैठकांतून निवडली जाणारी कार्यकारीणी ही अत्यंत महत्त्वाची होती. या कार्यकारीणीत महत्त्वाचे प्रमुख भूमिगत नेते होते आणि त्यांच्या आदेशा प्रमाणे प्रतिसरकार चालत होते. ३ ऑगष्ट १९४३ रोजी प्रतिसरकारच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य म्हणून क्रांतिवीर नागनाथ अण्णांची निवड करण्यात आली.

प्रतिसरकारची महत्त्वाची कामे-देशद्रोह्यांना शिक्षा देणे, पोलिस खबऱ्याला शिक्षा देणे, क्रांतिकारकांच्या विरोधात असणाऱ्या साक्षीदारांना शिक्षा देणे, व्यवस्थित काम न करता लोकांना त्रास देणाऱ्या पाटील, तलाठ्यांना शिक्षा देणे, अन्यायकारक संपती जमा करणाऱ्या अधिकाऱ्यांना ठीक करणे, सरकारधार्जिण्या प्रतिष्ठित मंडळींच्यावर प्रतिसरकारचा वचक बसवणे, अनैतिक वागणारे, स्त्रियांचा छळ करणारे, गाव गुंड, सावकार, काळा बाजार करणारे वगैरे लोकांच्यावर वचक बसवणे इ. हे करत असताना त्यांना मारझोड ही करावी लागायची. भूमिगतांनी गुन्हेगारांना मारण्यासाठी एक नवीन पद्धत सर्वत्र अवंलबवली होती. ती अशी. गुन्हेगाराचे पाय बांधावयाचे, त्या पायांच्यामध्ये काठी अडकून त्याला उलटा टांगायचा व त्याच्या तळपायावर काठयानी झोडपायचे म्हणजे पत्र्या लावणे. या पत्र्या लावण्याच्या पद्धतीने प्रतिसरकारला लोक 'पत्री सरकार' म्हणू लागले. क्रांतिसिंह नाना पाटील यांना प्रतिसरकारचे प्रमुख पद देऊन वेगवेगळ्या गावी १८ ग्रुप स्थापन करण्यात आले. ते ग्रुप व ग्रुपप्रमुख खालील प्रमाणे.

| गावाचे नाव | प्रमुख | उपप्रमुख |
|---|---|---|
| १) वाटेगाव | बर्डे गुरुजी | अंतूकाका बर्डे |
| २) कासेगाव | बाबूजी पाटणकर | शेख काका |
| ३) कराड (इंदोली) | कासेगावकर वैद्य | एम.एम.जाधव |
| ४) किवळ | भिकोबा साळुंखे | दत्तोबा काटकर |
| ५) म्हावशी | म्हावशीकर बुवा | म्होडेकर पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | बिळाशी | गणपतराव पाटील | दत्तोबा लोहार |
| ७) | चरण | जोशी काका | बाबूराव चरणकर |
| ८) | वाळवे (शिराळा) | नागनाथ नायकवडी | किसनअहिर (पैलवान) |
| | | वाय.सी.पाटील | राजमती पाटील (ताई) |
| ९) | कुंडल | जी.डी.लाड (बापू) | ईश्वरा लाड |
| १०) | हणमंतवडिये | भगवान पाटील(बप्पा) | महादेव अप्पा मिरगे |
| ११) | कुमठे | पांडुतात्या बोराडे | बाबू जंगम |
| १२) | रहिमतपूर | सोपान घोरपडे | विठ्ठल घोरपडे |
| १३) | बुध (पाचेगाव) | बाबूराव कचरे | लाला इंगळे |
| १४) | लिंब (गोवा) | बाबूराव जगताप | विष्णू सोनमारे |
| १५) | कवठे | किसन वीर | आबा ढगे |
| १६) | वाई | द्वारकादास जोशी | आण्णा पंत |
| १७) | खेड बुद्रुक | विष्णू डोईफोडे | दादा पाटील |
| १८) | नांदगाव (तासगाव) | घोरपडे मास्तर | रामराव पाटील |

सातारा जिल्ह्यातून वरील प्रमाणे प्रतिसरकार मध्ये काम करणारी भूमिगत नेते मंडळी होती. यांच्या बैठकीतून डिकटेटर म्हणून निवड केली जात असे.

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली शिराळा, वाळवा तालुक्यातून ग्राम राज्याची कल्पना प्रतिसरकारचे धोरणाप्रमाणे राबवली जात होती. अनेक गाव गुंडांना क्रांतिकारक नागनाथ अण्णांच्या कार्यकर्त्यांनी पत्र्या लावून त्यांची गुंडगिरी मोडकळीस आणली, सावकाराची सावकारशाही खिळखिळी केली. अनेक गोर गरीब मुलींचे नांदणे लावले, विधवांच्या अन्यायाने लाटलेल्या जमिनी परत केल्या. काही शेतकऱ्यांच्या गाव गुंडांने जमिनी पडीक पाडल्या होत्या त्या क्रांतिकारक अण्णांचे अत्यंत जवळचे धाडसी सहकारी किसन अहिर, खंडू शेळके, नारायण पेशवे, रामू मास्तर, शामराव आप्पा पाटील, वस्ताद, देवास, अंता पाटील, वाय.सी.पाटील, राजमती पाटील (ताई), बिरनाळे पैलवान, वगैरे मंडळींनी त्या जमिनी नांगरुन, कुळवून, पेरून दिल्या. गावोगावी न्यायदान मंडळे स्थापन केली, राष्ट्र सेवा दलाच्या शाखा स्थापन केल्या, ऐतवडे सारख्या गावात सामुदाईक शेतीचा प्रयोग केला. दुर्गम भागात व्हॉलंटरी शाळा काढल्या. गावोगावी स्वच्छतेच्या मोहिमा घेऊन गावे स्वच्छ केली. अशा पद्धतीने प्रतिसरकारच्या स्वप्नाची ग्राम राज्य साकार करायचा प्रयत्न क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी

व त्यांच्या सहकारी भूमिगतांनी मर्यादित दोन तालुक्यांत केला तो अत्यंत प्रभावी ठरला. तसा प्रतिसरकारच्या चळवळीचा प्रभाव सातारा जिल्ह्यातील निरा नदीपासून वारणा नदीपर्यंत होता.

'स्वतंत्र भारत' नावाचे पत्रक प्रतिसरकारच्या मार्फत काढले जाई. ती पत्रके गावोगावी पोहचवण्यासाठी धावपटूंची नेमणूक करून त्यांच्यामार्फत पत्रके पोहच करण्याचे काम वाळवा, शिराळा मध्ये राबले. भारतातल्या सर्व प्रांतांतील १९४२ ची चळवळ थंडावत चालली होती पण एकट्या सातारा जिल्ह्यात भूमिगतांनी प्रतिसरकारच्या मार्गदर्शना खाली ती चळवळ धगधगत ठेवली होती. त्या कामात क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यांच्या आई क्रांतिमाता लक्ष्मीबाई व वडील रामचंद्र गणू नायकवडी यांनी त्यांना या कामात मनापासून समजून उमजून सहकार्य केले. त्यासाठी दोघांनाही इंग्रज सत्तेने तुरुंगात डांबून ठेवले. आईंना येरवडा जेल मध्ये तीन महिने तर वडिलांना सहा महिने कारावासाची शिक्षा भोगावी लागली.

प्रतिसरकारचे प्रमुख नेते क्रांतिसिंह नाना पाटील होते. त्यांना अनेक स्वातंत्र्यवीर या कामात सहकार्य करत होते. त्यापैकी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, जी.डी.बापू(लाड), नाथाजी लाड होते. तसेच प्रतिसरकारचे काम जन मानसात रुजन्याची पार्श्वभूमी निर्माण करण्याचे मोठे काम त्या काळात कर्मवीर भाऊराव पाटलांनी केले. त्यांचे मुख्य काम समाज घडवण्याचे होते. त्यासाठी शाळांची बंद असलेली दार त्यांनी बहुजन समाजासाठी खुली केली. नाना पाटलांनी ज्या वेळी प्रतिसरकार उभे केले त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील त्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे होते. क्रांतिकारक स्वातंत्र्याची चळवळ पुढे लढत होते. पण त्यांच्या पाठीमागे राहून त्यांना रसद पुरवण्याचे काम रयत शिक्षण संस्थेचे हजारो विद्यार्थी, शिक्षक व स्वत: कर्मवीरअण्णा करत होते.

# सातारचे चार गट

देशात आणि महाराष्ट्रात स्वातंत्र्याच्या चळवळीचे आंदोलन थंड व्हायला लागले होते पण सातारा शांत झाला नव्हता. सातारी क्रांतिकारकांचे आंदोलन अजून धगधगत होते. भूमिगतांनी सोईसाठी सातारा जिल्ह्याची चार भागांत विभागणी केली होती. पहिला सामर्थ्यवान गट क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली कुंडलचा होता. नाना पाटलांचा खाक्या काही वेगळाच होता. खऱ्या अर्थाने ते लोकनेते होते. त्यांची सभेतील भाषणे ऐकून लोक भारावून जात. पुढे त्यांनी प्रतिसरकारचा कारभार सुरू केला आणि नाना पाटील कुंडलला जवळ जवळ स्थानबद्ध झाले. त्यांच्या भोवताली कुंडल गटाच्या क्रांतिकारकांचे अभेद्य कडे तयार झाले होते. ते कडे पार करून नाना पाटलांना भेटणे अवघड होऊन बसले. कुंडल गटात लाड बंधू सर्व शक्तिमान होते. नाना पाटलांच्या नावाचा उपयोग करून पुढे पुढे लाड बंधू कारभार करू लागले. त्या पैकी जी.डी.लाड (गणपती लाड) बापू हा तरणाबांड तरुण पुण्याच्या आयुर्वेद कॉलेज मध्ये शिकत होता. त्याच वेळी ४२ ची ऑगस्ट क्रांतीची चळवळ सुरू झाली होती. मग त्याने शिक्षणाला राम राम ठोकला व जिवाची पर्वा न करता चळवळीत झोकून दिले. जी.डी.लाड (बापू) हा तरुण धाडसी, निधड्या छातीचा आणि पराक्रमी होता. सुभाषचंद्र बोस हे बापूंचे आदर्श होते. प्रतिसरकारची 'तुफान सेना' त्यांनी आझाद हिंद

फौजेच्या आराखडयाबरहुकूम बेतली होती. दुसरे नाथाजी लाड, त्यांचे नाना पाटलांच्या बहिणीबरोबर लग्न झाले होते. हे गृहस्थ मोठे धोरणी होते. हुशार होते, चाणाक्ष होते म्हणून प्रतिसरकारने त्यांची डिक्टेटर म्हणून निवड केली होती. पुढे पुढे 'नाथा बोले आणि नाना पाटील हाले' अशी परिस्थिती निर्माण झाली. सिंहासनावर बसलेला राजा नामधारी बनला आणि पंतप्रधानाच्या हाती सत्ता जावी तसे कुंडल गटाच्या राजकारणाला वळण लागले. नाव नाना पाटलांचे व कारभार लाड बंधूंचा असा प्रकार झाला.

दुसरा गट किसन वीरांचा होता. त्यांचे क्षेत्र वाई तालुका होता. येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध असता त्यांनी जेल फोडला. त्यामुळे त्यांच्या भोवती एक प्रकारचे वलय तयार झाले होते. कुंडल गटाने त्यांना फारसे जवळ केले नाही. प्रतिसरकारच्या परिसरात वावरणारे एक नेते एवढेच खरे म्हणजे त्यांचे स्थान होते. किसन वीर विचाराने प्रौढ, चटपटीत, वागण्या बोलण्याने प्रभाव पाडणारे, चांगल्या संस्कारात वाढलेले. त्यांचे कुंडल गटाशी फारसे जमले नसले तरी मुंबईच्या मध्यवर्ती संघटनेशी त्यांचे संबंध चांगले होते. तसेच नागनाथ अण्णांच्या बरोबरही त्यांचे चांगले संबंध होते. त्यांची प्रवृत्ती विधायक कामात रममाण होणारी होती. त्यांच्यावर राष्ट्रसेवा दलाच्या संस्काराचा प्रभाव होता. त्यांनी जातीयवादाला कडाडून विरोध केला होता.

तिसऱ्या गटाचे प्रमुख वसंतदादा पाटील. यांनी बेचाळीसच्या लढ्यात हातात बंदूक घेऊन दिवसा ढवळ्या सांगलीचा जेल फोडला. एकोणीसशे चाळीसच्या सत्याग्रहात एक सत्याग्रही म्हणून महात्मा गांधींनी त्यांची निवड केली होती. वसंतराव शांत, धीर गंभीर, संयमी स्वभावाचे होते. भौगोलिक दृष्ट्या कुंडल गट त्यांना अधिक निकटचा, पण त्या गटाशी त्यांचे सूत जमले नाही. वसंतराव दादांचे नागनाथ नायकवडी, किसन वीर, बर्डे मास्तर, बाबूजी पाटणकर, पांडू मास्तर, बाबूराव चरणकर, शेख काका यांच्याशी मात्र चांगले जमत होते. म्हणून ते या गटामध्ये सामील होऊन काम करत होते.

चौथा गट बाबूराव चरणकरांचा. या गटाचे कार्यक्षेत्र होते बिळाशी. १९३० सालच्या जंगल सत्याग्रहाचे 'बिळाशी बंड' गाजले होते. या भागातील शेतकऱ्यांनी ब्रिटिश अंमलदाराच्या नाकात दम आणून सोडला होता. त्यावेळी बाबूराव चरणकरांनी सत्ताधारी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन बिळाशी बंड संघटित केले.

असे हे चार प्रमुख गट सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार आस्तित्वात येण्यापूर्वी वेगवेगळ्या भागांत ब्रिटिश सत्तेला आव्हान देत होते. प्रतिसरकारच्या रचनात्मक स्थापनेची कारवाई प्रत्यक्षात अमलात आणली ती कुंडल गटाने व नागनाथ नायकवडी गटाने. उर्वरित गटाने इंग्रजी सत्ता खिळखिळी केली. पण त्या लोकांना सरकार स्थापन करता आले नाही. याचा मागोवा घेता काही बाबी आपोआप स्पष्ट होतात. अनुकूल भौगोलिक परिस्थिती हे सातारा जिल्ह्याचे वैशिष्ट्य होते. सातारा जिल्हा डोंगराळ, दळण वळणाची साधने कमी, खळखळ वहाणाऱ्या नद्या, घनदाट जंगल, पावसाळ्यात नद्यांना येणारे पूर इत्यादी नैसर्गिक परिस्थितीने सक्षम होता. पाठलागावर असलेल्या पोलिसांना गुंगारा देऊन डोंगरदऱ्या जवळ केल्या की भूमिगत कार्यकर्ते सुरक्षित रहात होते. या दुर्गम भागाचे नैसर्गिक संरक्षण त्या भागाला लाभले होते. भूमिगत क्रांतिकारकांना आणखीही एक महत्त्वाची अनुकूलता लाभली होती. सातारा जिल्ह्याची परंपरा लढाऊ आहे. छत्रपती शिवरायांनी मावळयांची सोबत घेऊन मोंगल साम्राज्य सत्तेबरोबर जो लढा दिला, त्या लढ्यात मराठा शिलेदार बिनीला लढत होता. धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनी मोघलांना तलवारीने पाणी पाजले. दुसऱ्या बाजीरावाच्या नाकर्तेपणामुळे इंग्रजांचा ध्वज पुण्याच्या शनिवार वाड्यावर चढला तेव्हा मराठे हतबल झाले. त्यांचा सैनिकी पेशा संपुष्टात आला. हातातील तलवारी म्यान झाल्या. तिची जागा नांगराने घेतली. तरी क्षात्रतेज सळसळत राहिले. साताराचे भूमिगत क्रांतिकारकांनी चलेजाव स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली.साताराच्या क्रांतिकारकांच्या रक्तात पिढ्यान्‌पिढ्यांचे भिनलेले क्षात्रतेज उफाळू लागले. त्यांनी आपले प्रतिसरकार स्थापन केले आणि इंग्रजी सत्तेचे साताऱ्यातून उच्चाटन करायला सुरुवात केली.

प्रतिसरकारच्या अस्तित्वानंतर धुळे खजिना लुटून तो सही सलामत सातारला आणला. त्यात नागनाथ अण्णांचा सिंहाचा वाटा होता. खजिना साताऱ्यात आला आणि त्यातूनच जिवाभावाचे मित्र जी.डी.लाड (बापू) व नागनाथ अण्णा एक मेकांपासून दुरावले. कुंडल गटापासून बाजूला गेलेल्या नागनाथ अण्णांनी वाळवा शिराळा भागात आपला स्वतंत्र गट निर्माण केला. त्या गटात किसन अहिर, वाय.सी.पाटील आदी कार्यकर्त्यांच्या बरोबर राजूताई पाटील ही तरुणी खांद्यावर बंदूक घेऊन आघाडीने लढत होती. अण्णा कुंडल गटापासून बाजूला झाले असले

तरी ते प्रतिसरकारच्या ध्येय धोरणांपासून बाजूला झाले नाहीत. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन प्रति सरकारची धोरणे तंतोतंत अमलात आणली. वाळव्या पासून तंदूर -मंदूर पर्यंतच्या कृष्णा-वारणेच्या खोऱ्यातील गावगुंड, गुन्हेगार, पोलिसांचे खबरे, लाचखाऊ अधिकारी, गोरगरीब जनतेवर, स्त्रियांच्यावर, अन्याय करणाऱ्या समाज कंटकांना ठेचून काढले. इतरांपेक्षा नागनाथ अण्णा वेगळे होते. ते निरपेक्ष भावनेने आपले काम करीत होते. महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस यांच्या ध्येय धोरणाप्रमाणे स्वातंत्र्य संग्रामात पुढच्या आघाडीने लढत होते.

# सांगाव बंदुका गडप

कसबे सांगाव हल्ली कागल तालुक्यात असले तरी हे गाव स्वातंत्र्यपूर्वकाळात मुंबई इलाख्यातील हातकणंगले पेट्यात होते. हे गाव चारी बाजूंनी निसर्गाच्या झाडाझुडपांच्या सौंदर्याच्या खोबनीत वसले आहे. एका बाजूला काळीभोर जमीन तर दुसऱ्या बाजूला चढ उताराचे विस्तीर्ण झाडा झुडपांचे मैदान. त्या काळात कसबे सांगाव हे गाव व्यापार पेठ म्हणून प्रसिद्ध होते. त्या गावातील मातब्बर म्हणून प्रसिद्ध असलेल्या मगदूम मास्तरांनी गावाला चलेजाव चळवळीचे केंद्र बनवले होते. मगदूम मास्तरांना सहकार्य करणाऱ्या वतनदार पाटलांना ब्रिटिश सरकारने सस्पेंड केले होते आणि त्या जागी सत्याप्पा भिमा मिरजे ऊर्फ कुपवाडे पाटील हे गाव कामगार पाटील झाले होते. गावातील देशप्रेमी तरुणांना त्यांनी पकडून देण्याचा सपाटा लावला होता. त्या त्रासातून मुक्त होण्यासाठी रेसेडेंसी बंगल्यावर चालू असलेल्या पिकेटिंगमध्ये काही तरुणांनी भाग घ्यावयास सुरुवात केली होती. अनेक तरुण तुरुंगात गेले होते. त्यामुळे या व नजीकच्या गावच्या लोकांच्यावर सरकारची दहशत रहावी, चळवळीचे नीतिधैर्य खचावे, या उद्देशाने कसबे सांगावला चार पोलिसांचे एक युनिट बंदोबस्तासाठी ठेवले होते. सदर युनिट व पोलिसांचा खर्च गावावर सामुदाईक दंडाचे रूपाने बसवला होता. त्यामुळे लोकही चिडून होते. हे युनिट हल्ली असलेल्या मारुतीच्या देवालयाच्या पूर्वेस ग्रा.पं.ची बालवाडी असलेल्या खोलीच्या उत्तरेला असलेल्या खोलीत मुक्कामाला होते व शाळेच्या पाठीमागे असलेल्या त्या वेळच्या दक्षिणाभिमुख असलेल्या चावडीच्या पूर्वेकडील ढेलजीत पहारा करीत बसत असत.

स्वातंत्र्य संग्राम भूमिगतांची 'बहिर्जी नाईक' नावाची एक गुप्त संघटना होती. त्यांतील एका हेराने व नानासाहेब घाटगे या मित्राकडून कसबे सांगावच्या आऊटपोष्टच्या पोलिस ठाण्यातील बंदुकांची माहिती प्रतिसरकार मधील क्रांतिसिंह नाना पाटलांचे शिलेदार क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांना कळाल्यापासून त्या कशा मिळवावयाच्या यांची इत्थंभूत योजना त्यांनी आखली. आधी त्यांनी आपल्या बरोबर आणखीन तीन तरुणांची निवड केली, ते तीन शिलेदार क्रांतिअग्रणी जी.डी.लाड (बापू) शाम पाटील व ईश्वरा गुरव. चौघेजण मिळून मंगळवार पेठेतील डी.बी.पाटील यांच्या घरी जमले. डी.बी.अत्यंत हुशार व चौकस होते त्यांच्याकडून कसबे सांगाव गावची पूर्ण माहिती घेतली. आउटपोष्ट कोठे आहे? गावातील कोण कोणते रस्ते आउट पोष्टाला छेदून पुढे जातात? त्या रस्त्यां पैकी कोणता रस्ता आउट पोष्टापासून गावा बाहेर पडायला सोईचा आहे? गावाच्या चौकात कोणत्या वेळी गर्दी असते आणि कोणत्या वेळी शुकशुकाट असतो? गावात कोणत्या रस्त्याने प्रवेश केला तर त्या बाजूला विरळ वस्ती आहे? पोलिसांना गावातील कोणत्या व्यक्तीकडून मदत मिळू शकते? याची इत्थंभूत माहिती मिळवली आणि पुढे कसबे सांगावच्या बंदुका कधी व कोणत्या वेळेस पळवायच्या तो दिवस निश्चित केला. तो दिवस होता शुक्रवार तारीख १/१०/१९४३ व वेळ निवडली झांझड पडताना दिवे लावण्याची.



**सांगाव पोलिस चौकीची पाहणी करताना क्रांतिवीर अण्णा**

कसबे सांगावचे आउट पोष्ट भरवस्तीच्या ठिकाणी होते. चावडीच्या राबत्यात होते आणि लुटण्यासाठी फक्त चौघांनी हल्ला करणे म्हणजे सरळ मृत्यूला सामोरे जाण्याचा प्रकार होता. सारी तयारी झाली. दुपारी तीनला कागलला जाणाऱ्या गाडीची तिकिटे काढली. क्रांतिअग्रणी जी.डी.लाड (बापू) व ईश्वरा गुरव हे लक्ष्मीपुरीतील मोटार स्टॅण्डवर गाडीत जाऊन बसले क्रांतिवीर नागनाथ नायकवडी व शाम पाटील हे प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे विद्यार्थी असल्यामुळे कोल्हापूरला परिचित होते म्हणून ते दोघे सागरमाळ तिटयावर जाऊन मोटार गाडीची वाट पहात बसले. थोड्या वेळातच मोटारगाडी आली. ते दोघेही मोटर गाडीत चढले त्यावेळी हल्ली कागल नगर पालिका असलेल्या जागेत स्टॅण्ड होते. तिथे यांची चौकडी उतरली आणि आम्ही वेगळे आहोत हे दाखवावयाचे, म्हणून मागे पुढे थोडे थोडे अंतर ठेवून कसबे सांगावच्या दिशेने निघालो कसबे सांगाव गावा लगतच एक ओढा आहे. त्या चौघांना कागल पासून कसबे सांगावच्या ओढ्यापर्यंत पोहचायला ५ ते ५.३० वाजले. पोलिसांजवळ कोणत्या प्रकारच्या बंदुका आहेत याची आगोदर माहिती नागनाथ अण्णांनी मिळवली होती. ओढ्यात उतरल्यावर वळणावर चौघांनी गोळ्या वाटून घेतल्या. प्रत्येकाच्या कमरेला सातबारी, रिव्हॉल्व्हर होते. रिव्हॉल्व्हर लोढ केली. सांज झाल्यामुळे गुराखी पोरं गुरं हाकत बिगी बिगी गाव जवळ करत होती. त्या गुराख्यांच्या जनावरांच्या कळपाबरोबर यांचा दोघा दोघांचा गट चालला होता. गाव जवळ आल्यावर गुरं आपापल्या मालकांच्या घराकडे वळत होती. अंधार पडायला लागला होता. अंगणातल्या बाया बापड्या घरात दिवा लावायला व स्वयंपाक पाण्याकडे लागल्या. पुरुष मंडळी गोठ्यात आलेल्या जनावरांची बांधाबाधी करायच्या नादात होती. लहान मुलं अंगणात खेळण्यात दंग होती. जो तो आपापल्या कामात व्यस्त होता. पोलिस ठाण्यावर ही चौकडी आली. पोलिस ठाण्याच्या आसपास कोणच नव्हते. परिसर निर्मनुष्य होता. हे चौघे गावाला नवखे तसे गावच्या कुत्र्यांनाही नवखेच होते. गावंढळ कुत्री जोरजोराने अंगावर भुंकून जात होती.

चौकडी चावडी जवळच्या झेंड्याच्या खांबाजवळ आली. कुत्री भुंकायची थांबली आणि ती मागं फिरली. साध्या वेशातील एक पोलिस हवलदार उंबऱ्यावर अंधुक प्रकाशात तांदूळ निवडत बसला होता. "काय हवलदार साहेब,काय चाललय?" म्हणत क्रांतिवीर नागनाथ अण्णा आत खोलीत शिरले. पाठोपाठ जी.डी.बापू, शाम पाटील, ईश्वरा गुरव आउट पोष्टाच्या खोलीत शिरले. दुसरे दोन पोलिस हवलदार बाबालाल शेख व काशीम हवलदार स्वयंपाक करीत करीत पत्त्याच्या डावात रंगून

गेले होते. त्यांच्या लक्षात येण्यापूर्वीच चौकडीने बंदुकांना व काडतुसांच्या माळांना हात घातला. त्याच बरोबर पोलिसांचे कोट बुट, ड्रेस पट्टे गोळा करत होते. उंबऱ्यावर बसलेल्या कॉन्स्टेबल लक्ष्मण परीट यांच्या लक्षात आले की हा काही तरी वेगळा प्रकार आहे म्हणून त्याने कडीला हात घातला आणि कडी घालणार एवढ्यात नागनाथ अण्णांचे त्याच्याकडे लक्ष गेले. बसलेल्या ठिकाणी त्यांनी तेथूनच रिव्हॉल्व्हर मधून त्याच्या हाताचा बरोबर नेम धरून गोळी झाडली. ती त्याच्या हातावर बरोबर लागली. तो ठो-ठो बोंबलत बाहेर पळाला. बाकीचे दोघे हवलदार चुपचाप बसले. चौकडीना तीन बंदुका मिळाल्या. चौथी रायफल शोधूनही मिळेना पोलिसांनां धमकावून पाहिले पण ते ठप्प राहिले.



सांगाव पोलिस चौकीतून बंदुका पळवणारे क्रांतिवीर अण्णा व साथीदार

मिळालेली शस्त्रे, सामान घेऊन क्षणमात्रही वेळ न दवडता ठाण्याच्या बाहेर पडून ठरलेल्या पार्कातील रस्त्याने कूच करायला हवी, नाहीतर गावात बोभाटा होईल. पाच मिनिटांतच कामकाज संपवून क्रांतिकारी चार शिलेदारांनी पोबारा केला. पोलिस ठाण्याला वळसा घालून गावाबाहेर पडून न समजणाऱ्या बाजूने पार्कातील सोनारकोडीकडे पळत गेले. मधल्या वेळेत चौथी रायफल घेऊन कागलचा रनर (पोष्टमन) बरोबर गेलेला पोलिस रायफल घेऊन धावत आला. आउट पोष्टमध्ये

बंद केलेल्या आपल्या साथीदारांना आउटपोष्टच्या दाराची कडी काढून बाहेर काढले. झाला प्रकार त्या रनर कॉंस्टेबलच्या लक्षात आला. त्याने आपली एक बंदूक आणि पोलिस पाटलाची एक बंदूक बरोबर घेतली. आपले तीन पोलिस सहकारी व ५०-६० गाव कामगाराचे लोकांना मदतीला घेऊन रायफल व बंदुकीच्या बाराचा हवेत आवाज काढला. त्यांनी क्रांतिकारकांचा पाटलाग केला. प्रत्युत्तर म्हणून क्रांतिकारक चौकडीनेही आपल्या जवळच्या हत्यारातून हवेत गोळीबारीचे आवाज काढले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड (बापू), शाम पाटील व ईश्वरा गुरवांचेकडे असलेल्या गोळ्या मिलिटरी पॉवरच्या होत्या. त्या पोलिसांच्या गोळ्यांपेक्षा जास्त घातक आणि लांब पल्ल्याच्या होत्या. अंधार पडेपर्यंत सुमारे वीस मिनिटे ही चकमक चालू होती. क्रांतिकारकांनी अंधाराचा फायदा घेऊन पोलिसांना झुकांडी देत दोन पावले आक्रमकपणे पुढे जायचे, त्या बरोबर पोलिस व लोक दहा पावले मागे सरायचे. पोलिस क्रांतिकारकांच्यावर नेम धरून फायरिंग करायचे पण क्रांतिकारक लोकांना भीती वाटावी म्हणून त्यांच्या डोक्यावरून गोळी जाईल अशा पद्धतीने फायरिंग करत होते. त्यांना एकाही शेतकऱ्याचा जीव जाऊन बंदुका नको होत्या. लोकांना काय माहिती बंदुका पळवणारे देशभक्त क्रांतिकारक आहेत परंतु क्रांतिकारकांच्यात मात्र एवढी जाणीव होती. ही सामान्य जनता पोलिसांच्या भडकाव्याने आपल्या पाठीशी लागली आहे. म्हणून जाणून बुजून लोकांच्या डोक्यावरून गोळी जाईल असे क्रांतिकारक फायरिंग करत लोकांच्या डोक्यावरून गोळी सू-सू करत गेली की, पोलिसांची व लोकांची चापच्या चाप खाली पडायची. लोक उठे पर्यंत क्रांतिकारकांची चौकडी आपल्यातील व लोकांच्यातील अंतर वाढवत होती. असा लपाछपीचा दहा एक मिनिटे खेळ चालला होता. पोलिस आणि क्रांतिकारकांच्यात खूप अंतर पडायला लागले. थोडा फार जो अंधुक प्रकाश होता तो पूर्ण अंधाराने पोटात घेतला. अंधाराचा फायदा घेऊन क्रांतिकारक पोलिसांना झुकांडी देऊन जवळच्या उसाच्या फडात घुसले. सगळीकडे सारा अंधारच अंधार सर्वत्र दाटला. लोक गावाकडं जायला माघारी फिरले तसे पोलिसांचे धैर्य खचले. उसाच्या फडाकडे बघत बघत पोलिसही लोकांच्या मागोमाग आउट पोष्टाकडे आले.

उसाच्या फडातून चौकडी पुढे जाऊन ज्वारीच्या घनदाट ताटव्यात शिरली. काही अंतर चालून गेल्यावर एका मोठ्या झाडा खाली येऊन सर्वजण बसले. थोडावेळ थांबल्यावर परत पायपिटीला सुरुवात केली. सागर माळावरील उंच पठारावर आल्यानंतर त्यांनी एक वेळ चौफेर नजर टाकली. सर्वत्र अंतरा अंतरावर

दिव्यांचे पुंजके दिसत होते. रस्ता कळेना, रात्र थोडी निवळली होती. ठिक ठिकाणी अवकाशातील चांदण्याच्या व लुकलुक करणाऱ्या ताऱ्यांच्या अंधुक प्रकाशातून वाट काढत पुढे पुढे वाटेने जात होते, पण ती वाट भलतीकडे जात होती. रात्रभर चालतोय पण अजून कोल्हापूर का येईना? चौकडी गोंधळलेली होती. त्यांची दिशाभूल झाली होती. पुढे मेंढपाळ धनगारांच्या मेंढ्यांचा कळप दिसला. त्याला चुकऊन पुढे आल्यावर त्यांना एक लांबुडके घर दिसले.त्या घरातील दिव्याचा उजेडही दिसत होता, पण आजूबाजूला तर बिलकूल घरे नाहीत आणि या माळावर एकच घर कसे म्हणून नागनाथ अण्णांनी ईश्वरा गुरवाला कानोसा काढण्यासाठी पाठवले. ते ठिकाण म्हणजे एक देवालय होते. त्या देवालयात चार पाच धनगर चिलिमी ओढत बसले होते. इत्थंभूत माहिती काढून ईश्वरा गुरव परत आपल्या सहकाऱ्यांच्याकडे आला. त्यांना सर्व बैजवार माहिती सांगितली. शेवटी सर्वांनी विचार केला. रायफली शेजारच्या झुडपात लपवून ठेवल्या आणि चौकडी देवळात आली. त्या धनगरांना ते म्हणाले, ''आम्ही वाटसरू आहोत. थोडी विश्रांती इथे घेतली तर चालेल का?'' घ्या आमची काय हरकत नाही. धनगर लोकांची परवानगी घेऊन दाराच्या तोंडाशी चौघेही क्रांतिकारक सावधतेने कलंडले. त्यावेळी अंदाजे पहाटेचे तीन वाजले होते. सांगावातून निघाल्यापासून न थांबता चौकडी एक सारखी चालत भटकत होती. क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या या चौकडीला कसबे सांगाव तळंदगे मधील पार्कातील माळाने दिलेला हा चकवा होता. रात्रीच्या वेळी या माळावर अद्यापही अनेकांची दिशाभूल होते.

देवालयातील दाराशी लवंडलेली चौकडी सावध होती. देवळातील चार धनगरांच्यात कन्नड मधले चाललेलं संभाषण कान देऊन ऐकत होती. संभाषण कन्नडमध्ये चालले असले तरी मथितार्थ कळण्यासारखे होते. ते धनगर एकमेकांशी बोलत होते. रात्री कसबे सांगाववर दरोडा पडलाय, चार दरोडेखोरांनी पोलिसांच्याही बंदुका पळवल्या आहेत वगैरे वगैरे चर्चा चालू होती. ईश्वरा गुरवाने बिडी पेटवता पेटवता त्यांतील एका धनगराला विचारले, ''अजून सांगाव किती लांब आहे आणि हे देऊळ कोणत्या देवाचे?'' ''सांगाव?'' तो धनगर म्हणाला, ''इथून अजून तीन मैलावर आहे आणि हे देवस्थान सांगावच्या उत्तरेस असलेल्या तळंदगे गावचे जगन्नाथाचे मंदिर आहे'' ''अस होय! बरं बरं'' म्हणतच ईश्वरा गुरव उठला.

रात्रभर चालून अजून आपण कसबे सांगाव गावाजवळच आहोत, ही गोष्ट चौकडीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. झुडपात लपवलेल्या रायफली

घेतल्या. पुढे गेल्यावर गाव दिसायला लागले. त्या गावाला वळसा घालून छोटी टेकडी ओलांडून पलीकडे गेले. फटफटीत होता एका दाट जोंधळ्याच्या पिकात शिरून बसले. थोड्या वेळात दिवस वर आला. आशा परिस्थितीत दिवसा फिरणे धोक्याचे होते. सकाळी आठच्या सुमारास एक शेतकरी हातात खुरपे दोरी घेऊन निघालेला दिसला. क्रांतिकारी चौकडीपैकी क्रांतिवीर नागनाथ अण्णा त्या शेतकऱ्याच्या जवळ आले. त्याला विश्वासाने सर्व माहिती सांगितली. योगायोगाने तो शेतकरी स्वातंत्र्यप्रेमी निघाला आणि आपल्या नेहमीच्या बोलण्याच्या शैलीत त्याने क्रांतिकारकांना विश्वासाने सांगितले, ''तुम्ही निवांत असा. मी आपली सर्व व्यवस्था करतो.'' असे म्हणाला आणि तो शेतकरी जोंधळ्याच्या पिकातून बाहेर आला आणि आपल्या वस्तीवर गेला. भाकरी व दुधाची कासांडी घेऊन क्रांतिकारकांच्या जवळ आला. त्यांना जेऊ खाऊ घालून रात्री तुम्हांला वाट दाखवायला येतो म्हणून सांगून परत आपल्या वस्तीवर गेला. चारच्या सुमारला एकाएकी आकाशात काळे ढग जमायला सुरुवात झाली. विजा कडकडायला लागल्या. बघता बघता आभाळ काळ्याकुट्ट ढगांनी झाकले, विजांचा कडकडाट होऊन एकदम जोराचा पाऊस पडायला लागला. तडाडा लाह्या उडाल्यागत जोंधळ्यांच्या पानांचा आवाज व्हायला लागला. रानात सारं पाणीच पाणी होतं तरी देखील रात्रभर चाललेल्या स्वातंत्र्य सैनिकां पैकी शाम पाटील दगड उशाला घेऊन निवांत घोरत झोपला होता. त्यांच्या अंगाखालून पावसाचे पाणी वाह्याला लागले होते. शामची गडद झोप लागली होती. एक ते दीड तास पडणारा पाऊस थांबला होता. कसबे सांगावहून पळवलेल्या पोलिसांच्या साहित्यासह चौकडी भिजून ओली चिंब झाली होती. पळवलेल्या साहित्याचे आता त्यांना ओझे व्हायला लागले होते. मोकळे चालायचे म्हटले तर चिखलात पिंढरी पर्यंत पाय घुसत होते. पाय उचलून टाकायचा झाला म्हणजे पायातले चप्पल चिखलात अडकून राह्याचे आणि मोकळा पाय वर यायचा, अशा अवस्थेत वाटाड्या शेतकरी व त्याचा एक मित्र त्यांच्या पुढे चालले होते. त्यांच्या हातात बॅटऱ्या व काठ्या होत्या. बॅटरीच्या उजेडात अचूक वाटेने पुणे-बेंगलोर रोडवर या सर्वांना त्यांनी आणून सोडले. चौकडीने त्यांना प्रेमाने आलिंगन देऊन निरोप दिला. त्यावेळी बरीच रात्र झाली होती. वाटाडे परत फिरल्यावर रस्त्याने थोडे अंतर चालल्यावर चौकडी कोल्हापूरच्या दिशेने निघाली. त्यांच्या पायाखालचा नेहमीचा परिचित रस्ता होता. वाट भरभर ओसरत होती. अधेमधे येणाऱ्या वहानांच्या लाइटचा मात्र अडथळा व्हायचा. त्या दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू होते. लष्करी

गाड्यांचा एक ताफा रस्त्याने जात असलेले क्रांतिकारकांना जाणवले. लष्करी गाड्या एका मागून एक अशा जात असतात. याचा बरोबर अंदाज बघून रस्ता सोडून सागर माळाच्या एका खड्ड्यात लपून बसले. लष्कराची शेवटची गाडी गेल्या बरोबर दुडक्या चालीने शेतवाडी मार्गे ताराराणी समोरील घाटगे फौजदाराच्या मालती बंगल्यातील आपल्या खोलीत नागनाथ अण्णा आपल्या सहकाऱ्यांसह सुखरूप पोहचले आणि एकदाचा निश्वास सोडला.

फौजदार घाटगेंचा मालती बंगला म्हणजे सुरक्षित ठिकाण. बंगला फौजदारांचा होता आणि या बंगल्यावर पळवलेल्या बंदुका ठेवतील असा कोणालाही संशय न येणारे हे ठिकाण नागनाथ अण्णांनी जाणीवपूर्वक निवडले होते. दुसऱ्या दिवशी रविवारी ३/१०/१९४३ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारला मालती बंगल्यातून बंदुका बाहेर काढून त्या वाळवे गावी न्यायच्या होत्या. फौजदार घाटगे हे नानासाहेबांचे सख्खे चुलते होते. आणि नानासाहेब नागनाथ अण्णांचे मित्र होते. ते राष्ट्रीय विचारांचे होते. त्यांना निरोप दिला पण कांही कामा निमित्त ते कागलला गेले होते त्यांना क्रांतिवीर अण्णांचा निरोप मिळताच ते तातडीने कोल्हापूरला आले. दोघांची भेट झाल्यावर अण्णांनी त्यांच्या कानात हळूच सांगितले ''तुमच्या बातमी प्रमाणे आम्ही सांगावचे मिशन फत्ते केले.'' हे ऐकल्याबरोबर नानासाहेबांनी क्रांतिवीर नागनाथ अण्णांना प्रेमाने मिठी मारून आनंद व्यक्त केला. ती वेळ आनंद करण्याची नव्हती. रात्र वैऱ्याची होती. तरीही नानासाहेबांनी क्रांति अग्रणी जी.डी. लाड (बापू), शाम पाटील व ईश्वरा गुरव यांचेही यथोचित स्वागत केले.

कसबे सांगावच्या रायफली कोल्हापुरातून सहीसलामत बाहेर काढण्याची शेवटची मोहीम यशस्वी करण्यासाठी गुप्तपणे पाच जणांची बैठक झाली. या कामी फौजदार घाटगेंची गाडी वापरण्याचा धाडसी निर्णय नानासाहेब घाटग्यांनी घेतला. शाम पाटलांनी कोल्हापुरात थांबावयाचे त्यांनी पोलिसांच्या चाहुलीवर रहायचे, ईश्वरा गुरवांनी पुढे कामेरीत जाऊन थांबावयाचे व कामेरी ते वाळवा या रस्त्याच्या मार्गात काय अडथळा आहे काय? पोलिसांची चाहूल काय आहे? त्याची सर्व माहिती घेऊन ठेवावयाची आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णा व क्रांति अग्रणी जी.डी.लाड(बापू) यांनी नानासाहेबांच्या बरोबर मोटार गाडीतून यायचे, असे नियोजन केले. तिन्ही रायफली, काडतुसांचे पट्टे पोलिसी ड्रेस सर्व एका पोत्यात अलगद गुंडाळून पोत्याची वळकटी केली. नानासाहेबांनी गाडीच्या डिगीत रायफली ठेवल्या. चुलत्यांना कागलला जातो म्हणून सांगून आपल्या धाकट्या भावाला बरोबर घेतले. सर्वजण त्यांना

भैय्यासाहेब म्हणत होते. रात्री ९ वाजता गाडी तडक ताराराणी समोरून रस्त्याला लागली. ठरलेल्या सांकेतिक ठिकाणी हल्लीच्या शिवाजी विद्यापीठाच्या माळावर गाडी थांबली. क्रांतिवीर नागनाथ अण्णा व क्रांति अग्रणी जी.डी.लाड (बापू) गाडीत बसले. भैय्यासाहेबांना नानासाहेबांनी कामाची पूर्ण कल्पना अगोदरच दिली होती. नियोजनबद्ध पद्धतीप्रमाणे गाडी पुणे बेंगलोर रोडने धावत सुटली. ती तारीख होती रविवार ३/१०/१९४३ ची रात्र. बरोबर गाडी ठरल्यावेळी कामेरी वाळवा रोडवर येऊन थांबली. ईश्वरा गुरव अगोदरच तेथे येऊन थांबले होते. त्यांनी नागनाथ अण्णांना व जी.डी.बापूंना सांगितले की दुपारी व सायंकाळी इकडच्या भागात जोराचा वळीव पाऊस पडला आहे. जरी ओढ्याला उतारा मिळाला, तरी चिखलामुळे इथून पुढे गाडी चालणार नाही. रस्त्याच्या कडेला थोड्या अंतरावर अंधारात गाडी उभी केली. डिगीतील तीन रायफलच्या तीन वळकट्या, तीन क्रांतिकारी त्रिकूटाने खांद्यावर घेतल्या. नानासाहेब व भैय्यासाहेब या घाटगे बंधूंना परत जायला सांगून तिघेजण अंधाऱ्या रात्री चिखलातून, काट्याकुट्यातून मार्ग काढत हे निघेजण वाळव्याच्या वाटेने निघाले. रात्री १ वाजता नागनाथ अण्णांच्यासह ते त्रिकूट वाळव्याला आले. अण्णांच्या घरी जेवण खाणे आटोपले. कोल्हापुरात विशेष धोका नसल्याचे शाम पाटलांना मित्रांच्याकडून समजल्यामुळे ते कोल्हापूरला न थांबता वाळव्यास अण्णांचे घरी अगोदरच येऊन थांबले होते. पुढे ही चौकडी कृष्णा कोयना पार करून घोगाव मार्गे, रेल्वे लाईनच्या कडकडेने चालत रेल्वे फाटकाच्या पुढे बरेच चालत गेल्यावर रेल्वेलाईन क्रॉस करून क्रांतिसिंहाची राजधानी कुंडल येथे सुखरूप पोहचले.

# धुळे खजिना लूट

## (१४ एप्रिल १९४४ )

४२ च्या स्वातंत्र्याच्या संग्रामाला पुरती दोन वर्षे लोटत आली होती. चळवळीला आता चांगलच भरतं आल होत. खेड्यापाड्यांत घराघरांपर्यंत चळवळ पोहचली होती. जुलमी इंग्रजांची सत्ता खिळखिळी करण्यासाठी गोव्याहून पाहिजे तेवढी हत्यारे मिळतील म्हणून नागनाथ अण्णांनी कार्यकर्त्यांना सांगितले. गोव्याच्या हत्यारांची मोहीम त्यांनी नुकतीच यशस्वी केली होती आणि शेकडो हत्यारं गोव्याहून आणणं शक्य होते. पण हत्यारे खरेदी करण्यासाठी पैशाची गरज होती. या पैशाच्या शोधात क्रांतिकारी धडपडत होते. कोडोली पोष्टाची थैली व पे स्पेशल ट्रेन लुटीतून मिळालेली रक्कम तोकडी होती. त्यातून भूमिगतांचा थोडा फार खर्च भागला असला, तरी मोठ्या प्रमाणात हत्यारं खरेदी करण्या इतपत ती लूट पुरण्या एवढी नव्हती. 'प्रतिसरकारचा' वाढता जोर पाहून इंग्रज सत्ताधारी प्रतिसरकारला चिरडण्याचा प्रयत्न करत होते. स्वातंत्र्य संग्रामातील म्होरक्यांना पकडण्यासाठी हजारो रुपयांच्या बक्षिसांची लालूच दाखवत होते. ठिकठिकाणी त्यांनी लष्करी छावण्या बसवल्या होत्या. पोलिसांचा फौज फाटा वाढवला होता. अनेक युक्त्या करूनही नाना पाटील, नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड यांना आपण पकडू शकलो नाही याची गिलबर्ट सारख्या मोठ्या अधिकाऱ्याला सारखी खंत वाटत होती. भूमिगतांनी गिलबर्टला जेरीस आणले होते. साताराच्या स्वातंत्र्य संग्रामातील भूमिगतांना नामोहरम करण्यासाठी ब्रिटिश राजवटीने सातारा केंद्रबिंदू केला होता. क्रांतिवीर नागनाथ अण्णांना मात्र लष्करी पद्धतीची हत्यारे,

मशिनगन्स्, लांब पल्याच्या रायफली, पिस्तुले इत्यादींची इथून पुढच्या लढ्यासाठी अत्यंत आवश्यकता आहे याची जाणीव होत होती आणि त्यासाठी पैशाची निकड होती.

पे स्पेशल ट्रेन सारख्या लुटीने आणि ब्रिटिश सत्तेविरोधी केलेल्या विध्वंसक कामगिरीतून भूमिगतांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लागला होता. त्यांचे पाठीमागे लागलेल्या आग्या मोहळाला हुलकावणी देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेच्या स्वारीच्या वेळी जी नीती वापरली त्याच नीतीचा विचार करून क्रांतिवीर नागनाथ नायकवडी व क्रांतिअग्रणी जी.डी.लाड (बापू) यांनी साताऱ्यापासून खूप लांब अशा खानदेशामधील धुळे खजिना लुटण्याची धाडसी मोहीम आखली. खजिना कोठे व कसा लुटावा यासाठी आटपाडीच्या चरखा संघात व्यवस्थापक म्हणून पश्चिम खानदेशचे कापडणे गावचे धुडकू तानाजी ठाकरे काम पहात होते. त्यांच्याकडून या दोघा क्रांतिकारकांना प्रथम धुळे खजिन्याची बातमी लागली. कापडणे गावचे विष्णू सीताराम पाटील व शिरपूरचे शंकर पांडू माळी हे आटपाडीला ठाकरे यांच्याकडे आश्रयाला आले होते. या तिघांच्या मागे क्रांतिवीर नागनाथ अण्णा व क्रांति अग्रणी जी.डी.बापू या दोघांनी लकडा लावला आणि उत्तमराव पाटील वगैरे खानदेशी स्वातंत्र्य सैनिकांशी संधान बांधून दोघांच्या विचाराअंती खानदेशातच खजिना लुटण्याचा निर्णय घेतला. दोघांनी मिळून या अंतिम निर्णयाला क्रांतिसिंह नाना पाटलांची संमती घेतली.

खानदेशचा खजिना लुटण्यासाठी सातारच्या भूमिगतांच्या लहान लहान तुकड्या रवाना करायला सुरुवात झाली. मजल दर मजल करत भूमिगत मिळेल त्या वाहनाने, सोईच्या रस्त्याने खानदेश जवळ करत होते. त्या भूमिगतांमध्ये अग्रभागी नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, रघुनाथ रावळ, आप्पा पाटील, सावळा धनगर, दत्तू जाधव, ज्ञानू संतू जाधव, रावसाहेब कळके, बाळा जोशी, धोंडीराम माळी हे लोक होते. चार-दोन दिवसांच्या प्रवासानंतर एक दिवस ठरलेल्या ठिकाणी क्रांतिवीर नागनाथ अण्णा व जी.डी.बापू लाड यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक खानदेश मधील धुळ्यापासून चार एक मैलाच्या अंतरावरील वडजईला फकिरा आप्पा देवरे यांच्या गावी पोहचले. तिथून सातारच्या कार्यकर्त्यांचे ग्रुप तयार केले. एक ग्रुप वडजईच्या बंधाऱ्यावर, एक मुख्य ग्रुप बोरकुंड जवळच्या होरपळे गावच्या जंगलाच्या मळ्यात, काही फुले भवनात, तर कुणी आर.डी.गांधींकडे, अशा पद्धतीने सर्वांची राहण्याची सोय डॉ.उत्तमराव पाटील, बोरकुंडचे ओंकार बापू, वडजईचे फकिरा आप्पा देवरे, मोहाडीचे रामचंद्र पाटील, म्हसदीचे पाटील आणि कंपनी, माधवराव चिंतू देवरे

बोर्डीचे व्यकंटराव धोबी, शंकर माळी, विष्णू पाटील, खानदेशच्या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केली. वास्तव्यात भाकरी गोळा करण्याचे काम डॉ.उत्तमराव व यशवंतराव चिंतू देवरे करत होते. चळवळीत फकिरा आप्पा देवरे यांचे टोपण नाव 'नास्तिक बाबू' म्हणून पडले होते. सर्व सातारकर फकिरा आप्पा देव त्यांना टोपण नावानेच हाक मारत असत. फकिरा आप्पांचा भाऊ चंद्रकांत पोलिस खात्यात नोकरीला होता. त्याचा चुलतभाऊ दयाराम देवरे (पाटील) हा पोलिस खात्यात जमादार होता. तो धुळ्याच्या पोलिस लाईनमध्ये रहात होता आणि कुसुंब्याचे भाऊराव पाटील सी.आय.डी.खात्यात होते. हे सर्व स्वातंत्र्य सैनिकांना सामील होते, राष्ट्रप्रेमी होते. त्यांच्या सहकार्याने धुळ्याच्या साक्री कचेरीतला खजिना लुटण्याचा धाडशी बेत केला होता. सरहद्दीतील डोंगराळ भागात साक्री हे तालुक्याचे गाव होते.

त्यावेळी खजिन्यात दीड लाख रुपये जमा असल्याची पक्की खबर होती. माहिती काढण्यास यशवंतासह सातारचे भूमिगत गेले. त्यांना साक्रीच्या कारकुनाने कचेरीत भिडवले. सर्व इत्थंभूत माहिती मिळाल्यामुळे काम सुखकर झाले होते. कचेरीची पहाणी केल्यावर क्रांतिवीर नागनाथ अण्णा व जी.डी.लाड (बापू) व अन्य सातारच्या क्रांतिकारकांनी कार्यक्रम निश्चित फत्ते होणार असे खानदेशी सहकाऱ्यांना ठासून सांगितले. तिथे पोहचणे व खानदेशातून सुखरूप बाहेर पडण्याचा मर्ग निश्चित करा. पुढचे सर्व आम्ही पाहून घेऊ. बेत ठरला तो असा. सर्वांच्या पुढे कचेरीचा नकाशा ठेवला. प्रथम सोळा सतरा भूमिगतांना कचेरीत ठिक ठिकाणी पेरून ठेवावयाचे. त्यांपैकी चौघांनी संगीनधाऱ्या पोलिसांना अचानक झडपा घालून मिठ्या मारायच्या. त्या बरोबर इतर सहा जणांनी चपळाईने गार्डातल्या सर्व बंदुका हस्तगत करायच्या, रायफलचे हवेत बार काढत मुख्य कचेरीच्या तोंडावरची येणाऱ्या जाणाऱ्यांची रसद तोडायची आणि आतील सर्व लोकांच्यावर दहशत बसवत आपल्या साथीदारांना संरक्षण देत रहायचे आणि इतर भूमिगतांनी ट्रेझरी अव्वल कारकुनाचे फोन कनेक्शन तोडून त्याला जाम करून ट्रेझरीतला खजिना भरावयाचा. सारे अगदी घड्याळ्याप्रमाणे करून बंदुकांचे व हँडगनचे आवाज काढत गावाबाहेर डोंगराळ भागात पसार व्हायचे. खानदेशातील कोणत्याही गावाचा संबंध न येता रात्रीत नाशिक जिल्ह्यात जवळच्या घाटबारीने सातारा जेवढा जवळ करता येइल तेवढा करायचा. गरज पडली तर चाळीसगावच्या रामसिंग घोरपडे किंवा साक्रीपासून १५-२० मैलांवरील नाशिक हद्दीतील जातेगावच्या कार्यकर्त्यांची मदत घ्यायची होती. साक्री ते बोरकुंड पर्यंतच्या साऱ्या वाटा व मार्ग क्रांतिवीर नागनाथ अण्णा व जी.डी.(बापू)लाड यांनी डॉ.उत्तमराव पाटील व यशवंतला बरोबर घेऊन दोन दोनदा

फिरून परतीचा मार्गही निश्चित केला होता. त्या शिवाय रस्त्यातील डोंगरांच्या काठाकाठाने असलेल्या देऊर, म्हसदी कासारे, मालपूर, धाडणे, सामोडे इ.गावांतही क्रांतिकारकांनी भेटी दिल्या होत्या. निर्धास्त मनाने सर्व हालचाली करून साक्रीच्या कचेरीतल खजिना लुटण्याचा बेत पक्का झाला पण........

पण फकिरा आप्पा देवरेंनी नवीन बातमी आणली. धुळ्यावरून नंदूरबारला मोठा खजिना जातोय आणि तोही सर्व्हिस गाडीतून जाणार आहे. अशी पक्की खबर जमादर दयाराम देवरे पाटील यांच्याकडून लागली आहे त्याचा आपण पहिला विचार करावा असे मला वाटते. सर्व क्रांतिकारकांनी फकिराप्पा देवरे यांच्या म्हणण्या प्रमाणे धुळ्याचा खजिना लुटण्याचा ठरवले.

एप्रिल महिना उजाडला, खानदेश तापू लागला. खानदेशी उन्हाने वरून साताकर तापत होते आणि आतून खजिन्याच्या विचाराने क्रांतिकारक तापत होते. धुळे ते नंदूरबार मध्ये खजिना लुटीची जागा निश्चित करण्यासाठी डॉ.उत्तमराव पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, क्रांति अग्रणी जी.डी.लाड (बापू) यांच्या नेतृत्वाखाली भूमीगतांचे एक पथक निवडले व त्यांना सोबत घेऊन बारकाईने सर्व रस्त्यांची पाहणी केली. रस्त्यातील चढ उतार, वळसे, झाडा झुडुपांची गर्दी असलेला रस्त्यातील भाग, आदलेमधले जोड रस्ते, तिथली आसपासची भौगोलिक परिस्थिती, अशा चौबाजूने विचार करून दोन-दोनदा रस्त्याची पहाणी केली आणि धुळ्यापासून २१-२२ मैलांवर धुळे दौंडाईचे मार्गावर सोनगरीपासून ६-७ मैलावर असलेल्या डोंगर टेकड्या व दाट झाडीझुडुपे असलेल्या चिमटाने गावाच्या पलीकडे चार एक मैलावर जिथं रस्ता चढणीला लागतो त्याच्या अलीकडे चार एक फर्लांगावर सपाट असलेल्या रस्त्याच्या ठिकाणी गाडी आडवण्याचे ठरले. जर यदाकदाचित काय गडबड झाली आणि गाडी हातची सुटली, तरी चढणीमुळे गाडीचा वेग ड्रायव्हरला वाढवता येणार नाही आणि पाठीमागून पळत जाऊन गाडी गाठता यावी ही त्या पाठीमागची क्रांतिकारकांची हुशारी होती. खानदेशाचा उन्हाळा महाकठीण होता. सतत अंगातून घामाच्या धारा लागत होत्या. दिवसातून दोन-दोनदा अंघोळी केल्या तरी उन्हाळा जाणवतच होता. काही झाले तरी खानदेशी खजिना घेऊनच सातारला जायचे हा पक्का निर्धार साताररच्या क्रांतिकारकांनी मनोमन केला होता. खानदेशी लुटीचा खजिना यशस्वीरीत्या सातारला आणण्यासाठी कोणा कोणाची मदत घ्यावयाची याचे बरोबर नियोजन केले. या कामी डॉ.उत्तमराव पाटील, बोरकुंडचे ओंकार बापू दिवाण(पाटील), हरी खोबत्याचे केशव वाणी(मास्तर), नानासाहेब ढेरे, रामदास पाटील, ॲड.झेड.बी.पाटील, वामनराव पाटील, धुडकू तानाजी देवरे, व्यकंटराव रणधीर (धोबी),

फकिरा आप्पा देवरे (नास्तीक बाबू), आप्पासाहेब रणदिवे, रामचंद्र बाबर, माधवराव चिंतू देवरे, दयाराम देवरे पाटील (जमादार), चंद्रकांत देवरे पाटील (पोलिस अधिकारी), कुसुंब्याचे भाऊराव पाटील (सी.आय.डी.) इ.चे सहकार्य घेतले.

सातारचे दोन्ही नेते क्रांतिवीर नागनाथ नायकवडी व क्रांति अग्रणी जी.डी.लाड (बापू) दोघांनी बडजाईच्या बंधाऱ्यात मनसोक्त पोहून अंघोळी केल्या. तो पर्यंत वडजाईहून गोळा केलेल्या भाकरीची पाटी आणि डिचकीभर कालवण घेऊन खान्देशचे कार्यकर्ते आले होते. पांजर पोळच्या गाईच्या गोठ्या पलीकडच्या झाडाखाली बसून सर्वांनी यथेच्छ भोजन केले व गाईच्या गोठ्यात एका कोपऱ्यात मैफल बसली. हत्यारं घासून पुसून ठेवली. मुहूर्त धरायचा बाकी होता.डॉ.उत्तमराव पाटील म्हणाले ''आम्ही खानदेशी कार्यकर्ते इतके उबून गेलो आहोत की आता असेच साक्रीला चला पण आम्हाला आता या आर्थिक अडचणीतून सोडवा.'' असे अगदी काकुळतीला येऊन डॉ.उत्तमराव पाटलांचे सह सर्वजणांचे मत होते. पण सातारचे दोन्ही नेते खान्देशी कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, ''क्रांतिकारकांना स्वातंत्र्य संग्रामासाठी जास्ती पैशची गरज आहे आणि तो पैसा मिळवण्यासाठी कमीत कमी धोका पत्करला पाहिजे म्हणून खानदेशी नेत्यांनो, जरा आठ दिवस थांबा. आपण नंदूरबारकडे जाणाऱ्या खजिन्यचे काय होते ते पाहू. नाहीतर २१ एप्रिलला साक्रीच्या कचेरीवर चालून जाऊ व तिथला खजिना पूर्वीच्या नियोजित कार्यक्रमाप्रमाणे लुटू.'' दोघा नेत्यांच्या प्रस्तावाला सातारचा व खानदेशी भूमिगतांनी सर्वानुमते पाठिंबा दिला.

१३ एप्रिल. दुपारी बारा वाजता दयाराम देवरे, फकिरा आप्पा देवरे (नास्तिक बाबू) यांच्याकडे घाईघाईने आला आणि उद्या सकाळी आठ वाजता ५ लाख ५१ हजार रुपयांचा खजिना नंदूरबारला जाणार असलेल्या हुकमाचा कागद फकीरा आप्पा देवरे यांच्या हातात ठेवला आणि खजिन्याबरोबर दोन रिटायरला आलेले पोलिस व त्यांच्याबरोबर दोन बंदुका आहेत. एक कॅशियर-रामदास, हेड कॉन्स्टेबल सयाजी भिवा, कॉन्स्टेबल सदाशिव भास्कर ड्रायव्हर आहे. याची माहिती येऊन सांगितली व हुकमाच्या कागदाची प्रत दाखवली. खजिन्यात शंभर रुपयांच्या नोटा १ लाख, दहा रुपयांच्या २ लाख, पाच रुपयांच्या २ लाख, एक रुपयाच्या ५० हजार आणि चिल्लर एक हजार. पाच लाख पन्नास हजारांच्या नोटा व एक हजाराची चिल्लर असल्याचे त्या हुकमाच्या कागदावरून क्रांतिकारकांच्या लक्षात आले. ताबडतोब हालचालीला गती आली. ठिकठिकाणी असलेल्या सातारच्या क्रांतिकारकांना निरोप धाडले. वडजईच्या मळ्यातील क्रांतिकारक, भाई माधवराव रणदिवे यांच्या आंब्याच्या बागेतील क्रांतिकारक, मोतीराम

भाऊ यांच्या धुळ्याच्या फुले भवनातील (विद्यार्थी वसतिगृह) क्रांतिकारकांनी आपल्याबरोबर असलेल्या दारू गोळ्यासह रात्री दहा वाजेपर्यंत पांझरपोळ्यात यावे असे सर्वांना निरोप मिळाले. या कामी डॉ.उत्तमराव पाटलांना पाठवले व त्यांना वाहनाची व्यवस्था करण्यास सांगितले.

डॉ. उत्तमराव पाटलांनी आणलेल्या रामचंद्र बाबांच्या टांग्यात नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, धोंडीराम माळी व स्वतः डॉक्टर उत्तमराव पाटील बसले. बाकीचे क्रांतिकारक भल्या पहाटे १ वाजता ओंकार बापूंनी पाठवलेल्या मोठ्या बैलगाड्यात बसले. सर्वांना सूचना दिल्या. धुळ्यातील गोल चावडी पोलिस चौकीला चकवा देऊन भूमिगतांनी पांझरा नदीच्या पुलावर शेवटच्या टोकावर जमायचे. ती वेळ साडेतीन ते चारच्या सुमारची होती. टांगा व बैलगाड्या दामटवल्या. अचानक कानावर आवाज आला 'थांबवा.' ड्युटीवर असलेल्या पोलिसाचा तो आवाज होता. तोपर्यंत दूर पुलाजवळ गाड्या निघून गेल्या होत्या. भूमिगतांनी पाठीमागे वळून पाहिले. पोलिसाने पाठलाग करून गाड्या गाठेपर्यंत क्रांतिकारकांनी गाड्या सपाट्याने पांझरा नदीच्या पुलाच्या आत घातल्याही. क्रांतिकारकांचे पोलिस चौकीपासून शक्य तेवढ्या दूरवर गाड्या नेण्याचे धोरण यशस्वी झाले. पोलिस पुढच्या टांग्याच्या आडवा झाला आणि टांगा थांबला. टांग्याच्या पाठीमागून येणाऱ्या बैलगाड्याही थांबल्या. 'चला उतरा खाली' असे पोलिस दरडावून सांगत होता. 'कोण तुम्ही येवढ्या रात्री कुठे चाललात, गाड्यात काय आहे?' वगैरे विचारू लागला. पोलिसी खाक्यात दरडावू लागला. मामला गंभीर होत चालला. पटापटा उतरून आपआपले दारु गोळ्याचे सामान घेऊन निम्मे-अर्धे क्रांतिकारक पुलाखाली गेले. मग मात्र पोलिसांचा संशय बळावला. तो मदतीच्या इशाऱ्याची शिटी तोंडात घालणार, एवढ्यात नागनाथ अण्णांनी त्याच्यावर विजेच्या वेगाने झडप घातली आणि हिसडा देऊन शिटी हिसकावून घेतली. त्याची टोपी काढून घेतली. अनपेक्षित झालेल्या हल्ल्याने पोलिस भांबावला. एवढ्यात इतर भूमिगतांनी त्याला लाथा-बुक्क्यांनी बेजार केले. बाकीच्या क्रांतिकारकांना पळा म्हणाल्यावर ते वाट दिसेल तिकडे पळत सुटले. पोलिस शिटीसाठी व टोपीसाठी गयावया करत होता. सर्वजण पसार झाल्यावर शिटी चेपवून, चेंदा-मेंदा करून दिली. टोपी लांबवर फेकून दिली. नागनाथ अण्णा, जी.डी.बापू, धोंडीराम माळी, डॉ.उत्तमराव पाटील तेथून तातडीने निघून गेले आणि व्यकंटराव धोबी मात्र मेळातून वेगळे पडले. ते शेवटपर्यंत खजिना लुटीचे ठिकाणी वेळेवर पोहचू शकले नाहीत.

पांझरा नदीचा पूल ओलांडून ठरलेल्या सांकेतिक ठिकाणी १६ पैकी फक्त ८ क्रांतिकारक पोहचले. त्यांपैकी दोन खानदेशी व ६ सातारकर. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, धोंडीराम माळी, गोंदीचे किसन(मास्तर)पवार, आप्पा पाटील, रावसाहेब कळके, खानदेशी डॉ.उत्तमराव पाटील, शंकर भाऊ माळी (शिरपूर) पहाटेचे चार वाजत आले होते, अजून २०-२२ मैलांचे अंतर गाठावयाचे होते. इतरांची वाट बघणे म्हणजे आता मूर्खपणाचे होते. मागवलेली टॅक्सी आली नव्हती म्हणून टांग्यातून नागनाथ अण्णा, जी.डी.बापू,धोंडीराम माळी आणि खानदेशी शंकर भाऊ माळी यांना पुढे चिमठाण्याकडे रवाना केले. त्यांना सडक न सोडता जावा म्हणून सांगितले व डॉ.उत्तमराव पाटील टॅक्सीची वाट पहात पांझरा नदीच्या पुलापाशी थांबले. अर्धा एक तासातच शाळू शेट बड गुजर यांची टॅक्सी आली. त्या टॅक्सीत साताराचे आप्पा पाटील, धोंडीराम माळी, रावसाहेब कळके व खानदेशाचे डॉ.उत्तमराव पाटील बसले आणि चिमठाण्याच्या रस्त्याने टॅक्सी निघाली. वाटेत टांग्यातील सर्वांना टॅक्सीत घेतले. ड्रायव्हर हा चौकस असतोच. त्याने त्याच्या स्वभावाप्रमाणे चौकशी चालवलीच. सारे संभाषण खानदेशच्या अहिराणी भाषेत झाले.

''तुम्ही कुठले?'' ड्रायव्हर

''आम्ही मालगावचे. जातीने सोनार'' क्रांतिकारक.

''तुम्ही दोडाईच्याला कुठे निघालात?'' ड्रायव्हर.

''आहो, आमच्यावर आफत आली आहे. हे बघा आमचे नवरदेव'', देखण्या किसन मास्तरकडे बोट दाखवून डॉ.उत्तमराव पाटलांनी सांगितले, ''मागील वर्षीच याचे लग्न झाले मालपूर दोंडाईच्या नातेवाईक मुलीशी. एक हजाराचे मुलीच्या अंगावर दागिने घातले. शिवाय १००० रु. रोख दिले. लग्नानंतर मुलगी पाठवलीच नाही. दागिणेही गेले आणि मुलगीही म्हणून बेत केला आहे. दागिने गेले खड्ड्यात. मुलीला उचलून आणायचे हे ठरवूनच आम्ही निघालो आहोत.'' ''हं, म्हणूनच तुम्ही एवढी तगडी मंडळी निघाला, नाही का? तरी माझ्या मनात शंका आली होती की सारी पैलवान मंडळी निघाली कुठे आणि एवढ्या तातडीने. आता उलगडा झाला.'' ड्रायव्हने मन खुले केले. डॉ.उत्तमराव पाटलांनी ड्रायव्हरला सांगितले, ''आमच्या समाजाचा मोठा पुढारी सवाई मुकटीला रहातो. तो निरोपाप्रमाणे रहदारी बंगल्याजवळ मुकटी रस्त्यावर थांबला असेल तिथे तुम्ही टॅक्सी उभा करा.''

ही उत्तमरावांची टुंगच होती. पुढारी न आलेले कारण दाखवून 'ड्रायव्हर साहेब, आम्ही आता मुकटीला जातो, तुम्ही परत जा.' असे म्हणून ड्रायव्हरला त्याचे ठरलेले भाडे ३५ रु. शिवाय १० रु. ची नोट बक्षीस दिल्याने तो खूष झाला. तो म्हणाला, ''आजकालचे पुढारी म्हणजे खाऊ असतात. हा दुनियेचा न्याय आहे.'' रामराम करुन ड्रायव्हर गाडी घेऊन परत गेला.

चिमठाणे रहदारीच्या बंगल्याला वळसा घालून नदीच्या पात्रात सर्व आठ क्रांतिकारकांची बैठक सुरू झाली. बैठकीच्या विचाराअंती नागनाथ अण्णांनी व जी.डी.बापूंनी क्रांतिकारकांचे दोन ग्रुप तयार केले. स्वत: डॉ.उत्तमराव पाटील आणि सातारकर तिघे मिळून चार जणांच्या एका ग्रुपने खजिन्याच्या गाडीत बसून यायचे. खजिन्याच्या गाडीत रावसाहेब कळके,धोंडीराम बापू माळी, आप्पा पाटील व पुढे रस्त्यावर खजिन्याची गाडी आडवण्यासाठी नागनाथ नायकवडी, जी.डी.बापू, गोंदीचे किसन मास्तर, शंकर भाऊ माळी (शिरपूर) यांनी जायचे असे ठरले. खजिन्याची गाडी लांबवर दिसताच रस्त्यातील दोघांनी आपआपसांत भांडायचे व गाडी जवळ आल्याची खात्री करून रस्त्यावर असे पडायचे की जेणे करून गाडी थांबेल. दुसऱ्या दोघांनी गाडीत आपले लोक आहेत का नाहीत ते पहायचे व त्यांना खुणेने सांगायचे. गाडीच्या आडवे पडलेले लोक उठलेले पाहून खजिन्याच्या गाडीतील दोघांनी बंदुकांसह पोलिसांना मिठ्या मारायच्या व एकाने ड्रायव्हरला रोखायचे आणि एकाने दार उघडून खजिन्याच्या पेट्या गाडीतून बाहेर फेकायच्या. असे बैजवार ठरल्यानंतर खजिन्याच्या गाडीत बसण्यासाठी एक ग्रुप चिमठाण्याला गेला व दुसरा ग्रुप खजिना लुटीच्या ठिकाणी चिमठ्याण्याच्या रस्त्यावर निघाला. दोन्ही ग्रुप ठरल्या वेळेत आपआपल्या ठिकाणी पोहचले-ती तारीख होती १४ एप्रिल १९४४. खजिन्याच्या गाडीत पोलिसांच्या जवळ कोणत्या बंदुका आहेत याचा सुगावा अगोदरच लागल्यामुळे त्या बंदुकांना लागणाऱ्या गोळ्या क्रांतिकारकांनी आपल्या सोबत बऱ्याच ठेवल्या होत्या. शिवाय प्रत्येकाकडे सातबारी रिव्हॉल्व्हर व त्याला लागणारी भरपूर काडतुसे बरोबर ठेवली होती.

धुळ्यावरून ८ वाजता निघणारी खजिन्याची गाडी ९ वाजले १० वाजले तरी येईना, आता काय करावे म्हणून चिमठाण्याच्या स्टँडवर वाट बघत बसलेल्या क्रांतिकारकांची सारखी घालमेल होत होती. शेवटी एकदाची खजिन्याची गाडी आली. त्या गाडीचा नं.बीवायपी ४२२ होता. त्यात तीन क्रांतिकारक हुशारीने

पोलिसांच्या लगत गाडीत बसले होते. चौथे डॉ.उत्तमराव पाटील त्या गाडीत जागा नव्हती म्हणून उतरले. खजिन्याची गाडी आडवण्यासाठी रस्त्यावर क्रांतिकारक नागनाथ अण्णा व जी.डी.बापू हे दोघे लांबवर सर्व्हिस गाडी दिसली की आपआपसांत जोरात भांडायला सुरुवात करत गाडी आडवण्याच्या टप्प्यात आली की रस्त्यावर आडवे असे पडत की गाडी थांबलीच पाहिजे. गाडी थांबल्यावर आपली माणसं गाडीत आहेत का नाहीत याची बाजूला असलेल्या दोघांनी चाहूल घ्यायची. गाडीत आपली माणसे आहेत की नाही हे त्या दोघांनी खुणेने खुणवायचे. नाहीत म्हणून खुणवले की अण्णा-बापूंनी उठून बाजूला व्हायचे असे करता करता तीन एक सर्व्हिस गाड्या निघून गेल्या. चौथी गाडी दूरवर येताना क्रांतिविरांना दिसली. गाडी टप्यात आलेली बघून क्रांतिवीर नागनाथ अण्णा व जी.डी.बापूंनी आपआपसांत भांडायला सुरुवात केली. अगदी रक्तबंबाळ होईपर्यंत ठोश्याला ठोसे चालूच होते. गाडी जवळ आल्याचे लक्षात येताच पुढच्या दोन्ही चाकांच्या दोन्ही बाजूंला एक एक आडवे पडले. गाडी थांबली, आतील भूमिगतांनी जरा गडबड केली. गाडीच्या आडवे पडलेले आपले साथीदार गाडीच्या चाकापासून बाजूला झालेत का नाही? याची चाहूल घ्यायच्या अगोदरच पोलिसांना मिठ्या मारल्या. त्या बरोबर गाडीत गोंधळ झाला. गाडीचा ड्रायव्हर भारी हुशार होता. त्यांने गाडीतले लोक व गाडीच्या बाहेर आडवे पडलेले लोक एकच आहेत हे बरोबर ओळखले आणि रस्त्याला आडवे पडलेल्या लोकांच्या अंगावरून गाडी जावी इतपत गाडीला वेग दिला. रस्त्यावर आडवे पडलेले नागनाथ अण्णा, जी.डी.बापू चटकन उठून बसले म्हणून बचावले. तरीही गाडीचे टायर त्या दोघांच्या कानाला घासून गेले. गाडीत पोलिसांची आणि भूमिगतांची झटापट चालूच होती. इकडे गाडीचा वेग ड्रायव्हर वाढवत होता. पुढे एकदम रस्त्याला चढण असल्यामुळे ड्रायव्हरचा नाइलाज झाला होता. इतक्यात क्रांतिवीर नागनाथ अण्णा झटदिशी उठले वाऱ्याच्या वेगाने चढणीवर गाडी गाठली आणि एका झेपेतच ड्रायव्हरच्या साईडचा दरवाजा एका हाताने पकडला आणि त्याच वेळी पायट्यावर पाय ठेवून एका हाताने अगोदरच लोड केलेले रिव्हॉल्व्हर ड्रायव्हरवर रोखले. तरीही ड्रायव्हर गाडी थांबवेना म्हणून एक गोळी त्याच्या दंडावर झाडली, तरीही गाडी थांबेना. परत दुसरी गोळी दंडावर झाडली, तिसरी गोळी दंडावर झाडली तरी ड्रायव्हर गाडी थांबवेना. शेवटी 'तू आता मरशील गाडी थांबव' तरी ड्रायव्हर गाडी थांबवेना. शेवटी नाईलाजाने त्याच्या कानशिलवर चौथी गोळी झाडली. मग मात्र त्याने स्टेअरिंगवर मान टेकवली व दुसऱ्या हाताने गाडीची किल्ली फिरवली आणि गाडी थांबली. तो पर्यंत गाडीतल्या


झटापटीत एका पोलिसाला गोळी लागली. दुसऱ्या पोलिसाच्या झटापटीत धोंडीराम बापू माळी यांच्या रिव्हॉल्व्हर मधील गोळी आयर्न बार वर आपटून ती रावसाहेब कळके यांच्या अंगठ्यात रुतून बसली.



**धुळे खजिना गाडी आडवण्यासाठी भूमिगत देशभक्त-क्रांतिवीर अण्णा व जी.डी.(बापू)लाड भांडणाचा प्रसंग वटवताना**

गाडी थांबल्याबरोबर नागनाथ अण्णांनी लोकांना सांगून ड्रायव्हरला खाली उतवलं पाणी पाजा म्हणून सांगितले व खजिन्याच्या पेट्या रस्त्यावर घेतल्या. साऱ्या पेट्या  देवदार खोक्याच्या लोखंडी पट्टीने पॅक केलेल्या होत्या. क्रांतिकारक पेट्या उचलून रस्त्यावर आपटायला लागले. पेट्या आपटून फुटेनात. रावसाहेब कळके किर्लोस्कर कारखान्यात कामाला होते. त्यांना मशनरीची खोकी कशी फोडायची याचे चांगले ज्ञान होते. त्यांनी खजिन्याच्या गाडीतील टॉमीच्या साहाय्याने फटाफट पेट्या फोडल्या. क्रांतिकारकांनी अक्कल हुशारीने अगोदरच खाकी पँटवर धोतरे नेसली होती. ती फेडली व चार पदरी अंथरली क्रांतिकारक खजिन्यात गुरफटून गेल्याचे पाहून कॅशियरने अक्कल हुशारीने एका दहा बारा वर्षाच्या पोराला जवळच्या पोलीस

चौकीकडे धाडले. पोरगं पळाल्याचं पाहून एका क्रांतिकारकाने त्याच्यावर बंदूक रोखली आणि फायर करणार येवढ्यात क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे त्यांच्याकडे लक्ष गेले. त्यांनी ओरडून क्रांतिकारकाला दराडावून गोळी झाडू नका म्हणून सांगितले. त्यामुळे मुलाचे प्राण वाचले. पोलिस चौकी चार एक मैलावर होती. धोका वाढत होता. निम्म्या अर्ध्या पेट्या फोडण्यात यश आले होते. एवढ्यात डॉ.उत्तमराव पाटील ट्रक मधून खजिना लुटीच्या जागी पोहचले. त्यांनीही ट्रक मधील टॉमी घेऊन राहिलेल्या पेट्या फोडायला सुरुवात केली. सर्व पेट्या फुटल्यानंतर त्याचे चार भाग केले. आपल्या धोतराच्या चार पदरी घड्या केल्या होत्या, त्यावर नोटांचे बंडल ठेवून गाठोडी बांधली. ती गाठोडी पाठीला ढालीसारखी बांधून हातात रायफली घेतल्या. चार क्रांतिकारकांनी नोटांची चार गाठोडी उचलली. एक हजाराची चिल्लर लग्नाला निघालेल्या वऱ्हाडाला दिली आणि महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावांच्या घोषणा देत मुख्य रस्ता सोडला व डोंगराचा मधला रस्ता धरला. निघण्यापूर्वी बसच्या व ट्रकच्या टायरी भूमिगतांनी फोडल्या होत्या. तो दिवस होता १४ एप्रिल १९४४.



**धुळे खजिना लूट घेऊन जाताना**
**क्रांतिवीर अण्णा, जी.डी.बापू व साथीदार**

बरोबर १२ वाजले होते. मुख्य रस्ता सोडून क्रांतिवीर पाठीवर बोचकी बांधून दरी कपारीच्या पाय वाटेने निघाले. आनंद पोटात मावत नव्हता. वरून एप्रिलचा उन्हाचा कहर होता. पायातील चपला चढणीला घसरत होत्या. पाठीला बांधलेली नव्या कोर नोटांची बंडले खळखळत होती. क्रांतिकारक झाडाझुडपांतून डोंगर कपारीतून झपाझप पावले उचलत होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेची लूट रायगडावर सुखरूप पोहोचवली होती, त्या प्रमाणे आपण खानदेशी खजिना घेऊन तापलेल्या उन्हाच्या झळातून, ब्रिटिश सत्तेच्या तावडीतून सुखरूपणे साताऱ्याला पोहचवायचा या एकाच ध्येयाने क्रांतिकारक वाट मागे टाकून पुढचे पाऊल पुढे टाकत रानावनातून चालले होते. उन्हाचे चटके, तहानेने व्याकूळ झालेला जीव, पोटातील भुकेची आग या सर्वांवर मात करत ध्येयवेडे क्रांतिवीर कशाचीही तमा न करता मार्गक्रमण करत होते. एका ओढ्याच्या काटावर विहीर दिसली म्हणून सर्वांनी हातपाय धुतले, पोट भरून पाणी प्याले व पुढचा रस्ता चालू लागले. ओढा ओलांडून पुढे एका टेकडीची चढण चढून गेल्यावर त्या टेकडीवरून सहज म्हणून नागनाथ अण्णांनी चोहो बाजूला नजर फिरवली. त्यांना लांबवर चार एक पोलिस हातात रायफली घेऊन पळत आपल्या मागावर येतायत हे दिसले. ''बापू, घात झाला, आपल्याला पोलिसांनी गाठले आहे'' यातून निभावून जाण्यासाठी नागनाथ अण्णा जी.डी.बापूंना म्हणाले, ''बापू, आपण आपले दोन ग्रुप करू या! निम्मा खजिना घेऊन एका ग्रुपला बरोबर घेऊन तुम्ही पुढे जावा; तो पर्यंत मी पोलिसांना रोखतो.'' जी.डी.बापू म्हणाले, ''नाही, तुम्ही पुढे जावा. मी पोलिसांना रोखून धरतो.'' दोघांचे तू-मी सुरूच होते. पोलिस जवळ येऊन भिडायला लागले. पोलिसांनी फायरिंग करायला सुरुवात केली. पोलिस पाठलाग करत आहेत, क्रांतिवीर फायरिंग करत करत पुढे पळत आहेत आणि अण्णा-बापूंची चर्चा चालूच आहे. मागे राहणाऱ्याच्या जिवाला धोका आहे हे दोघेही चागले जाणून होते. दोघेही जिवाभावाचे मित्र एकमेकांना मागे ठेवून जायला तयार होईनात. शेवटी दोघांनी पाठीमागच्या ग्रुपमध्ये थांबण्याचे ठरवून चार जणांचा एक गट पुढे पाठवण्याचे ठरले. त्यात रावसाहेब कळके, आप्पा पाटील, गोंदीचे किसन मास्तर व माहितगार म्हणून शंकर माळी यांना सरळ दक्षिणेकडे नंतर धुळ्याच्या दिशेने मेहरगाव कुसुंबे सडक ओलांडून कसेही करून बोरकूड गाठायला सांगितले. सर्वजण डोंगराच्या कडेने झाडाझुडुपांतून दडत निघून गेले. निम्मा खजिना व निम्मे क्रांतिकारक सुखरुपपणे गेल्याच्या आनंदात जी.डी.बापू व नागनाथ अण्णांनी एकमेकांकडे पाहिले आणि खाच खळग्यांचा आधार घेऊन पोलिसांचा समाचार घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या बरोबर धोंडीराम

माळी व डॉ.उत्तमराव पाटील होतेच. तेही रिव्हॉल्व्हरच्या साहाय्याने पोलिसांच्या दिशेने फायरिंग करत पुढे पळत होते. रस्त्यात एखादे गाव लागले की गावाला बाहेरून वळसा घालून क्रांतिकारकांना जावे लागत होते. मात्र पोलिस गावातून लोकात त्यांच्या विरोधात भडकवून गावातील खाजगी बंदुकांसह गावकऱ्यांना घेऊन क्रांतिकारकांचा पाठलाग करायचे. पोलिस गावकऱ्यांना 'हे दरोडेखोर आहेत. यांनी लग्नाचे वऱ्हाड लुटले, बायका पोरांना मारहाण करून त्यांचे सर्व दागिने पळवले' वगैरे खोटे-नाटे सांगून त्यांची माथी भडकवण्याचे काम करत होते. त्यामुळे गावकरी चिडून जोशात क्रांतिकारकांचा पाठलाग करायचे व नेम धरून बंदूक चालवायचे. पण अण्णा-बापूंचा विचार वेगळाच होता. एखाद्या शेतकऱ्याचा मुडदा पाडून खजिना त्यांना नकोच होता. हे दोघे विचार करायचे या बिचाऱ्या गांवकऱ्यांना काय माहीत  आम्ही स्वातंत्र्य सैनिक आहोत आणि यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या गरजेपोटी ब्रिटिश सरकारचा खजिना लुटला आहे. यांची या शेतकरी बांधवाना काही कल्पना नाही हे समजून घेऊन क्रांतिकारक  गावकऱ्यांच्या डोक्यावरून गोळी जाईल अशा पद्धतीने रायफल चालवत होते. गावकरी जवळ येताच क्रांतिकारक बंदुकीचे बार काडायचे त्या बरोबर लोकाचे चापच्याचाप खाली जमिनीवर पडायचे, लोक सावरून पुन्हा पाठलाग करेपर्यंत क्रांतिवीर पुढे पळायचे, गावाची हद्द संपली की गावकरी परत फिरायचे. पुन्हा नवीन गाव लागला की तोच प्रकार व्हायचा. पोलिस आणि क्रांतिकारकांची लढाई ही सुरूच असायची. पुन्हा नवीन गाव लागला की गावकरी क्रांतिकारकांच्या पाठीशी जोशात लागायचे. नेम धरून क्रांतिकारकांच्यावर फायरिंग करायचे. क्रांतिकारक मात्र गावकऱ्यांना भीती वाटली पाहिजे अशा पद्धतीने फायरिंग करत एक सारखे दगड धोंड्यातून, ओढ्या नाल्यातून, झाडा झुडपांतून पळत होते. चार गावच्या लोकांपासून क्रांतिकारकांना त्रास झाला. पोलिसांनी गावकऱ्यांच्या बंदुकांचा वापर करून आपले राउंड जपून ठेवले. आणि क्रांतिकारकांचे राउंड संपले असावेत असा पोलिसांनी अंदाज केला असावा. ही गोष्ट क्रांतिकारकांच्या लक्षात आली. नागनाथ अण्णा व जी.डी.बापूंना माहिती होतं आपल्याकडे रायफलचे राउंड कमी आहेत. पण रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या भरपूर आहेत. शेवटी एक छोटस गाव लागल, त्या गावाला वळसा देऊन क्रांतिकारक गावा बाहेरून पळत होते. गाव सारा मागे लागला होता. क्रांतिकारकांनी बचावासाठी डोंगराचा आधार घेतला. डोंगराच्या झाडा झुडुपांच्या आडोशात लोकांच्यावर व पोलिसांच्यावर नजर ठेवून एका खड्यात बसले. ठरावीक अंतरापर्यंत गावकरी आले आणि जिवाच्या भीतीने मागे गेले. पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांना वाटले क्रांतिकारकांच्याकडून फायरिंग

होत नाही त्या अर्थी त्यांच्या जवळचा दारू गोळा संपला. पोलिस टप्प्यात आल्याबरोबर क्रांतिकारकांनी फायरिंगला सुरुवात केली. एक रायफल मधील गोळी झाडायची, रायफल पोलिसांना दिसेल अशा पद्धतीने रोखायची आणि खड्ड्यात आतल्या आत रिव्हॉल्व्हरच्या गोळीचे चार फायरिंगचे आवाज काढावयाचे. पोलिसांना क्रांतिकारकांनी आपल्या दारू गोळ्याचा अंदाज लागू दिला नाही. क्रांतिकारक डोंगर माथ्यावर होते त्यांच्या पाठीवर मावळतीचा सूर्य होता, आणि पोलिसांच्या डोळ्यावर सूर्यकिरण पडत होते. पोलिसांना क्रांतिकारकांचा काही अंदाज लागत नव्हता. तरी त्यातून पोलिस गोळीबार करत होते. क्रांतिकारक एक खड्डा पुढे सोडत मागच्या खड्ड्यात उडी घेत पळत होते. त्याच वेळी अचानक पोलिसाची एक गोळी सू-सू-सू करत आली आणि जी.डी.बापूंच्या पिंढरीतून आर-पार झाली. ते एकदम ओरडले, ''नागनाथ!'' अण्णांच्या काळजात धस्स झाले. अंगावर काटा उभा राहिला. आपल्या मित्रावर काय प्रसंग आला, म्हणून खड्ड्यातून मान वर काढून बघतायत तोपर्यंत पोलिसांची दुसरी गोळी सू-सू करत आली, ती बरोबर त्यांच्या खांद्याला येऊन लागली. काळ आला होता पण वेळ आली नव्हती. गोळीचा रेंज संपला होता. त्यामुळे ती थंड होऊन आली होती, नुसती खांद्याला थटली आणि समोरच खाली पडली. गोळी लागलेल्या ठिकाणी चार जोंधळ्या एवढे रक्ताचे थेंब आले आणि तेथेच सोकले. परंतु गोळी लागलेल्या ठिकाणचा भाग मात्र लहान चेंडू एवढा फर-फर फुगला. एवढं सगळं रामायण घडेपर्यंत सूर्य निम्मा अर्धा डोंगराने गिळला होता. पोलिसही दिवसभराच्या धावपळीतून कंटाळले असावेत. रात्र ही स्वातंत्र्यसैनिकांची चलती. या लढाईत आपला निभाव लागणार नाही हे पूर्ण ओळखून चारीही पोलीस एकदम उभे राहिले. पाठीला बंदुका अडकवल्या, आणि एका पाठोपाट एक परतीच्या वाटेने माघारी फिरले. दूरवर त्यांच्या पाठमोऱ्या दिसणाऱ्या आकृत्या डोळ्यांना दिसेनाशा झाल्यावर क्रांतिकारक खड्ड्यातून बाहेर आले. धोंडीराम माळ्यांनी आपली विजार फाडून बापूंची जखम बांधली. बापूंना इथून पुढे चालणे शक्य नव्हते. तरीही क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या खांद्याचा आधार घेत बापू हळू हळू चालत होते. पोलिसांचे दिवसाचे राज्य संपून क्रांतिकारकांचे अंधाराचे साम्राज्य सुरू झाले होते. बापूंचा पाय जास्तच ठणकत होता. त्यांना घोटभर पाण्याची गरज होती, हे त्यांच्या आवाजावरून कळत होते. पण नाईलाज होता. अंधाराच्या काळ्याकुट्ट साम्राज्यात पानंद रस्त्याने ते पुढे पुढे निघाले होते. रस्त्यात डोंगरवाडी भिल्लांची वस्ती लागली. एका भिल्लाच्या खोपटात थोडी विश्रांती घेतली. थोडंस खाल्यावर सर्वजण पोटभर पाणी प्याले. नागनाथ अण्णांनी

एका तरुण तगड्या भिल्लाला दोन हजार रुपये दिले व बापूंना खांद्यावर घ्यायला सांगितले. रात्रभर तो भिल्ल बापूंना खांद्यावर घेऊन क्रांतिकारकांच्या बरोबर चालत होता. दिशा ओळखू येत नव्हत्या. उशिरा का होईना चंद्र उगवला होता. त्याच्या प्रकाशात निदान क्रांतिकारकांना दिशा कळल्या. एक मोठा ओढा ओलांडल्यावर कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला. गाव जवळ आल्याची चाहूल मिळाली. उजाडता-उजाडता ते सर्वजण गावाजवळ आले. ते गाव होते हाटीखोबरे. आता जावे कुठे? कसलाच आधार नव्हता. नागनाथ अण्णांनी गावातील एका शाळा मास्तराला गाठले. त्यांना विश्वासाने सांगितले 'काल खजिना जो लुटला तो आम्हीच, आम्ही सातारचे क्रांतिकारक आहोत, आमचा एक साथीदार पोलिसांच्या गोळीने जखमी झालाय तेव्हा एका दिवसाचा आसरा द्या' त्यावर मास्तर म्हणाले, ''इथतर सारखा पोलिसांचा राबता आहे. इथं तुम्ही थांबणे जास्त धोक्याचे आहे.'' नागनाथ अण्णा म्हणाले, ''ठीक आहे, निदान एखादा भाड्याचा टांगा बघून आम्हांला द्या'' मास्तरांनी चांगला तगडा टांगा बघून दिला. त्या मास्तरांचे नाव केशव वाणी. त्यांच्याकडून नोटा ठेवण्यासाठी त्यांच्या घरातील मोकळ्या दोन गोण्या मागून घेतल्या. त्या चांगल्या सुताच्या होत्या. टांग्याच्या बसण्याच्या गादीखाली नोटांची पोती ठेवली आणि हे चार क्रांतिकारक टांग्यात बसले. माणसाच्या डोक्या एवढे उंच घोडे असलेला मजबूत टांगा, त्याला साजेसा धिप्पाड लालबुंद, उंचापुरा मोठ्या मिशांचा, खानदेशी पागोट्यावर उपरणे गुंडाळलेला रुबाबदार पाटील टांगा हाकत होता.

हाटी खोबरे गावावरून टांगा देऊरला डॉ.उत्तमराव पाटलांच्या मामांच्या गावी निघाला. देऊरला जायला दोन फाटे होते. एक नेर वरून व दुसरा आक्कलपाड्याहून जरा लांबचा मार्ग होता. नेरला पोलिस पार्टीचा धोका होता म्हणून टांगा अक्कलपाड्याच्या रस्त्याला वळवला. थोडे अंतर टांगा चालून गेल्यावर समोरून दहाबारा पोलिसांची पार्टी खांद्याला संगिनीसह बंदुका अडकवलेले येताना दिसली. टांगा मागे फिरवला तर त्यांना संशय येणार. काय करावे? पंचायत. समोर फर्लांगभर अंतरावर पोलिस आले होते. टांगेवाल्याला नागनाथा अण्णांनी आता काहीही गडबड न करता टांगा पुढे दामटायला सांगितला आणि टांग्यात कोणतर टारगट पोरे आहेत या उद्देशान पोलीस जवळ येताच 'हुईई....' असे केले व टांगा पुढे दामटला. पोलिस रात्रभराच्या शोधामुळे कंटाळले होते. टांगा जवळ आल्यावर निम्मे पोलीस एका बाजूला व निम्मे दुसऱ्या बाजूला झाले आणि मधून सरळ टांग्याला रस्ता देऊन ते पुढे हाटीखोबरे गावाकडे गेले. क्रांतिकारकांचा टांगा सरळ पोलिसांच्या दोन रांगांतून पुढे सरकला. पोलिसांनी टांग्याकडे बिलकूल लक्ष दिले

नाही. टांगा सहीसलामत देऊरच्या कॅप्टन विश्वासराव देवळे या डॉ.उत्तमराव पाटलांच्या मामांच्या मागील दाराजवळ पोहचला. खजिन्या सह सर्व क्रांतिकारक घरात गेले व टांग्याचे भाडे देऊन टांगा परत पाठवला. जी.डी.बापूंच्या पायाची जखम सोडली, कडूलिंबाच्या कोमट पाण्याने जखम धुतली. पाय तसा रात्रभराच्या प्रवासाने संतापला होता, दुखत होता; पण धुळे खजिना लुटीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मलम लाऊन स्वच्छ फडक्याने परत जखम बांधली व पायाला शेक देणे सुरू ठेवले. थोड्याशा विश्रांतीने जी.डी.बापूंना थोडासा आराम वाटायला लागला. अण्णांच्या खाद्याला लागलेल्या गोळीमुळे आलेली सूज तशी बऱ्यापैकी ओसरली होती.

देऊर मध्ये कॅप्टनच्या घरी सर्व क्रांतिकारक सुखारूपपणे विश्रांती घेत होते. घरात स्वंयंपाकाची तयारीही चाललेली होती. इतक्यात डॉ.उत्तमराव पाटलांचा मामे भाऊ रामदास घाई-घाईने आला व घाबऱ्या-घाबऱ्या म्हणाला, ''नेरचे फौजदार पार्टीसह चावडीवर आलेत. ते म्हणतायत साडेपाच लाखांचा सरकारी खजिना चिमठाण्याला लुटला गेला. तगडे जाडजूड खाकी चड्ड्या घातलेले असे लोक होते. असे लोक दिसले तर त्यांना पकडून ठेवा. त्या लुटीची ताबडतोब वर्दी दिल्यास मोठ्यातले मोठे इनाम सरकार देईल, म्हणून सांगत आहेत. चहा आणतो म्हणून त्यांना सांगून तुम्हाला निरोप द्यायला आलोय'' एका दमात त्यांने क्रांतिकारकांना सांगितले.

डॉ.उत्तमरावांनी आपल्या नानासाहेब या मामे भावाला बोलावले व त्याला सांगितले, ''फौजदारसाहेब व त्यांच्या सोबतच्या पोलिसांची उत्तम व्यवस्था ठेवा. चार दोन कोंबड्या कापा, दारुच्या बाटल्या. अगदी तेज माल आणा, पाहुणचार चांगला करा. पडूदे भडव्यांना दारूच्या नशेत.'' नानासाहेब, रामदास सह सर्व क्रांतिकारक खळखळून हसले.

योगायोगाने त्याच दिवशी नानासाहेबांच्या लग्नाचा साखरपुडा होता म्हणून मुलीचे काका सीताराम गोविंद पाटील यांना पश्चिम खानदेशचा मोठा भाऊ म्हणून सर्वजन ओळखत होते हे पश्चिम खानदेशचे मोठे नेते हजर होते. तसेच त्या साखर पुड्याला डॉ. उत्तमराव पाटलांचे मेव्हणे झेड.बी.पाटीलही आले होते. तिकडे चावडीत फौजदार आणि पोलिस पार्टीची कोंबडी, अंडी, दारूची पार्टी झोडत होती. इकडे साखरपुड्याची पुरणपोळी, आमरसाची खानदेशी पंगत उठत होती. जेवणानंतर निरनिराळ्या घरांत क्रांतिकारक मंडळी विभागली.

पहाटे चारच्या सुमारास सावंत फौजदार गावकऱ्यांना सूचना देऊन पार्टीसह नेरला गेले. ही खबर मिळाल्यावर सर्व नोटांची पोती एका चांगल्या टांग्यात घालून

सर्व क्रांतिकारक बोरकुंडला ओंकार बापूंच्याकडे सुखरूप पोहचले. तिथे रावसाहेब कळके, शंकर पाटील व व्यंकटराव धोबी ठरल्याप्रमाणे येऊन पाठीमागून येणाऱ्या नागनाथ अण्णा, जी.डी.बापू, धोंडीराम माळी, डॉ.उत्तमराव पाटील या क्रांतिकारकांची वाट पहात थांबले होते. नागनाथ अण्णांनी व जी.डी.बापूंनी त्यांना विचारले, ''आप्पा पाटील, किसन मास्तर कुठायत?'' ते दोघे मुंबईला निघून गेले. अण्णांनी रावसाहेबांना परत विचारले, ''ते अचानक का निघून गेले? आणि पैशाच्या गाठोड्याचे काय?'' त्यावर रावसाहेब कळकेनी जी सविस्तर माहिती सांगितली ती अशी 'आम्ही मजल दर मजल करत चालत पळत बोरकुंड जवळ करत होतो. मेहर गावाजवळ यायला आम्हांला पहाट झाली होती. काही गावकरी रानात प्रातर्विधीला निघाले होते. त्यांनी आम्हाला पाहिले दरोडेखोर-दरोडेखोर आलेत म्हणून त्या लोकांनी आमचा पाठलाग केला. त्या दोघांनी पळता पळता साक्री धुळे रस्त्याच्या 'मैल दगडा' जवळ एक झाड आहे, त्या झाडा जवळच्या टेकडीच्या वळणावर नांगरलेल्या नांगरटीत त्यांनी नोटा मातीआड केल्या, कशीतरी धोतरं अंगा भोवती गुंडाळली, एक-दोन नोटांची पुडकी सोबत घेतली आणि मुंबईला जातो म्हणून दोघेजण निघून गेले.'

नेहर गावाच्या हद्दीत नांगरटीत टाकलेला खजिना शोधन्यासाठी क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी रावसाहेब कळकेना सोबत बोरकुंड मध्ये ठेवून घेतले. जी. डी. बापू, डॉ.उत्तमराव पाटील, धोंडीराम माळी, शंकर माळी या चौघांना यांच्या सोबतचा खजिना घेऊन दोन टांग्यातून डॉ.उत्तमराव पाटलांच्या नासिक जिल्ह्यातील नादगाव तालुक्यातील साकोरी गावी जाऊन थांबण्यास सांगितले मी आणि रावसाहेब नांगरटीत दडवलेला खजिना घेऊन दोन एक दिवसात साकोरी गावी येतो असे सांगून त्या चौघांना पुढे पाठवले.

ओंकार बापूंनी एक छोटी तट्ट्या असलेली पडद्याची बैलगाडी व मेहरगावची जवळची नातेवाईक असलेली एक स्त्री,तिची मुलगी आणि यशवंत नावाचा त्यांचा सहकारी नागनाथ अण्णा व रावसाहेब कळके यांच्या सोबत दिला. ते सर्वजण अंधार पडायच्या सुमारास मेहर गावात नातेवाईकांच्याकडे पोहचले. त्या गावातील लोकांनी शंकेने दरोडेखोर म्हणून क्रांतिकारकांचा पाठलाग केल्यामुळे मेहर गावात अजून पोलिस पार्टीचा तळ होताच. नागनाथ अण्णांनी घर मालकाला विश्वासात घेऊन सर्व कल्पना दिली. रात्री जेवण झाल्यावर कुदळ, फावडे घेऊन भल्या पहाटे यशवंतला व रावसाहेब कळक्यांना बरोबर घऊन नागनाथ अण्णा त्या जागेवर पोहोचले. मिळतील तेवढ्या नोटा घेऊन, चांदणं पडायच्या आत घरात सुखरूप पोहचले. त्याच प्रमाणे दुसऱ्या दिवशीही कार्यक्रम केला. दोन दिवसांच्या शोधात

त्यांना पहिल्या दिवशी एक लाख रुपये मिळाले आणि दुसऱ्या दिवशी ८० ते ९० हजार मिळाले. ही सर्व रक्कम घेऊन तिसऱ्या दिवशी भल्या पहाटे मेहरगाव सोडले व परत बोरकुंडला ओंकारराव पाटलांचे घरी आले. (पुरलेल्या नोटां पैकी काही नोटा पेरणी वेळी मालकाला सापडल्या असे पुढे कळाले.)

सकाळी ओंकार बापूंनी भली मोठी बैलगाडी दिली. त्या बैलगाडीत खाली खरबुजे त्यावर खजिना वर टरबुजे घातली. आणि क्रांतिवीर अण्णा, रावसाहेब कळके, व गाडीवान असे तिघे गाडीत बसले गाडी सरळ नांदगावला निघाली. नांदगावात पोलिसांनी गाडी आडवली. ''गाडीत काय आहे?'' नागनाथ अण्णा म्हणाले, ''गाडीत खरबुजे, टरबुजे आहेत.'' ''गाडी खाली करुन आम्हांला दाखवा'' पोलिसांनी हट्ट धरला. ''गाडीत तुम्हांला काय आहे ते दिसते आहेच. तरी आपली इच्छा असेल तर, गाडी उपसून दाखवतो; पण ही गाडी साकौऱ्याच्या वामन आप्पांची आहे.'' साखरेची पोती मध्ये आहेत गाडी उपसण्याचे नाटक करायला क्रांतिवीर नागनाथ अण्णा गाडीवर उभा राहिले. पोलिस म्हणाला, ''काय? साकोऱ्याच्या आप्पांची गाडी आहे? असे आम्हांला आधिच का नाही सांगितले. जाऊ द्या गाडी. आप्पांना आमचा राम राम सांगा'' यावर ते दोघे खळखळून हसले. बैलगाडी पुढे दामटली. ती उत्तमराव पाटलांच्या सासरवाडीच्या मार्गाने निघाली.

डॉ.उत्तमरावांच्या सासरवाडीत साकोरा या गावात डॉ.उत्तमराव पाटील, जी.डी.(बापू) लाड, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, धोंडीराम बापू माळी, रावसाहेब कळके, शंकर पांडू माळी, व्यंकटराव धोबी हे क्रांतिकारक एकत्र जमले. सर्व खजिन्याचा मेळ घेऊन मोजदाद घेतली. खजिना ५ लाख रुपये भरला. गाडीवानांना दिलेली एक हजाराची चिल्लर, शिवाय रस्त्यात ठिकठिकाणी कमी झालेली नोटांची बंडले ती एकूण पन्नास एक हजाराची होती. सर्वजन एकत्रित असताना ही नोटांची पुडकी मोजून लहान लहान सिमेंटच्या गोणीत भरली. खानदेशच्या चळवळीसाठी डॉ.उत्तमराव पाटलांच्याकडे एक लाख रुपये दिले. गादी फाडून कापसाच्या खालवर एक लाख रुपये घालून गादी होती तशी शिवली व ते एक लाख रुपये श्री.अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे पोहोच केले. बाकी रक्कम सातारच्या चळवळीसाठी साताऱ्याकडे सुखरूप आणण्याची जबाबदारी नागनाथ अण्णा व जी.डी.बापूंच्यावर सोपवली होती. सातारच्या वाट्याला आलेला खजिना सिमेंटच्या लहान लहान गोणीत भरला. तो खजिना साकोऱ्याहून नांदगावला नेण्यासाठी क्रांतिकारक रस्त्याच्या कडेला वहानाची वाट पहात होते. एवढ्यात लष्कराची एक गाडी आलेली दिसली. नागनाथ अण्णांनी त्या गाडीला हात करून थांबवली. ड्रायव्हरला विनंती करून 'नांदगावला आम्हांला सोडा' म्हणून सांगितले. अशा पद्धतीने मिलिटरी गाडीतून

धुळ्याचा खजिना सुखरूपपणे नाशिक जवळील म्हसरुळ येथील गजपंथ येथे गुरुकुल आश्रमात आणला. तेथे शांतिकुमार गुरुजी आश्रम प्रमुख नागनाथ अण्णांच्या चांगल्या ओळखीचे होते. तिथे आठ दिवस क्रांतिकारकांनी मुक्काम केला. रावसाहेब कळके व जी.डी.लाड बापूंना सातारला दवाखान्यात पाठवले. गुरुकुल मधून खजिना सुखरूप सातारला पोहचवणे गरजेचे होते. धोंडीराम माळी (बापू) यांना ऐतवडे येथे राजमती बिरनाळे ताईंना आणण्यासाठी पाठवले. दोन-तीन दिवसांत राजूताई पाटील यांना घेऊन धोंडीराम बापू गजपंथ गुरुकुल आश्रमात परत आले. आश्रमात ताई आल्यानंतर त्यांच्या मदतीने तो धुळे खजिना नाशिककडून येणारा जवळचा रस्ता म्हणून दांडेली मार्गे रेल्वेने व पायवाटेने सातारकडे सहिसलामत पोहचला.

या लुटीतील पैशाचा हिशेब मात्र वेगवेगळ्या क्रांतिकारकांनी वेगवेगळा सांगितला आहे. पण राजमती पाटील (ताई) यांच्या हिशोबाप्रमाणे यातील १ लाख रुपये डॉ.उत्तमराव पाटील यांना खानदेश चळवळीसाठी, १ लाख रुपये अच्युतराव पटवर्धन यांचेकडे, १ लाख ४० हजार रुपये जी.डी.लाड (बापू) यांना कुंडल ग्रुपसाठी व १ लाख ६० हजार क्रांतिवीर नागनाथ नायकवडी वाळवा ग्रुपसाठी देण्यात आले. नागनाथ नायकवडी यांच्याकडे आलेल्या धुळे खजिना काशीनाथ कृष्णा नायकवडी (वाळवा) व राजमती पाटील यांचेकडे ठेवला होता व नागनाथ अण्णांचे मार्गदर्शनाखाली राजू ताईंच्या हस्ते स्वातंत्र्य चळवळीसाठी तो खर्च केला.

राजू ताईंनी एक वेळ जाहिरपणे सांगितले, ''नागनाथनी व मी हा पैसा फौज उभी करण्यासाठी खर्च केला. आमच्या फौजेत वीस तीस स्त्रिया व सुमारे पाचशे पुरुष होते. शिक्षणासाठी आझाद हिंद सेनेतील नानकसिंग व मन्सासिंग हे दोघे होते. धुळे खजिन्यातील पैसा केवळ स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी खर्च केला. प्रपंच्यासाठी पाच पैसेही खर्च केले नाहीत आणि हे सातारच्या सर्व भूमिगतांना माहीत आहे.''
(धुळे खजिना लूटीचा प्रसंग सांगताना अण्णा म्हणाले,''अरे जया! धुळे खजिन्याची नोटांची पोती मी माझ्या खांद्यावरून आणली. त्यातले दहा रुपये मी घेतले नाहीत त्याहीपेक्षा त्यातील १० रुपये घ्यावेत हे माझ्या मनात सुध्दा आले नाही हे महत्त्वाचे.'')

पुढे धुळ्याच्या सेशन कोर्टात व्यंकटराव धोबी, शंकर माळी, धोंडीराम माळी, किसन पवार, आप्पा पाटील, विष्णूभाऊ पाटील, शिवाजी सावंत अशा सात जणांवर धुळे खजिन्याच्या लुटीची केस चालली. बॅरिस्टर केनरफ् नरीमन, बॅरिस्टर मोरे, बॅरिस्टर जपे या ख्यातनाम वकिलांनी बचावाचे काम केले. अखेर धोंडीराम माळी यांना २७ वर्षे, व्यंकटराव धोंडी यांना २० वर्षे व शंकर माळी यांना २० वर्षे शिक्षा झाली. बाकीचे चौघे निर्दोष झाले पण त्यांना स्थानबद्ध करण्यात आले.

# हत्यारांसाठी गोव्यावर दुसरी स्वारी

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली, मोगलांचे खजिने लुटले, कल्याणचा खजिना लुटला. करोडो रुपयांची लूट मिळाली म्हणून गड, कोट, किल्ले सजले. दारुगोळा, हत्यारे मिळाली, तोफा मिळवल्या हे सर्व संपत्तीमुळे शक्य झाले. शिवरायांची ती वाट नागनाथ अण्णांनी धरली होती.

धुळ्याचा खजिना घेऊन सहीसलामत भागात पोहचल्यावर क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी आपल्या सहकाऱ्यांना गोव्याची हत्यारे मिळवण्याची वाट दाखविली आणि खूप दिवसांची फौजी संघटनेची मनीषा पूर्ण करण्यासाठी गोव्याहून हत्यारे आणण्यासाठी दुसऱ्यांदा गोव्यास निघाले. पहिल्यांदा हत्यार आणण्यासाठी कोल्हापुरातून बाहेर पडले ते हत्यार मिळाल्याशिवाय परत यायचे नाही या निर्धाराने. शेवटी अथक प्रयत्नाने चव्वेचाळिसाव्या दिवशी हातात हत्यार पडले गोव्यातील हत्यारांचा शोध लावला आणि मगच कोल्हापूरला आले.

स्वतः नागनाथ अण्णा, राजूताई पाटील (ताई), जी.डी.बापू, वाय.सी.पाटील, किसन अहिर वगैरे आठ एक कार्यकर्त्यांना घेऊन गोव्याकडे निघाले. आता सर्व वाटा माहीत असल्यामुळे कोल्हापूरहून निघून सरळ दोड्याला बाळ मणेरकर यांच्याकडे आले. बाळ मणेराची व क्रांतिकारकांची ओळख करुन दिली. बाळ मणेर, क्रांतिवीर नागनाथ अण्णांना म्हणाले, ''मी तुमची फार वाट बघतोय. बऱ्याच हत्यारांची जुळवा जुळव केलेली आहे.'' सर्व कार्यकर्ते चकित झाले. दुसऱ्या दिवशी बाळ मणेरकर हे सर्वांना मार्मा गोव्याला घेऊन गेले. तेथून म्हापशाला आपल्या मावस भावाकडे घेऊन आले. क्रांतिकारकांची व मावस भावाची ओळख करून दिली आणि त्याला सांगितले, ''मी नसतानाही ही कार्यकर्ते मंडळी तुझ्याकडे आली तर त्यांना लागतील तेवढी हत्यारे व काडतुसे देत जा.''

बाळ मणेरकरांचा मेव्हणा बापू नार्वेकर हा म्हापशाला टेलर काम करत होता. त्याच्याकडे पोर्तुगाल लष्करातील मोठ मोठ्या अधिकाऱ्यांची कपडे शिवायला येत होती. गोव्यात तर खुल्लम खुल्ला हत्यारांची खरेदी विक्री होत होती. बापू नार्वेकरांच्यावर अधिकाऱ्यांचा विश्वास होता. बापूने पोर्तुगाल लष्करातील अधिकाऱ्यांना पैशाचे अमिष दाखवले. मग काय मिलिटरीतील कोरी करकरीत हत्यारे, कोऱ्या करकरीत लांब पल्ल्याच्या रायफली, नव्या कोऱ्या करकरीत काडतुसाने भरलेल्या पेट्याच पेट्या त्या अधिकाऱ्यांच्या कडून मिळायला लागल्या. मागेल तेवढी सातबारी जर्मन मेड रिव्हॉल्व्हर, स्टेनगन, इटालियन पिस्तुल अशी अनेक प्रकारची हत्यारं नवी करकरीत मिळायला लागली. हत्यारे होती, पैसा होता पण ती गोव्या पुरती मर्यादित होती. खुलेआम ती महाराष्ट्रात आणता येत नव्हती. त्यासाठी चेक नाका चुकवून दऱ्या-खोऱ्यातून, डोंगर-झाडीतून चोरट्या मार्गाने ती आणावी लागत होती. त्यासाठी मध्यान रात्री जीव धोक्यात घालून हे काम क्रांतिकारक करत होते.

क्रांतिकारक निधड्या छातीचे, धाडशी, जिवाची पर्वा न करणारे असे होते. नागनाथ अण्णांनी शेकडो हत्यारे चळवळीसाठी सातारा परिसरात आणली आणि इतर भागातील भूमिगतांना हत्यारे मिळवण्याची वाट दाखवली. हत्यारे, लष्करी दारू गोळा हा माल सुरक्षित आपल्या भागात यावा या करिता त्यांनी गोव्यापासून साताऱ्या पर्यंत एखाद्या यंत्रासारखी फळी निर्माण केली. यंत्राचं बटण दाबावं आणि यंत्र जसं चालू व्हावं तसं, गोव्यात मिळालेले लष्करी साहित्य एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात असं करत इच्छित स्थळी अवघ्या काही दिवसांतच येऊन पोहोच होत होतं.

एकदा गोव्याहून हत्यारे आणण्यासाठी नागनाथ अण्णा व जी. डी. बापूंच्या बरोबर राजूताई पाटील गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी सांगितलेला तो प्रसंग. 'आम्ही तिघांनी गोव्यात हत्यारे, काडतुसे खरेदी केली. ती वाटाड्याकडे दिली आणि गोव्यातून बाहेर पडताना चेक नाक्यावर आम्हा तिघांना पोलिसांनी आडवले. आम्हा तिघांवरही वॉरंट होती. आम्ही तिघेही भूमिगत होतो. याच व्यक्तीवर वॉरंट आहे म्हणून आमच्या कपाळावर काय शिक्का नव्हता की तसा टिळा नव्हता. त्यांनी आमची झडती घेतली, मी पिशवीतून शाल व साडी झाडली पिशवीतून चुकून एक काडतूस बाहेर पडले पण पोलिसांच्या ध्यानात यायच्या अगोदर माझी बांगडी पडली म्हणून चटकन काडतूस उचलले आणि कनवटीला लावले. हा एक प्रसंग आणि दूसरा प्रसंग 'गोव्याहून छोट्या स्टेनगन, रायफली, काडतुसे, दारू गोळा, लहान-मोठी सातबारी

रिव्हॉल्व्हर वगैरे साधन सामुग्री रेल्वेने मिरजेला येत होती. ती तिथून रेल्वेने रुकडी स्टेशनवर उतरुन घेतली जात, पुढे मालगावला श्री.मालगोंडा भाऊ पाटील यांच्या घरी पोहोच होत होती. त्या पाटलांच्यावर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ऐतवडे गावी एका पान मळ्यातील सांकेतीक स्थळी ती हत्यारं पोहोच करण्याची जबाबदारी सोपवली होती. पाटील ती हत्यारे घेऊन मानगावहून मधल्या मार्गाने वडगाव हवेली, किणी-घुणकी, या मार्गाने पुढे वारणा नदी पार करुन बाजीराव बाळांचे ऐतवडेहून पुढे कुरळप गावाच्या पश्चिमेकडून ऐतवड्याचा राक्षसओढा ओलांडून नेहमीच्या सांकेतीक स्थळी  पोहोच करीत होते. एक वेळ दुर्दैवाने किणी घुणकीच्या आसपास पोलिसांना त्यांचा संशय आला म्हणून त्यांनी पाटलांना हाक दिली, पाटलांनी हाक ऐकू न आल्याचा बहाणा करून मधल्या मार्गाने सायकल रेटली, पोलिसांनी जीपने त्यांचा पाटलाग चालवला परंतु रस्त्याच्या खराबीमुळे व वारणा आडवी आल्यामुळे पोलिसांना पायी पाटलाग करावा लागला. पाटलांनी सायकलचा वेग खुपच वाढवला होता. पोलिस आणि पाटलांच्यात अंतर पडले त्याचा फायदा घेऊन पाटलांनी पोलिसांना चकवा देऊन कुरळपाच्या पश्चिमेकडून ऐतवडचा राक्षसओढा चलाकीने पास केला आणि सांकेतीक स्थळी कसेतर पोहोचले, दमगिर आवस्थेत खाली पडले, सारी हत्यारे पानमळ्यात विखरुन पडली, तिथं एक शेतकरी होता. त्याने झाला प्रकार पाहिला, तितलाच पडलेला पाला हत्यारांव टाकला आणि रस्त्याच्या पलिकडे ढगेवाडीच्या सागाच्या जंगलात क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा फौजी कँप होता. तिथे त्यांना निरोप दिला. अण्णांनी आपले चार सहकारी तातडीने रवानाकेले आणि कँपवर हत्यारे व मालगोंडा पाटलांना सुखरुप आणले. पोलिसांना गुंगारा देणारे क्रांतिवीर अण्णांचे असे सहकारी होते.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांना स्वातंत्र्याच्या लढ्यात गोव्याहून हत्यारे आणण्यापासून ती सुरक्षित ठेवणे, भूमिगतांना पूरवणे, त्यांच्या जेवण-खाण्याची सोय करणे इ. कामांत अण्णांच्या आई क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी, राजूताई बिरनाळे, इंदूताई पाटणकर, नगाक्का नायकवडी यांच्या सारख्या अनेक स्त्रियांनी मोठे योगदान दिले आहे. बऱ्याच स्त्रियांची नावे उपलब्ध नाहीत. खरं म्हणजे त्यांच्यावर एखादे स्वतंत्र पुस्तक तयार होईल इतके त्यांचे मोठे कार्य आहे.

# सासरवाशीण तडफदार शूरकन्या शेवंता

दिवसेंदिवस स्वातंत्र्याचा लढा तीव्र स्वरूप घेत होता. इंग्रजांनी भूमिगतांच्यावर गुंडांना घातले होते. अंगावर शहारे आणणारा तो प्रसंग. साल १९४४. वार होता शुक्रवार. शेवंताने रात्रीच्या जेवणाची भांडी. कुंडी करून झाड लोट केली. मागच्या सोप्याला थोरल्या दिराचं अंथरुण घातलं, मधल्या माळीत मालकाचं अंथरुण घातलं. मालक झोपायला गेल्यावंर आपलं, अंथरून पुढच्या सोप्यात घातलं. मालकाच्या उशाला पाण्याचा तांब्या भरून ठेवला आणि आपल्या अंथरुणावर येऊन कलंडली. बाहेर काळा कुट्ट अंधार होता. रात किड्याच्या किरकिरीत तिचा डुलका कधी लागला हे तिला कळालच नाही. घड्याळात बाराचे ठोके पडायला आणि दारावर कडीचा आवाज धड धड व्हायला एकच गाठ पडली. तशी शेवंता दचकून आपल्या अंथरुणावर उठून बसली. तिने करड्या आवाजात विचारले ''कोण आहे?'' बाहेरून आवाज दिला. ''शेवंताताई, मी नागनाथ आहे. लवकर दार उघडा. माझ्या मागं पोलिस लागलेत.'' शेवंता चटकन उठून दाराजवळ आली. पुन्हा एक वेळ खात्री केली. ''अण्णा, तुम्हींच आहात''? ''होय मी नागनाथच आहे. अगोदर दार उघडा.'' शेवंताने दाराची कडी काडली. तसी शेवंता सासरवाशीण होती. नांदायला येऊ न अजून सहा महिनेही झालेले नव्हते. सासरच्या माणसांच्या स्वभावाचा तिला अजून अंदाज लागला नव्हता. घरातील सारी माणसं पहिल्या झोपेत गाढ झोपली होती. तिने कशाचाही विचार न करता नागनाथ अण्णांना पोलिसांच्या तावडीतून वाचवणे हे आपलं कर्तव्य आहे हे समजण्या इतपत तिला जाण आली होती. प्रथम तिने दाराची कडी काढली. अण्णांना घरात घेतले आणि दाराला कडी लावली.

अण्णा पळून-पळून दमून गेले होते. त्यांना धड नीट बोलता येत नव्हते. कसंबसं त्यांनी शेवंताला सांगितले ''माझ्या मागे पोलिस आणि गुंडांची टोळी लागलेली आहे. मला पोलिस निघून जाईपर्यंत घरात दडण्यासारखी जागा आहे का?'' शेवंता तशी धाडसी होती. ती त्यांना म्हणाली, अण्णा घाबरण्याचं काहीच कारण नाही. तुम्ही इथं सुरक्षित आहात. आसपास सारी माणसं आपली आहेत. आता कसलाही विचार न करता मधल्या माळीत मालक झोपलेत तिथं जाऊन झोपा. मी इथं सोप्यात खडा पहारा करत बसते. एवढ्यात घोड्यांच्या टापांचा आवाज आला. कांही घोड्यावर बसलेले पोलिस आणि काही पायदळी पोलिस, शिवाय काठ्या कुऱ्हाडी घेतलेले काहीजण होते. शेवंताने दाराच्या फटीतून बघितले पोलिस कावरे बावरे झाले होते. आपलं सावज कोणत्या घरात दडलय याचा अंदाज त्यांना लागत नव्हता. फौजदार सायबान साऱ्या गल्लीची व मुख्य रस्त्यांची नाकाबंदी करण्याची पोलिसांना ऑर्डर दिली. त्यांना साऱ्या घरांना गराडा घालून रात्रभर खडा पहारा करण्यास सांगितले आणि दिवस उजाडल्या उजाडल्या प्रत्येक घराची झडती घेण्यांस सुरुवात करा. सायबांच्या हुकमा प्रमाणे पोलिस यंत्रणा सज्ज झाली. शेवंताच्या दारातल्या पिंपरणीच्या झाडाखाली काही पोलिस बसले होते. तर कांहीना खडा पहारा करण्यास थांबले.

अण्णा पोलिसांच्या हालचालीचा अंदाज घेत तसेच सोप्यात उभेच राहीले होते. ते खाली बसायलाही तयार नाहीत आणि झोपायलाही तयार नाहीत. शेवंता अण्णांना म्हणाली ''मधल्या घरात फळ्या टाकून माळा केलाय त्या माळ्यावर जाऊ न झोपा. शेवंताच्या सांगण्याप्रमाणे अण्णा माळ्यावर झोपायला गेले. तशी शेवंताने शिडी काढून बाजूला दडवून ठेवली, आणि ती आपल्या अंथरुणावर आडवी झाली. तिच्या डोक्यात नाना विचार येत होते. आपण केलेल्या धाडसाबद्दल ''सासू-सासरे काय म्हणतील? नवरा काय म्हणेल? थोरला दीर, जाव काय म्हणेल?''

शेवंता विचाराच्या तंद्रीत अंथरुणावर पडून होती एवढ्यात कोंबड्यानं बांग दिली. शेजारच्या बायाबापड्या उठल्याची चाहुल लागली, घराघरातली जाती घर घर फिरू लागली, तांबडं फुटल. शेवंतान आपल्या नवऱ्याला व सासू, सासऱ्याला उठवलं त्यांना रात्रीचा सारा प्रकार सांगितला. त्या सर्वांनी तिच कौतुक केलं. आता पुढे काय? असा सर्वांनाच प्रश्न पडला होता. ऐवढ्यात शेवंता म्हणाली, 'तुम्ही सर्वजन आंघोळ, चहा पाणी उरकुन घ्या, मी काय ते बघते' असं म्हणून शेवंता अंगण झाडायच्या निमित्तान दारात आली. पोलिस येणाऱ्या जाणाऱ्या माणसांची

कसून तपासणी करत होते. फटफटीत झाल्यावर पोलिसांनी एका एका घराच्या झडतीला सुरुवात केली. शेवंताच्या घरापुढील पोलिस अजून आपल्या जागेवर आळोखे पिळोखे देत तसेच बसले होते. नागनाथ अण्णा पोलिसांच्या गराड्यात पक्के आडकले होते. पण ते आजून पोलिसांच्या हाताला लागले नाहीत ही बातमी समजल्यावर सांगलीहून आणखीन एक ताज्या दमाची पोलिसांची तुकडी वाळव्याला आली. पोलिसांनी साऱ्या माळ भागाला गराडा टाकला होता. ते सारा भाग पिंजून काढत होते. शेवंताच्या मनात पाल चुकचुकली लवकरच आपल्याही घराची झडती होणार ! त्या अगोदर अण्णांना घरातून बाहेर काढलं पाहिजे. तिने मनात एक धाडसी बेत केला आणि दारातल्या पोलिसा जवळ गेली. "आहो पोलिस दादा आमची पावणी भारी लाजवट आहे. तिला बाहेर झाड्याला जायचं आहे, पण ती तुम्हा मंडळींना फार भितिया हो. काय करावं हेच मला कळना झालय?" "आहो मावसी आम्ही पोलिस असलो तरी माणसंच आहोत. तुंम्ही या बाजूनं तुमच्या पावनीला घेऊन जावा."

पोलिसानं तेवढं म्हटल्यावर शेवंता घरात आली. ती अण्णांना म्हणाली अण्णा आपण धाडस करून घरातून बाहेर पडूया, काय व्हायचं ते दोघांचं होईल, आणि तिने आपलं लग्नातलं ठेवणीचं नवं लुगडं साधारण पातळा सारख दिसणार होत, ते अण्णांना नेसवलं, चांगली जरीची चोळी घालायला दिली. पायात चांदीच्या साखळ्या घातल्या, हातात बांगडया भरल्या, पायात जोडवी घातली, बाईकी चप्पल पायात घालायला दिली. कपाळाला कुंकवाचा टिळा लावला नकळत तोंडावर पदर ओढून घेतला आणि जरा माग सरून तिनं अण्णांना बघितलं. तिचा स्वतःवर विश्वास बसेना. खरच हे अण्णा आहेत की कुणी नवी नवरी आहे? तिनं अण्णांच्या हातात एक तांब्या दिला. आपल्या हातात एक तांब्या घेतला. अण्णांना घेऊन बाहेर अंगणात आली आपल्या डाव्या हाताला पोलिस ठेवले. उजव्या हाताला अण्णांना घेतलं आणि झाड्याला जाण्याचा बहाणा करून ती निघाली, तसे पोलीस बाजूला सरले. त्यांनी तिला वाट करून दिली. पोलिसांचा गराडा पार करून अण्णा सहीसलामत सुटले ते तडक आपल्या सांकेतिक स्थळी सुखरूप पोचले.

दूरवर अण्णा गेल्याचं बघून शेवंता घराकडं येत होती. तो पर्यंत लक्ष्मीच्या देवळाकडे अण्णांना पकडल्याची कोणीतरी हूल उठवली, तसे पोलिस लक्ष्मीच्या देवळाकडे निघून गेले. पोलिस उत्तर दिशेला पळत होते आणि नागनाथ अण्णा मात्र दक्षिण दिशेला मल्लिकार्जुनचा डोंगर चढत होते.

❋❋

# उल्लेखनीय तुळसीचा कट्टा

१९४२ मधला तो काळ आणि ते मंतरलेले दिवस होते. सातारच्या क्रांतिकारकांचा स्वातंत्र्याच्या लढ्याला जोर आला होता. अशा वेळी इंग्रज सरकार गप्प कसे बसणार आणि त्यातच सामान्य जन मानसांचे लोंढे भूमिगत क्रांतिकारकांना येऊन मिळत होते. त्यातून भूमिगताची ताकद दुगणी-तिघणी दिवसेंदिवस वाढत होती. ती शक्ती मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी राष्ट्रद्रोही, पोलिस, खबऱ्यांना हाताशी धरले क्रिमीलर गाव गुंडांना तुरुंगातून सोडले. सर्वांना एकत्र करुन प्रमुख भूमिगतांच्या पाठीमागे लावले. एकतर त्या क्रांतिकारकांना पकडा नाहीतर ठार मारा असे त्यांना सांगितले पण क्रांतिकारक ते कसले? त्यांनी राष्ट्रद्रोही, पोलिस खबरे व गावगुंडांनाच 'दे धरणीमाय ठाय' करुन सोडले.

सर्व ताकदीनीशी पोलिस क्रांतिकारकांच्या पाठीशी होते पण स्वातंत्र्य सैनिक त्यांच्या हाताला लागत नव्हते. जनमानसातून पोलिस छाप्याच्या बातम्या भूमीगतांना आपसूख लागत होत्या भूमिगतांनी आपल्या बचावासाठी अनेक गुप्त ठिकाणे शोधून ठेवली होती. क्रांतिवीर नागनाथ अण्णांची वाळव्यात दडण्या-लपण्याची अनेक ठिकाणं होती. त्यापैकी माळावरच्या मारुतीच्या देवळा समोरचा तो मंतरलेला तुळशीचा कट्टा होय. त्या तुळशीच्या कट्ट्याची नैसर्गिक ठेवण अशी होती की, इस्लामपूर रस्त्याने गावात शिरताना उजव्या हाताला रेणुका मातेचे जुन्या पुराण काळातील देऊळ. ते कुंभारी कौलानी झाकलेले, त्या मंदिराच्या आजूबाजूला मोकळे माळरान (सध्या त्या ठिकाणी हुतात्मा किसन अहिर विद्यालयाची इमारत व क्रिडांगण) ते


संपल्या बरोबर इस्लांमपूर रस्त्याला छेदून नायकवडी गल्लीत जाणारी गाडी वाट, त्या वाटेला लागून अण्णांचे घर, घराच्या परस दारात भलेमोठे चिंचेचे झाड-पुर्वी कधी वाड वडलानी लावले आहे. परसदार संपले की छोट गावतळ (सध्या नाही) त्या गाव तळ्याच्या बांधावर पुर्वेला शंभरएक वर्षाचे जुने पुराणे पिंपळाचे झाड(सध्या नाही) त्या झाडाला लागून औरस चौरस अशी गाव विहीर-सतत पाण्याने भरलेली. त्या विहीरीच्या दक्षिण बाजूला गावठी शेंडाचा घनदाट ताटवा त्या ताटव्यात आधे-मध्ये लाल फुलांची झाडे आणि तसाच गावात पुढे जाणारा इस्लांमपूर रस्ता त्या रस्त्याला छेदून अहिर गल्लीत जाणारी गाडी वाट.

गाव विहीरीच्या पुर्वेस आठ ते दहा गजावर पूर्वेला तोंड करुन असलेले मारुतीचे देऊळ. पूर्वजांनी बांधलेले अत्यंत सुबक बांधकाम, चांगल्या सागवाणी लाकडाचा वापर करुन. जवळच असलेल्या सुतार मेट्यातील श्री. रामचंद्र यशवंत सुतार, श्री. आण्णा तुकाराम सुतार, श्री. नाना तुकाराम सुतार व श्री. ज्ञानू तुकाराम सुतार या चार भावांनी त्या लाकडाचे केलेले कोरीव खांब, त्या खांबावर घातलेले लांब सडक सुबक चौकोनी बडोदे, असे देवालय पुऱ्या उंचीचे बेंगलोरी कौलांनी झाकलेले आहे. शिवाय घडीव दगडाने बांधलेला मारुतीचा गाभारा आहे. त्यात दगडी सुंदर अशी हनुमानाची मुर्ती उगवत्या दिशेला तोंड करुन बसवलेली आहे.

देवालयाच्या दारात थोड्या अंतरावर वडाचे एक झाड कोणी कधी काळी लावले याचा अंदाज देणारा माणूस सध्याच्या पीढीत कोणी नसावा. त्या वडाच्या झाडाच्या पारंब्या अशा काही जमिनीत घुसलेल्या आहेत की नवख्या माणसाला वाटावे हे एक दुसरेच वडाचे झाड आहे की काय? त्या झाडाच्या आणि मंदिराच्या मध्यावर दगडी बांधकामात बांधलेला चौकोनी कट्टा त्या कट्ट्याच्या बरोबर मध्यावर सुंदर असे तुळशी वृंदावन. त्या वृंदावनाचे आजू-बाजूला कट्ट्यावर चार-दोन माणसे सहज झोपतील असा तो औरस-चौरस कट्टा आहे. त्या तुळशीच्या कट्ट्याचे बांधकाम शके १८५२ मी.का.शुक्ल पक्ष-१ खर्च रु.९० हा श्री. तानुबाई भाऊ डांगे व विठू कोंडी सव्वाशे यांनी केला आहे.

१९४२ ते १९४७ या स्वातंत्र्य संग्रामातील पाच वर्षाच्या काळात क्रांतिवीर नागनाथ अण्णा भूमिगत असताना ज्या-ज्या वेळी वाळव्यात मुक्कामाला असायचे त्यावेळी ते याच कट्ट्यावर निवांत झोपत होते. आणि त्यांच्या जिवा-भावाचे साथीदार किसन अहिर (पैलवान), रामचंद्र अहिर (मास्तर), खंडू शेळके (दाजी), काका घोरपडे, नारायण आबा कदम, किसन देसाई, शंकर परुळेकर इत्यादी मंडळी

चारी दिशेला रायफलचा जागता पहारा ठेवून अण्णांचे संरक्षण करीत होते. गावात कुठेही खुट्ट झाले की पहिली बातमी या कट्ट्याला येऊन थडकत होती. असा हा मंतरलेला कट्टा. किसन अहिर (पैलवान) हे हयात होते तोपर्यंत नित्य नियमाने मारुतीचे दर्शन घेऊन त्या कट्ट्याला आपल्या तळ हाताचा स्पर्श करुन तालमीत व्यायामासाठी जात होते. तो मंतरलेला तुळशीचा कट्टा सुस्थितीत आहे. (सध्या देवालयाचे जीर्णोद्धाराचे काम चालू आहे.) देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी वयाच्या ८७ व्या वर्षात पदार्पण केले आहे तरीही हुतात्मा किसन अहिर विद्यालयाकडून, हुतात्मा किसन अहिर कारखान्याकडे जाता-येता भारावलेल्या मनाने अण्णा त्या कट्ट्याकडे पाहून मंतरलेल्या दिवसाच्या आठवणीत रमून जातात.



सहकाऱ्यांच्या जागत्या पाहऱ्या
तुळसीच्या कट्ट्यावर विश्रांती घेत असलेले अण्णा

# सातारा जेल फोडून पसार

शिवाजी महाराजांचे गुप्तहेर सेनाप्रमुख बहिर्जी नाईक यांच्या नावावरून प्रतिसरकारने गुप्त बातम्या मिळवण्यासाठी 'बहिर्जी' नावाचे पथक जनतेतून निवडले होते. हे पथक क्रांतिकारकांना गुप्त माहिती देण्याचे काम करत असे. तसेच मुलकी व पोलिस अधिकारी, पोलिस खबरे, सरकारधार्जिणे लोक, गावगुंड वगैरे समाजकंटकांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत व त्यासाठी वेश पालटून हे पथक लोकांच्यात मिसळे व भूमिगतांच्या सहकाऱ्यांना व भूमिगतांना मदत करणाऱ्या गावकऱ्यांना निरोप देण्याचे काम करत असे.

पावसाळ्याचे दिवस होते, ओढ्यांना, नदीनाल्याना पूर आला होता. वाळव्याला येणारे सर्व मार्ग जवळ जवळ बंदच होते. क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे बरेच दिवसांत वाळव्याला येणे झाले नव्हते. थोडासा पाऊस कमी झाल्यावर जाऊन यावे म्हणून त्यांनी बहिर्जी पथकातील एका विश्वासू माणसाकरवी किसन अहिर यांचेकडे निरोप पाठवला. 'मी आठ एक दिवसांत वाळव्याला येईन. त्या वेळी राष्ट्रसेवादलाच्या सर्व कार्यकर्त्यांना भेटून परत ऐतवडे भागात जाईन.' नागनाथ अण्णांच्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी किसन अहिर यांनी आपले प्रमुख कार्यकर्ते खंडू सखाराम शेळके, नारायण आबा कदम, रामचंद्र संतू अहिर, काका घोरपडे, इनामदार आप्पा, कुबेर नवले, पांडू खंडागळे, पांडादेव गावडे वगैरे मोजक्या कार्यकर्त्यांची गुप्त बैठक घेतली व तसे नागनाथ अण्णांना कळवले. सर्वांनाच अण्णांच्या भेटीची उत्सुकता होती. अजूनही चार एक दिवस क्रांतिवीर नागनाथ अण्णांना वाळव्यात यावयास अवकाश होता म्हणून किसन अहिर यांनी अगोदर वाळव्यात एक व्यापक

बैठक घेतली व सर्वांना राष्ट्र सेवा दलाच्या फेरीची व जाहीर सभेची तयारी करा म्हणून सांगितले. सर्व कार्यकर्ते जिद्दीने कामाला लागले. अगदी १० वर्षाच्या मुलापासून ते ६० वर्षाच्या माणसापर्यंत सर्वांच्या उत्साहाला उधाण आले होते.

कृष्णा नदीचा पूर ओसरला होता. पाऊस कमी झाला असला तरी अधून मधून एखादी पावसाची सर यायची आणि थोड्या वेळात कडक ऊन पडायचे, कधी काळ्या ढगांनी सूर्य झाकायचा कधी मध्येच तोंड दाखवायचा. निसर्गाचा हा असाच खेळ चालू होता. २८ जुलै १९४४ चे दुपारचे चार वाजले होते. गावकऱ्यांना नागनाथ अण्णा वाळव्यात आल्याची बातमी लागली. चारी भागांतून लोकांचे लोंढेच लोंढे क्रांतिवीरांना भेटण्यासाठी येत होते. पूर्व नियोजनाप्रमाणे सर्वजण हाळभागावर एकत्रित जमले. तेथून प्रचंड अशी राष्ट्रसेवादलातील हजारो शेतकऱ्यांची फेरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वळसा घालून 'छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधीजी, क्रांतिसिंह नाना पाटील, पंडित जवाहरलाल नेहरू व क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या नावांच्या घोषणांचा जलोष करत निघाली. भरपूर समाज जमला होता. राष्ट्रसेवादलाची फेरी हळू-हळू पुढे सरकत होती. गर्दीमुळ लोकांचे पाय अडखळत होते, चिखलावरून ते निसरत होते. मध्येच पावसाची सर येत होती. पण कशाचीही तमा न करता फेरी गर्जना करत हाळभागाला पूर्ण वेढा देऊन पुढे चालली होती. एक एक भाग संपून एकदाची फेरी सभेच्या ठिकाणी पोहचली. खचाखच गर्दीने लोक अण्णांच्या भाषणासाठी उत्सुकतेने वाट बघत बसले होते. क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे बरोबर पद्माळचे वसंतदादा पाटील यांचे मावस भाऊ नारायण जगदाळे, धोत्रेवाडीचे बाबूराव खोत, वसगडेचे शामगोंडा पाटील आणि नांद्रेचे बाबूराव पाचोरे हे बाहेरचे पाहुणे म्हणून मेळाव्यासाठी आले होते.

राष्ट्रसेवादलाची फेरी झाल्यावर तेथेच मोठी जाहीर सभा झाली. कार्यकर्त्यांच्या व प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी भाषणाला सुरुवात करण्याअगोदर भारत माता, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग व नाना पाटलांच्या नावांच्या घोषणा दिल्या. त्या घोषणांना लोकांनी जोराचा प्रतिसाद दिला आणि अण्णांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, ''माझ्या भाषणाला सुरुवात करण्याअगोदर महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, क्रांतिसिंह नाना पाटील व हुतात्मा बाबू गेनू, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना वंदन करतो. एवढ्या उत्साहाने जमलेला समाज पाहून मला वाटते आपल्या देशाचे स्वातंत्र्य आता दूर राहिले नाही. (लोकांचा टाळ्यांचा कडकडाट) सर्व देशभरातील सामान्य जनता तुमच्या प्रमाणे रस्त्यावर आली आहे. ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेला उलथून पाडण्यासाठी जशास

तसे, ठोशास ठोसा आणि गोळीस गोळीनेच उत्तर दिले जाईल.(लोकांचा टाळ्यांचा कडकडाट) इंग्रजांना वाटत असेल महात्मा गांधींच्या अहिंसा मार्गाने जाणाऱ्या जनतेला चिरडून टाकू. जसे या देशात महात्मा गांधी आहेत तसे हुतात्मा भगतसिंग,राजगुरू, सुभाषचंद्र बोस यांच्या सारखे जशास तसे उत्तर देणारेही नेते जन्माला आलेले आहेत हे त्यांनी विसरू नये. (लोकांचा टाळ्यांचा कडकडाट) नि:शस्त्र जनतेला गोळ्या घालून इंग्रजांना वाटत असेल आम्ही मर्दुमकी गाजवली; पण त्यांनी इतकं ध्यानात ठेवावे जनतेचे सांडलेले रक्त वाया जाणार नाही. त्या रक्ताच्या थेंबा थेंबांतून हजारो क्रांतिकारक निर्माण होतील आणि मग तुम्हांला दे माय धरणीठाय करतील हे ध्यानात ठेवा. (वीज कडाडल्यागत टाळ्यांचा कडकडाट, घोषणांचा जल्लोश) गांवकऱ्यांनो, आपली सर्व लढण्याची तयारी झाली आहे. तुम्ही माझ्या पुढच्या निरोपाची वाट बघा आणि लढ्याला तयार रहा. सर्वच गोष्टी मला उघड बोलता येणार नाहीत. या सभेत ब्रिटिशांचे काही बगलबच्चे खबरे बसलेले आहेत. त्यांनीही ध्यानात ठेवावे इंग्रजांची जी गत, तीच तुमची आहे. एवढे आज पुरे आहे. इथे मी थांबतो. जय हिंद, जय भारत, भारत माता की जय'' अशा घोषणेच्या जोशात त्यांनी आपले भाषण संपवले.

सभा संपल्यानंतर लोक उत्साहाने आपआपल्या घरी निघून गेले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा आपल्या मोजक्या निवडक कार्यकर्त्यांच्या बरोबर कोटभागावर गेले. शेजारच्या आसपासच्या चार घरांतून भाकरी कालवण कार्यकर्त्यांनी गोळा केले आणि सर्वजणांनी एकत्रित मिळून बाहेरच्या ओटीवर जेवण केले. जेवण झाल्यावर शेजारच्या तुकूनाना देसाईंच्या घरात क्रांतिवीर नागनाथ अण्णा, वसंतदादांचे मावस भाऊ नारायण जगदाळे, धोत्रेवाडीचे बाबूराव खोत, वसगड्याचे शामगोंडा पाटील आणि नांद्र्याचे बाबूराव पाचोरे, शंकरराव परुळेकर (इनामदार आप्पा) असे सर्वजण झोपायला गेले. दिवसभराच्या दगदगीने सर्वजण गाढ झोपी गेले. मध्येच रात्री नारायण जगदाळे उठले. त्यांच्या हाताला खरूज झाली होती. त्याची सारखी आग होत होती. त्यांना लवकर झोप लागेना म्हणून ते अंगणात येऊन शेकोटी करून बराच वेळ शेकत बसले होते. अर्ध्या तासाने परत जाऊन झोपले. झोपते वेळी दाराला कडी लावायला विसरून गेले. रात्र बरीच झाली होती. मध्यान उलटून २९ जुलै १९४४ ची काळ रात्र सुरू झाली होती. रिमझीम पाऊस पडत होता. सर्व आकाश काळ्याकुट्ट ढगांने झाकलेले होते. कुठंतर एखादी चांदणी साक्षीला होती. कुत्री भुंकत होती. सततच्या धावपळीने शिणलेल्या शरीराचे कार्यकर्ते निवांत झोपले होते. रात्र वैऱ्याची होती. खबऱ्यांच्या फंद फितुरीने घात केला. खबऱ्यानं पोलिसांना घर दाखवलं व पसार झाला. पायदळ पोलिस पार्टीने घराला गराडा घातला. घराला

आतून कडी नव्हती ही पोलिसांना नामी संधीच मिळाली. दार उघडून फौजदार अहमदी व ७-८ पोलिस अपसूक घरात शिरले. बे-सावध सावजावर रानटी हिंस्त्र जनावराने जशी झडप घालावी आणि त्याला पकडावे अगदी तसे बेसावध गडद झोपलेल्या भूमिगतांच्या छातीला संगीन लावून तोंडावर बॅटरीचा झोत पाडला आणि पोलिसी जरबेच्या आवाजात,"खबरदार! जागचे हालाल तर मुडदे पाडू. गप गुमान हात पुढे करा आणि शरण या." प्रतिकार करण्याची संधी नागनाथ अण्णांना मिळाली नाही. सरळ पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे हात पुढे करण्यावाचून गत्यंतर नव्हते. पोलिसांनी सर्वांना बेड्या घातल्या. ती पहाट होती २९ जुलै १९४४ ची.

सर्व भूमिगतांना आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णांना पकडून पोलिस चावडीवर आले. सर्वांना चावडीच्या कट्ट्यावर बसवून दोन पोलिसांना पहाऱ्यावर बसवून बाकीचे सर्व पोलिस प्रातर्विधीसाठी नदीवर गेले. अण्णांना पकडल्याची बातमी हा हा म्हणता गावभर पसरली. सर्व गावावर शोककळा पसरली. कार्यकर्त्यांचे लोंढेच्या लोंढे चावडीकडे यायला लागले. अण्णांच्या मनात तिथून पळून जाण्याचा बेत होता. त्यासाठी त्यांनी हाताच्या अंगठ्यावर बेडी आणून ठेवली होती. कार्यकर्त्यांची वाट बघतच होते. चार एक कार्यकर्ते आले की लगेच हाताच्या अंगठ्याच्या ढोपरावची बेडी झटकन काढायची व उभ्या असलेल्या पोलिसाला मिठी मारायची, बाकीच्या कार्यकर्त्यांनी कोपऱ्यात उभ्या केलेल्या बंदुकांवर झडप घालून बंदुका ताब्यात घ्यायच्या असं मनात नियोजन केले होते.पण दुर्दैव, लोकांचा तांडा चावडीवर चालून येतोय ही बातमी पोलिसांच्या हस्तकांनी पोलिसांना दिली. नदीवर गेलेले पोलिस पळतच चावडीकडे आले. पहिल्यांदा त्यांनी रायफली ताब्यात घेतल्या आणि पकडलेल्या भूमिगतांना बरोबर घेऊन ताबडतोब गावाबाहेरून आष्ट्याचा रस्ता धरला. लोकांनी गंजीखान्याजवळ पोलिसांची वाट रोखण्याचे ठरवले. त्या कामात सर्वश्री किसन अहिर (पैलवान), खंडू शेळके, नारायण आबा कदम, रामचंद्र संतू अहिर (मास्तर), काका घोरपडे, किसन देसाई वगैरे कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. गावाच्या जवळ असलेल्या गंजीखाना वाटेच्या दुतर्फा दाट काटेरी फड्याची, केकताडीची, निवडुंगांची आणि इतर अन्य झाडा झुडुपांची वनराई होती. त्याचा फायदा घेऊन प्रमुख कार्यकर्त्यांनी ठिक ठिकाणी माणसे पेरली आणि हुशारीने दबा धरून बसले. पोलिस नागनाथ अण्णांना व अन्य क्रांतिकारकांना पुढे घालून घेऊन चालले. लोकांचा समुदाय आक्रमक होऊन पोलिसांच्या पाठीशी निघाला होता. पोलिसांनी आपला पवित्रा बदलला. बंदुका लोड केल्या. "खबरदार पुढे आलातर, एक एकाचे मुडदे पाडू" असे म्हणत हवेत गोळी बार केला. लोक जास्तच बिथरले. लांब लांब असलेले लोक संघटितरीत्या एकत्र धावतच पोलिसांच्या जवळपास भिडायला लागले. लोकांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. लोकांचा वाढता जोर पाहून नागनाथ अण्णांना

खात्री झाली. लोक आपणाला यातून सोडवणारच. पोलिसांनी जनसमुदायावर रोखलेल्या बंदुका आणि लोकांची आक्रमक भूमिका पाहून नागनाथ अण्णांनी विचार केला. एखादा जरी शेतकरी पोलिसांच्या गोळीला बळी पडला आणि आपली सुटका झाली, तरी ती अत्यंत वाईट गोष्ट होईल. अण्णांनी लोकांना शांत केले. किसन पैलवान, खंडू शेळके, नारायण आबा कदम, रामू मास्तर, काका घोरपडे, किसन देसाई या मोहरक्यांना पुढे बोलावले आणि त्याना सांगितले 'तुम्ही सर्वजण लोकांना घेऊन परत जावा. ब्रिटिश सरकारची ही कुत्री पिसाळलेली आहेत. त्यांना कशाचेही भान नाही. थोड्याच दिवसांत मी येतोय. तुम्ही शांत व्हा आणि शांततेने परत मागे फिरा' लोक ओशाळलेल्या दुःखी मनाने मागे फिरले. बायामाणसे धाय मोकलून रडू लागली. त्या दिवशी कोणीही आपल्या चुली पेटवल्या नाहीत. अशी वाळव्याची जनता होती आणि ते मंतरलेले दिवस होते.

आष्ट्यापेक्षा इस्लामपूर जेल सुरक्षित म्हणून नागनाथ अण्णांच्यासह सर्व क्रांतिकारकांना इस्लामपूर जेलमध्ये आणून ठेवले. इस्लामपूर जेल मधून पलायन करण्याचा बेत राजूताई पाटील, वाय.सी.पाटील, अंता पाटील, किसन पैलवान वगैरे कार्यकर्ते करत होते. तो पर्यंत वाळव्यात एक घटना घडली. अण्णांना पकडलेल्या दिवशीच पोष्टाच्या पेटीत डी.एस.पी. सातारा यांचे नावे लिहलेले एक अंतर्देशीय पत्र पोष्टमन रामभाऊ शिंदे यांच्या हाती लागले. रामभाऊ शिंदे हे मूळचे देवराष्ट्रे या गावचे. ते राष्ट्रप्रेमी होते. क्रांतिकारकांच्या बद्दल अभिमान असणारे असे होते. त्यांनी विचार केला आजच क्रांतिकारकांना पकडले आणि आजच पोष्टात टाकलेले डी.एस.पी.सातारा यांचे नावचे पत्र. यात कायतर भानगड आहे असा मनाशी तर्क करून ताबडतोब त्यांनी ते पत्र नागनाथ अण्णांचे कार्यकर्त्यांना दाखवले. त्या कार्यकर्त्यांपैकी मूळ नाव बाबूराव देशपांडे जुने कॉंग्रेसचे कार्यकर्ते १९३० सालच्या सत्याग्रहाची शिक्षा भोगून आले होते. लोकांनी त्यांचे नाव राष्ट्रोधर देशपांडे असे पाडले होते. त्या राष्ट्रोधरांनी त्या पत्रातील हस्ताक्षर व सही ओळखली. त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले,'' हे अक्षर व सही एस.डब्ल्यू.देशपांडे (सदाशिव वामन देशपांडे) यांची आहे.'' त्यांनी पत्रातील मजकूर वाचला. 'आपल्या सूचनेप्रमाणे मी तुम्ही सोपवलेली कामगिरी पार पाडली आहे. मी आपणास कधी व कोठे भेटावे हे मला कळवावे, आपला विश्वासू एस.डब्ल्यू.देशपांडे.' पत्रातला मजकूर कळताच बेफाम झालेल्या कार्यकर्त्यांचा राग आनावर झाला. तेथे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुकरण केले. स्वराज्याशी गद्दारी करणाऱ्या खंडोजी खोपडे याचा छत्रपतींनी उजवा हात व डावा पाय तोडला त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांनी एस.डब्ल्यू.देशपांडे यांना घरातून उचलून आणले व गावाबाहेर आणून त्यांचा उजवा हात व डावा पाय

कलम केला. या कामात १) नारायण आबा कदम, २) खंडू सखाराम शेळके (दाजी), ३) किसन आत्माराम अहिर (पैलवान) ४) किसन गोविंदा जाधव ५) सखाराम तुकाराम घोरपडे (काका) ६) पांडुरंग गणू पाटील ७) दिना हिंदू नायकवडी ८) मारुती तातोबा गायकवाड ९) रामचंद्र संतू अहिर (मास्तर) वगैरे वीस बावीस लोकांनी पुढाकार घेतला होता. पुढे हे सर्वजण गाव सोडून मल्लिकार्जुनाच्या डोंगरावर आश्रयाला गेले. तेथून रात्री खंडू शेळके यांच्या पाहुण्यांच्या मालेवाडी गावातील मळ्यात जेवणास व मुक्कामाला गेले. इकडे दुसरे दिवशी वाळव्यास फौजदार व त्यांची पोलिस पार्टी एस.डब्ल्यू. देशपांडे यांच्या हात-पाय तोडीच्या गुन्ह्याच्या चौकशीला आली होती. संबंधित लोकांची चौकशी करून त्यांच्यावर पकड वारंट जारी केले. वरील लोकाना वाळव्यातील नाना परीट, कृष्णा कदम, ( हे उकृष्ट पैलवान होते. दांडपट्टा, लेझिम, मल्लखांब व लाठी चालवणे इ. खेळ खेळत होते. पुढे ते दत्तक गेले आणि किसन बापू कदम या नावाने प्रसिध्दीस आले. ते वयाची १०५ वर्षे जगले.) ज्ञानू कदम, सौदी मुसलमान(सैदू आबा), आत्मा वाणी, शंकर महाजन, तातोबा रामा शेळके, देवाप्पा मगदुम, जिन्नु पाटील, भरमा बाबाजी मगदूम, बाबूराव आपटेकर (राष्ट्रोधर) विनायक पंढरीनाथ थोरात (दादा), रामू अहिर, शंकर परीट, भरमू पाटील, बाळू आण्णा, भिलवडे मास्तर, दादू थोरात (मास्तर) हे मदत करत होते. या शिवाय वाळव्यातल्या ज्ञात-अज्ञात अशा कितीतरी लोकांनी नागनाथ अण्णांना चळवळीसाठी सहकार्य केले. सर्वांची नावे उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही.

दुसऱ्या दिवशी पोलिस पार्टीला बाबुराव देशपांडे या इनामदाराने सर्वोतोपरी मदत केली आणि त्यांना बैलगाडीने पडवळवाडी एस.टी स्टॅंडवर (टप्प्यावर) पोहोचवून तो परत वाळव्याला जात असताना त्याला गाडीतून खेचले आणि त्याचा उजवा हात व डावा पाय कलम केला. या कामी तुकाराम नाना खोत (वस्ताद), कृष्णा रामा करमाळकर, हरी गणू कदम, यशवंत बापू करमाळकर, महादेवराव अनुसे (देवास), तुकाराम साधू कुंभार (शाम), दत्त लखू बाड (मारुती) यांनी पुढाकार घेतला. चोहीकडे या घटनेमुळे नागनाथ अण्णांचा दबदबा वाढला, पोलिस हादरले, पोलिस खात्याची नाचक्की झाली. नागनाथ नायकवडी यांना पकडून देण्यास मदत करणाऱ्या दोन गद्दारांचे २४ तासांच्या आत हात पाय तोडले. आणखीन कोण कोण गद्दार आहेत त्यांचा शोध चालू ठेवला, आणि कार्यकर्त्यांनी सापडतील त्या गद्दारांना शिक्षा देण्याचा सपाटा चालू ठेवला. दुसरे दिवशी डी.वाय.एस.पी. भोसले व सावंत या सरकारी अधिकाऱ्यांनी अण्णांना विनंती केली 'तुमच्या कोणत्याही कार्यकर्त्याला बोलवा. त्याला आम्ही पकडणार नाही. काहीही करा. पण वाळवा शांत करा. क्रांतिवीर नागनाथ अण्णांना तेच पाहिजे होते. त्यांनी कामेरीचे कार्यकर्ते बाळकू पाटील यांच्या कडून निरोप देऊन बापूंना (वडील) इस्लांपूरला

बोलावून घेतले. त्यांच्या कडून किसन पैलवान, खंडू शेळके, रामचंद्र अहिर, तुकाराम नाना खोत यांना निरोप दिला. थोड्याच दिवसांत मी येतोय झाले एवढे प्रकार पुरे, पुढे तुम्ही सर्वजण शांत रहा. या अण्णांच्या निरोपाप्रमाणे वाळवा शांत झाला.

वाळव्यातील गद्दारांना शिक्षा केल्यामुळे इंग्रजी राज्यकर्त्यांनी सर्वस्वी किसन आत्माराम अहिर, खंडू सखाराम शेळके(दाजी), रामचंद्र अहिर(मास्तर), नारायण आबा कदम, पांडू पाटील, सखाराम घोरपडे (काका), किसन देसाई-सर्व वाळवा आणि तुकाराम नाना खोत (वस्ताद), कृष्णा रामा करमाळकर, हरी गणू कदम (भाऊ), यशवंत बापू करमाळकर, महादेव धनगर (देवास), तुकाराम साधु कुंभार (शाम), दत्तू लखू बाड (मारुती)-सर्व पडवळवाडी यांच्यावर पकड वारंट जारी केले. या सर्वांचा नेता नागनाथ अण्णा जेलमध्ये होता. त्यामुळे सर्वांना भूमिगत रहावे लागले. वाळव्यात किंवा पडवळवाडीत रहाणे धोक्याचे होते म्हणून सर्वजण पांडुरंग पाटलांच्या भावाकडे साखराळ्याला गेले. दोन-एक दिवस त्यांच्याकडे राहिले. पांडु पाटलांचे भाऊ आप्पा पाटलांची भेट न झाल्यामुळे बोरगावला सर्वजण आले. वाळव्याचे भूमिगत बोरगावला आल्याची बातमी जी.डी.लाड (बापू) ना कळाली. त्यांनी सर्वांची कुंडलमध्ये आपल्या मळ्यात आठ दिवस रहाण्याची सोय केली. तिथून ती मंडळी ग्रुप ग्रुपने शेरेदुशारात बराच काळ राहिली. ते गावच मुळी राष्ट्रप्रेमी होतं.

वाळवा शांत होता. इकडे नागनाथ अण्णांनी मनाशी एक निर्धार केला. 'जोपर्यंत जेलमधून आपण पलायन करत नाही तो पर्यंत पूर्ण एक भाकरी खायची नाही' त्याप्रमाणे ते दर दिवशी एका भाकरीतील एक तुकडा बाजूला काढून ते जेवत असत. एकदा मधेच बापू (वडील) व आई अण्णांना भेटून गेले. बापूंनी अण्णांना सांगितले ''जेलबिल फोडून पळून येऊ नकोस, पोलिसांना घावलास तर पोलिस गोळी घालतील. कवा सुटायचा तवा सूट पण पळून यायचा विचार सोड.'' आई व वडील (बापू) परत किसन अहिर (पैलवान) यांना भेटले व अण्णांचा शांत रहाणे बद्दलचा पुन्हा एकदा निरोप दिला. बापू व आई इस्लामपूर जेलमध्ये अण्णांना भेटून आल्यानंतर वाळव्याचे आप्पासाहेब सरकार थोरात आणि खंडेराव दाजी थोरात अण्णांना भेटण्यासाठी इस्लामपूरला मामलेदार भोसले यांच्या घरी आले. मामलेदार भोसलेना त्यांनी सांगितले 'आम्ही नागनाथना भेटायला आलोय. त्यांना आपल्या घरी आणायची व्यवस्था करा' त्या प्रमाणे डी.वाय.एस.पी. सावंत यांना मामलेदार भोसले साहेबांनी निरोप दिला. मध्येच आप्पासाहेब थोरात सरकारानी मामलेदारांना 'सांगितले आमच्याकडे आणताना त्यांना काडण्या किवा बेड्या बिलकूल घालायच्या नाहीत.' त्याप्रमाणे बेड्या न घालता आप्पासाहेब सरकारांची व खंडेराव दाजी थोरात यांची मामलेदारांच्या घरी नागनाथ अण्णांची भेट झाली. त्यावेळी सरकारनी अण्णांना दिलासा दिला आणि खंडेराव दाजी थोरात तर म्हणाले, ''नागनाथ तुम्हाला पकडले म्हणून वाळव्यातला स्वातंत्र्याचा लढा

शांत झाला नाही; उलट वाळव्यात आता घरा-घरांत क्रांतिकारक तयार झालेत." अत्यंत समाधानकारक भेट झाल्यावर नागनाथ अण्णांना परत इस्लामपूर कचेरीत नेण्यात आले. पलायनाची चक्रं फिरू लागली. अण्णांची रोजच्या रोज अंघोळीचे कपडे धुण्यासाठी जेलच्या बाहेर येत असत व धुतलेली कपडे जेलमध्ये दिली जात असत. त्या धुतलेल्या कपडयातून चिठ्ठ्यांची देवाण घेवाण चालू होती. पलायनाला मदत करण्यासाठी नेर्लेच्या महमंद हवलदाराना फितूर केले होते. त्या मोबदल्यात राहिलेल्या सर्व्हिसच्या कारकिर्दीत जेवढे पैसे त्याला मिळतील त्या पेक्षा जास्त रक्कम देण्याचे ठरले. कुठून, कुठल्या वेळी तुरुंगातून पलायन करायचे त्याचा इत्थंभूत आराखडा वाय.सी.पाटील व राजूताई पाटील (बिरनाळे ताई) यांनी बनवला होता. त्यासंबंधीची चिठ्ठी वाळलेल्या धोतराच्या घडीतून नागनाथ अण्णांच्याकडे पाठवली होती. वाळलेले कपडे तुरुंगात देत असता कपड्याच्या घडीतील चिठ्ठी खाली पडली आणि ती सी.आय.डी.च्या हाताला लागली. पोलिस खाते खडबडून जागे झाले. वायरलेस वरून डी.एस.पी.सातारा यांना निरोप धाडले. यंत्रणा टाईट केली. पहाऱ्यावरचे पहारेकरी बदलून नवीन पहारेकऱ्यांच्या नेमणुका केल्या. जादा स्पेशल हत्यारबंद पोलिसांची वेगळी बटालीयन बंदोबस्तासाठी ठेवली.कडेकोट बंदोबस्त ठेवला गेला. नागनाथ अण्णांना भेटण्यास कार्यकर्त्यांना मनाई केली.



इस्लामपूर जेलमध्ये चिठ्ठी सापडल्याने पलायनाचा बेत उघडकीस

दोनच दिवसांत साताऱ्याहून डी.एस.पी.ची ऑर्डर आली. नागनाथ नायकवडी यांना इस्लामपूर जेल मधून सुरक्षित अशा सातारा जेलमध्ये हलवा. पोलिसांना क्रांतिवीर नागनाथ अण्णा व त्यांच्या क्रांतिकारक भूमिगतांची भीती वाटत होती म्हणून त्यांना सातारला हालवताना विशेष दक्षता घेऊन त्यांना कधी हालवावयाचे याची गुप्तता ठेवली. अधिकाऱ्यांची आपसात खलबते चालू होती. एक दिवस अचानक कडेकोट बंदोबस्तात हत्यारबंद पोलिसांच्या बंदोबस्तात नागनाथ अण्णांना पोलिस गाडीत बसवले त्यांच्या बाजूला दोन-दोन हत्यारबंद पोलिस पुढे दोन-दोन हत्यार बंद पोलिस, पुढच्या एका गाडीत पोलिसांची पलटण मध्ये अण्णांची गाडी, पाठीमागे एस.आर.पी. ची (राखीव पोलिस)गाडी अशा सुरक्षतेखाली साताऱ्याकडे गाड्या निघाल्या.रस्त्यात पोलिसांची सारखी घालमेल होत होती. पोलिस सारखे बावरल्या सारखे भीतीच्या दडपणाखाली होते. अचानक एखादेवेळी क्रांतिकारक हल्ला करतील की काय? असा पोलिसांच्या मनात विचार येऊन गेला. सातारा जेलच्या दारात सर्व गाड्या सुरक्षित पोहचल्या. क्रांतिवीर नागनाथ अण्णांची गाडी जेलच्या आत गेली आणि पोलिसांनी एकदाचा श्वास घेतला. डी.वाय.एस.पी. भोसले यांनी जेलरला खास सूचना दिल्या-'यांनी इस्लांमपूर सबजेल मधून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता; म्हणून यांच्यावर नजर ठेवण्यासाठी एका खास पोलिसाची नेमणूक करा' असे सांगून पोलिस इस्लामपूर परतीच्या मार्गे लागले.

नागनाथ अण्णांना रात्रीच्या वेळी सातारा जेलमध्ये आणून सोडले होते.सातारा जिल्ह्यातला तो जेल अभेद्य असा आहे. अशा जेल मधून पळून जाणे सोपे नव्हते. डी.वाय.एस.पी. भोसलेंच्या सांगण्याचे गांभीर्य वाटले नाही. जेलरने त्या गोष्टीला विशेष महत्त्व न देता पूर्वी जेलमध्ये असलेल्या बर्डे गुरुजींवर लक्ष ठेवणाऱ्या अडिसरे पोलिसाला नागनाथ अण्णांच्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले आणि बर्डे गुरुजींना ज्या बऱ्याकमध्ये ठेवले होते, त्याच बराकीत नागनाथ अण्णांना ठेवले. त्यांना वाळव्यात पकडल्या पासून साताऱ्याला आणले तो ४० वा दिवस होता, तो वार होता गुरुवार. सातारच्या तुरुंगाला चारी बाजूला उंच-उंच काळ्या दगडांच्या भक्कम भिंती, तुरुंगाला एक मोठे प्रवेश द्वार, ते मोठ्या लाकडी दरवाजाने सतत बंद ठेवले जात असे. गरजेप्रमाणे त्याची उघडझाप केली जात होती. इतर वेळा लहान दिंडी दरवाजाने ये जा होत असे. सतत जेलच्या आत बाहेर चोवीस तास हत्यारबंद पोलिसांचा कडक पहारा असे. आतल्या आत कैद्यांना ठेवण्यासाठी बंद बऱ्याका बांधलेल्या आहेत. तसेच बरेच मोठे मोकळे मैदान कैद्यांना फिरण्यासाठी आहे. कैद्यांच्या अंघोळीसाठी मोठा पाण्याचा हौद, जेवण बनवण्यासाठी स्वयंपाक घर, धान्य भांडार (कोठी) लायब्ररी वगैरे आवश्यक तेवढ्या सोई केलेल्या आहेत. रात्री कैद्यांची हजेरी घेऊन सर्वांना बराकी मध्ये डांबले


जायचे आणि त्या बराकीच्या दरवाजाला कुलूप घातले जायचे. रात्रभर कडक पहारा असायचा. सकाळी सर्वांना प्रातर्विधी व आंघोळीसाठी मोकळे सोडले जायचे, अशी सातारा जेलमध्ये पद्धत होती. या पद्धतीची नागनाथ अण्णांना काडीमात्र कल्पना नव्हती. त्यांना आजच इस्लामपूरच्या सब जेलमधून आणले होते आणि सातारच्या सेंट्रल जेल मध्ये बर्डे गुरुजींच्या बराकी मध्ये बंदिस्त ठेवले होते.

सकाळी नेहमी प्रमाणे एक हवलदार आला. त्याने प्रत्येक बराकीची ओळीने कुलपे काढली. सर्व कैदी बाहेर आले. त्या प्रमाणे नागनाथ अण्णांही बाहेर आले आणि जेल मधल्या मोकळ्या मैदानात येऊन थांबले. तिथं त्यांना कामेरीचे एस.बी.पाटील भेटले. अण्णा त्यांना म्हणाले, ''अहो एस.बी., इस्लामपूरच्या जेलपेक्षा या जेलमधून पळून जायला सोप आहे. तुम्ही येणार का माझ्याबरोबर?'' एस.बी.पाटील म्हणाले, ''माझी शिक्षा संपत आली आहे. थोडे दिवस राहिलेत आता पळून जाण्यात काय अर्थ आहे.?'' हीच गोष्ट बर्डे गुरुजींना विचारली. त्यांनीही एस.बी.पाटलांच्या सारखेच उत्तर दिले. शेवटी अण्णा म्हणाले, ''मी जेल फोडून जातो. निदान मला तरी मदत करा.'' त्यावर एस.बी.पाटील म्हणाले,''मी हा जेल फोडून पळून जाण्यासाठी नियोजन केलं आहे. तुम्ही जेल फोडणार, तर माझ्या नियोजनाचा उपयोग केलात, तर तुम्ही नक्की यशस्वी व्हाल.'' एस.बी.पाटलांना अण्णा म्हणाले, ''मला पकडून इंग्रजांनी माझा अपमान केलाय. मला त्यांचा पराभव करून त्यांना धडा शिकवायचा आहे. काही झाले तरी मी तुरुंग फोडणारच.'' एस.बी.पाटील म्हणाले, ''ठीक आहे, मी काय सांगतोय ते ध्यान देऊन ऐका. हे बघा, एक-दोन वेळा मी आजारी असताना पोलिस मला सरकारी दवाखान्यात नेत असत. त्यावेळी मी तुरुंगाच्या आजूबाजूची जागा येता जाता पाहिलेली आहे. भिंतीच्या बाहेर तुरुंगाच्या सभोवतीने उंच असे तारेचे कंपाउंड आहे. पश्चिमेच्या बाजूला विटी दांडू, चेंडू फळीने खेळणाऱ्या पोरांनी विटी, चेंडू आणण्यासाठी तारा वाकवून वाट पाडली आहे. त्या शिवाय भाकड जनावरे चरायच्या निमित्ताने तारेच्या कंपाउंड मध्ये जात असत त्यांच्या जाण्या येण्याने वाट बरीच मोठी झालेली आहे. जवळच पोलिस लाईन आहे.'' अशी इत्थंभूत सर्व माहिती एस.बी.पाटील यांनी नागनाथ अण्णांना दिली. पलायनाची जागा निश्चित करण्यासाठी अण्णा व एस.बी.पाटील हातात हात घालून भिंतीला समांतर येरझाऱ्या घालून व्यायाम करणाच्या निमित्तान हिंडत फिरत एकदाची जागा निश्चित केली. मदतीसाठी म्हणून वशीचा सिटचोर साळीला (सिट चोर म्हणजे एकट्याने चोरी करावयाची) व नेर्लेच्या बाबूरामाचा भाऊ शामू रामा यांना तयार केले. प्रश्न पडला तो स्पेशल पोलिसाचा. तो पोलिस नागठाण्याचा अडिसरे नावाचा होता. त्यांना बर्डे गुरुजी व नागनाथ अण्णांच्यावर नजर ठेवण्याची स्पेशल ड्युटी दिली होती. याबाबत नागनाथ अण्णा एस.बी.पाटलांना म्हणाले,

''उद्या याची आपण ट्रायल घेऊ. सकाळी बऱ्याकीमधून आपण बाहेर आल्यावर बर्डे गुरुजींना पाण्याच्या हौदावर प्रातर्विधी व आंघोळीसाठी पाठवून देऊ. स्वत: मी दुसरीकडे जातो. पोलिस महत्त्व कुणाला देतोय ते पाहू.'' त्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी ट्रायल घेतली. बर्डे गुरुजी हौदाकडे निघाल्यावर नेहमीच्या सवयी प्रमाणे पोलिस बर्डे गुरुजींच्या मागे गेला. आता कसलीही अडचण राहिली नाही. पलायनाचा बेत अण्णांनी निश्चित केला. त्यांनी एस.बीं.ना तसे सांगितले व पुढील बेत पण सांगितला. सकाळी बऱ्याक मधून बाहेर सोडल्या बरोबर बर्डे गुरुजींनी हात पाय धुण्यासाठी पाण्याच्या हौदाकडे जायचे. तेथे त्यांनी नेहमी पेक्षा जास्त वेळ काढायचा. तुरुंगाच्या आतील एका पोलिसाची कटकट मिटली. दुसरा पोलिस कुलपे काढायच्या नादात आपोआपच रहातोय आणि तिसरा पोलिस धान्य कोठीतील शिदा घ्यायला जातो. त्याला तिकडेच एकाने गुंगवावयाचे आणि सिट चोर साळीने व शामू रामाने भिंती लगत भिंतीकडे तोंड करून बसावयाचे. त्या दोघांच्या खांद्यावर एस.बी. तुम्ही बसायचे आणि तुमच्या खांद्यावर मी बसावयाचे. पहिल्या जोडीने भिंतीचा आधार घेत हळू हळू उभा रहायचे, नंतर एस.बी.तुम्ही उभा रहायचे आणि शेवटी मी तुमच्या खांद्यावर उभे रहायचे. असा तिघांचा मनोरा करायचा आणि त्या वेळी मी धोतराचा सोगा एस.बी.च्या हातात द्यावयाचा आणि दुसऱ्या बाजूला भिंतीवरून खाली उतरताना दोरा सारखा धोतराचा उपयोग करायचा. (नागनाथ अण्णांच्या गुन्ह्याचा चार्जसिट आजून कोर्टात दिला नव्हता. त्यामुळे अण्णांना जेलमध्ये स्वत:चे कपडे वापरण्यास मुभा होती) सर्व नियोजन व्यवस्थित ठरवले. नंतर दुपारी अण्णांना जेल मधून बाहेर काढले व सर्व पोलिस चौक्यावरून (अगदी मेढ्यापर्यंतच्या) अधिकाऱ्यांना हेच 'नागनाथ नायकवडी' म्हणून ओळख करण्यासाठी फिरवले आणि चार वाजता परत सातारा जेल मध्ये आणून बर्डे गुरुजींच्या बऱ्याक मध्ये बंद केले. रात्री बर्डे गुरुजींनाही जेल फोडण्याचे नियोजन समजून सांगितले. गुरुजींनीही त्या नियोजनाला संमती दिली.

क्रांतिवीर नागनाथ अण्णां जेलमध्ये आलेला तिसरा दिवस होता. चौथ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे प्रातर्विधी व अंघोळीसाठी सर्व कैंद्यांना सोडण्यासाठी पोलिसाने बराकीच्या किल्ल्या घेऊन कुलपे काढण्यास सुरुवात केली. प्रथम बर्डे गुरुजींच्या बऱ्याकीचे कुलूप काढले. नागनाथ अण्णा व बर्डे गुरुजी बाहेर आले. ठरल्याप्रमाणे बर्डे गुरुजी पाण्याच्या हौदाकडे गेले. अडिसरे पोलिस बर्डे गुरुजींच्या बरोबर गेला. एस.बी.पाटील, साळी व शामूरामा बाहेर आल्या बरोबर चौघेही पलायनच्या भिंतीजवळ गेले. वशीचा सिटचोर साळी व नेर्लेचे बाबू रामाचे भाऊ शामूराम भिंतीकडे तोंड करून बसले, लगेच एस.बी.दोघांच्या खांद्यावर बसले. लगेच नागनाथ अण्णां एस.बी.च्या खांद्यावर बसले. नियोजनाप्रमाणे पहिली जोडी उभा राहिली. नंतर एस.बी.पाटील

उभा राहिले आणि शेवटी अण्णा उभा राहिले. अण्णा एस.बी.च्या खांद्यावर उभे राहिल्यावर छातीच्या खाली पर्यंतचा भाग भिंतीच्या वर आला. भिंतीवर चढायचे म्हटले तर भिंतीवर हाताचा जोर देऊन भिंतीवर चढणे भाग होते. विचार करायला वेळ नव्हता. नागनाथ अण्णा भिंतीवर चढले. तुरुंगाच्या बाहेर पाहिल्यावर ये जा करणारे लोक दिसले. रविवार १० सप्टेंबर १९४४ चा नुकताच सूर्योदय व्हायला लागला होता. त्या उगवत्या सूर्याला साक्ष ठेवून कसलाच विचार न करता १८ फूट उंचीच्या तटावरुन डोळ्याचे पाते लवते न लवते तो पर्यंत त्यांनी खाली उडी मारली. तळहाताला थोडीसी इजा झाली. बाकी कुठेही खुट्ट झाले नाही.




**सातारा जेलमधून क्रांतिवीर अण्णांचे पलायन**

तळहातातून रक्त येत होते. विचार करायला नागनाथ अण्णांना वेळ कुठे होता? तुरुंगाच्या बऱ्याकीतून बाहेर पडल्यावर सूर्योदयाच्या बरोबर आठव्या मिनिटाला भिंतीवरून उडी मारली व तुरुंगातून बाहेर पडले. रक्ताने माखलेले तळहात मातीत चोळले आणि शेळीसाठी गवत उपटतोय असा देखावा करत, गवत उपटत-उपटत मुलांनी वाट पाडलेल्या तारेच्या कंपाउंडमधून बाहेर पडले. समोर बघतायत तो एक पोलिस हातात पिशवी घेऊन पोलिसचाळीत निघाला होता. अण्णांनी पवित्रा बदलला आणि त्याच्या पाठोपाठ पोलिसचाळीत निघाले. मनात ठरवलं पोलिसचाळीत पहिल्या घराचे समोर जायचे आणि पोलिस घरात दिसला, तर त्यांना म्हणायचे हवलदार

साहेब,''मी खेड्यातील एक गरीब तरुण आहे मला पोलिसात भरती व्हावयाचे आहे. तुम्ही मला काय मदत करू शकाल काय?' जर पोलिस घरात नसलाच आणि त्याची बायको दिसली तर त्यांना म्हणायचे 'अहो मावशी बाई हवलदार साहेब कुठायत? त्यांनी मला नोकरी कामासंबंधी बोलावले होते' असे म्हणायचे. पण नागनाथ अण्णांचे दैव बलवत्तर. पहिल्या घरात कोणही समोर दिसले नाही. अण्णांनी समोरच्या घराच्या पायरीवर जो पाय टाकला होता; त्याच पायावर गिरकी मारून घूमजाव केले. तडक पोलिस चाळीतून सातारा शहराचा रस्ता धरला. त्यांना पाहणाऱ्यांना त्यांच्याबद्दल काहीही संशय आला नाही, कारण ते पोलिस चाळीतूनच येत होते. इकडे तो पर्यंत सातारा जेलमध्ये मोठा हाहाकार झाला. तुरुंगातील स्पेशल पोलिस हवलदार व बऱ्याकीच्या दारांना कडी कुलपे घालणारा हवलदार हवालदिल झाले. 'सकाळच्या हजेरीला असणारा कैदी गेला कुठे? जमिनीत गडप झाला की आकाशात उडून गेला? नेमकं काय?' पोलिसाने एस.बी.पाटलांच्याकडे चौकशी केली. ''नागनाथ कुठाय?'' एस.बी. म्हणाले, ''आता माझ्याजवळून पाण्याच्या हौदाकडे जातो म्हणून गेला.'' पोलिस पाण्याच्या हौदाकडे जाऊन आला.''अहो, पाण्याच्या हौदाकडे नागनाथ नाही.'' त्यावर एस.बी.पाटील म्हणाले, ''असं होय. अहो हवलदार, मग तो मला मेसमध्ये काहीतर काम आहे म्हणत होता. मग तिकडे गेलाय काय? बघा.'' पोलिस पळतच मेसमधून परत तेच सांगत आला. मग एस.बी.म्हणाले, ''अहो हवलदार, आता माझ्या लक्षात आले तो लायब्ररीत पुस्तकं आणायला जाणार म्हणाला होता. तिकडे आहे का पहा.'' पोलिस लायब्ररीत पळत गेला आणि पळतच परत आला आणि एस.बी.ना म्हणाला ''नागनाथ लायब्ररीत नाही.'' एस.बी.म्हणाले, ''अहो हवलदार साहेब, येवढं घाबरताय कशाला? कुठं जातोय नागनाथ? बर्डे गुरुजींच्यांकडे बसला असेल गप्पा मारत.'' अशा पद्धतीने एस.बी. पाटील यांनी वेळ काढला म्हणून नागनाथ अण्णा सुरक्षित ठिकाणी पोहचले.

कुठेच नागनाथचा पत्ता लागत नाही म्हटल्यावर कैदी पळाल्याचे घोषित केले. बिगुल वाजायला लागला. सातारा शहरात अण्णांची शोधा शोध सुरू झाली. त्याला आता खूप वेळ झाला होता. सातारा जेलच्या तटावरुन उडी मारून नागनाथ अण्णा सातारा शहराच्या दिशेने चालले होते. एका घराला वकिलाच्या नावाची पाटी दिसली. त्या काळात वकील मंडळी व शाळा मास्तर जवळ-जवळ सर्वच राष्ट्रप्रेमी होती. वकिलाची आपल्याला मदत होईल म्हणून त्याच्या घरात जाताना हातातील गवताची मूठ त्याच्या छोट्याशा बागेच्या कोपऱ्यात टाकली आणि 'वकील साहेब आहेत का?' म्हणून विचारले. घरातून बाईमाणसाचा आवाज आला (बहुतेक त्याची

बायको असावी) 'आहेत अंघोळ करतायत, तुम्ही बसून घ्या.' घरात येऊन ते खुर्चीवर बसले. समोरच्या भिंतीवर त्यांना पंचम जॉर्जचा फोटो लटकवलेला दिसला. वाघाच्या घरात आपण पाहुणा म्हणून आलोय हे त्यांनी ताबडतोब ओळखले आणि दूध घालायला आलेल्या शेतकरी बाईला पाटी उचलू लागल्याच्या निमित्ताने ते उठले. त्या बाईच्या डोक्यावर पाटी ठेवली ते तडक घराच्या बाहेर पडले. थोडे चालल्यावर रस्त्यालगत कन्याशाळेजवळ जाजू मारवाड्याचे दुकान लागले. जाजू मारवाडी राष्ट्रप्रेमी होता. शिवाय अण्णांची व त्याची ओळखही हाती.त्यांना घडला प्रकार थोडक्यात सांगितला. जाजू म्हणाले, ''दिवसभर दुकानला गिऱ्हाइकांची वर्दळ असते. उगीच धोका पत्करायला नको.'' नागनाथ अण्णा म्हणाले, ''ठीक आहे. मला सोमवार पेठेतील  कर्मवीर अण्णांचे घर दाखवायला माणूस द्या.'' त्या प्रमाणे त्यांनी आपल्या भाच्यास त्यांच्या बरोबर दिले. थोडे अंतर चालून गेल्यावर सोमवार पेठेतील कर्मवीर अण्णांच्या घरचा रस्ता लक्षात येताच जाजूच्या भाच्यास परत जायला सांगून ते सोमवार पेठेतील कर्मवीर भाऊराव अण्णांच्या घराजवळ आले. आंगणात दोन मावशीबाई  धांन्य निवडीत बसल्या होत्या.  दारातच लहान मुलीला घेऊन उभे राहिलेले शंकरराव सुखटनकर दिसले. त्यांना अण्णा म्हणाले, ''सुखटनकर साहेब तुम्ही मला ओळखत नाही पण मी तुम्हांला चांगला ओळखतो 'गणी आत्तारना नागनाथांनी बोलवलय येवढा निरोप द्या' असे सांगून सरळ कर्मवीर अण्णांच्या घरात शिरले. त्यांच्या मच्छरदाणी लावलेल्या कॉटवर जाऊन निवांत झोपले. काही क्षणातच क्रांतिवीर नागनाथ अण्णांची गडद झोप लागली.



क्रांतिवीरअण्णा कर्मवीरांच्या कॉटवर विसावले

क्रांतिवीर नागनाथ नायकवडींनी अभेध्य असा सातारचा जेल फोडून यशस्वी पलायन केल्याची बातमी सातारा शहरापासून जिल्ह्यापर्यंत पोहचली. सर्व जनतेला, भूमिगतांना आनंद झाला. याने ब्रिटिशांची चांगलीच जिरवली. 'वारे बहाद्‌रा!' म्हणून अनेक जणांनी आपला आनंद व्यक्त केला. रहिमतपूरचे एक पैलवान रहिमतपुरापासून साताऱ्यापर्यंत अण्णांच्या नावाच्या घोषणा देत ते साताऱ्यापर्यंत पळत येऊन त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. १० सप्टेंबर १९४४ ला नागनाथ अण्णांनी जेलमधून पलायन केले. त्या दिवशी त्यांना भेटण्यासाठी मिरजवाडीहून त्यांचे आजोबा संभाजी साळुंखे आले होते. त्यांना एस.बी.पाटलांनी सांगितले 'नागनाथ सकाळीच तटावरून उडी मारून पळून गेला आहे. पोलिस चाळीच्या बाजूच्या जेलच्या तारेच्या कंपौडजवळ पाहून या.' तिथच पडलाय का? सही सलामत निघून गेलाय? त्या प्रमाणे त्यांनी आपला नातू सही सलामत गेल्याची खात्री केली आणि जेलरला सांगितले, "मी नागनाथचा आजोबा आहे. मी त्याला भेटायला आलोय मला त्याची भेट द्या." त्यावर जेलर खेकसूनच म्हणाला, "तुमचा नातू जेल फोडून पसार झालाय." आजोबाने जेलरला दम दिला. "इतक्या कडक बंदोबस्तातून पळून गेला म्हणून मला खोटं सांगताय? अगोदर माझा नातू कुठाय ते सांगा? नाहीतर मी तुमच्या पुढं डोक फोडून घेईन. तुम्हीच माझ्या नातवाला मारलय आणि वर पळून गेलाय म्हणून सांगता काय?" जेलर नरमला. तो काकुळतीला येऊन आजोबांना म्हणाला, "अहो, खरच सांगतोय तुमचा नातू जेल फोडून पसार झाला."

नागनाथ जेल फोडून आल्याची बातमी गणी आत्तारना समजली होती. पण तो कोठे आहे, कुठे गेलाय हे माहीत नव्हते. एवढ्यात सुखटनकर साहेबांनी गणी अत्तारना नागनाथनी तुम्हांला बोलावलेचे सांगितले. ते आता कर्मवीर अण्णांच्या घरात आहेत म्हटल्यावर त्यांनी आपल्या घराच्या मागच्या दाराची कडी काढून ठेवली आणि नागनाथना आणण्यासाठी कर्मवीर अण्णांचे घरी गेले. मावशीबाईंना विचारले, "नागनाथ कुठायत?" त्यावर त्या बाई म्हणाल्या, "ते नागनाथ आहेत का कोण हे मला माहीत नाही. पण आत एक माणूस अण्णांच्या कॉटवर गाढ झोपलेला आहे. पाहिजे तर आत जाऊन बघा." जवळ जाऊन गणी आत्तारनी नागनाथ अण्णांना जागे केले व हाताने खूणवून माझ्या पाठीमागून या म्हणून पुढे चालू लागले. आपल्या मागच्या दाराने त्यांना घरात घेतले व बायकोला जेवण तयार करायला सांगितले. रुबेदाने (गणी आत्तारची पत्नी) जेवण तयार झाल्यावर दोघांना जेवायला वाढले. दोघेही ताटावर बसले खरे; पण नागनाथ अण्णांना घास गिळतोय कुठे? ते तसेच ताटावर बसून राहिले. ही गोष्ट गणी आत्ताराच्या लक्षात

आली. ते त्यांना म्हणाले, ''अरे नागनाथ, जेव. भिण्याचे कारण नाही. अरे बाबा, या गणीचा अगोदर मुडदा पडेल, मगच पोलिस उंबऱ्याच्या आत पाऊल ठेवतील.'' (एक प्राध्यापक मास्तर असं धाडसाने बोलतोय आणि आपण?) मग मात्र नागनाथ अण्णा मनापासून पोटभर जेवले. (कारण अटक झालेल्या दिवसापासून त्यांनी व्रत घेतले होते. ''जेल फोडल्याशिवाय एक पूर्ण भाकरी खायची नाही.'' त्याप्रमाणे भाकरीतला एक तुकडा बाजूला काढून ते जेवत असत. त्या गोष्टीचा आज चव्वेचाळिसावा दिवस होता. शिल्लक भूक त्यांनी आज पूर्ण केली. गणी आणि नागनाथ अण्णांनी दिवसभर मनसोक्त गप्पा मारल्या आणि साताऱ्यातून पसार होण्याचा प्लॅन तयार केला.

त्या दिवशी दिवसभर गणी आत्तारनी नागनाथ अण्णांना आपल्या घरात ठेवून घेतले. सर्व सातारा शहरात शस्त्रधारी व नि:शस्त्र पोलिसांची सारखी धावपळ होती. पोलिसांनी सर्व शक्ती नागनाथवर एकवटली होती. हजारो हत्यारे नागनाथांच्या मार्गावर निघाली. शेकडो घोडेस्वार सातारा शहरभर फिरू लागले.पोलिसांनी सर्व सातारा शहर पिंजून काढले अण्णांचे गाव वाळवे दक्षिण साताऱ्यात मोडत होते म्हणून दक्षिणेकडे पोलिसांच्या तुकड्या त्यांच्या मार्गावर पाठवल्या होत्या. साहेबलाल सन्दे सर व महादेव ग.पाटलांच्याकडे (बापू मास्तरांचा भाऊ) साताऱ्यातून बाहेर काढण्याची कामगिरी गणी आत्तारनी त्या दोघांवर सोपवली. त्या दोघांनी त्यांना आपल्या खोलीवर आणून ठेवले. साहेबलाल संदे हे अण्णांचे वर्गमित्र होते. महादेव पाटलांनी व संदे सरांनी साताऱ्यातील इत्थंभूत माहिती काढण्यासाठी म्हणून ते दोघे एक हॉटेलमध्ये चहा पीत बसले होते. त्या हॉटलेमध्ये अचानक साहेबलाल संदेचा मित्र जो सी.आय.डी. खात्यात नोकरी करत होता त्याचे नाव अशोक होते. ते आले आणि चहा पीत गप्पा मारता, मारता त्यांने एक फोटो संदेसरांना दाखवला व म्हणाला, ''हा एका वीरपुरुषाचा फोटो आहे. त्या वीर पुरुषाने अती अवघड असा सातारचा जेल दिवसा ढवळ्या फोडून पोलिस खात्याच्या हातावर तुरी दिल्या आणि सही सलामत निघून गेला.'' संदे सरांनी फोटो पाहिला. तो क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा होता.त्याने साहेबलाल संदेना सहज बोलता बोलता इंग्रजी आदेशाचे गुपित सांगितले.

''नागनाथ नायकवडी दिसता क्षणी गोळी घालण्याचा आदेश इंग्रज सरकारने दिला आहे. पोलिस कमी पडले म्हणून बेळगावहून पाचशे पोलिसांची एक सशस्त्र तुकडी मागवली आहे. सर्व सातारा शहराला पोलिसांचा वेढा घातलेला आहे.'' असे तो मित्र त्यांना सांगत होता. आणखीन थोडा वेळ मित्रा बरोबर गप्पा गोष्टी झाल्यावर संदे मास्तर तडक आपल्या खोलीवर निघून आला. ते गणी

आतारांच्या घराजवळच सोमवार पेठेत येवलेकर बिल्डिंग मध्ये तिसऱ्या मजल्यावर एका खोलीत रहात होते. ते दोघे मित्र खोलीवर आले तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. त्या दोघांनी नागनाथ अण्णांना सातारा शहराची सर्व हकीकत सांगितली. त्या बातमीचा सर्व अंगांने विचार केल्या नंतर दिवसभराचे वेळेत अण्णांनी सातारा शहरातून निसटून जाण्याचे नियोजन केले होते. त्यासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नीतीचा अवलंब करण्याचे ठरवले होते.

रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान वेशांतर करून नागनाथ अण्णांनी महादेव पाटील व साहेबलाल संदेसह खोली सोडली. धनिणीच्या बागेच्या पश्चिम दिशेने निघून बागेच्या दक्षिण दिशेच्या भल्या मोठ्या टेकडीला वळसा घालून उत्तर दिशेने मेढ्याकडे मार्गक्रमणाला सुरुवात केली. लांबवर पोलिस चौक्या व पोलिसांच्या बॅटरीचे लांबवर पडणारे प्रकाशझोत दिसत होते. लपत-छपत चंद्राच्या अंधुक प्रकाशातून सातारचा वेढा पार करण्यात ते यशस्वी झाले आणि सरळ मेढ्याच्या रस्त्याला लागले. पोलिसांचा अंदाज नागनाथ हे आपल्या भागात दक्षिणेकडे गेले असतील असा होता. त्यामुळे त्यांनी जास्तीत जास्त तपासाची यंत्रणा दक्षिणेकडे लावली होती आणि पुना हायवेकडे आणि सातारा रेल्वे स्टेशनच्या भागात थोड्या पोलिसांच्या तुकड्या पाठवल्या होत्या. पश्चिम भाग सारा दऱ्या खोऱ्यांचा, जंगल झाडीचा, हिंस्र प्राण्यांनी व्यापलेला होता. त्या बाजूला तुरळक एक- दोन पोलिसांच्या तुकड्या शोध मोहिमेच्या तैनातीवर होत्या. मेढ्याच्या रस्त्याने तिघे सावधगिरीने चालले होते. मेढ्याच्या रस्त्यावर तुरळक एखादे वहान यायचे. त्यावेळी मुख्य रस्ता सोडून तिघेही झाडीच्या आडोशाला लपून बसायचे. अशा लपाछपिने तिघेही सातारा मागे ठेवून पुढे वाटचाल करत होते. थोडे अंतर चालून गेल्यावर मध्येच बैलांच्या गळ्यातील चाळांचा आवाज यायला लागला. थोडासा उजेड दिसला म्हणून बाजूला झाडाच्या सावलीत थांबले. बैलगाडी जवळ आली. बैलगाडीच्या दांड्याला लटकवलेला कंदील दिसायला लागला. गाडीत गाडीवान एकटाच होता. धोका नसल्याची खात्री करून त्यांनी गाडीवानाला विचारले, ''गाडीवान दादा, आपण एवढ्या अपरात्री कुठे चाललात? आम्ही गाडीत बसू का?'' गाडीवान म्हणाला, ''बसा पोरांनो, मला बी तेवढी सोबत झाली.'' तिघेही गाडीत बसले डोंगर झाडीचा प्रदेश होता. गार हवा अंगाला झोंबत होती. मध्येच कोल्हेकुइचे आवाज कानावर येत होते. गाडीवाना बरोबर गप्पा मारत वाट मागे टाकत तिघे चालले होते. गाडी मेढ्याला जाणार होती हे गाडीवानाने सांगितले होते. दहा अकरा मैलांचा पल्ला गाठल्यावर ते तिघेजण काळोशीला जाणाऱ्या फाट्यावर बैलगाडीतून उतरले. परंतु हा मार्ग मधला पाऊल वाटेचा होता. जंगलातून आणि डोंगर कपारीचा होता. या

रस्त्याला पोलिसांचा कसलाच धोका नव्हता. उंच उंच गवत असलेल्या पाऊल वाटेने ते तिघे काळोशी जवळ करायला लागले. या वाटेने दिवसा जायचे म्हटलेतर एकट्या दुकट्या माणसाने जाण्याचे धोक्याचे होते. साप,विंचू काट्यांपेक्षा हिंस्त्र प्राण्यांची भीती दांडगी होती. लांबवरून हिंस्त्र प्राण्यांचे आवाज कानावर येत होते. कशाचीही पर्वा न करता नागनाथ अण्णा पुढे झपाझपा चालत होते. त्यांच्या पाठीमागून चालताना या दोघांची फजिती व्हायची. रात्र चांदण्याची होती. जंगलझाडी दाट होती. खुल्या मोकळ्या मैदानातून चालताना चांदण्याचा उपयोग व्हायचा. इतर वेळी हातातील छोट्या बॅटरीचा वापर करून कसेतरी काळोशी गावच्या वेण्णा नदीच्या पाणवठ्याला ते त्रिकूट आले. नदीतून खळखळ आवाज करत एक सारखे पाणी वहात होते. चंद्र प्रकाशात सगळा पाणवठा प्रकाशमय दिसत होता. मध्येच चंद्रमा काळ्या ढगांच्या आत लपत होता. तिघेजण एकमेकाला आधार देत ओढणाऱ्या पाण्यातून नदीपार करत होते. पाण्याला ओढ चांगली होती. हळू हळू का होईना तिघेही दुसऱ्या तीराला पोहचले. हातातली पायतानं पायात सरकवत जवळच असलेल्या काळोशी गावचा रस्ता धरला. किर्र.... झाडीतून घुमणारे रातकिड्यांचे व वन्य प्राण्यांचे आवाज काळजात धस्स करणारे होते मध्येच सापाचे फुसकारे, पायात येणारी बेडकं, चपलांचे करकर होणारे आवाज, स्मशान शांततेचा भंग करत होते. कशाचीही तमा न करता नागनाथअण्णा पुढे चालले होते. काळोशीत नागनाथ अण्णांचे मित्र बोगर गुरुजी, कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेच्या व्हॉलंटरी शाळेत शिक्षकाचे काम करत होते. ते वाळवे तालुक्यातील येलूर गावचे राहणारे होते. त्यांनी कामातून त्या गावावर चांगला दबदबा निर्माण केला होता. ते पोलिस पाटलांच्या घरात रहात होते. तिघेही काळोशी गावात बोगर गुरुजींच्या घराजवळ आले. अण्णांनी गुरुजींना हाक मारून उठवले. गुरुजींनी अण्णांचा आवाज ओळखला, लगबगीने दार उघडले आणि आश्चर्याने,''नागनाथ, तुम्ही इतक्या रात्री?'' अण्णा हसत हसत म्हणाले, ''गुरुजी, स्वातंत्र्याचा प्रकाश पाहिजे असेल तर हा पारतंत्र्याचा अंधार गाडायचा आहे.'' असे म्हणत गुरुजींना मिठी मारली.

बोगर गुरुजींना नागनाथ अण्णांनी जेल फोडल्याची बातमी दुपारीच समजली होती. पोलिस पाटलांचेकडे मामलेदार आले होते. त्यावेळी गुरुजी घरीच होते. तरीही अण्णांनी आपण सातारचा जेल फोडल्याचे गुरुजींच्या कानावर घातले. गुरुजी म्हणाले, ''होय, मला हे समजले आहे. तुम्ही काही काळजी करू नका. मी आपणाला सही सलामत आपल्या भागात पोहोचवण्याचे काम करतो. मी इथल्या लोकांना व्हॉलंटरी शाळेची तपासणी करणारे साहेब आलेत अशी बतावणी करतो.'' तिघेही म्हणाले, ''ठीक आहे.'' पण त्यातून नागनाथ अण्णांना काय वाटले कुणास

ठाऊक. त्यांना धोक्याचे संकेत कसे मिळतात देव जाणे. ते म्हणाले, "मी इथे थांबत नाही. पुढे एकिवला भगवान पाटलांचे कडे जातो. गुरुजी, कमी जास्त निरोप सांकेतिक भाषेत निरोप्या करवी कळवा किंवा सवड असल्यास स्वत: या." पहाटेच्या कोंबड्याने जसी बांग दिली तसे तिघांनी ताबडतोब बोगर गुरुजींची खोली सोडली आणि एकीवचा रस्ता पकडला. एकीव गाव हे सह्याद्री पर्वत रांगेत उंच अशा एका डोंगर फाट्याच्या माथ्यावर होते. पश्चिमेचा संपूर्ण भाग किर्रर्र.... जंगलाने भरलेला होता. एका बाजूला उंचचउंच डोंगर रांगा, तर दुसऱ्या बाजूला खोल-खोल दऱ्या. बोगर गुरुजींनी त्यांना एकीवच्या पाय वाटेवर डोंगराच्या पायथ्याजवळ आणून सोडले व ते परत गेले. तिघांनी काळोशी गावाला मागे ठेऊन एकीव गावचा चढणीचा रस्ता धरला. पहाटेचा गार वारा उत्साहात भर घालत होता. पहाट होता होता तांबडं फुटलं. दिवसाचा लाल गोंडा दिसू लागला. पाखरांची किलबिल चालू झाली. आकाशात पक्ष्यांचे थवेच्या थवे उंच उंच भराऱ्या मारू लागले. दिवस सोनेरी किरणांची उधळण करत वरती सरकू लागला; तसी एकीव गावची छपरे दिसायला लागली. भगवान पाटलांची झोपडी गावाच्या बाहेरच्या बाजूला थोड्याशा अंतरावर झाडा झुडुपांच्या गर्द अशा ताटव्यात दडली होती. भगवान पाटील हे वाळवे तालुक्यातील शिगावचे रहाणारे. राष्ट्र सेवा दलातील एक कार्यकर्ते. अण्णांचे जिवा भावाचे मित्र होते. सकाळी लवकर तिघेही भगवान पाटलांच्या घराच्या पुढच्या अंगणात आले. तेव्हा भगवान मास्तर अंगणाची झाड लोट करण्यात मग्न होते. सहज मास्तराचे लक्ष या तिघांच्याकडे गेले. अण्णांना पाहताच मास्तरांना आश्चर्य आणि कुतूहल वाटले. आनंदाने मास्तरांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांनी हातातला झाडू तिथेच टाकला आणि पळत जाऊन अण्णांना मिठी मारली. ही मिठी दोन मित्रांची की राम-भरत भावांची? ती त्यांनाच माहीत. तिघांना बसायला त्यांनी चटई अंथरली, चूळ भरायला पाणी दिले आणि गरम दुधाचे ग्लास भरून हातात देत मास्तरांनी चटईवर बैठक मारली. साहेबलाल संदे सरांनी "हे आपली शाळा तपासायला आलेले साहेब" म्हणून नागनाथ अण्णांची ओळख करून दिली. भगवान पाटील हुशार, हजरजबाबी होते. त्यांना अण्णांनी दूध पिता-पिता सर्व झाला प्रकार सांगितला होता. ते म्हणाले, "साहेबलाल तुम्ही माघारी साताऱ्याकडे कूच करा. आम्ही अण्णांना सुखरूप पोहचवतो" आणि सर्वजण जोर जोराने हसू लागले.

भगवान पाटलांनी नागनाथ अण्णांना व्हॉलंटरी शाळेकडे नेले. रस्त्याने जाताना एखादा दुसरा माणूस किंवा बाईमाणूस आडवे आले तर त्यांना बाजूला व्हा म्हणायचे, "शाळा तपासयाला साहेब आलेत. तुम्हाला माहीत नाही का?" अशी

बतावणी करत शाळेकडे आले. शाळेत सर्व मुलांची ओळख करून दिली 'हे साहेब आपली शाळा तपासायला आलेत.' असेच दोन-एक दिवस गेल्यावर धन्वंतरी वैद्य अण्णांचा मार्ग काढत काळोशीवरून एकीवमध्ये आले. एकीव हे जावळी तालुक्यातील गाव कास तलावाच्या काठावर वसले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचे वधाचे वेळी या दुर्गम भागाचा फार उपयोग करून घेतला होता. अशा या दुर्गम भागात अण्णा सुखरूप होते. तिसऱ्या दिवशी भगवान पाटील, नागनाथ अण्णा आणि धन्वंतरी वैद्य यांनी एकीव गाव सोडले, पुढे त्यांनी सह्याद्रीच्या डोंगर कपारीतील दुर्गम भागातील रयत शिक्षण संस्थेच्या बऱ्याच व्हॉलंटरी शाळा होत्या त्या पैकी परतीच्या वाटेवरील शाळा तपासण्याचा बहाणा करत पाली मार्गे सज्जनगडाच्या पायथ्याला वळसा घालून डोंगराच्या माथ्यावरील पायवाटेने इंदोलीला क्रांतिकारक दिनकरराव निकमांच्याकडे आले. तेथून पुढे बहिर्जी नाईक संघटनेच्या हेरांमार्फत भूमिगतांना निरोप पाठवले. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे पाटणचा डोंगर उतरून कोयनेच्या खोऱ्यातील तांबवे गावात प्रकट झाले. तेथे यशवंतराव चव्हाणांसह (जे पुढे उपपंतप्रधान झाले) अनेक भूमिगत जमले होते. नागनाथ अण्णांनी तुरुंग फोडल्याची बातमी ऐकून वाळवे, पडवळवाडीचे सर्व भूमिगत शेरे दुशार गावाच्या आश्रयाला होते. ते सर्वस्वी किसन आत्माराम अहिर (पैलवान), खंडू सखाराम शेळके (दाजी), रामचंद्र संतू अहिर (मास्तर), तुकाराम नाना खोत (वस्ताद), देवास, मारुती बाड, करमाळकर तात्या वगैरे जणू अण्णांच्या बालेकिल्ल्यातील कट्टर मावळे भेटण्यास आले होते. पुढे या आपल्या विश्वसनीय मावळ्यांच्या संरक्षणात अण्णा ऐतवडेला आपल्या कॅंपवर सुखरूप पोहोचले.

# गोटखिंडी गावचा वेढा पार

कृष्णा-वारणा खोऱ्यात मल्लिकार्जूनच्या डोंगराच्या पायथ्याला हिरव्या गर्द झाडीच्या आडोशाला वसलेले गोटखिंडी हे गाव (पुर्वीच्या दक्षिण साताऱ्यातील वाळवे तालुक्यातील नावाजलेले एक मोठे खेडे) डोंगराच्या वरच्या कपारीला झाडा झुडपांच्या वनराईत लपलेले मल्लिकार्जूनचे सुंदर मंदिर आहे. देवाचे दर्शन घेऊन डोंगर माथ्यावर आल्यावर चोहो बाजूला नजर फिरवली असता दिसणारा सारा आकर्षक परिसर पाहून मन आनंदाने भरुन येते. दूरवर पश्चिमेस पाहिलेतर जंगल झाडीतला शिराळा पेठा दिसतो. पुर्वेला पाहिल्यावर आष्टा परिसर दिसतो. दक्षिणेस पाहिले असता वारणानदीच्या कुशीत वसलेली लहान मोठी खेडी दिसतात. उत्तरेस दूरवर पाहिलेस तर काळ्या भोर सुपिक पठारावर वाळवा गाव व कृष्णा नदी दिसते आणि खाली डोंगराच्या पायथ्याकडे पाहिले की, अवरस-चौरस चारी दिशेला पसरलेले गोटखिंडी गाव दिसते. गावात घर तशी एकमेकाला खेटून बांधलेली, कांही कुंभारी कौलाची तर कांही दगडमातीची कौलाची, कांही उंच माड्या तर कांही घडीव दगडाचे मोठ मोठे वाडे, एकूण ज्यांच्या-त्यांच्या ऐपती प्रमाणे आहे. गावात मध्यावर अमृतेश्वराचे जागृत दैवत, त्या मंदिरात सुबक दगडी बांधकाम असलेला देवाचा गाभारा. त्यावर उंच अस देखण शिखर आणि गाभाऱ्यापुढे भाविकांच्यासाठी भव्य मंडप, समोर पाण्यासाठी विहीर, या मंदीराला चारी बाजूने भिडणारे रस्ते आणि त्या रस्त्याला छेदणाऱ्या लहान-मोठ्या पाऊल वाटा, चोळं-बोळं अशी गोटखिंडी गावची अंतर्गत रचना आहे. एखाद्या भूमिगताच्या मागे पोलिस लागावेत त्याने देवाचे दर्शन घ्यावे

आणि पटकन एका पाउल वाटेने नाहिसे व्हावे आणि पोलिस पार्टी मंदीराच्या आवारातच घुटमळावी अशी परिस्थिती त्या जून्या काळात होती. (आज मात्र या गावत खूप सुधारणा झाल्या आहेत.)

या गावात अनेक जाती-पातीची, धर्माची माणसे गुण्या गोविंदाने राहतात. ती मनाने आणि दिलाने एक आहेत. गावात कांही आकरीत घडलतर त्या माणसाच्या मदतीला गाव कसा धावून जायचा. अशा या गावातला बहूतांशी शेतकरी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या बाजूचा आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णां यांच्यावर प्रेम करणारा आहे. अशा या गावात सातारच्या डी.एस.पी.ने चारशे पोलिसांचा गराडा क्रांतिवीर नागनाथ अण्णांना पकडण्यासाठी घातला होता. त्या वेढ्यातून अण्णा कसे निसटले याची ही कथा.....

महात्मा गांधीच्या ''करा किंवा मरा'' या संदेशाने देश पेटून उठला होता. जनतेने इंग्रजी सत्तेला हैराण करण्यासाठी अनेक मार्गांचा अवलंब केला होता. कोण फोनच्या तारा तोडत होता, तर कोण रेल्वेचे रुळ उखडून टाकत होता. तर कोण हात बॉम्ब लावून रस्त्यावरील पूल उध्वस्त करीत होता. तर कोणी इंग्रजांची रसद लूटीत होता. अशाच एका प्रसंगात टेलिफोनच्या तारा तोडण्याच्या कामात कांही गोटखिंडी गावच्या मंडळींचा हात होता. याचा सुगावा पोलिसांना लागला. त्यांच्या गुप्त अहवालावरून इंग्रजी सरकारने नुकसान भरपाई म्हणून सर्व गावावर सामुदाईक दंड रु. १८००/- बसवला होता. (कोण म्हणते दंड १८ हजार रुपयाचा होता.) त्याचे वसूलीचे काम चालू होते. लोक हवालदिल झाले होते. या गोष्टीचा क्रांतिवीर नागनाथ अण्णांना सुगावा लागला म्हणून त्यांनी गावकऱ्यांना धीर देण्यासाठी व त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून चारशेएक कार्यकर्त्यांचे शिबीर घेतले. (तो काळ साधारण १९४३-४४ च्या मध्यावरचा होता.) ते शिबीर गोटखिंडीचे केशवराव थोरात सरकार यांच्या वाड्यात घेतले. त्यावेळी तो वाडा मोकळाच होता. त्या वाड्यात कार्यकर्ते चरक्यावर सुत काढण्याचे काम करीत होते. सरकार स्वत: परगावी रहात होते.

शिबीराची बातमी पोलिसांना त्यांच्या खबऱ्यांच्या कडून लागली होती. ती माहिती पोलिसांनी सातारा डी.एस.पी. यांना कळवली क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे अनेक कारनामे इंग्रजी दप्तरी नोंद होते. पोलिस त्यांच्या मागावर होतेच. डी.एस.पी. ने या संधीचा फायदा घेऊन शे-दोनशे पोलिसांचा फौज फाटा बरोबर घेऊन गोटखिंडी गावाकडे कूच केली. इकडे शिबीर संपल्यानंतर कांही कार्यकर्ते आप-आपल्या घरी निघून गेले, कांही मंडळी त्या वाड्यातच झोपली. नागनाथ अण्णा मात्र तिथेच एका घरात जाऊन झोपले. अण्णांची झोप म्हणजे झाडावरच्या पक्षा सारखी होती. एक झोप झाल्या बरोबर ते तिथून बाहेर पडले आणि चर्मकार

समाजातील रवींद्र गवळी नावाच्या मित्राच्या घरातील शेणी ठेवण्याच्या माळ्यावर खालवर घोंगडे घालून झोपले. त्या वेळी कोंबड्याने भल्या पहाटेची पहिली बांग दिली. त्याचवेळी त्यांच्यावर संकट जवळ यायला लागलय याची कल्पना त्यांना नव्हती. सातारा डी.एस.पी. आणि त्यांचे शे-दोनशे पोलिस गावाजवळ येऊन ठेपले होते. सायबानं गावातील साऱ्या रस्त्यावर चौकी पहारे बसवायास सांगितले. इतर पोलिसांना गावाला वेढा घालण्याचा आदेश दिला आणि कांही शेलक्या तरुण पोलिसांचे व कांही घोडेस्वारांचे शोध पथक आपल्या बरोबर घेऊन दिवस उगवणेची वाट बघत होता. नागनाथ अण्णां गावात आहेत याची पक्की खबर त्याला होती पण नेमके कोणाच्या घरात झोपलेत याचा पत्ता लागत नव्हता.

इकडे नागनाथ अण्णा गवळी मित्राच्या घरी जागे झाले. त्या वेळी पहाटेची कोंबड्याने दुसरी बांग दिली होती. घरा घरातील माणसे जागी झाली होती. कोण जनावरांना चारा-पाणी करत होते. तर काही घरातल्या बाया-बापड्या जात्यावर गीत गात दळण-कांडण करीत होत्या. अण्णा तसे एका जागेवर कधीच स्थिर झोपत नव्हते अनेक वेळच्या अनुभवाने त्यांना कोठूनतरी दैवी संकेत मिळत असतील काय?

कायतर गडबड असल्याची एकाएकी त्यांना जाणीव झाली आणि ते खडबडून जागे झाले व चटकन उठून अंदाज घेण्यासाठी रस्त्यावर आले. गावठी कुत्री भुंकत होती. त्याचवेळी साहेब शोध पथक घेऊन अमृतेश्वराचे देवालयाच्या दारात थांबला होता. नेहमीच्या सवयी प्रमाणे गवळी लवकर उठून प्रात:र्विधीस गेले होते. परत येताना त्यांना पोलिसांची चाहूल लागली. लगबगीने ते आपल्या घराकडे अण्णांना सावध करण्यासाठी आले तर अण्णा रस्त्यावर उभेच होते. दबक्या आवाजात गवळी म्हणाले "अण्णा घात झाला, पोलिसांनी सारा गाव येडलाय, सायब देवळाजवळ येऊन थांबलाय." अण्णांनी एका मिनिटात विचार केला. पोलिसांचा फास आवळायच्या आत आपण हा वेढा पार केला पाहिजे. त्यांनी गवळी मित्राच्याकडून एक जाडं भरड धोतर, एक मुंडासं, बंडी व खुरपं दोरी घेतली. शेतकऱ्याचा वेश धारण केला. डोक्यावर घोंगड्याची खोळ घेतली व चांभारवाड्याच्या पश्चिमेच्या बाजूने साती ओढा पार करुन तातडीने निघाले होते. योगायोगाने त्याच दिशेने एक शेतकरी बैल जोडी व खांद्यावर लाकडी नांगर घेऊन निघाला होता. तो अण्णांच्या साधारण परिचयाचा होता. अण्णांनी चटकन त्या शेतकऱ्याच्या खांद्यावरील नांगर आपल्या खांद्यावर घेतला आणि बैल हाकत ते त्याच्या पाठोपाठ निघाले. अजून तांबड फूटायच होत पण झुंजू-मुंजू झाल होतं. माणूस जवळ आल्याशिवाय ओळखत नव्हता. ही वेळ बरोबर साधून अण्णां आणि तो शेतकरी एका पाठोपाठ चालले होते. येवढ्यात गस्त घालणाऱ्या पोलिसाने त्यांना हाटकले "कोण र तुम्ही?..... एवढ्या लवकर कुठं चाललाय.?"

अण्णांनी तेवढ्याच आवाजात ''तुम्ही कोण?.... इथ काय करताय?'' असं विचारलं. पोलिस, ''आम्ही कोण? आमच्या ड्रेस वरनं तुला दिसणां काय? आणि आम्हांलाच विचारतोस, तुम्ही कोण.?''
जरा खालच्या आवाजात अण्णां म्हणाले, ''हवलदार साहेब, तुम्ही लांब असल्यामुळे वळखलं नायं!''
साहेब म्हटल्यावर हवलदार जरा ढिला पडला. आणि म्हणाला, ''आगोदर डाफारलास आणि पोलिस बघितल्यावर नरमलास व्हयं.''
अण्णा म्हणाले,''तसं नव्हं साहेब, आम्ही याच गावचं शेतकरी हायं. नांगर हाकायला रानात निघालोयं.''
तरीही हवलदाराने दोघांची झडती घेतली.
झडती घेत असताना अण्णा म्हणाले,''हवलदार साहेब, एक विचारु का?''
हवलदार म्हणाला,''विचार की.''
अण्णा म्हणाले,''साहेब, आमच्या गावात कोण फरारी-बिरारी आल्यात काय? तवा येवढा सारा फौज फाटा आणलायसा.''
पोलिस म्हणाला,''तुलारं, कशाला नसत्या चौकशा..... गुमान जा की आपल्या कामाला.''

अशा हुशारीने पोलिसांना कोणताही संशय न येऊ देता क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी वेढा पार केला. पुढे थोडे अंतर गेल्यावर त्या शेतकऱ्याला अण्णा म्हणाले, ''माझा मी सुखरुप जातो, तुम्ही डोंगराच्या कडं-कडनं समोरच्या झाडाच्या ताटव्यातून पुर्वेला खिंडीच्या बाजूला जावा! पोलिसांचा कायं भरवसा नायं, आपल्या दोघांना त्यांनी बघितलयं, मनात शंका आली तर माग काढत येतील, काय सांगता येत नायं. मी निसटून जाईन आणि तुंम्ही त्यांच्या हाताला लागशीला तेव्हां पोलिस गावातून गेल्याची खात्री करुनच मग गावात जावा.'' असं त्या शेतकऱ्याला बजाऊन अण्णा पश्चिम दिशेने मल्लिकार्जूनच्या डोंगराच्या कडेने आपल्या ढगेवाडीच्या कॅम्पवर सुखरुप पोहोचले.

असा होता गोटखिंडी गावचा पोलिसांचा वेढा
आणि
असा होता वेढा पार करणारा नागनाथ...

# गिल्बर्टच्या हातावर तुरी

## (२६ जानेवारी१९४५)

सातारा जेलमधून नागनाथ नायकवडी (अण्णा) मजल दर मजल करत सह्याद्रीच्या डोंगरकपारीतील रयत शिक्षण संस्थेच्या व्हॉलंटरी शाळांना भेटी देत-देत कोयनेच्या पठारावर वसलेल्या तांबवे गावात उघडपणे भूमिगतांना भेटून आपल्या वाळवे तालुका व शिराळा पेट्यातील राजधानीत सुखरूप पोहचले आणि तेथे आल्यानंतर प्रतिसत्तेच्या माध्यमातून लोकांच्यात उघडपणे मिसळून देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याची धुरा सांभाळायला सुरुवात केली. त्यातूनच एक दिवस सवड काढून वाळव्याला आई वडिलांना भेटण्यासाठी आले. घराकडे जाण्याचा धोका न पत्करता गावा बाहेरील धोंडी बाबाजी अहिर यांच्या विहिरीवर धावेकडेच्या एका झाडाखाली येऊन थांबले. कार्यकर्त्यांच्या भेटीनंतर आई वडिलांना बोलाऊन घेतले व त्यांना भेटून शिराळा पेट्यातून अज्ञात स्थळी मुंबईला पान बाजारात येऊन थांबले. दिवसाढवळ्या सातारा जेल फोडल्यानंतर विश्वासाने आपल्या सोमवार पेठेतील घरी आश्रयाला आलेल्या क्रांतिवीराला शाब्बासकी देण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील त्यांना भेटण्यासाठी खास मुंबईला आले होते. नागनाथ अण्णांचा पत्ता त्यांना माहीत नव्हता, म्हणून दादरला बुटाचे दुकान असणाऱ्या गणपती गायकवाड या माजी विद्यार्थ्याकडे आले. त्याला सोबत घेऊन नागनाथ अण्णांचा शोध घेतला. त्यांना त्यांचा पत्ता मिळाला. दादरला लायब्ररी रोडला नागनाथांचा गोटखिंडीचा मित्र रवींद्र गवळी रहात होता. त्याच्या घरी ते थांबले होते. तेथे कर्मवीर भाऊराव पाटील गेले त्यांना नागनाथ अण्णा दिसताच कडकडून मिठी मारली.

''शाब्बास माझ्या वाघा. वाळव्याचं आणि आपल्या देशाचं नाव इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये नोंदविलस. इंग्रजी सत्तेला नत मस्तक केलस. यापुढे राष्ट्रीय कार्यात तुला असेच यश लाभो. माझा आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहे.'' या आनंद भेटीने नागनाथांचा जोम दुप्पट वाढला.

नागनाथ नायकवडी यांच्या सातारा प्रकरणाची ब्रिटिश पार्लमेंटला नोंद घ्यावी लागली. त्या गोष्टीचा मुंबई इलाख्यातील इंग्रजी सत्तेला जबरदस्त तडाखा बसला होता. सातारा पुन्हा पेटला. भूमिगतांनी उत्साहाने कामाला सुरुवात केली. ब्रिटिश सत्ताधारी पोलिस अधिकाऱ्यांना नागनाथ नायकवडी यांना पकडून देणाऱ्याची जनता काय हालत करते हे माहीत होते. म्हणून त्यांनी नवीन डाव बाहेर काढला. क्रिमिलर गाव गुंडांना तुरुंगातून सोडून दिले. त्यांना त्यांनी क्रांतिवीराच्या पाठीमागे लावले ते एकाच अटीवर-नागनाथला जिवंत पकडून द्या, नाहीतर ठार मारा. त्या शिवाय जनतेला पैशाचे आमिष दाखवून बघितले, पूर्वी जाहीर केलेले ५०० रुपयांच्या बक्षिसामध्ये आणखी ५००/-रुपयांची वाढ करून असे एकूण १०००/- रुपयचे बक्षीस अण्णांना पकडून देणाऱ्यास सरकारने जाहीर केले. सरकारी नोकऱ्या देऊ केल्या. रावबहादुरी पदव्या, सन्मानपत्रे असे कितीतरी पर्याय काढले. सरकारी अधिकारी मेटाकुटीला आले. पण ते सापडत नाहीत चौहींकडून पोलिसांचे गुप्त रिपोर्ट मुंबई प्रांताच्या मुख्य पोलिस कचेरीत येऊन थडकले. नागनाथ नायकवडींना लोकांच्यातून जोराचा प्रतिसाद आहे. लोकच त्यांचे संरक्षण करतायत, त्यांचा कुठही थांगपत्ता लागत नाही. मोठमोठ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची मुंबईला मीटिंग झाली. 'कोण हा नागनाथ? एवढ्या मोठ्या इंग्रजी सत्तेला आव्हान देतोय? काही झालं तरी याला वठणीवर आणलाच पाहिजे.' यासाठी सातारा जिल्ह्यासाठी एका दुष्ट, विश्वासघातकी, कर्तव्यदक्ष, चाणाक्ष डी.एस.पी.म्हणून गिल्बर्ट नावाच्या मूळ इंग्लड मध्ये रहाणाऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. तो अधिकारी सामान्य नव्हता. त्याने बंगालची स्वातंत्र्याची चळवळ मोडून काढली होती. अनेक क्रांतिकारकांना पकडून त्यांचे हालहाल केले होते. घरादारावर नांगर फिरवले होते, जप्त्या केल्या होत्या. तसा त्याने बंगालमध्ये चांगला वचक बसवला होता. त्याची त्याला चांगली गुर्मी होती. त्या अधिकाऱ्याने नागनाथ नायकवडींना पकडण्याचा विडा उचलला होता. तो सातारला हजर झाला; पण त्याने अजून साताऱ्याचे पाणी पुरते चाखले नव्हते.

गिल्बर्टने सातारा जिल्ह्याची सूत्रे हातात घेऊन दोन एक महिने लोटले होते. सी.आय.डी.खात्यामार्फत नागनाथ नायकवडी यांची भागातील कार्याची पद्धत पाहता ते आपल्या जाळ्यात अडकतील असे सी.आय.डी.खात्याला वाटत नव्हते. गावगुंड व क्रिमिलर गुंड एकत्र आले असले तरी त्याचा फारसा उपयोग होत

नव्हता. गावगुंड व क्रिमीलर गुंड क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या पासून आपला बचाव कसा करता येईल यातच गुंतून पडले होते. लोकांच्यातून चोहोकडून त्यांना संरक्षण  मिळत होते. जनमाणसांत त्यांचा नावलौकिक व आदरभाव वेगाने वाढत होता. गिल्बर्टला काय करावे सुचत नव्हते. गिल्बर्टने वाळवे तालुका व शिराळा पेट्याकडे पोलिस बंदोबस्त वाढवला आणि तो खानापूर तालुक्यातील पारे गावाला क्रांतिसिंह नाना पाटील असल्याची विश्वसनीय बातमी मिळाली म्हणून तिकडे निघून गेला. त्यांने  पारे गावाला रात्री ३ वाजता वेढा घालून सर्वत्र नाकेबंदी केली. स्वतः बरोबर काही तगडे पोलिस बरोबर घेऊन प्रमुख भूमिगतांची घरे तपासून सारा गाव पिंजून काढला; पण नाना पाटलांचा थांगपत्ता लागत नव्हता. क्रांतिसिंह पारे गावात कोरे यांच्या घरी सुखरुप होते. पोलिसांच्या गाड्या कोरे यांच्या घरा समोरच उभ्या होत्या. पोलिस भलतीच घरं तपासत गावात नुसता धुमाकूळ घालत होते. अनेक स्त्री पुरुषांना मारझोड करत होते. शेवटी डी.एस.पी.गिल्बर्ट रिकामे हात हलवत साताराला निघून गेला.

गिल्बर्ट सातारला पोहचल्यानंतर त्यांना नागनाथ नायकवडी ऐतवडे गावात येणार असल्याची बातमी गुप्त पोलिसांच्याकडून मिळाली. गिल्बर्ट तातडीने सातारहून ऐतवडे गावी निघाला. आपल्या बरोबर तगड्या जवान पोलिसांची एक तुकडी बरोबर घेऊन लाडेगावात पोहचला. तो दिवस २६ जानेवारी १९४५. त्याच दिवसाचे औचित्य गाठून नागनाथ नायकवडी यांनी कर्मवीर भाऊराव पाटलांचे ऐतवडे गावी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली झेंडावंदन व भूमिगत कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. मेळावा संपल्यानंतर प्रमुख क्रांतिकारकांच्या जेवणाचा कार्यक्रम राजमती पाटील यांच्या घरी ठेवला होता. इथपर्यंतची सर्व बातमी गिल्बर्टला लागली होती. गिल्बर्टने मनात ठरवले कार्यक्रम संपल्यानंतर जेवणाचे ठिकाणी छापा घालायचा. त्याप्रमाणे नियोजन केले.  गुप्त पोलिस खात्याच्या अधिकाऱ्याकडून गावाची रचना, रस्ते, जोड रस्ते, बोळकांडे आणि जेवणाचे ठिकाण राजूताई पाटील यांच्या घराची माहिती घेतली. घरात प्रवेश कसा करायचा वगैरे इत्थंभूत माहिती घेतली. साध्या वेशातील पोलिस मेळाव्याच्या ठिकाणी पाठवले. नागनाथ नायकवडींचे नाव मुंबई इलाख्यातील पोलिस खात्याला माहीत होते. पण त्यांना प्रत्यक्ष पहाणारे लोक हाताच्या बोटावर मोजण्या इतपत होते. त्यांचे फोटो तर फार दुर्मिळ गोष्ट होती. काही पोलिस अधिकाऱ्यांनी सातारा जेलमध्ये नागनाथना पाहिले होते. त्या अधिकाऱ्यांकडून गिल्बर्टने त्यांचे रेखाचित्र तयार करून घेतले होते. गिल्बर्ट तसा हुशार अधिकारी होता. व्यक्तीला पाहिल्यानंतर नागनाथ नायकवडी कोणते हे तो रेखाचित्रावरून सहज ओळखू शकत होता.

रामानंद भारतींच्या भाषणाचा कार्यक्रम संपला. सर्व प्रमुख मंडळी राजूताई पाटील यांच्या घरी जेवणासाठी गेली. बैठकीसाठी काही लाकडी पाट मांडले होते. काही ठिकाणी घोंगडयाच्या घड्या टाकल्या होत्या. रामानंद भारतींसह प्रमुख भूमिगत कार्यकर्ते जेवायला बसले होते. नागनाथ अण्णाही हातपाय धुऊन चूळ भरून जेवणाच्या ठिकाणी आले. सर्वांच्या पुढे जेवणाची ताटे ठेवण्याचे काम चालू होते. राजूताई स्वयंपाक घरात जेवणाचे नियोजन करत होत्या. शेवटच्या पाटावर ते बसणार एवढ्यात पुढच्या दारातून गिल्बर्ट चपळतेने अण्णांच्या अंगावर झडप घालण्याच्या पवित्र्यात घरात शिरला. अण्णांची आणि गिल्बर्टची नजरानजर झाली. तो चार एक हाताच्या अंतरावर आला असेल नसेल, तोच नागनाथ अण्णा डोळ्यांचे पाते लवायच्या आत विजेच्या वेगाने परसदाराच्या पाच फूट उंचीच्या तटावरून वाघासारखी झेप घेऊन वाऱ्याच्यावेगाने पळत सुटले. पळणारा माणूस नागनाथ आहे हे गिल्बर्टने ओळखले होते. त्यांनेही त्याच चपळाईने परस दाराच्या तटावरून उडी मारली व तितक्याच वेगात त्यांचा पाठलाग करू लागला. गावाच्या बाहेर आल्यानंतर एक ओढ्याची पाणंद लागली. त्यातून झुळझुळ पाणी वहात होते. त्या पाण्यातून एका पाठोपाठ एक असे दोघे पळत होते. पळता पळता नागनाथ अण्णांच्या एक गोष्ट लक्षात आली. गावाच्या बाहेर साधारण १ मैल ते दीड मैल अंतरावर एक विहीर आहे. त्या विहिरीवर धावेलगत एक पिंपळाचे झाड आहे. त्या पिंपळाच्या पारंब्या विहिरीच्या कड्याला घासून समांतर पाण्याकडे गेलेल्या आहेत, त्या पारंब्याच्या आतील कडा आपण भीमराव गायकवाडाच्या मदतीने पोखरला आहे. त्या पोकळीत आठ दहा हत्यारबंद भूमिगत दडून बसतील अशी ती गुहा आहे. चटकन नागनाथ अण्णांनी आपला मार्ग बदलला व विहिरीच्या दिशेला धावत निघाले. दोघांच्या पळण्याने चपाचप पाण्याचा आवाज दोघांना येत होता. इतके ते एकमेकांजवळून पळत होते. गिल्बर्टच्या हातात रिव्हॉल्व्हर होते. नागनाथ अण्णांचे जवळ कसलेच हत्यार नव्हते. मागे वळून गिल्बर्टला प्रतिकार करणे शक्य नव्हते. गिल्बर्टच्या गोळीला व्यर्थ बळी पडणे किंवा तुरुंगात खितपत पडणे क्रांतिवीर नागनाथना मान्य नव्हते. त्या गुहेत लपण्याशिवाय त्यांच्या पुढे पर्याय नव्हता. पळण्याचा वेग वाढवला आणि एका क्षणात गिल्बर्टच्या नजरे आड होणाऱ्या वळशाने अण्णा चटकन विहिरीच्या धावेवरून पिंपळाच्या पारंब्याना धरून झरझर खाली आले आणि त्या गुहेत दडून बसले. पुढे पळणारा माणूस अचानक दिसेनासा झाला. पोलिस अधिकारी गिल्बर्ट चक्रावला, विहिरीत खाली वाकून बघितले पाणी आहे तसेच आहे. हातात आलेली शिकार गेली म्हणून तो रागाने धावेवर बुटाचे पाय आपटत होता. त्याची जाणीव गुहेत बसलेल्या नागनाथ अण्णांना जाणवत होती. तो पर्यंत गिल्बर्टचे चार तगडे पोलिस

आले. त्यांनी साहेबांचा रागाने लालबुंद झालेला चेहरा, घामाने निम्मी अर्धी भिजलेली वर्दी पाहिली. त्या तगड्या सहकारी जवानांना बघून  गिल्बर्ट एकदम ओरडला, ''काय हा अजब माणूस! बघता बघता नाहीसा झाला म्हणजे काय? एकतर जमिनीत गेला  की अदृष्य झाला?'' गिल्बर्ट भांबावून गेला, चोहोबाजूला नजर टाकली. सर्वत्र रान मोकळे आणि भयान शांतता होती. शेवटी हताश झालेला गिल्बर्ट दुःखी मनाने हात हालवत सातारला परत फिरला.

गिल्बर्टने पुन्हा कधीही नागनाथ नायकवडी यांचा नाद केला नाही व वाळवा शिराळा भागात फिरकला नाही. इथचं इंग्रज सत्तेचा पराभव झाला.

❋ ❋



गिल्बर्टला चकवा देऊन विहिरीच्या गुहेत बसलेले
क्रांतिवीर  नागनाथअण्णा

# सांगाव बंदुका कोर्ट केस

सांगावच्या बंदुका सही सलामत प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडे कुंडलला क्रांतिवीर नागनाथ अण्णा व क्रांतिअग्रणी जी.डी. (बापू) लाड यांनी सुखरूप पोहचवल्या इकडे सांगावमध्ये दुसऱ्या दिवसी २.१०.१९४३ रोजी दुपारी १२ वाजता पोलिस पाटलांनी हातकणंगले पोलिस स्टेशनला वर्दी देऊन केस नोंदवली. कागलचे घाटगे फौजदार हे त्या गुन्ह्याची चौकशी करत होते. त्या दरम्यान कोल्हापूरमध्ये ए. डिव्हिजनच्या फौजदाराने दुसऱ्या एक गुन्ह्यात ईश्वरा गुरवांना अटक केली होती. ही बातमी घाटगे फौजदारांना कळाली. त्यांनी सांगावच्या बंदुका केसमधील साक्षीदारांना १४.११.१९४३ रोजी कोल्हापूर येथे आणले. त्या साक्षीदारांनी ओळख परेडमध्ये ईश्वरा गुरव यांना ओळखले. घाटगे फौजदार यांनी त्याला मारहाण केली. जंग-जंग पछाडले तरी ईश्वरा गुरव यांनी आपल्या इतर साथीदारांची नावे सांगितली नाहीत व गुन्हाही कबूल केला नाही. शेवटी त्यांच्यावर फस्ट क्लास मॅजिस्ट्रेट हातकणंगले या कोर्टात इ. पी. कोड कलम ३९७, इ. पी. कोड कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न करणे), कलम ३२६ (बेकायदा शस्त्रे बाळगणे) या तीन कलमांखाली गुन्हा दाखल केला.

ही बातमी क्रांतिवीर नागनाथ अण्णांना कार्यकर्त्यांच्या बैठकीत समजली. साक्षीदारांनी ईश्वरा गुरवांच्या विरुद्ध साक्ष देऊ नये म्हणून त्यांनी आपले सहकारी किसन पैलवान, खंडू सखाराम शेळके (दाजी), रामचंद्र संतू अहिर (मास्तर) सर्व वाळवा. गणा जाधव, सदा कापसे, छगन बापू. सर्व कामेरी, अंता पाटील-ढगेवाडी

आणि वाय.सी. पाटील  यांना पाठवले.हे सर्वजण रात्री १० वाजता बंदुकाचे बार काढतच गावात शिरले. जुन्या शाळेसमोर वाळवणाच्या ढिगावर मौला बाबालाल मुल्ला झोपला होता. त्याला बंदुकीच्या धाकाने साक्षीदारांची घरे दाखवण्यास भाग पाडले. सदाशिवराव माने, शंकरराव लोकापुरे व हॉटेल मालक श्री.बकस अत्तार यांना घरातून ओढून चौकात आणले. साक्षीदारांच्या घरातील बायका-मुलांच्या आरडा ओरडीने सारा गाव जमला व त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांना गराडा घातला. ''आमच्या लोकांना सोडा आणि इथून चालते व्हा'' असा गलका करत दगडफेक केली. स्वातंत्र्य सैनिकांनी बंदुकांचे व रिव्हॉल्व्हरचे हवेत बार काढले. तसे गावकरी मागे सरले. वाय.सी.पाटील गावकऱ्यांना उद्देशून म्हणाले. ''आम्ही कोण दरोडेखोर नाही. आम्ही भूमिगत स्वातंत्र्यसैनिक आहोत. आम्ही तुमच्या गावातील पोलिसांच्या बंदुका इंग्रजांच्या विरुद्ध बंड करण्याकरिता लुटल्या आहेत. आणि हे तुमच्या गावातील पोलिसांचे खबरे आमच्या विरुद्ध साक्ष द्यायला निघालेले आहेत. त्यांना अद्दल घडवण्यासाठी आम्ही त्यांना पकडले आहे.'' गावकऱ्यांच्या लक्षात खरा प्रकार आला. ते आपापल्या घरी निमूटपणे निघून गेले.

स्वातंत्र्य सैनिकांनी त्या तिघा साक्षीदारांना गावाच्या बाहेर आणले आणि बेदम मार दिला. जर का तुम्ही आमच्या विरोधात साक्ष दिलीत तर पुन्हा चोप देऊ व तुमची घरे दारे जाळून खाक करू. असे धमकावून त्यांना सोडून दिले. सदर केसमध्ये ईश्वरा दादा गुरव रा. येडेनिपाणी यांनाच फक्त आरोपी केले होते. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड(बापू) व शाम पाटील या तिघांचा या केसमध्ये संबंध होता परंतु शेवटपर्यंत पोलिसांना यांचा थांगपत्ता लागला नाही. पुढे ही केस बरेच दिवस चालू होती. असि.सेशन जज्ज कोल्हापूर कोर्टात सेशन्स केस नं.६३/४५ ने केस चालली. बकस अत्तार यांनी पोलिस संरक्षणात साक्ष दिली. सरकार तर्फे असि. पब्लिक प्रॉसिक्युटर श्री.धर्माधीकारी यांनी काम चालवले. तर आरोपी तर्फे श्री.पाटील (रुकडी) यांनी केस चालवली. सदर केसचा निकाल दिनांक २३.८.१९४५ इ.स.रोजी लागून आरोपी ईश्वरा गुरव यांना इंडियन पिनल कोड कलम ३९७ (दरोडा) खाली सात वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा व १०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंड न भरल्यास एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा दिली. मात्र आरोपीवरील इ.पि.कोड कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न करणे) व कलम ३२६ (बेकायदा शस्त्रे बाळगणे) खाली गुन्ह्याच्या केस मधून दोष मुक्त केले.

# 'पुढारी'कार

महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरूंचा ''करेंगे या मरेंगे'' संदेशाप्रमाणे आम्ही सातारचे क्रांतिकारक पेटून उठलेलो आणि पे स्पेशल ट्रेन सारख्या लुटीने ब्रिटीश सत्तेविरोधी केलेल्या विध्वंसक कामगिरीतून भूमिगतांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लागत होता. त्यांना हुल देऊन आम्ही शिराळापेट्याच्या जंगलातून, दऱ्याखोऱ्यातून वारणा पार करुन शाहूवाडी तालुक्यातून खाली कोल्हापूरमध्ये उतरत होतो. कोल्हापूर संस्थान हे छत्रपती शाहू महाराजांच्या आधिपत्याखाली होते. छत्रपती शाहू महाराज असताना त्यांनी इंग्रजांच्यावर जबर वचक बसवला होता तो अजून कायम होता. त्यामुळे कोल्हापूरात आलो की आम्ही बिनधास्त होत होतो. शिवाय कोल्हापूरची जनता आम्हांला सहाय्य करत होती.

विशेष म्हणजे निखळ राष्ट्रप्रेमी 'पुढारी'कार पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव म्हणजे आमचा मोठा आधार होता. तसे ते म्हणजे आमची आर्थिक सहाय्य करणारी बँकच होती. कधी लागतील त्यावेळी त्यांच्याकडे जावे आणि पैसे घ्यावेत. परंतु त्यासाठी त्यांची एक अट होती घेतलेले पैसे कधीही परत करायचे नाहीत, शिवाय ते अन्नपूर्णा इंदिरादेवींच्या हातचे गरमागरम सुग्रास जेवण जेवायला घालत होते.

पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव हे केवळ पत्रकार नव्हते, तर ते सत्यशोधक चळवळीत काम करणारे आणि महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबर आंदोलनात सक्रिय सहभागी असणारे समाजसुधारक होते. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकार चळवळीला सर्वतोपरी आर्थिक सहाय्य करणारे एक उमद्या मनाचे व्यक्तिमत्व होते.

जाधवरावांच्या बाबतीत बोलताना नागनाथ अण्णा पुढे म्हणाले, 'तसा माझा आणि 'पुढारी'चा संबंध 'पुढारी' हे साप्ताहिक होते, त्यापासूनचा आहे.

१ जानेवारी १९३९ साली 'पुढारी' दैनिक स्वरूपात लोकांच्या हातात पडू लागले तेव्हा आम्हा स्वातंत्र्य सैनिकांना खूप आनंद झाला. ४०-४१ च्या दरम्यान माझा आणि जाधवरावांचा परिचय कामगार नेते कॉ.संतराम पाटील यांनी करुन दिला. आम्ही त्यांच्यापेक्षा खूपच लहान त्यामुळे ते आमच्यावर वडीलकीच्या नात्याने माया करायचे. पहिल्या भेटीतच मी जाधवरावांच्याकडे आकर्षित झालो. मला त्यांच्या सारखा मोकळ्या मनाचा दिलदार माणूस पहिलाच भेटला. कसलेही आढे-वेढे न घेता किंवा कोणताही बडेजाव पणा न करता चळवळीला आर्थिक मदत करणारे 'पुढारी'कार जाधवराव आम्हांला आमचे वाटायला लागले. पुढे आम्ही विश्वासाने चळवळीच्या गुप्त बैठका 'पुढारी' ऑफिसमध्ये घेऊ लागलो. ब्रिटीशसत्ता असलेल्या काळात आम्हा स्वातंत्र्य सैनिकांच्याबरोबर संबंध ठेवणे, मदत करणे, घरात जेऊ-खाऊ घालणे म्हणजे आपल्या साऱ्या कुटुंबाला संकटात टाकणे. असे असताना जाधवराव न डगमगता कसलाही विचार न करता आमच्याशी जास्तच जवळीक करत होते.

सततच्या भेटीतून आम्हांला त्यांच्यातील अनेक गुणांचे पैलू जाणवले. तसे जाधवराव समाज घडवणारे निरपेक्ष मार्गदर्शक होते. आम्ही प्रतिसरकारचे सारे चळवळीतले क्रांतिकारक कोल्हापुरशी खूप जवळ होतो. त्यामुळे दै.पुढारी आम्हाला खूप जवळचा वाटायला लागला. ते आमचे हक्काचे वर्तमानपत्र अशी भावना आमच्यात रुजली. जनतेचे त्यांच्यावरील प्रेम मी जवळून पाहिले आहे. अशा या 'पुढारी'कारांची पत्नी सौ. इंदिरादेवी आम्हा स्वातंत्र्यसैनिकांच्या अन्नपूर्णा होत्या. त्यांच्या हातची झुणका भाकरी खाताना मला माझ्या आईची आठवण व्हायची. इतक त्या आम्हा सर्वांना मायेन वाढायच्या. तसा इतरांचा दिवस मावळला की आम्हा स्वातंत्र्य सैनिकांचा दिवस उगवायचा म्हणजे आम्ही रात्री अपरात्रीच जाधवरावांच्याकडे जात असू. त्या माउलीने कधीही आमच्या जेवणाचा कंटाळा केला नाही. रात्रीचे कितीही वाजलेले असोत 'पुढारी' कार्यालयातील आमची बैठक संपल्यानंतर जाधवराव आम्हांला शुक्रवार पेठेतल्या घरी घेऊन जायचे. तिथं इंदिरावहिनींच्या हातचे गरमागरम सुग्रास जेवण करुन आम्ही रातोरात तेथून लगेच पसार होत असू. मी स्वत: अनेकदा जाधवरावांच्याकडून आर्थिक सहाय्य घेतलेले आहे.''

अन्नपूर्णा इंदिरादेवी, घरी आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला जेवायला वाढायच्याच शिवाय भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांचे जेवणाचे डबे पाठवायच्या. या गोष्टीमुळे पुढारीशी जवळीक निर्माण झाली. मी तर चळवळीला बळ देणारं वृत्तपत्र या नात्यानं आणि जाधवरावांशी असलेल्या आपुलकीन 'पुढारी'ला आपल मानलं. पुढे जाधवराव हयात असेपर्यंत त्यांचेशी मैत्रिचे संबंध होते. जाधवरावांनी १९४२ च्या लढ्यात क्रांतिकारकांच्यासाठी जे योगदान दिले त्याचे मोल करता येणार नाही.

# देशांतर्गत फौजी संघटना

## (१५ डिसेंबर १९४५)

साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या आंदोलनाबाबत प्रसंगाने अनेकांनी आपल्या कुवतीप्रमाणे लिखाण केले आहे. काही लहान मोठी पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत. त्या लढ्यात प्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या भूमिगतांची कार्यकर्त्यांची आपल्या महितीच्या आणि अंतरमनाच्या समजुतीप्रमाणे, बुद्धीच्या कौशल्याने त्यांच्या कार्याची कमी अधिक नोंद घेतली आहे. कोणाला त्यांनी अतिमहत्त्व दिले आहे तर कोणाला बऱ्यापैकी महत्त्व दिले आहे. तर काही जणांची नुसती बोळवण केली आहे. त्यामुळे इतिहासाचा धागा मात्र त्यांच्या हातून निसटून गेला. कदाचित काही व्यक्तींना महत्त्व देण्यासाठी व त्यांना अलौकिक प्रकाशाच्या झोतात आणण्यासाठी किंवा न कळत त्यांच्या हातून तसे लिखाण घडले असेल. अनेक भूमिगतांच्यावर तसा हा अन्याय झाला आहे.

नागनाथ नायकवडी इतरांच्यापेक्षा वेगळे हाते. शिकला सवरलेला हा तरुण धाडसी होता. त्यांचे विचार स्पष्ट होते. त्यांचे हात स्वच्छ होते. त्यांची दृष्टी साफ होती. आपल्याला काय करावयाचे आहे आणि काय साधावयाचे आहे या विषयी त्यांच्या मनात गोंधळ नव्हता. महात्मा गांधी त्यांचे दैवत असले तरी त्यांचा शस्त्रावर विश्वास होता. निखळ राष्ट्रवादी दृष्टिकोन हे त्यांचे वैशिष्ट्य होते. सामान्य जनेतेवर त्यांचे प्रेम होते.


नागनाथ नायकवडी यांच्या भोवती बरेच सहकारी जमा झाले होते. श्रीमती राजूताई पाटील ही तरुणी खांद्यावर बंदूक लटकावून त्यांच्या बरोबरीने त्या गटात काम करत होती. धडाडीने सर्वत्र वावरत होती. त्यांच्या जोडीला वाय.सी.पाटील,

किसन अहिर (पैलवान), खंडू शेळके (दाजी), रामचंद्र संतू अहिर (मास्तर), नारायण कदम (पेशवे), शंकर इनामदार, सखाराम तुकाराम घोरपडे (काका), तुकाराम नाना खोत (वस्ताद), महादेव राऊ (अनुसे), देवास, पांडू गायकवाड, बाळू काईगडे, अंता पाटील, गंगाराम गायकवाड, शामराव पाटील (जुनेखेड), बंडा नायकवडी (चरण) आदी कार्यकर्त्यांचा एक प्रभावी संच होता. कृष्णा खोरं आणि वारणा खोरं तळ बनवून नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी शस्त्राच्या बळावर वाळव्या पासून कणदूर-मणदूर पर्यंतच्या साऱ्या कृष्णा वारणेच्या खोऱ्यातील गुन्हेगार, फरारी गुंड आणि इंग्रजी सत्तेचे हस्तक यांना चेचून काढले.अगदी एक एकाला वेचून त्यांचा बदोबस्त केला.

धुळ्याच्या पाच लाख एक्कावन हजार रुपयांच्या खजिन्याच्या लुटीतील वाळवा ग्रुपला १ लाख ६० हजार रुपयांची रक्कम दिली होती. त्या रकमेतून गोव्याहून भरपूर प्रमाणात हत्यारं आणली होती. हत्यारं आणि पैशाच्या जोरावर देशांतर्गत फौजी संघटना सुरू करावयाची ठरल्यावर सातारा जिल्ह्यातून वाड्या वस्त्यावरून खेड्या पाड्यांतून शेकडो तरुण फौजी संघटनेत सामील होत होते. हत्यारे होती, हत्यारं पेलणारे हात होते, पैसा होता, उणीव होती ती फक्त फौजी शिक्षण देणाऱ्या तज्ज्ञ माणसांची. त्या दृष्टीने नागनाथ नायकवडी यांनी फौजी शिक्षण देणाऱ्या सैनिकांची शोधा शोध चालू केली. अगदी त्याच सुमारास दिल्लीला लाल किल्ल्यात सुभाषचंद्र बाबूंच्या आझाद हिंद सेनेचे तीन सेनानी धिल्लन सैगल व शहानवाझ यांच्यावर इंग्रजी सत्ताधाऱ्यांनी जो खटला भरला होता, त्याची सुनावणी चालू होती. आझाद हिंद सेनेच्या या सेनानींच्या आर्थिक मदतीसाठी दिल्लीला ८८ दरियागंज येथे एक कार्यालय उघडण्यात आले होते आणि त्या कामाची जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेल यांची कन्या मनीबेन पटेल यांच्यावर सोपवली होती. ही वर्तमान पत्रात आलेली बातमी त्यांच्या वाचनात आली. आता थांबायला सवड नव्हती. फौजी संघटना सुरू करायची त्यांना घाई झाली होती. त्यांच्यावर पकड वारंट होते. पकडून देणाऱ्याला इंग्रज सरकारने रोख बक्षीस जाहीर केले होते. तरी त्यांना त्याची फिकीर नव्हती. अर्जुनाला जसा माशाचा डोळाच दिसत होता. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य दिसत होत तसं नागनाथांना फक्त देशाच स्वातंत्र्य दिसत होत. वेशांतर करून ते दिल्लीला निघून गेले.

दिल्ली तशी नागनाथ नायकवडी(अण्णा) यांना नवखी होती. भाषेचा प्रश्न होताच. ते प्रथमच दिल्लीला आलेले त्यांची विशेष अशी कुणाचीही ओळख पाळक नाही. सोबत कोण माणूस नाही, अशा अवस्थेत दिल्लीत हिंडून ८८ दरियागंज कार्यालय शोधून काढले. आझाद हिंद सेनेच्या मदतीकरता उघडण्यात आलेली ही

कचेरी भव्य इमारतीत होती. इमारत उत्तरान्भिमुखी होती. कचेरीत शेकडो लोक वेगवेगळी कामं करत होती. अनेक लोकांची ऑफिसला ये जा चालू होती. त्या लोकांच्या घोळक्यातून अण्णा ऑफिसची एक एक उंच पायरी मागे टाकत पुढे चालले होते. समोरच एका खुर्चीवर मणीबेन पटेल बसलेल्या होत्या. नागनाथ अण्णांनी मनात ताडण केली. याच त्या मनीबेन पटेल असाव्यात. ते ऑफिसमध्ये जाऊन त्यांच्या पुढे अदबीने उभे राहिले. आता भाषेची अडचण होती. इंग्रजी मध्ये बोलावे म्हटलेतर इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालेले. हिंदीही फारशी अवगत नव्हती. मोडक्या तोडक्या हिंदीत मणीबेनना सांगितले मी साताऱ्याहून आलो आहे, मला आझाद हिंद सेनानीच्या खटल्यासाठी मदत करावयाची आहे म्हणत कोटाच्या खिशातील दोनशे पन्नास रुपये मणीबेनच्या टेबलावर ठेवले. त्यांनी नागनाथ अण्णांना बसायला सांगितले. बेल मारून एका कारकुनाला बोलावले त्यांच्याकडे पैसे दिले आणि यांना पावती आणून द्या म्हणून त्यांनी कारकुनास सांगितले.




**लष्करी शिक्षणासाठी फौजी मिळावा म्हणून**
**मणिबेन पटेल बरोबर चर्चा करणारे अण्णा.**

समोरचा माणूस पावती काढायला गेल्यावर अण्णांनी मणिबेनना मोडक्या तोडक्या हिंदीत सांगायला सुरुवात केली. ''मी साताऱ्याहून आलोय, साताऱ्यामध्ये आम्हाला फौजी संघटना सुरू करायची आहे. आमच्याकडे हत्यारं आहेत. लष्करासाठी लागणारी तरुण माणसं आहेत, पैसा आहे, आम्हांला लष्करी शिक्षण देणारी आझाद हिंद सेनेतील एखादा फौजी सैनिक द्या. त्याची सर्व प्रकारची अडचण दूर करू. कपडालत्ता, जेवण खाण, पैसा आडका यांची सर्व व्यवस्था आमची संघटना करेल.'' मणीबेन पटेलनी सातारा जिल्ह्यातून आलेल्या त्या तरुण क्रांतिकारकाकडे (अण्णांकडे)

एक वेळ निरखून पाहिले आणि निर्धारयुक्त वाणीनं एकाच वाक्यात उत्तर दिलं. 'फौजी संघटना गांधीजींच्या तत्त्वज्ञानात बसत नाही.' मणिबेन पटेल यांच्या या उत्तरात इतका ठामपणा होता की अण्णांना आणखी काही सांगावे असे वाटले नाही. चिकाटी सोडायची नाही आणि दिलेल्या देणगीची पावती मिळणार होती म्हणून खुर्चीवर तसेच बसून राहिले होते.

मणीबेन पटेलांना पुन्हा एकदा सांगावे असे वाटत होते. पण त्यांनी मघाशी दिलेल्या उत्तरात जो करारीपणा होता तो पाहून ओठातून शब्द बाहेर पडेनात; पण काय विचित्र योगायोग होता. पहा. विधात्याला नागनाथ अण्णांची मागणी मान्य होती. इतक्यात लष्करी गणवेशातील दोन उंचेपुरे शीख तरुण तेथे आले. त्यांनी बूट आपटून मणिबेन पटेलना लष्करी स्वरूपाची सलामी दिली. अगदी सुंदर हिंदीमध्ये त्यांनी आपली ओळख मणिबेनला थोडक्यात करून दिली. आपल्याला लष्करी स्वरूपाची फौजी संघटना उभ्या करावयाच्या आहेत आणि तशा स्वरूपाचे काम आम्हांला पाहिजे आहे. देशाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात हे मिळाले तरी आम्ही ते आनंदाने करू. मणिबेन पटेलांनी क्षणाचीही उसंत न घेता नागनाथ अण्णांना जे उत्तर दिले होते; तेच उत्तर त्या दोन जवानांना दिले. फौजी संघटना गांधीजींच्या तत्त्वात बसत नाही. तेव्हा तशा स्वरूपाचे काम मी आपणांस देऊ शकत नाही. त्याबद्दल क्षमा करा. परत त्या तरुणांनी बूट आपटून मणिबेनना लष्करी सलामी दिली आणि खाडखाड बूट वाजवत ते त्या ऑफिसच्या बाहेर पडले.



**फौजी संघटनेचे काम मिळावे म्हणून मणिबेन पटेलना भेटण्यास आलेले नानकसिंग व मन्सासिंग**

नागनाथ नायकवडी यांचे मन मणिबेन पटेलच्या व त्या तरुणांच्या संवादातून आनंदी झाले होते. त्यांच्या मनाला आशेचे किरण दिसत होते. त्याच वेळी त्या तरुणांना थांबवून आपलं हृदयमन सांगावे असे आवेगात त्यांना वाटलं. त्यांनी आपल्या मनाला आवर घातला आणि ते दोन शीख तरुण कुठल्या बाजूला जातायत यावर मणीबेन पटेलच्या लक्षात न येईल या पद्धतीने नजर ठेवली. ते तरुण ऑफिसच्या पायऱ्या उतरून पूर्व दिशेला निघून गेले. देणगीची पावती हातात पडताच मणिबेनना नमस्कार केला. मणिबेन पटेलना शंका न येईल अशा पद्धतीने ऑफिस मधून बाहेर पडले. तो पर्यंत ते फौजी तरुण बरेच दूर गेले तरी नजरेच्या टप्प्यात होते. त्यांनी भर रस्त्यातून पळत जाऊन त्या तरुणांना गाठले. त्यांना तेथे उभा करून आपली माहिती सांगितली. आपण एवढ्या दूर महाराष्ट्रातून का आलोत, त्याचे प्रयोजन मोडक्या तोडक्या हिंदीत सांगितले. मणीबेन पटेलनी दिलेले उत्तरही सांगितले. मणिबेन पटेल यांच्या समोर बसलेल्या नागनाथ अण्णांना या दोन शीख तरुणांनी पाहिलं होते. त्यामुळे त्या तरुणांना त्यांच्याबद्दल नवखेपणा वाटला नाही. तुम्हा दोघांना जे लष्करी संघटना उभा करण्याचे काम पाहिजे आहे ते काम आमच्याकडे महाराष्ट्रात साताऱ्यामध्ये आहे. त्या फौजी तरुणांना सातारचे नाव चांगले माहीत होते. ते ब्रिटिश लष्करात असताना मराठा बटालियनशी संबंध आला होता. त्यांना मराठ्यांचा पराक्रम चांगला माहीत होता म्हणून तुम मराठा-मराठा करीत त्यांनी अगदी दिलखुलासपणे हसत हसत नागनाथ अण्णांचे हात आपल्या हातात घेतले आणि एका क्षणाचाही अवधी न घेता त्यांनी सातारला येण्यास तयारी दर्शवली. त्यांनी नागनाथ अण्णांना आपली नावे सांगितली, ''माझे नाव मन्सासिंग व याचे नाव नानकसिंग, सुभाषचंद्र बाबूंची आझाद हिंद सेना ज्या वेळी ब्रम्हदेशात आली होती त्यावेळी ब्रिटिश सरकारने एक शीख रेजिमेंट त्यांच्या बंदोबस्तासाठी ब्रम्हदेशात पाठवली होती. त्या शीख रेजिमेंटमध्ये आम्ही दोघेही होतो. आमची शिख रेजिमेंट ब्रम्हदेशात गेल्यावर सुभाचंद्रबाबूंच्या आझाद हिंद सेनेला दारू गोळा राशनसह जाऊन मिळाली. पुढे ब्रम्हदेशात ब्रिटिश लष्कराने आमच्या रेजिमेंटचा पाडाव केला आणि आमच्या रेजिमेंटला ताब्यात घेऊन कलकत्त्याजवळ एका कॉन्टामेंट कॅम्पमध्ये कैद करून आणून ठेवले होते. त्या कॉन्टामेंट कॅपभोवती, विजेच्या तारांचे कुंपण होते. शिवाय अगदी कडक पहारा ठेवला होता. त्या कुंपणाला घळ पाडून आम्ही सहा शीख तरुण बाहेर पडलो आणि कलकत्ता रेल्वे स्टेशनवर आलो. तेथे आमचा पोलिसांनी पाठलाग केला. त्यात आमची व त्या चार जवानांच्या ग्रुपची चुकामूक झाली. योगा योगाने त्याच वेळी

एक गाडी स्टेशनचा प्लॅटफॉर्म सोडताना दिसली. आम्ही पोलिसांना गुंगारा देऊन उलट्या दिशेने त्या गाडीत बसलो. ती गाडी थेट दिल्लीला आली. दिल्लीत आल्यावर ८८ दरियागंजच्या कचेरीचा पत्ता समजला. आम्ही फौजी संघटनेचे काम मिळेल म्हणून इथे आलो. काम मिळत नाही म्हटल्यावर आम्ही आमच्या मुलुखात निघालो होतो. आपण भेटलात आम्हांला पाहिजे होते तेच काम आपण देतो म्हणालात त्याबद्दल खूप आनंद झाला. आम्ही दोघेही तुमच्या मराठी मुलुखात यायला (दिलसे) मनापासून तयार आहोत. फक्त एकच विनंती. आपल्या मुलखात जाण्यापूर्वी आम्हांला आमच्या घरच्या मंडळींना भेटण्याची इच्छा आहे.'' त्यावर नागनाथ अण्णा म्हणाले, ''ठीक आहे.''



**नानकसिंग व मन्सासिंग यांना फौजी ट्रेनिंग देण्यास सातारा भागात यावे अशी विनंती करणारे अण्णा.**

दिल्लीहून नागनाथ अण्णा मन्सासिंग व नानकसिंग या फौजींबरोबर त्यांच्या पंजाब मुलुखाकडे निघाले. नानकसिंगांचे आई वडील लहानपणी वारले होते. त्यांना एक लहान भाऊ व बहीण होती. या तिघांही भावंडाचा सांभाळ त्यांच्या मावशीने

केला होता. लुधियाना पासून आठ-दहा मैलांवरील एका खेड्यात नानकसिंगची मावशी रहात होती. ते कुटुंब गरीब शेतकऱ्यांपैकी होते. तिघेही नानकसिंगांच्या मावशीच्या घरी पोहचले. मावशी व धाकटा भाऊ रानात कापूस वेचायला गेले होते. घरात कोणच नव्हते. नानकसिंगांनी शेजारच्या मुलाला रानात पाठवून मावशीला व भावाला बोलावून घेतले. नानकसिंग यांच्या घरची गरिबी, मावशीच्या अंगावर पंजाबी साधा पेहरावा होता. कुडत्याला एक दोन ढिगळं लावलेली होती. पायजम्याची सुद्धा तीच अवस्था, मावशी आणि नानकसिंगचा लहान भाऊ एकमेकांना कडकडून भेटले. तिघांच्या डोळ्यांत आनंदाश्रू वाहू लागले. मावशीने आपला हुंदका आवरला. ताबडतोब स्वयंपाक केला. तिघांना जेवायला वाढले. तिघांच्या ताटात विळतीने गूळ खिसून घातला. गरम गरम चपात्या फाकून ताटात वाढल्या आणि गुळावर डावीन तूप वाढलं. एक डाव, दोन डाव-तीन डाव नागनाथ अण्णांना आश्चर्य वाटले. आयुष्यात पहिल्यांदाच एवढे तूप त्यांनी खाल्ले. अर्धवट जेवण होतय न होतय तोच गल्लीतील पोरं पळत आली आणि पोलीस आले म्हणून सांगायला लागली. तिथल्या तिथं तिघांनीही जेवणाची ताटं अर्धवट सोडली. नानकसिंगाने मावशीला सांगितलं, ''मावशी जातो. मी जगलो वाचलो तर भेटेन. माझ्या माग पोलिस लागलेत. स्वतःला सांभाळ. येतो मी'' अन् झटदिशी गावाच्या बाहेर तिघेही पळत सुटले. ते पुढे आणि मागे पोलिस होते. यांच्या पळण्याच्या वेगामुळे पोलिस आणि यांच्यात खूप अंतर पडले होते.

नानकसिंग ब्रम्हदेशाच्या युद्धावर असताना त्यांच्या बहिणीचे लग्न झाले होते. तिला एक लहान बाळ होते. तिच्या लग्नाला आपणाला हजर रहाता आले नाहीच; शिवाय बरेच दिवस झाले, तिची भेट झाली नव्हती म्हणून गावी आल्यानंतर हुशारीने लहान भावाला बहिणीला आणण्यासाठी तिच्या सासरी पाठवलं होतं. बहिणीचं सासर फार लांब नव्हतं.४-६ मैलांवर ते गाव होतं. नानकसिंग त्या दोघांना त्याच दिशेने घेऊन पळत होता. एका पाठोपाठ एक ते तिघेही एक सारखे पळत होते. गावा बाहेर २-३ मैलांवर गेले असतील नसतील तो पर्यंत पुढून नानकसिंगांचा लहान भाऊ बहिणीला आणि लहान मुलाला सांडेवर (उंटावर) बसवून सांड पळवत गाव जवळ करत होता. सर्वांना पाहून त्याने सांड थांबवली. भाऊ बहीण एकामेकांकडे पळतच आली. कडकडून भेटली. बहिणीचा आणि लहान बाळाचा नानकसिंगाने पापा घेतला. नानकसिंगाने गहिवरलेल्या आवाजात बहिणीला सांगितले, ''माझ्या मागं पोलिस दौडतायत. मी जातो. जणू पुन्हा आपली आणि आपल्या बहिणीची भेट

होते का नाही कुणास ठावे? हे नानकसिंगांच्या मनात विचार घोळत होते. नानकसिंगांनी बहिणीला आणि तिच्या गोजिरवाण्या बाळाला सांडेवर बसवले आणि लहान भावाला सांगितले, 'हिला हिच्या सासरी परत सोडून ये. मी जातो' नानकसिंगांनी परत एक वेळ आपल्या बहिणीची नजरेने भेट घेतली आणि पळायला सुरुवात केली. बराच वेळ बहीण नानकसिंगांची पाटमोरी आकृती नजरेत साठवत होती. नजरेच्या आड आपला भाऊ झाल्याचे पाहून ती बिचारी सासरी गेली. दूरवर गेल्यावर एका टेकडीवरून नानकसिंगांनी आपल्या गावाकडे आणि बहिणीकडे पाहिले. भाऊ सांडेपुढे चाललेला दिसतोय. सांडेवर बहीण बसलेली दिसते, तिच्या मांडीवर इवलसं बाळ दिसतय, बहीण लांब वरून उंच उंच हात करून बाळाकडे बोट दाखवून बांधवा माझ्या बाळाला भेटायला लवकर ये, असे खुणेने सांगत होती. नानकसिंगांचे डोळे पाण्याने डबडबलेले होते. हुंदका आवरता येत नव्हता. अण्णा आणि मन्सासिंग दोघेही त्यांच्याकडे पहात होते त्यांचेही काळीज आतल्या आत चर्रर करत होतं.


लुधियाना स्टेशनवर तिघेही आले आणि पंजाब मेलने अमृतसरला पोहचले. तिघांनी अमृतसर मंदिरात गुरु नानकसिंगचे दर्शन घेतले. अजून मन्सासिंगच्या गावी त्यांच्या आई वडिलांना भेटायला जायचे होते. मन्सासिंग नागनाथ अण्णांना म्हणाले, ''आम्ही दोघेच आई वडिलांना भेटून येतो. इथून जवळच लाहोरच्या रस्त्यावर माझं गाव आहे.'' त्या दोघांनी अमृतसरच्या एका बागेत अण्णांना बसवले आणि ते दोघेजण मन्सासिंगच्या आई वडिलांना भेटून चार-एक तासात परत आले आणि दोघेही एका सुरात म्हणाले,''चलो, हम तैय्यार है अब कहींभी चलो'' तिघेही परत दिल्लीला आले. खादी भंडारमधून नागनाथ अण्णांनी दोघांनाही कपडे घेतले. दिल्लीहून मुंबईला आले तेथून सातारामार्गे ऐतवडे गावात पोहचले. दुसऱ्या दिवशी ढगेवाडीच्या कँपमध्ये राजूताई पाटील, वाय.सी.पाटील, किसन अहिर (पैलवान) वगैरे कार्यकर्त्यांच्यावर त्यांच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपवून दिली. नानकसिंग व मन्सासिंगने फौजी संघटनेच्या कामात उत्साहाने भाग घ्यावयाला सुरुवात केली. गावोगावचे तरुण कार्यकर्ते ढगेवाडीला एकत्रित केले होते. ढगेवाडी गावालगतच सागाचे जंगल होते त्या जंगलात फौजी कँप चालू होता. नवेखेड, जुनेखेड, पडवळवाडी, गोटखिंडी, अंकलखोप, वाळवे, कामेरी, ऐतवडेबुद्रुक, शेखरवाडी, जक्राईचीवाडी, लाडेगाव, वशी, ढगेवाडी अशा वीस पंचवीस गावांतील तरुण या फौजी संघटनेत येऊन दाखल झाले होते. पलीकडील कोल्हापूर जिल्ह्यातून

कलनाकवाडी, मडीलगे,ठाणे वगैरे खेड्यांतील अनेक कार्यकर्ते फौजी संघटनेत येऊन सामील झाले होते. सर्वांची खाण्यापिण्याची व्यवस्था राजूताई पाटील यांच्यावर सोपवली होती. वाळव्यातून व आसपासच्या खेड्यांतून शेकडो पोती धान्य मिलिटरी कँपसाठी जमा झाले होते. ते बैलगाडीतून पोहच करत होते. स्वातंत्र्याच्या चळवळीला उधाण आले होते. तरुणांची एकसारखी संख्या वाढत होती. ढगेवाडीचे सागाचे जंगल लष्करी हुकमांच्या आवाजांनी आणि भारत मातेच्या घोषणांनी दणाणत होते. वातावरणात एक नवचैतन्य निर्माण झाले होते. फौजी संघटनेची बातमी पाच पन्नास मैलांच्या टापूत वाऱ्यासारखी पसरली होती. पण दहा बारा मैलांवर इस्लामपूर येथे असलेल्या ब्रिटिशांच्या पोलिस कचेरीला याचा काहीही थांगपत्ता नव्हता. इतकी गुप्तता लोकांनी ठेवली होती.

भल्या पहाटेपासून फौजी संघटनेच्या कवायतीला नानकसिंग व मन्सासिंग या दोन लष्करी जवानांच्या कडक शिस्तीखाली प्रारंभ व्हायचा. मधला नाष्ट्याचा वेळ सोडला तर दुपारचे बारा वाजेपर्यंत लष्करी शिक्षणाची तालीम सुरू असायची. कडाक्याच्या थंडीतही तरुण घामाघूम व्हायचे. मन्सासिंग, नानकसिंग, किसन अहिर (पैलवान), नागनाथ अण्णा, राजमतीताई, वाय.सी.पाटील,बाळकू बिरनाळे वगैरे लोक फौजी संघटनेच्या कामासाठी अहोरात्र खपत होते. क्रांतिकारकांचे थवेच्या थवे कँपध्ये येऊन सामील होत होते. मिळवलेली शस्त्रे कमी पडू लागली. गोव्याहून चोरट्या मार्गाने शस्त्रास्त्रांची, दारुगोळ्याची, काडतुसांची अविरत आयात चालूच होती. प्रफुल्ल सिनेमाचे आर्ट डायरेक्टर बाबूराव जाधव व सिने आर्टिस्ट डी.बी. पाटील यांनी तात्काळ लाकडी बनावटीच्या हुबेहूब रायफली ट्रेनिंगसाठी तयार करून दिल्या होत्या. कर्नाटकचे माजी समाज कल्याण मंत्री ब्याकुडचे वसंतराव पाटील यांनीही दोन स्टेनगन दिल्या होत्या, त्यासाठी त्यांनी बेळगावचे मिलिटरी मधील लोकांशी संधान बांधले होते.

नागनाथ नायकवडी अण्णा यांचे कित्येक दिवसांचे स्वप्न आज पुरे झाले. त्यांनी स्वतःच्या हिमतीवर लष्करी सेनेची उभारणी केली आणि त्या सेनेमार्फत लढा चालू ठेवला. ते कुंडल गटापासून वेगळे झाले म्हणून प्रतिसरकार स्थापनेच्या प्रयत्नापासून दूर झाले नाहीत. त्यांनी वाळवे आणि शिराळा भागात प्रतिसत्ता निर्माण केली आणि स्वतंत्रपणे प्रतिसरकारचे काम चालवले. त्यांच्या भोवती मागे नमूद केल्या प्रमाणे वाय.सी.पाटील, किसन अहिर, शंकर परुळेकर (इनामदार), सखाराम घोरपडे (काका), बाबूराव कोकाटे, दत्ता पाटील, नामदेव गायकवाड, गंगाराम गायकवाड, बिरनाळे पैलवान, राजूताई पाटील, शामराव पाटील (आप्पा),

खंडू शेळके (दाजी), रामचंद्र अहिर (मास्तर), नारायण कदम आदी क्रांतिकारकांचा प्रभावशाली गट निर्माण झाला होता. नव्या जोमाने, नव्या हिमतीने क्रांतिवीर नागनाथ नायकवडींची स्वातंत्र्य संग्रामाची चौफेर घोडदौड चालू होती. याची कागाळी ब्रिटिशांचे हस्तक ब्रिटिश पोलिस अधिकाऱ्यांच्या कानावर घालत होते. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना पकडण्यासाठी पहिले ५०० रु.बक्षीस जाहीर केले होते. आता त्यात सातारा जेल फोडीनंतर नव्याने आणखीन ५०० रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.



ढगेवाडीच्या सागाच्या जंगलात
स्वातंत्र्यसैनिकांचा फौजी ट्रेनिंग कँप

# काळ आला होता; पण वेळ आली नव्हती

अहिर गल्ली म्हणजे नागनाथ अण्णांचा एक छोटासा बाले किल्लाच होता. अत्यंत सुरक्षित असे ठिकाण असल्यामुळे बहुतेक वेळा अण्णा पाठीमागच्या अहिर गल्लीत असायचे. गल्लीची रचना पूर्व-पश्चिम अशी एक वळसा सोडला तर सरळ रेषेत होती. या गल्लीत पश्चिमेच्या शेवटच्या टोकाला किसन पैलवान यांचं घर होतं. त्यांचे पूर्ण नाव किसन आत्माराम अहिर, जवळच लागून रामचंद्र अहिर (मास्तर) यांचे घर आणि मधे एक घर सोडून खंडू सखाराम शेळके यांचे घर, रस्त्यालगत समोर नारायण कदम (पेशवे) यांच घर, अहिर गल्लीतील तशी एक दोन घरं सोडली, तर बाकी सर्व घरे अत्यंत साधी दगड मातीची, कुंभारी कौले असलेली होती. जनावरांच्यासाठी साधी पाला पाचोळ्याची छप्पर, गल्लीच्या मध्यभागी एक रस्ता आणि त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंला एकाला एक लागून घरे, आणि मधे त्या रस्त्याला छेदणाऱ्या पाऊल वाटा, चोर वाटा, काही बोळाचे रस्ते होते पण हे नवख्या माणसाच्या लवकर लक्षात न येणारे असे रस्ते, गल्लीच्या पाठीमागे दक्षिण बाजूला एक रस्ता, त्याला लागून शेंडाचा व बाभळी झुडपांचा आणि काटेरी फड्याचा ताटवा. त्या ताटव्याला लागून आत पेरीव रान, गल्लीच्या पश्चिम बाजूला मोकळं थोडंसं गायरान. त्या गायरानात मधे-मधे बाभळीची झुडपं, तरवडाची झुडपं, काही भागात शेंडाचे व निवडुंगीच्या झाडांचे ताटवे आणि त्यातून दक्षिण उत्तर बैलगाडी रस्ता. पुढे सर्व पेरीव रान. गल्लीच्या उत्तर बाजूला

ज्या ठिकाणी सध्या हुतात्मा किसन अहिर विद्यालय आहे ती जागा पूर्वी पडीक होती. त्याठिकाणी मोठ-मोठी काटेरी फड्यांची झाडं व ठिक ठिकाणी वारुळे होती. कोपऱ्यावर रेणुका मातेच मंदिर. त्यानंतर पुढे इस्लामपूरला जाणारा मुख्य रस्ता, रस्त्याच्या पुढे सध्या मैदान आहे त्या ठिकाणीही बाभळीची तरवडाची झुडपं, काटेरी केकताडाचा फड आणि पुढे अण्णांची शेती. तिथेच थोड्या अंतरावर मैदानाच्या पूर्वेस अण्णांचे घर अशी नैसर्गिक या भागाची रचना होती. त्यामुळे पोलिस गल्लीत आलेतर ते एकतर ताबडतोब समजायचे कारण गल्लीतल्या घरा घरातली बायका, पोरं, माणसं नागनाथ अण्णांच्यावर जीव टाकत होती. त्यामुळे नागनाथ अण्णा अहिर गल्लीत अत्यंत सुरक्षित असत. अहिर गल्लीत झालेल्या पोलिसांच्या पाटलागात भूमिगत कुठून आले आणि कसे निघून गेले याचा पोलिसांना कधीच पत्ता लागला नाही.

एक वेळ नागनाथ अण्णांनी कार्यकर्त्यांना आपल्या माथ्यावर केसाच्या आड दडलेला वण दाखवला आणि स्वातंत्र्याच्या संग्रामातील प्रसंग सांगायला सुरुवात केली. ''काळ आला होता; पण वेळ आली नव्हती. १९४२ च्या जन आंदोलनाला चांगलं उधान आलेला तो काळ होता. इंग्रज शासनाला भूमिगत चांगले हादरे देत होते. म्हणून ब्रिटिश सरकारनं भूमिगतांच्यावर सर्व लक्ष केंद्रित केले होते. भूमिगतांना दिसता क्षणी गोळ्या घाला किंवा पकडून जेरबंद करा. असे आदेश डी.एस.पी. साताऱ्याकडून सर्व पोलिस स्टेशनला मिळाले होते. पोलिसही सर्व शक्तिनिशी भूमिगतांच्या मागे धावत होते. पावसाळ्याचे अखेरचे दिवस होते. हवामान तसे कोरडे होते. तरी गाव पांदीचे ओढे, नाले वहात होते. कृष्णा नदीला आजून उतार झाला नव्हता. वाळवा, शिरगाव मधील लोक नावेनेच ये-जा करत होती. किसन पैलवान, शंकराव परुळेकर (इनामदार), खंडू शेळके (दाजी), नारायण कदम (पेशवे), रामचंद्र अहिर (मास्तर), काका घोरपडे, पडवळवाडीचे तुकाराम नाना खोत (वस्ताद), देवास (अनुसे) वगैरे कार्यकर्ते अहिर गल्लीतील शेतकरी रामू मुळीक यांच्या वस्तीवर जमले होते. ती वस्ती गल्लीच्या दक्षिण बाजूला साधारण चार एक फर्लांगावर होती. वस्ती अतिशय स्वच्छ व टापटीप असायची. चांगली सुंदर खोप असायची, पाखरे राखण्यासाठी मचाण असायचे त्याचा उपयोग भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना टेहळणी करिता व्हायचा. जनावरांच्यासाठी दमदार मांडव असायचा,

स्वच्छ पाणी शिवाय सुरक्षित ठिकाण, रामू मुळीक दिसायला साधाभोळा शेतकरी होता; पण चाणाक्ष, हुशार, विश्वासू, प्रामाणिक होता. वस्तीवरून दिवसा भूमिगत कार्यकर्ते गावाकडे येताना आपल्या जवळच्या साध्या बंदुका, लांब पल्याच्या रायफली, इतर दारुगोळा त्या वस्तीवर ठेवत. खिशात एखादे पिस्तूल किंवा रिव्हॉल्व्हर घालून सड्या हातानं गावात जात-येत होते. त्या दिवसी बाबुराव थोरात हा कार्यकर्ता आम्हांला भेटला आणि 'राष्ट्र शक्तीत' काय तर बातमी आलिया. ती तुम्ही वाचली का? म्हणून त्यांनी मला विचारले. तो राष्ट्रशक्तीचा अंक अणण्यासाठी मी आमच्या घरी आलो होतो. आम्ही भूमिगत वाळव्यात येणार आसल्याची बातमी पोलिसांना समजली होती म्हणून दहा बारा पोलिसांची एक हत्यारबंद तुकडी गावाच्या बाहेर गंजीखान्यात दबा धरून बसली होती. त्याची कल्पना आम्हा कोणालाच नव्हती, रामा गोटखिंडकर हा त्यांचा खबऱ्या त्यांच्या बरोबर होता. तो दोन साध्या वेशातील पोलिसांच्या बरोबर आमच्या घराच्या आसपास फिरत होता. मी घरात गेल्याची खात्री केली आणि पोलिसांना आमच्या घरावर छापा घालायला त्याने पाठवले. ( हे आम्हांला नंतर कळाले) माझ्या पाठोपाठ बाबूराव थोरात, खंडू दाजी, किसन पैलवान वगैरे कार्यकर्ते पेपर मधल्या बातमीच्या उत्सुकतेने आमच्या घराकडे येत होते. त्यांना आमच्या घराकडे पोलिस पळत येतायत ते दिसले. त्यांनी मला सावध केले. 'अण्णा, पळा. पोलिस आले.' मी ताबडतोब पाठीमागच्या दाराकडे पळालो; येवढ्यात दुसरी हाळी पोलिस पाटीमागच्या दाराने येतायत! मी पवित्रा बदलला आणि पुढच्या दाराने एवढ्या जोरात पळत सुटलो-दुर्दैव पुढच्या दाराची चौकट उंचीला कमी आहे हे माझ्या लक्षात आले नाही, माझा माथा इतक्या जोरानं चौकटीवर आपटला की, डोकं मागे आणि पाय पुढे गेले तसा मी धाडकन जमिनीवर खाली पडलो. डोक्याला मोठी खोक पडली सर्व डोकं रक्त बंबाळ झालं होतं. रक्त तोंडावरून वगळून अंगावर सांडत होत. आईने जखमेत हळद भरली पण थांबायला वेळ कुठाय, पोलिसांनी बंदुका लोड करून हवेत बार काडत मागच्या दारा जवळ आले हाते. एका हाताने डोक्याची जखम धरून पेटकराच्या दारातून सुतार मेट्याच्या पाटीमागच्या रस्त्याने वेगाने कुंभारवाडा ओलांडून तसाच रानातील पाय वाटेने लक्ष्मीचे देऊळ गाठले. पोलिस पाटीवर होतेच, कपडे सारे रक्ताने माखले होते. कृष्णामाई दुथडी तुडुंब भरून वहात होती. वस्तीवरच्या दोन शेतकरी कार्यकर्त्यांना

बरोबर घेऊन त्यांच्या मदतीने नदी पार केली आणि तेथून हवलदाराच्या वस्तीवर गेलो. आता पोलिसांचा धोका टळला होता. तो पर्यंत रक्तस्रावामुळे ग्लानी यायला लागली होती. हवलदार वस्तीवर जखमेला मलमपट्टी केली. थोडसं दूध घेतलं, जेवणखाणं झाल्यावर रात्रभर तिथच विश्रांती घेतली आणि सकाळी कुंडल येथे जाऊन नाना पाटलांना भेटलो. दोन एक दिवसांनी डोक्याची जखम सुकायला लागली होती. परत शिराळा पेट्यात फौजी कँपच्या ठिकाणी पोहचलो. अशा अनेक संकटांवर मात केली. अनेकवेळा गावगुंडांनी रस्ते रोखले, इथं मारतो तिथे मारतो म्हणाले, तरी मी आजून वयाच्या ८६ वर्षा पर्यंत जगलोय कसा? याचच मला आश्चर्य वाटतय.'' असे अण्णा म्हणाले अन् थांबले.

❋ ❋

# सोनवड्याची लढाई

## (२५ फेब्रुवारी १९४६)

ढगेवाडीच्या सागाच्या जंगलात फौजी कँप सुरू होऊन दोन महिने होत आले होते. अजूनही इंग्रजी सत्तेला त्याचा सुगावा लागला नव्हता. पोलिस कचेरी पासून दहा बारा मैलांवर असलेला हा कँप डोंगराच्या खोबणीत पश्चिम दिशेला सागाच्या दाट झाडीने झाकलेल्या पठारावर होता. अति उत्साहाने कार्यकर्ते लष्करी शिक्षण घेत होते. बाल्यावस्थेत असलेल्या या लष्करी कँपचा न जाणून ब्रिटिश सरकारला जर सुगावा लागला. तर मोठा अनर्थ होईल, नुकतेच प्राथमिक लष्करी शिक्षण पूर्ण होत आले होते. यापुढे फौजी कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष फायरिंग कसे करायचे, नेम कसा धरायचा, शस्त्राने सैनिकांवर हल्ला कसा करायचा, स्टेनगन कशी चालवायची, हातबॉम्ब कसे फेकायचे यांचा प्रत्यक्ष सराव करायचा म्हटले तर त्या शस्त्रागाराचे आवाज होणार. पोलिस कचेरी जवळ होती. म्हणून ढगेवाडीचा कँप हलवून दुसऱ्या जागी सुरू करावयाचा होता. फौजी कँपची नवी जागा शोधण्याचे काम किसन अहिर (पैलवान) यांच्याकडे नागनाथ अण्णा व सहकाऱ्यांनी सोपवले होते.

किसन अहिर आपल्या बरोबर दोन सहकाऱ्यांना घेऊन ढगेवाडीच्या पश्चिम दिशेला दुर्गम अशा शिराळ पेट्यात शिरले. सबंध शिराळ पेट्यातील डोंगर,दऱ्या,जंगल त्यांनी पायाखाली घातलं. पाटण तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगर कपारी,पठारावरील कांही जंगलाचा भाग पण त्यांनी पालथा घातला. पण मनाजोगे ठिकाण त्यांना गवसेना म्हणून त्यांनी शिराळ पेट्याला लागून वारणेच्या

पलीकडे दक्षिण दिशेला कोल्हापूर जिल्ह्याच्या शेवटच्या उत्तरेकडील टोकाच्या शाहुवाडी महालाकडे आपला मोर्चा वळवला. सकाळ पासून चालून चालून आता चांगल्याच भुका लागल्या होत्या, म्हणून किसन अहिर यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर वारणा पार केली आणि टेकडीवर झाडाखाली बसून आपल्या जवळचे जेवण जेवले. शेजारच्या वस्तीवर पाणी प्याले आणि फौजी कँपच्या नवीन जागेच्या शोधात निघाले. साधारणतः दुपारचे एक वाजले असतील त्या तिघा क्रांतिकारकांनी शाहुवाडी महालातील जंगल तुडवायला सुरुवात केली. शाहुमहाल घनदाट अरण्यांनी भरलेला, हिंस्त्र श्वापदांची वस्ती असलेला, उंचच उंच डोंगरांच्या रांगांनी दऱ्या खोऱ्यांनी नटलेला हा फौजी कँपसाठी योग्य आहे असे किसन अहिरांनी मनात ठरवले. सतत पाच-सहा दिवस शिराळ पेटा, पाटण तालुका आणि शाहुवाडी महालाचा जंगली मुलुख पायी पालथा घातल्यावर वारणेच्या पलीकडील शाहुवाडी महालपैकी थाबड्या जवळच बांबवडे हे हजार बाराशे वस्तीचं छोटसं गाव. ते ठिकाण त्यांना आवडले. कानसा नदीच्या काठावर एका टेकडीवर घनदाट जंगलाने वेढलेल्या अशा दुर्गम भागात वसलेले होते. गावात बहुतेक वस्ती कोकणी शेतकऱ्यांची व बारा बलुतेदारांची आहे. इथला शेतकरी कष्टाळू, प्रामाणिक आणि मायाळू आहे. पिकाऊ भाताची शेती होती. डोंगर उतारावर शेतीत नाचणी, वरीची पिके शेतकरी घेत होते. या भागात पावसाचे प्रमाण फार होते. मृग नक्षत्रापासून नवरात्रात देवीला फुलांच्या दहा माळा घालण्यापर्यंतच्या दिवसापर्यंत पावसाची धुमश्चक्री चालूच असायची. ज्येष्ठात तो वेळी अवेळी यायचा आणि आषाढ संपता संपता विजाच्या कडकडाट आणि मेघांच्या गर्जनेत पाऊस हमखास पडायचा. या परिस्थितीचा लोकांना सराव झाला होता. गावाला जमिनीचे क्षेत्र तोकडे होते. त्यामुळे कामाधंद्यानिमित्त मुंबईला जाण्याचे प्रमाण जवळ जवळ घरटी होते. गावाच्या सपाट जागेच्या चोहोबाजूने पवनाई व चोपडाई हे डोंगर, शिंबाईचे पठार आणि कांडवनचे जंगल होते. गावाच्या दक्षिण बाजूला तीन चार फर्लांगावरून कानसा नदी पश्चिमेकडून पूर्व बाजूला वहात जाऊन वारणेला मिळाली होती. पवनाई डोंगराच्या उत्तर बाजूला प्रचंड सपाट मैदान हमचौक सपाट रान आहे. या मैदानाच्या पूर्व बाजूला चोपडाईचा डोंगर दक्षिणोत्तर पसरला आहे. दोन्ही डोंगर चराऊ गवताचे व करवंदाच्या जाळ्यांनी माखलेले आहे. पवनाई डोंगराच्या मध्यावर एक भलं मोठ आंब्याचं झाड आहे. पवनाईचा डोंगर आणि चोपडाईचा डोंगराची उतरण एक दीड मैल खाली खाली उतरत आली आहे आणि त्यांच्या उत्तर बाजूला शिबराईच पठार मैलन मैल पसरलेले असून त्याला लागून कानसा नदीचं खोर आहे. त्याच्या पलीकडे कांडवन जंगलात साग,आंबा,जांभूळ,

फणस,घाणेरी,निवडुंग,खैर आणि इतर वेली फुलांनी हिरव्यागार जंगली वृक्षराजीनं मैलच्या मैल भू-प्रदेश झाकून गेला आहे. पवनाई,चोपडाई,शिवराई आणि कांडबन यांच्या मध्यभागी पसलेले हे मैदान लष्करी छावणीसाठी नैसर्गिकरीत्या अगदी सुरक्षित होतं. कोणत्याही बाजूकडून आलेला माणूस छावणीतल्या फौजीला एक मैला पर्यंतचा सहज दिसत होता. पण त्या माणसाला तेथून छावणी दिसत नव्हती. शिवाय सपाट मैदानाच्या पूर्वेला पवनाई व चोपडाई डोंगराच्या हद्दीवर एक ओढा वाहत होता. छावणीची सपाट जागा दुर्गम होती आणि लष्करी छावणीपर्यंत पोहचण्याकरता काही मैल दऱ्या आणि डोंगर पादाक्रांत करावे लागत होते. रस्त्याची अडचण होती. तेथील दळणवळण अवघड होते. किसन अहिर (पैलवान) यांनी ही जागा पसंत केली. त्या लष्करी कँपच्या ठिकाणाला नागनाथ (अण्णा) नायकवडींसह सर्व क्रांतिकारकांनी मान्यता दिली.

ढगेवाडीच्या जंगलातील फौजी संघटनेची छावणी ताबडतोब थाबड्याच्या या ठिकाणी हलविली. आता थाबड्याच्या पठारावर क्रांतिकारकांचा तळ पडला. या ठिकाणी प्रशिक्षणाला भल्या सकाळी सुरुवात व्हायची आणि दुपारी १२ वाजता फौजी क्रांतिकारकांना सुट्टी मिळायची. आता सकाळच्या प्रशिक्षणामध्ये डोंगरावर चढाईचे शिक्षण, रस्सी बांधून दरीत खाली खोलवर उतरण्याचे प्रशिक्षण, प्रत्यक्ष बंदुकीच्या फायरिंगचे प्रशिक्षण, नेमबाजीचे प्रशिक्षण, घोड्यावर रपेट करण्याचे प्रशिक्षण, कोपरावर चालण्याचे प्रशिक्षण, दोरीवर चढण्याचे प्रशिक्षण, शत्रूची टेहळणी करण्याचे प्रशिक्षण, हातबॉम्ब, स्टेनगन चालवण्याचे प्रशिक्षण इत्यादी दिले जात होते. दुपारच्या जेवणानंतर १५-२० फौजी सैनिक छावणीतून बाहेर पडून आसपासच्या खेड्यात जात आणि राष्ट्रद्रोही, गरीब जनतेचा छळ करणारे समाजकंटक, पोलिसांचे खबरे, दरोडेखोर, गावगुंड यांच्या विषयी माहिती गोळा करत आणि दोषी असणाऱ्या व्यक्तीला जनता दरबारात लोकांच्या समोर त्या गुन्हेगार लोकांना शिक्षा करत. पाटील तलाठ्याचं गावातील लोकांशी वागणं कसं आहे याची बातमी काढून चांगल्या लोकांशी फौजी संघटना संबंध वाढवत होती. एखाद्या विधवेची अन्यायाने कोणी टग्याने जमीन हडप केली असेल तर ती जमीन त्या बाईमाणसाला परत करत. कोणी लाचखोरी केली असल्यास लाचखोरांना चावडीवर बोलाऊन त्यांच्याकडून पैसे वसूल करून ज्याचे त्याला परत देण्यास भाग पाडत. बाया बापड्यांवर कुणी अन्याय केला असल्यास गावकऱ्यांदेखत त्याच्या मुसक्या आवळून बायांचे पाय धरायला लावत. अशा फौजी संघटनेच्या कामातून जो वचक तयार झाला त्यातून आपोआपच कित्येक निष्पाप मुलींची नांदणूक लागली. निराधार

विधवा बायांना गावगुंडांचे पासून संरक्षण मिळायला लागले. भावी काळाच्या ग्रामराज्य निर्मितीचा पाया नागनाथ अण्णांनी या निमित्ताने घालायला सुरुवात केली होती. फौजी कँपमधील शिक्षण संपल्यावर फौजी संघटनेतील शिक्षण घेतलेल्या प्रत्येक तरुणाने एक एक गाव निवडून त्या गावातून किसानांची फौज तयार करायची आणि बाहेरून येणाऱ्या सुभाषचंद्र बोसच्या आझाद हिंद सेनेला या अंतर्गत किसानांच्या फौजेने मदत करावयाची. बाहेरून सुभाषचंद्र बोसच्या सैन्यांनी इंग्रजी फौजेवर हल्ला करायचा आणि आतून किसानांच्या फौजेने ब्रिटिश फौजेवर एकाच वेळी हल्ला करून इंग्रज सत्ताधाऱ्यांची कोंडी करायची आणि भारत देश स्वतंत्र करावयाचा हे स्वप्न नागनाथ अण्णांनी उरी बाळगून या दूरदृष्टीने फौजी संघटनेचा पाया भरला होता. नियमितपणे फौजी संघटनेचे कामकाज चालू होते. गावागावांत इंग्रजी सत्तेविरुद्ध नागनाथ नायकवडी यांनी आपली प्रतिसत्ता स्थापन केली होती. गावागावांतील प्रतिसरकारच्या न्यायालयामुळे इंग्रजी न्यायालये ओस पडायला लागली. खेड्यापाड्यांतील जनतेला त्यांच्या प्रतिसत्तेच्या न्यायदान मंडळाकडून न्याय मिळायला लागला. नागनाथ अण्णांच्या फौजेतील क्रांतिकारकांच्या योग्य वागण्यामुळे इंग्रज सैनिकांना लोक आडवू लागले. प्रारंभी क्रांतिकारक सैनिकांचे जेवण वाळवा व ऐतवडे बुद्रुक या गावांहून येत होते. पुढे पुढे बांबवडे व आसपासच्या गावचे लोक जेवण स्वतःहून देऊ लागले. लोकांच्यातील ऐक्याची व उत्साहाची भावना बघून फौजी संघटनेच्या सैनिकांना जोम आलेला होता. ते आपल्या फौजी शिक्षणाकडे नेत्यांच्या आदेशाप्रमाणे कार्यरत राहू लागले.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या या कारभाराचा इंग्रजी सत्तेला चांगलाच हादरा बसणार याचा आत्मविश्वास जनमाणसांना वाटत होता. असेच दिवस जात होते. एक दिवस नेहमी प्रमाणे सकाळी फौजी कँपची कवायत चालू होती आणि दूरवर एक सी.आय.डी बारकाईने कवायतीवर नजर ठेवून होता. झाडा झुडुपांचा आधार घेऊन लपून छपून त्याने आपले काम चालवले होते. फौजी संघटनेचे नशिब बलवत्तर होते. एका फौजी सैनिकाची त्याच्यावर नजर गेली. दूरवर करवंदीच्या जाळी आड माणसांची आकृती दिसते आहे. त्याने किसन अहिर व नानकसिंगांच्या लक्षात ही गोष्ट आणून दिली त्यांनी ताबडतोब आदेश दिला. 'पकडा त्याला. जिवंत धरून आमच्या पुढे हजर करा.' कसल्याही परिस्थितीत गोळी घालायची नाही. अशी ताकीद देऊन दहा बारा सैनिक त्याच्या पाठी लावले. तो माणूस पवनाईच्या पलीकडच्या डोंगर कड्यातून कँपला निरखत होता. आपल्या दिशेने काही माणसे पळत येतायत त्याचा सुगावा त्याला लागला. त्याने आपला तोरा

बदलला आणि दक्षिण दिशेने पळायला लागला. फौजी संघटनेच्या लोकांची शंका आणखी अधिकच बळावली. त्यांनी मग अधिक वेगाने दौडायला सुरुवात केली. पवनाईच्या डोंगरावर दिसलेला तो माणूस एकसारखा हुलकावण्या दाखवत लपत छपत पळत होता. लांब पल्याच्या बंदुकीने बरोबर टिपायचा म्हटलं तरी तसा तो बंदुकीच्या रेंजमध्ये होता. पण नेत्यांचा तसा आदेश नव्हता, म्हणून सैनिक त्याला जिवंत पकडण्यासाठी धडपडत होते. कारण त्याला पकडून तो कोण आहे? तो इथं कशासाठी आला? वगैरेची सविस्तर माहिती त्याच्याकडून मिळावयाची होती. यदा कदाचित फौजी संघटनेवर काय संकट येणार असले तर त्याची आगाऊ कल्पना येणार होती. अर्ध्या पाऊण तासाच्या पाठलागाच्या रणधुमाळीनंतर एकदाचा तो माणूस हातात आला. त्याला जिवंत पकडण्यात सैनिक यशस्वी झाले. त्याला पकडून त्याला जेरबंद करून नेत्यांच्या पुढे हजर केला. किती केला तरी तो इंग्रजी राजवटीतला सी.आय.डी. तापून निघालेला होता. सहजासहजी तो खरं सांगणाऱ्या पैकी नव्हता. उडवाउडवीची उत्तर देत होता. फौजी खाक्या दाखवून अर्धा कच्चा केल्यावर तो लाईनवर आला आणि भूत बोलल्यागत सर्व हकीकत खरी सांगू लागला. इंग्रजी सत्तेच्या वरच्या रँकचा तो सी.आय.डी. होता. सरकारला तुमच्या फौजी कँपचा सुगावा लागला आहे म्हणून कँपचा ठाव ठिकाणा व इत्थंभूत माहिती मिळवण्यासाठी माझी नेमणूक केल्याचे त्यांनी सांगितले. माझ्या रिपोर्टवर कारवाया करण्याचे ठरले आहे. त्यासाठी मिलिटरीला सज्ज रहाण्याचे आदेश पाठवण्याचे विचार अधिकारी करत आहेत वगैरे सर्व इत्थंभूत माहिती त्याच्याकडून काढून घेतली. पुढे या सी.आय.डी. अधिकाऱ्याचे काय करावे या बाबत फौजी आपआपसांत चर्चा करायला लागले.

त्या सी.आय.डी.ला तत्काळ गोळ्या घालण्याचा हेका कांही फौजी संघटनेच्या सैनिकांनी धरला होता. किसन अहिर (पैलवान), नानकसिंग व मन्सासिंग यानी सैनिकांना सांगितले, 'नागनाथ अण्णा, राजू ताई, वाय.सी.पाटील ही प्रमुख मंडळी दारुगोळा, हत्यार, काडतुसे आणण्याच्या कामी बाहेर गोव्याकडे गेलेले आहेत. ते परत आल्यावर त्यांच्या आदेशाप्रमाणे आपण निर्णय घेऊ.' असे म्हटल्यावर सैनिक शांत झाले. शेवटी तो अधिकारी पळून जाऊ नये म्हणून कँपच्या मैदानाच्या पूर्व बाजूने गेलेल्या ओढ्याच्या काठावर खड्डा काढून गळ्याइतके त्याला पुरून ठेवण्यात आले. जगण्या पुरत्या अन्न पाण्याची त्याची व्यवस्था करून चार सैनिकांचा त्याच्यावर सक्त पहारा ठेवला. त्याला बजाऊन सांगितले तुझी सर्व माहिती आम्हांला समजली आहे. जर का पळून जाऊन तू सरकारला माहिती दिलीस

तर तुझ्या बायका पोरांची आम्ही वाट लाऊ, लक्षात ठेव. अशी त्याला धाक घातली.दोन एक दिवसानंतर नागनाथ अण्णा आदी प्रमुख कँपवर आल्यावर त्यांना त्या सी.आय.डी.ची हकीगत कानावर घातली व त्याला त्यांचे पुढे हजर केले. त्या कैद्याने प्रमुखांना विनंती केली. ''मला ठार मारू नका. घरी माझी कच्चीबच्ची मुलं आहेत. वृद्ध आई वडील आहेत, बायको आहे. माझ्या शिवाय त्यांना कोणाचाही आधार नाही. मी पोटासाठी नोकरी करतोय. माझ्यावर दया करा. इथली कुठलीही माहिती मी सरकारला देणार नाही.'' अगदी काकुळतीला येऊन रडतरडत नेत्यांना तो सांगत होता. नेत्यांनी आदेश दिला. याचे डोळे बांधा आणि घोड्यावर बसवून वाळव्याच्या कार्यकर्त्यांच्या ताब्यात द्या आणि त्यांना सांगा दोन एक महिन्यांनी त्याला सोडा. तो पर्यंत त्याच्यावर चांगली नजर ठेवा.

आता फौजी संघटनेच्या नेत्यांच्या पुढे दुसरे प्रश्न चिन्ह उभे राहिले. सी.आय.डी.ने दिलेल्या माहितीवरून सरकारला कँपचा सुगावा लागलेला आहे. अशा परिस्थितीत इथं कँप जास्त काळ चालू ठेवणं धोक्याचे आहे. तत्काळ कँपची जागा बदलण्याची गरज नेत्यांना वाटू लागली. थाबड्याची जागा किसन अहिर पैलवान यांनी शोधली होती. त्यावेळी त्यांनी शिराळ पेटा, शाहु महाल, पाटण वगैरेच्या दुर्गम भागाची पहाणी केलेली आहे. त्यांना त्याचा चांगला अनुभवही आहे. तेव्हा नवीन जागा फौजी कँपसाठी शोधण्याची जबाबदारी नागनाथ नायकवडी आदी प्रमुख नेत्यांनी त्यांचेवर सोपवली. त्यावेळी किसन पैलवान नागनाथ अण्णांना म्हणाले, ''या पेक्षाही दुसरी एक जागा मणदूरच्या जंगलातली मला पसंत पडली होती; पण मी मुद्दामहून कोल्हापूर संस्थानातील थाबड्याची जागा का निवडली त्याला एक कारण आहे. कारण साताराचे पोलिस कोल्हापूरच्या छत्रपतींच्या परवानगी शिवाय त्यांच्या राज्यात ढवळाढवळ करू शकत नव्हते.'' नागनाथ नायकवडी व प्रमुख नेते त्यांना म्हणाले, ''पैलवान, त्या वेळच्या परिस्थितीला धरून तुमचं म्हणणं बरोबर होते.पण आज ती परिस्थिती नाही. आपल्या कँपचा इंग्रजांना सुगावा लागलेला आहे. इथून कँप हलवला पाहिजे, तेव्हा थाबड्याचा कँप हालवण्यापूर्वी परत एक वेळ तुम्ही मणदूरची जागा पहाण्यास जावा आणि उद्या तुम्ही बारा एक वाजेपर्यंत परत कँपवर या. तुम्ही आला की मगच आपण इथून ताबडतोब कँप हालवू आणि मणदूरच्या जंगलात नेऊ. प्रमुख नेत्यांच्या निर्णयाप्रमाणो किसन पैलवान मणदूरला गेले. शिराळ पेट्याच्या अगदी पश्चिम दिशेला मणदूरचं जंगल होतं. तेथून पुढे त्याच दिशेला थोड्या काही मैलांच्या अंतरावर वारणेचा उगम होता. मणदूरच्या चारी दिशेला मैल मैल पर्यंत पसलेली हिरव्यागार घनदाट वृक्षराजीनं

बहरलेला भू प्रदेश, रंगीबेरंगी पक्ष्यांची, हरणांच्या कळपांची वसाहत असलेल्या या जंगलात निरनिराळ्या जातींच्या फुलांनी बहरलेल्या वेली, दूरवरून येणारे हिंस्त्र प्राण्यांचे आवाज-मणदूरच्या जंगलाची नवलाई वेगळीच होती. थाबड्याच्या वायव्य बाजूला उंच उंच डोंगररांगांच्या अंगा खांद्यावर खेळणारं हे जंगल. मध्येच खोल डोंगर दरीतून वाहणारी वारणामाई मन कसं आनंदान फुलून येणार असं या भागाच सृष्टिसौंदर्य होत.

तो दिवस होता २३ फेब्रुवारी १९४६ किसन अहिर (पैलवान) मणदूरच्या दिशेने चालले होते. पैलवान अत्यंत हुशार होते, कर्तव्यदक्ष होते. उत्कृष्ट कुस्तीगीर होते. आयुष्यात त्यांना पराभव माहीत नव्हता, कधीही ते कुस्ती हरले नव्हते, कुस्ती बरोबर झाली नाही म्हणून एखाद्या पैलवानाने तक्रार केली तर त्याच फडात त्या पैलवाना बरोबर पुन्हा ते कुस्ती धरत आणि कुस्ती शौकिनांनी टाळ्यांच्या गजरात कुस्ती जिंकल्याचा निकाल दिल्यावर लोक त्यांना उचलून घेत असत. कुस्तीमध्ये त्यांचा मोळीचा डाव फार प्रसिद्ध होता. त्यांच्या मोळी डावात पैलवान सापडला की तो चितपट झालाच म्हणून समजा. त्यांची उंची पुरी सहा फूट होती. एक सारखे शरीरसौष्ठव होते. ते नाकसीर गव्हाळ रंगाचे होते. त्यांना अहंकार नव्हता. वागण्यात बोलण्यात सौजन्य होते. घरातून बाहेर पडले की तालमीपर्यंत मान खाली घालून सरळ जात. रस्त्यात इकडे तिकडे पहाण्याची त्यांना सवय नव्हती. अंगात हत्तीच बळ होतं म्हणून आपल्या उभ्या आयुष्यात त्यांनी कुणालाही त्रास दिला नाही. त्यांना कशाचाही मोह नव्हता. पैसा आडक्यापासून ते दोन हात दूर असायचे. चळवळीत असताना नागनाथ अण्णांनी त्यांना खर्चासाठी म्हणून पैसे देऊ केले. त्यांनी विनम्रपणे ते नाकारले आणि नागनाथ अण्णांना ते म्हणाले, "अण्णा, ही पिडा माझ्याजवळ नको. पाहिजे त्या गोष्टी दूध, धडूतं कपडा, घोंगडी चपलासह तुम्ही आम्हांला देताय आणि मग पैसे कशाला लागतायत?" एकच वेळ फक्त नागनाथ अण्णांना पैलवान म्हणाले होते. अण्णा मला एखादा दिवस दूध मिळाले नाही तर दुसऱ्या दिवशी माझे पोट साफ होत नाही. किसन पैलवानांना एका वेळेला आठ नऊ मापांचे कासांडीभर दूध लागायचे. पैलवान अगदी डोंगरात असले तरी त्यांना दररोज सकाळ संध्याकाळ आठ नऊ मापांचे कासांडीभर दूध पोहचवण्याची व्यवस्था नागनाथ अण्णांनी कटाक्षाने केली होती. किसन पैलवान कुठेही आणि कसल्याही कामात असले, अगदी जंगलात असले तरी दररोज एक हजार जोर-बैठका काढण्याचा नियम त्यांनी कधीही चुकवला नाही. ते नेहमी आपल्या सहकाऱ्यांना भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे म्हणून सांगायचे. ते स्वत: त्या प्रमाणे तंतोतंत

वागायचे. एक वेळचा प्रसंग-त्यांच्या पत्नी आजारी पडल्या होत्या. तशा त्या खूपच आजारी होत्या. म्हणून नागनाथ अण्णा त्यांना म्हणाले, ''पैलवान, तुम्ही एक वेळ घरी जाऊन पत्नीला भेटून या.'' त्यावर ते म्हणाले, ''मला फौजी कँपचे काम आहे शिवाय मी जाऊन काय करणार? डॉक्टर जाऊन बघून आलेत औषधपाणी दिलय.'' त्यावर अण्णा म्हणाले, ''पैलवान तसं नसतं. तुम्ही जाऊन येण्यात पत्नीला एक मानसिक समाधान मिळेल. ते वेगळं असतं. मी सांगतोय म्हणून तरी जाऊन या.'' मग ते वाळव्याला आले. त्यांचा मुलगा भगवान अगदी लहान दोन-एक वर्षाचा, पाच एक वर्षांची सुशीला नावाची एक मुलगी, पत्नी आणि वडील एवढा छोटासा त्यांचा परिवार होता.ते सर्वांना भेटले. दुसऱ्या दिवशी सकाळी तातडीने कँपवर आले आणि त्याच दिवशी संध्याकाळी नऊ वाजता थाबड्याला कँपवर पोहचले. अशीच एक गमंत सखाराम घोरपडे (काका) यांनी, 'सांगितली. मला बिडी ओढायची सवय होती. सकाळची फौजी कवायत संपल्यावर जेवण खाणं केल्यावर डोंगरावर विश्रांतीसाठी जात होतो. माझ्याबरोबर किसन पैलवान, खंडू शेळके(दाजी), नारायण कदम, रामचंद्र अहिर(मास्तर), तुकाराम नाना खोत(वस्ताद) ही माणसं रेड्याच्या ताकदीची होती. रेड्याचे शिंग धरून आपल्या ताकतीन रेड्याला गुडगं टेकायला लावत होती, असे आम्ही सर्वजण झाडाखाली बसलो होतो. येवढ्यात पैलवानची दुधाची कासांडी घेऊन एक कार्यकर्ता आला. मी सहज पैलवानांना म्हणालो, ''पैलवान, माझ्या विडीचा धूर वर जास्त जातोय का तुमच्या दुधाची धार वर जातेय ते पाहू. म्हणून मी उभा राहिलो आणि बिडीच्या धुराचा झुरका वर सोडला. त्या नंतर दुधाची भरलेली कासांडी घेऊन पैलवान उभे राहिले आणि उंच हात करून दुधाची धार तोंडात अशी काय धरली की एकही दुधाचा थेंब खाली न पडता एका दमात भरलेली कासांडी रिकामी केली. मी खजिल झालो आणि पैलवानांना म्हणालो, ''पैलवान तुम्ही जिंकलात.'' त्यावर पैलवान म्हणाले, ''आहो काका, जिंकलं काय म्हणताय? आपण सर्वजण येणारी लढाई जिंकणार.'' असा हा खिलाडू वृत्तीचा, उमद्या मनाचा, सर्वांना हवा हवासा वाटणारा, फौजी कँपचा जीव की प्राण असणारी व्यक्ती म्हणजे किसन अहिर पैलवान.

दुसऱ्या दिवशी २४ फेब्रुवारी १९४६ ला मणदूरच्या जंगलातील पूर्वी पसंत केलेली जागा त्यांनी निश्चित केली. एव्हाना त्या वेळी दिवसाचे बारा वाजले होते. थाबड्याला त्यांना एक वाजेपर्यंत पोहचायचे होते. ते आल्यावर थाबड्याचा फौजी कँप हालवायाचा होता म्हणून ते फौजी कँपच्या रोखाने बिगी-बिगी निघाले होते. मणदूर गाव ओलांडून ते तीन चार फर्लांग पुढे आले असतील

नसतील तोच त्यांना येडयाचे पांडू मास्तर पुढून आलेले दिसले. पांडू मास्तरांनी नुकतेच येरवडयाचा जेल फोडून पलायन केले होते. त्यांच्या मागावर पोलिस सतत होते. पेोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी म्हणून ते त्या दिवशी शिराळ पेट्याच्या घनदाट अरण्यात यावयास निघाले होते. बरोबर आणखी दोन सहकारी होते. शिराळ्याच्या वरती मावळतीच्या दिशेला चार पाच मैलांवर पुढे चालून आल्यानंतर शिराळ्याच्या दिशेने येणारा ड्रेसमधला हत्यारी पोलिस त्यांना दिसला. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्याला शिताफीने पकडले. त्याची सायकल मोडली, त्याला यथेच्छ मार दिला, त्याची बंदूक काढून घेतली त्याचा ड्रेस फाडला आणि त्याला मग सोडून दिले.

रक्तबंबाळ अवस्थेत तो पोलिस शिराळा पोलिस चौकीत आला व झाला प्रकार आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास सांगितला. वरिष्ठाने इस्लामपूर व सातारला रिपोर्ट केला आणि जादा पोलिसांची कुमक मागवून घेतली. किसन पैलवानांना पांडू मास्तरांनी पोलिसाला आपण कसे मारले हे सांगितले आणि पोलिस माझ्या मागावर आता येतील यदाकदाचित. तुम्हांलाही त्याचा त्रास होण्याची शक्यता आहे, तेव्हा तुम्ही पुढं जाणे धोक्याचे आहे असे सांगून आग्रहाने त्यांना माघारी फिरायला सांगून आपल्या बरोबर मणदूरला नेले व त्याना ठेवून घेतले. इकडे शिराळ्याला इस्लामपूर व साताराच्या पोलिसांची तुकडी येऊन थडकली. अगोदर शिराळ्याच्या जंगल भागात क्रांतिकारकांच्या प्रक्षुब्ध हालचाली चालू आहेत याची पोलिसांना अगोदरच कुणकुण लागली होती. पोलिसांच्या तुकड्यावर तुकड्या शिराळ्यात येऊन पोहचल्या. पोलिसाला मारहाण करणाऱ्या पांडू मास्तरांच्या मागावर एक पोलिस तुकडी चरण बिळाशीचा भाग तुडवत आरळ्यापर्यंत माग काढत आली होती. आरळ्यात चौकशी करता त्यांची खात्री झाली पांडू मास्तर मणदूर गावात आहेत. म्हणून पोलिस तुकडीने मणदूरकडे मोर्चा वळवला.

इकडे कँपवर बातमी समजली. पांडू मास्तरांनी केलेला प्रकार आणि चरणाकडे गेलेल्या पोलिसांच्या तुकड्या, फौजी संघटनेच्या कँपवर चिंतेचे वातावरण पसरले होते. ठरल्या वेळेला येणारे पैलवान अजूनही का आले नाहीत? हत्यार बंद पोलिसांची एक तुकडी सोनावड्याच्या डोंगर कपारीहून चरणच्या जंगलात उतरल्याची पक्की बातमी भूपाल बागणे या क्रांतिकारकांच्या बहिर्जी नाईक संघटनेच्या गुप्त हेराकडून नागनाथ अण्णांना समजली होती. किसन पैलवानांना सावध केले पाहिजे. त्यांच्यापर्यंत ही बातमी पोहचवली पाहिजे आणि त्यांना सहीसलामत फौजी कँपवर आणले पाहिजे म्हणून त्यांनी आपले तीन निवडक साथीदार निवडले. एक-किसन

पैलवानांचे चुलत चुलते रामचंद्र संतू अहिर (मास्तर), दुसरे जुनेखेडचे शामराव पाटील (आप्पा) आणि तिसरे त्या भागाची पूर्ण माहिती असलेले चरणचे बंडा नायकवडी. अशा तीन साथीदारांच्याकडे सातबारी, तीन रिव्हॉल्व्हर, अंगावर काळी घोंगडी आणि हातात फरशी कुऱ्हाडी देऊन थाबड्याच्या कँपवरुन अंधाऱ्या रात्री साधारण नऊ दहाचे सुमाराला पाठवले. ती रात्र होती २४ फेब्रुवारी १९४६ ची. सावधपणाने जंगल झाडी तुडवत तिघेही आरळ्याच्या दिशेने निघाले. वारणा नदी ओलांडली. ती तिघेही आरळे गावात आले. तिथून ते सोनावडे गावाकडे सावधतेने निघाले होते. रात्र बरीच झाल्यामुळे दिशा ओळखू येत नव्हत्या. इकडे चरणात तो पर्यंत पोलिसांनी गावाला वेडा टाकून घर न घर पिंजून काढायला सुरुवात केली. रात्र मध्यानीला आली होती.

पांडु मास्तरांच्या आग्रहाने किसन पैलवान मणदूरमध्ये एका घरात पांडू मास्तर व त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह झोपले होते. किसन पैलवानांची झोप अत्यंत सावधतेची होती. त्यांच्या कानावर दूरवरून कुत्र्याच्या भुंकण्याचे आवाज येत होते. पैलवान सावध झाले. कुत्रे माणसाला कस भूंकते आणि पाळीव जनावरावर कस भूंकते,रानटी जनवारावर कस भूंकते आणि पोलिसाला कसं भुंकते? याचे अचूक ज्ञान त्यांनी आत्मसात केलं होतं. पोलिस जवळपास आल्यावर कुत्र्यांच्या भुंकण्याच्या आवाजावरून पोलिसच आहेत हे त्यांनी नक्की ओळखले, पांडू मास्तर व त्यांच्या सहकाऱ्यांना सावध केले. तो पर्यंत पोलिसांच्या बुटांचा आवाज कानावर आला. पोलिस पुढच्या दाराला आले असतील, तो पर्यंत सर्वजण मागच्या दाराने पळाले. पांडू मास्तर थांबले. त्यांना पळता येईना म्हणून पैलवानांनी त्यांना खांद्यावर घेतले. ते त्यांना घेऊन दीड दोन मैल तसेच पळत गेले  त्यांना सुरक्षित ठिकाणी सोडले. पांडू मास्तर पैलवानांना म्हणाले, ''छत्रपती शिवाजी राजांच्या जवळ 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' तसे 'होता किसन म्हणून वाचला पांडू मास्तर.'' सर्वजण दिलखुलास हसले. कारण चौघेही पोलिसांच्या तावडीतून सुरक्षित अशा क्रांतिकारकांच्या साम्राज्यात घनदाट जंगलात काळ्या कुट्ट अंधारात होते.

किसन पैलवानांना शोधायला आलेले तिघे क्रांतिकारक सोनावडे सोडून मणदूरच्या चढावर आले होते. आता मध्यान रात्र टळून गेली होती. चंद्र उगवला होता. रात्र थोडीशी निवळलेली होती. पोलिसांच्या तावडीतून पांडू मास्तर त्यांचे दोन सहकारी व किसन पैलवान सुखरूप निघून गेले होते. हताश झालेले पोलिस मणदूरहून शिराळ्याकडे यायला निघालेले होते. ते मणदूर गावचा चढ चढत होते. त्यांच्या तोंडावर चंद्राचा प्रकाश पडत होता आणि हे त्रिकूट चरणची उतरण उतरत होते. त्यांच्या पाठीवर चंद्र होता त्यामुळे लांब वरून पोलिसांना चंद्राच्या प्रकाशातून


या तिघांच्या पुसटशा आकृत्या दिसत होत्या. पोलिस सावध झाले आणि हे त्रिकूट आपल्या विचारांच्या तंद्रीत उतरण उतरत होते. पोलिस दबा धरून बसले. त्रिकूट जवळ आल्या बरोबर त्यांनी झडप घालून तिघांना पकडले. त्या तिघांचीही झडती घेतली. त्यांच्याजवळ रिव्हॉल्व्हर सापडले. पोलिसांचा त्यांच्यावरचा संशय जास्तच बळावला. त्या तिघांनाही पोलिसांनी बेड्या घातल्या आणि परत दिवस उगवता उगवता मणदूर गाव चावडीवर आले. त्या गावातील लोकांनी फौजी संघटनेच्या या तिघांना ओळखले. गुपचूपपणे लोकांनी बातमी थावड्याच्या कँपवर पाठवली. बातमी आली ती पुसटशी-अहिरांना पकडले. सर्वांचा समज किसन पैलवानांना पकडले. सर्वजण हवालदिल झाले. फौजी कँपवर शोककळा पसरली. जो-तो निरनिराळ्या पद्धतीने विचार करू लागला. त्या वेळी नागनाथ अण्णा फौजी कँपवर नव्हते. ते एका शेतकऱ्याच्या वस्तीवर होते. ते कँपवर येण्या अगोद्र वाय.सी.पाटील, राजूताई पाटील, नानकसिंग, मन्सासिंग यांनी पोलिसांच्या तावडीतून किसन पैलवानांना सोडवून घेण्याचा निर्णय घेतला होता. सर्व कँपमधील कार्यकर्त्यांनी त्याला पाठिंबा दिला. सोनावड्याच्या पश्चिमेला एक डोंगर आहे. त्या डोंगराला लागून एक छोटी टेकडी आहे. त्या टेकडीच्या पश्चिमेला उत्तर दक्षिण एक ओढा सोनावडे गावच्या पश्चिम दिशेने वाहतो आणि तो वारणेला मिळतो. त्या ओढ्यावरून मणदूरहून एक रस्ता ओढ्याला छेद करून शिराळला जातो. त्या ओढ्याच्या दोन्ही बाजूंला ओढ्यात दोन ग्रुप करून दडून बसायचे व पोलिस ओढ्यात आल्याबरोबर दोन्ही बाजूंनी त्यांना गराडा घालायचा व किसन पैलवानांना सोडवून घ्यावयाचे ठरले. फौजी संघटनेच्या दृष्टीने किसन पैलवान ही अत्यंत महत्त्वाची व्यक्ती होती. म्हणून नागनाथ अण्णा स्वतः जातीने लक्ष घालून नियोजन करत होते. सोनावड्याचे ओढ्यात दक्षिणेच्या ग्रुप मध्ये अण्णा थांबले आणि उत्तरेच्या ग्रुप मध्ये नानकसिंग, मन्सासिंग, ताई व वाय.सी.पाटील बसले होते. इकडे किसन पैलवान पांडू मास्तरांना सांगून मणदूर गावाला वळसा घालून डोंगर कपारीने थाबड्याच्या कँपवर पळतच गेले होते. तेथे गेल्यावर त्यांना लोकांनी सांगितले. 'आहो पैलवान, तुम्हाला पकडलय म्हटल्यावर सर्वच फौजी सैनिक तुम्हांला सोडवायसाठी सोनावड्याच्या ओढ्यात दबा धरून बसलेत.' हे समजताच किसन पैलवान तेथून पळतच सोनावड्याच्या ओढ्यात नागनाथ अण्णा बसले होते तेथे पोहचले. त्या वेळी पैलवानांचे सर्व अंग घामाघूम झाले होते. त्यांच्या अंगावरचा खादीचा कोट घामानं ओला चिंब झालेला होता. अशा अवस्थेत अण्णांनी त्यांना पाहिले. जवळ बोलाऊन घेतले. जवळच पाण्याची भरलेली घागर होती. त्या घागरीतील तांब्याभर पाणी त्यांना चूळ भरायला दिले.अण्णांनी आपला निर्णय बदलला. राजूताई, वाय.सी.पाटील,

मन्सासिंग, नानकसिंगना निरोप दिला-किसन पैलवान सुखरूपपणे माझ्या जवळ आलेले आहेत. आता पोलिसांच्यावर हल्ला करण्याची गरज नाही. रामचंद्र अहिर (मास्तर), शामराव पाटील (आप्पा) आणि बंडा नायकवडी यांना पोलिसांनी पकडलेले आहे. त्यांना सोडवून आणण्याची माझी जबाबदारी आहे. लवकरच त्यांना मी सोडवून आणेन तुम्ही सर्वजण थाबड्याच्या कँपवर चला. कँप हालवायची तयारी करू.

ऐकण्याच्या मन:स्थितीत कोणच नव्हते, केव्हा एकदा पोलिसांच्यावर हल्ला करून तिन्ही साथीदारांना सोडऊन घेतोय अशा अवस्थेच्या शिगेवर फौजी संघटनेचे कार्यकर्ते होते. नागनाथ अण्णांचा नाइलाज झाला. त्यांना नाईलाजाने का होईना संमती द्यावी लागली. किसन पैलवानांनी चूळ भरली व ते नागनाथ अण्णांना म्हणाले, ''अण्णा, तुम्ही या ग्रुपमध्ये आहात, तर मी त्या ग्रुपमध्ये जातो.'' नानकसिंग, मन्सासिंग असलेल्या उत्तरेच्या ग्रुपमध्ये किसन अहिर (पैलवान) गेले.

इकडे मध्येच मणदूर मध्ये पोलिसांना फौजी संघटनेच्या क्रांतिकारकांच्या हालचालीची बातमी समजली. त्यांच्या पोटात भीतीचा गोळा आला. त्यांनी आपला मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला. क्रांतिकारकांना चुकवून ते पोलिस त्या त्रिकूटाला घेऊन डोंगराच्या पायथ्या पायथ्याने, जंगल झाडीच्या आडोशाने ओढ्यातून निघाले होते. ते किसन पैलवान व नानकसिंगांनी पाहिले. त्या दोघांनी घोषणा देत पोलिसांच्यावर हल्ला चढवला. फायरिंगला तोंड पडले. पोलिस गडबडले. त्यांनी क्रांतिकारी त्रिकू टला सोडून दिले व आपल्या बचावासाठी पोलिस फायरिंग करायला लागले. नैसर्गिक परिस्थिती पोलिसांच्या फायद्याची होती. पोलिस ओढ्यात होते आणि क्रांतिकारक ओढ्याच्या वरती चढावर होते. पोलिसांच्यावर केलेले फायरिंग पोलिसांच्या डोक्यावरून निघून जायचे कारण पोलिस ओढ्यात खाली बसायचे. संधी मिळताच परत पोलिस फायरिंग करायचे. क्रांतिकारकांचा जमाव मोठा होता. दक्षिण ग्रुप मधल्या क्रांतिकारकांनी पवित्रा बदलला. ते ओढ्यातून पोलिसांच्यावर चढाई करायला लागले, तसे पोलिस हादरले व पळायला लागले. पळता पळता स्वतःच्या बचावासाठी फायरिंग करत होते. किसन पैलवान एका छोट्या करवंदीच्या जाळी आडून गुडघ्यावर बसून फायरिंग करत होते तीच पोझिशन नानकसिंगांची होती. दोघांनी एकाच वेळी पठारावर बघितले तर बरेच क्रांतिकारक पोलिसांच्या फायरिंगच्या टापूत येत होते. बरेच लोक हाकनाक बळी पडतील म्हणून हे दोघे पोलिसांच्या फळीत घुसले आणि फाटक्या बोरीच्या करवंदाच्या झाडा आडून जयहिंद, जय भारत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावांच्या घोषणा देत

फायरिंग करत होते. पोलिस पळत होते. पठारावरील क्रांतिकारकांच्यात व पोलिसांच्यात अंतर वाढले. सर्व क्रांतिकारक व पोलिसांचा फायरिंगचा जोर वाढला. पोलिस अक्षरश: पळत ओढ्यातून दडून बचाव घेत फायरिंग करून निघाले होते. क्रांतिकारकांनी विजयाच्या घोषणा दिल्या. त्यांना आनंद झाला. पण तो आनंद क्षणिक होता. सर्व क्रांतिकारक उठून नाचत होते; पण किसन अहिर पैलवान आणि नानकसिंग निपचित आपल्या जागेवर देशासाठी शहिद होऊन पडले होते. किसन पैलवानांच्या गुडघ्याच्या वाटीतून गोळी आरपार गेली होती आणि नानकसिंगाच्या तोंडात गोळी घुसून मानेत अडकून राहिली होती. पोलिस दाही दिशांना पळत सुटले. फौजी संघटनेचे क्रांतिकारक आपल्या दोन साथीदारांच्या मरणाने फार दु:खी झाले. क्रांतिवीर अण्णांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. आम्हांला वाचवण्यासाठी तुम्ही पोलिसांच्या फळीत घुसलात-धन्य तुमचे जीवन !



सोनवड्याची लढाई

दु:ख करत बसायला वेळ नव्हता. पळून गेलेले पोलिस आणखीन लष्करासहित पोलिसांची कुमूक घेऊन येतील आणि आपल्या सर्वांचा फडशा पाडतील, या हुतात्म्यांच्या शरीराचे हाल करतील. म्हणून सर्वांनी दु:खातून स्वत:ला

सावरले. हुतात्मा किसन अहिर पैलवान आणि नानकसिंग यांची प्रेते खांद्यावर घेऊन थावड्याच्या कानसा नदीकडे निघाले. स्वतः नागनाथ अण्णांनी हुतात्मा किसन अहिरांच्या प्रेताला खांदा दिला आहे आणि त्यावेळी त्यांना ग.दि.माडगूळकरांच्या काव्याची ओळ आठवलेली आहे "कृतार्थ ज्यांचे कण कण जीवन, मरण ही मृत्युंजय." 'हुतात्मा किसन अहिर की जय!, हुतात्मा नानकसिंग की जय!' असे म्हणत वारणेला पार करून सर्वजण कानसेच्या काठी आल्यानंतर चंदनाच्या लाकडात लष्करी इतमामाने एकवीस फायरिंगची सलामी देऊन हुतात्म्यांच्या शरीराला अग्नी दिला. जवळच्या शेतकऱ्यांना माती सावरायला सांगितली व सर्व क्रांतिकारक आपआपल्या सोईने निघून गेले. नागनाथ अण्णा मधल्या मार्गाने ढगेवाडी गावात आले आणि बैलगाडीत बसून बाळकू दलालांना घेऊन पाटण खोऱ्यातील त्यांच्या सासरवाडीस गेले.



कृतार्थ त्यांचे कणकण जीवन मरणहि मृत्युंजय ।।
हुतात्मा किसन अहिर-की जय!
हुतात्मा नानकसिंग-की जय!

# दोन क्रांतिकारकांचा बळी

## (२२ मे १९४६)

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी (अण्णा) यांच्या मनातील शेतीच्या प्रयोगाला प्रोत्साहन म्हणून ऐतवडे येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपली सहा एकर जमीन सामुदाईक शेतीच्या प्रयोगासाठी दिली होती आणि इतर जमीनीत सामुदाईक शेतीचा प्रयोग करण्यासाठी क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी शेतकऱ्यांची मीटिंग घेतली होती. त्या मीटिंगच्या मार्गदर्शनासाठी ते स्वतः आले होते. राजूताई पाटील व वाय.सी.पाटलांची कार्यकर्त्यांना जमवण्याची घाई चालली होती. ब्याकुडच्या वसंतराव पाटलांचे बंधू प्रताप पाटील व पडवळवाडीचे बाबूराव कोकाटे यांची परीक्षा संपलेली होती. बाबूराव कोकाट्यांचे लग्न ठरले होते म्हणून ते ताईना व क्रांतिकारकांना लग्नाचे आमंत्रण देण्यास व कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेच्या निधीची पावती पुस्तके नेण्यास आले होते आणि प्रताप पाटील हे सुट्टी घालवण्यासाठी आले होते. दोघे रात्री जेवल्यावर राजमती ताईंच्या माडीवर जाऊन झोपले. त्या माडीवर जायला यायला बाहेरच्या बाजूने दगडी पायऱ्यांचा जिना होता. सर्व मंडळी मीटिंगसाठी गेली होती. वेळेवर मीटिंग सुरू झाली होती. नागनाथ अण्णा लोकांना सामुदायिक शेतीच्या प्रयोगाबद्दल मनापासून माहिती सांगत होते. अधे-मधे एखादा दुसरा शेतकरी आपल्या शंकेचे निरसन करून घेत होता.उत्स्फूर्तपणे लोक मीटिंगला साथ देत होते. रात्री उशिरापर्यंत मीटिंग चालणार याचा अंदाज करून वाय.सी.पाटील

झोप आली म्हणून नेहमीच्या ठिकाणी राजूताई पाटील यांच्या माडीवर झोपण्यास निघाले होते. इतक्यात नागनाथ अण्णांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यांनी रागातच, ''ए वाय.सी., कुठे निघालात?'' म्हणून मोठ्याने हाक मारली. वाय.सी.परत अण्णांच्या जवळ आले आणि त्यांना म्हणाले, ''मला फार झोप आली म्हणून मी झोपण्यास निघालो आहे.'' ''ठीक आहे.'' त्यांनी वाय.सींना आपल्या जवळ घोंगडीवर झोपण्यास सांगितले व परत मीटिंगला सुरुवात केली.

इकडे बरेच दिवसांपासून गावगुंडांचा बंदोबस्त करण्याचे काम अण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हातात घेतले होते. त्यातला एक प्रसंग, एक वेळ शिवा महाराला पकडून अण्णांच्या पुढ्यात उभा केले होते. अण्णांनी त्याला खूप समजून सांगितले आणि ताकीद देऊन सोडले होते. पण त्याच्या स्वभावात काहीच बदल झाला नव्हता. लोकांना त्रास देण्याचे उद्योग त्याने चालूच ठेवले होते. एक दिवस सहजासहजी तो वाय.सी.पाटलांच्या तडाख्यात सापडला. वाय.सी.पाटलांनी त्याच्यावर गोळीबार केला. त्यांने मेल्याचे सोंग केले. त्या गोळीबारात तो मेला असा समज वाय.सी.पाटलांचा झाला आणि त्याला पडलेल्या अवस्थेत तिथेच टाकून पुढे गेले. ते गेल्यानंतर तो जखमी अवस्थेत निघून गेला. त्या गोष्टीचा त्याच्या मनात वाय.सी.बद्दल राग होता. शिवाय हुतात्मा किसन अहिर (पैलवान) जिवंत असताना कामेरी गावातील तुकाराम पाटलांची खंडणीसाठी जमीन कामेरीच्या एका गावगुंडाने पडीक पाडली होती. ती जमीन एस.बी.पाटील,गणा जाधव, छगन बापू सर्व (कामेरी) व वाय.सी.पाटील, नागनाथ अण्णा हे सर्वजण तुकाराम पाटलांना घेऊन त्याच्या शेतात गेले व वाढलेली झाडे झुडपे तोडली. हुतात्मा किसन अहिर,खंडू शेळके, नारायण कदम,रामचंद्र अहिर सर्व वाळव्याचे आणि अन्ता पाटील ढगेवाडीचे यांनी कामेरीला त्या गावगुंडाच्या मळ्यात जाऊन त्यांच्याच बैल जोडीने जमीन नांगरली व पेरली हे त्यांना समजले. त्यांना ती गोष्ट अपमान करणारी वाटली. नागनाथ अण्णा व वाय.सी.पाटलांच्या बद्दल कामेरीच्या गावगुंडांच्या व शिवा महाराच्या मनात राग होता. त्याचा वचपा काढण्याचं त्या गुंडांनी ठरवले होते. पण त्याचा योग आला नव्हता. आज सामुदायिक शेती विषय मीटिंग आहे आणि त्या मीटिंगला वाय.सी.पाटील व नागनाथ अण्णा आहेत याची पक्की खबर त्यांना त्यांच्या खबऱ्याकडून समजली होती म्हणून त्यांनी मध्यानरात्री हल्ला करण्याचे ठरवले होते.

इकडे मीटिंग चांगली रंगात आली होती. या मीटिंगच्या चर्चेत कर्मवीर भाऊराव पाटलांचे बंधू एस.ए.पाटील(काका), पारिस काका, पंडित कलगौंडा पाटील यांनी भाग घेतला. मीटिंग संपल्यानंतर सर्वजण झोपण्यास आपापल्या घरी गेले. नागनाथ अण्णा वरचेवर येणाऱ्या संकटातून बरेच काही शिकले होते. त्या दिवशीही त्यांना अंतरमनाने संकेत दिला होता काय कुणास ठावे? ते व वाय.सी.पाटील त्या दिवशी राजूताईंच्या माडीवर झोपायला गेले नाहीत. नाही म्हटलं तर नेहमी नागनाथ अण्णा व वाय.सी.पाटील ताईंच्या माडीवर झोपत असत. त्या दिवशी मात्र ते ऐतवड्याच्या जैन बस्तीत महाराजांच्या ध्यान धारणेच्या गुप्त अशा भुयारी जागेत वाय.सी.पाटलांचे सह झोपले. असाच थोडावेळ गेला. रात्र काळोख्याची होती. मध्यान झाली. लोक अगदी गाढ झोपले होते.



बाबुराव कोकाटे व प्रताप पाटील यांचा
गावगुंडांनी घेतलेला बळी.

सखाराम बारपटे व शिवा महार आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर बंदुका लोड करून बाहेरच्या रस्त्याने चाहूल न करता माडीवर चढले.तिथे त्यांना दोन इसम झोपलेले दिसले. नागनाथ नायकवडी व वाय.सी.पाटील असावेत म्हणून त्यांच्या

तोंडावर बॅटरी पाडली आणि छातीला बंदूक लावली. बघतात तर हे वेगळेच अनोळखी तरुण आहेत म्हटल्यावर सखाराम बारपट्याने सहकाऱ्यांना परत चला म्हणून सांगितले; आणि माडीच्या पायऱ्या उतरायला लागले. एवढ्यात दोन बार झाले आणि शिवाने त्या तरुणांचे मुडदे पाडले. सखाराम बारपट्यांना हे आवडले नाही. त्यांचा राग अनावर झाला त्यांनी शिवाला अक्षरश: गचांड्या देत शिव्या देत खाली ढकलले आणि त्याला दोन थोबडी दिल्या. ''लेका त्या पोरांनी तुझे काय घोडं मारल होतं म्हणून त्याना मारलेस? हरामखोर!'' (असा वाद झालेला शेजारच्या लोकांनी ऐकला होता तो नंतर समजला) पुढे वाद घालायला वेळ नव्हता. तडका फडकी निघून गेले व त्यांचे सहकारी अंधाराचा फायदा घेऊन वशी लाडेगाव भागात निघून गेले. इकडे बाराच्या आवाजाने ताई जाग्या झाल्या व तडकाफडकी माडीवर गेल्या. बघताय तर बाबूराव कोकाटे व प्रताप पाटील रक्ताच्या थारोळ्यात पडलेले. आपल्या घरात आपल्यामुळे निष्पाप मुले मारली गेली याचे दु:ख त्यांना झाले. नागनाथ अण्णांना ही बातमी समजली. त्यांनी आपले सहकारी व ढगेवाडीला ठेवलेली हत्यारे मागवली, गुंडांचा पाठलाग केला. पण वेळ निघून गेलेली होती. सकाळी पंचनामा करून प्रेतं ताब्यात मिळाली. क्रांतिकारकांना हे कृत्य कुणी केले याचा सुगावा लागला. नागनाथ अण्णा व वाय.सी.पाटील सापडले नाहीत म्हणून रागाच्या भरात गुंडांनी हे दुष्ट कृत्य केले. क्रांतिकारक पेटून उठले. बदला घेतल्याशिवाय प्रेतांना अग्नी द्यायचा नाही अशी भीष्म प्रतिज्ञा क्रांतिकारकांनी केली. शिवाच्या शोधात क्रांतिकारक रवाना झाले. बिरनाळे पैलवानांना झाल्या गोष्टीची बातमी अंकलखोप मध्ये समजली. तेही शिवाच्या शोधात बाहेर पडले. त्यांना रस्त्यातच बाबूराव कोकाटे व प्रताप पाटलांना ठार मारणारा मारेकरी शिवा पानाचंदच्या सर्व्हिस गाडीने आष्ट्याहून सांगलीला जात आहे हे कळताच बिरनाळे पैलवान तेथे पोहचले. तो पर्यंत गाडी सुटली. ताबडतोब पैलवान हे भालचंद्र पोरवाल (बी.टी.पोरवाल) या मित्राकडे गेले. त्या मित्राची मोटार सायकल होती. त्या काळात त्या आख्ख्या भागात भालचंद्र पोरवालचे शिवाय कोणाकडे मोटार सायकल नव्हती. पोरवालनी मोटार सायकल ताबडतोब बाहेर काढली आणि स्वत: बिरनाळे पैलवानांना घेऊन पानाचंदच्या सर्व्हिस गाडीचा पाठलाग केला. पोरवाल सुसाट वेगाने गाडी चालवत होते. डिग्रजच्या चौथ्या मैलावर सर्व्हिस गाडीच्या आडवी मोटार सायकल भालचंद्र पोरवालानी लावली. सर्व्हिस गाडी थांबल्या बरोबर पैलवान गाडीत घुसले. एकाच

हिसड्यात शिवाला रस्त्यावर खेचले "शिवा, लेका, आमच्या मुलांना मारून तू कसा जिवंत राहतोयस?" म्हणत खिशातून लोड करून ठेवलेले रिव्हॉल्व्हर हातात घेतले आणि एका पाठोपाठ एक असे चार बार काढले. शिवा मेल्याची खात्री केली. ते सुसाट वेगाने आष्ट्याकडे निघाले. दरम्यान मोटार सायकलच्या अती वेगाने नंबर प्लेट रानात दूरवर जाऊन पडलेली होती. ती घेईपर्यंत डॉ.देशपांड्याची गाडी पाठोपाठ घडलेल्या ठिकाणी आली. त्यांनी बच्चुला ओळखले. तसेच सर्व्हिस गाडीतीलही काही लोकांनी भालचंद्र (बच्चू) पोरवालना ओळखले होते. आष्ट्यात परत आल्यावर पोरवालांनी गाडी घरात लावली. दोन्ही चाकातील हवा सोडली. तिजोरीच्या किल्ल्या घेतल्या. त्यातील पन्नास रुपये घेतले आणि घर सोडून निघाले. घरी कोणी नव्हते. वडील अंघोळ करायला गेले होते. निरोप कोणाकडे ठेवता आला नाही. प्रथम सरळ अंकलखोपला बिरनाळे पैलवानांच्या वस्तीवर आले. एक दिवस तेथे मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी घराकडे निरोप पाठवला, 'मी ठीक आहे. एक वर्षाने घरी येईन. माझी कुठेही शोधाशोध करू नका, अधेमधे निरोप देणार नाही; पण घरी नक्की येईन.' क्रांतिकारकांना शिवाला ठार मारल्याची बातमी समजली. त्यांची प्रतिज्ञा पूर्ण झाली म्हणून त्या दोघा तरुणांच्या प्रेताला अग्नी दिला.

आष्ट्याला भालचंद्र (बच्चू) पोरवालांच्या घरी पकड वारंट घेऊन पोलिस आल्याची बातमी त्यांना समजली. त्यांनी पुढच्या मनसुब्याची मनात तयारी केली आणि माधव भोळे नावाच्या पुण्याच्या तंबाखू व्यापाऱ्याकडे त्यांची ओळख होती. त्या भोळे व्यापाऱ्याकडे एक रात्र मुक्काम करून तडक मुंबईची वाट धरली. मुंबईला तशी फारशी ओळख नसल्यामुळे आपली मोहीम त्यांनी राजस्थानकडे वळवली. राजस्थानामध्ये थोडे दिवस काढल्यानंतर त्यांनी जालोरा स्टेशनवर गोळ्या बिस्किटे विकण्याचा व्यापार केला. त्यातून थोडे पैसे मिळाल्यावर भारताची राजधानी दिल्ली येथे प्रयाण केले. दिल्लीत त्यांचं फारसं मन रमेना म्हणून सर्व्हिस गाडीने माउंट आबूकडे निघाले. चार एक मैलावर माउंट आबूच्या अलीकडे सर्व्हिस गाडी पंक्चर झाली. सर्व पॅसेंजर खाली उतरले म्हणून हेही खाली उतरले. इकडे तिकडे फिरताना त्यांना जवळच जुने पुराने हनुमान मंदिर दिसले. विरळ वस्तीच्या या भागात असलेल्या या मंदिराचा राहण्यास आपणाला चांगला उपयोग होईल असे त्यांना वाटले. चौकशी केल्यावर त्यांना समजले की येथे कोणीही रहात नाही. या मंदिराला वेगळा असा कोणी पुजारी नाही. त्यांच्या मनात विचार आला 'आपणच या मंदिराची झाड लोट करावी व

इथचं महाराज म्हणून राहवे.' त्याप्रमाणे गाडीच्या ड्रायव्हरला त्यांनी सांगितले, ''माझे ठिकाण आले. मी इथचं उतरतोय, तुम्ही जावा.'' गाडी गेल्यावर मंदिराची चांगली झाडलोट केली. तेल आणून मंदिरातील दिवा लावला. तो पर्यंत काही मंडळी तेथे आली. त्यांच्याकडे चौकशी करता येथे जिवंत पाण्याचे झरे असल्याचे समजले. ते झरे भालचंद्र (बच्चू) पोरवालांनी स्वच्छ केले. त्यातून स्वच्छ असे निर्मळ पाणी वाहू लागले. छोट्या झाडाच्या बुंध्यात ते पाणी त्यांनी वळवले. बघता बघता त्या मंदिराची शोभा वाढायला लागली. पोरवालांनी साधू महाराजाचा पेहरावा अंगावर घालायला सुरुवात केली. ते स्वतः पूजा पाट करायला लागले. लोकांच्यात चर्चा सुरू झाली. 'कोण एक साधू महाराज मंदिरात येऊन राहिला आहे. त्याने हनुमान मंदिराचा परिसर पूर्णतः सुशोभित केला आहे.' रस्त्याने येणारी जाणारी माणसं मुद्दाम वाकडी वाट करून मंदिरात दर्शनाला येऊ लागली. लोकांना चांगली प्रवचने देण्यास त्या साधू महाराजाने सुरुवात केली.

थोडे दिवस असेच गेले आणि साधू महाराज प्रसिद्धीला येऊ लागले. लोक त्या साधू महाराजांसाठी दूध, फळे, जेवण आणि वर दिवा बत्तीसाठी दक्षिणा देऊ लागले. दोन तीन महिने भालचंद्र (बच्चू) पोरवाल साधू महाराजांच्या वेशांतरात त्या हनुमान मंदिरात राहिले. विचारपूस व्हायच्या अगोदरच आपण येथून हाललेले बरे असे राहून राहून त्यांना वाटू लागले. म्हणून एक दिवस झांजड पडताना लोकांची वर्दळ कमी झालेली पाहून, आपला पहिला पेहराव अंगावर घालून अजमेरकडे पलायन केले. अजमेर पासून चार एक मैलावरच्या बँवेर रेल्वे स्टेशनवर असणाऱ्या चहाच्या स्टॉलवर थोडे दिवस नोकरी केली. नोकरीला येण्या जाण्यामुळे अजमेरच्या फळ व्यापाऱ्याची त्यांची ओळख झाली. त्यांच्याकडे थोडे दिवस दिवाणजीची नोकरी केली. थोड्या दिवसानंतर मिळालेल्या पैशातून व अजमेरच्या व्यापाऱ्याच्या मदतीने स्वतःचे त्यांनी फळाचे स्टॉल चालू केले. सगळ्यांच्या बरोबर चांगले वागणे, त्यांच्यात मिळून मिसळून रहाण्याने या त्यांच्या चांगुलपणातून अजमीर मधील एका कुटुंबाची चांगली ओळख झाली. त्यांच्या घरातील लहान मुलं त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या मुलांना त्यांचा लळा लागला. त्यांच्या बड्या मंडळींच्या ते खात्रीत बसले. त्या कुटुंबाने त्यांना आपल्या घरातील एक खोली रहायला दिली. हळू-हळू त्या मंडळीने त्यांना आपल्या घरातील जेवण देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला भालचंद्र (बच्चू) पोरवाल त्यांना धान्याचा शिदा देऊ लागले. असे करता करता सहा महिने कधी संपले ते त्यांना कळाले नाही. ते

त्या कुटुंबाशी इतके एकरूप झाले की त्यांनी पोरवालांची लग्नाबद्दल चौकशी करायला सुरुवात केली. कारण त्या कुटुंबाचा पोरवालना आपली मुलगी द्यायचा विचार मनात येऊ लागला. पोरवालांचे तर लग्न झाले होते. त्यांना एक मुलगी पण झालेली होती. पुढचा प्रसंग टाळण्यासाठी मध्यान रात्री सर्व सामसूम बघून बॅवेर स्टेशनला त्यांनी राम राम ठोकला आणि सरळ तडक दिल्लीला निघून आले आणि दिल्लीहून जोधपूरला आपल्या भावाकडे आले. त्यांचा भाऊ बॅरिस्टर होता. त्यांच्या सल्ल्याने सांगलीला येऊन सरळ पोलीस स्टेशन मध्ये ते हजर झाले. रीतसर जामीन घेतला. सांगली संस्थानचे नामवंत वकील दिवाण कोर यांच्याकडे आपली केस दिली. त्यांची केस नाडकर्णी कोर्टापुढे चालली. साक्षीदारांनी आपली साक्ष बदलली. घटना घडली त्या ठिकाणी हे गृहस्थ नव्हते. ओळख परेडमध्ये घटना करणारी ही व्यक्ती नव्हे म्हणून साक्षीदारांनी साक्ष दिली आणि त्या शिवा खून खटल्याच्या केसमध्ये पोरवाल निर्दोष सुटले.

साताऱ्यामधील काशीबाई देशमुख या स्त्रीवर ब्रिटीश अधिकारी जलाल गाझी याने अत्याचार केला. ही गोष्ट क्रांतिसिंह नाना पाटील यांना समजली म्हणून त्यांनी त्या अधिकाऱ्याला संपवण्याची जबाबदारी आंतरराष्ट्रीय किर्तीचे मसाज तपस्वी डॉ.राम भोसले यांचेवर सोपवली. याला सर्व सातारच्या भूमिगतांनी पाठिंबा दिला. डॉ.राम भोसले यांनी ठरल्याप्रमाणे २४ जानेवारी १९३८ रोजी जलाल गाझी याला यमसदनी पाठवले. पुढे डॉ. राम भोसले यांची क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडींशी ओळख झाली व त्यातूनच त्यांची व अण्णांची दृढ मैत्री झाली. ती त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत टिकून होती.

# पोलिस खबऱ्याला शिक्षा

स्वातंत्र्य लढ्यामध्ये गावागावातून प्रतिसरकारचे कामकाज करत असताना गाव गुंडांशी वाकुडपणा घ्यावा लागला होता. त्यामुळे त्यांच्या पासून भूमिगतांच्या जीवीताला धोके तयार झाले. त्या स्वातंत्र्य सैनिकांना प्रतिसरकारच्या धोरणाप्रमाणे ग्राम राज्याच्या निवाड्याचे काम बिनधास्त करता यावे, पोलिसांचे खबरे (हस्तक), गावगुंड आणि देशद्रोही या समाज कंटकांच्यावर वचक बसावा म्हणून लष्कराचे शिक्षण घेतलेल्या  हत्यारबंद तरुण भूमिगतांची अशी गावागावांतून फेरी काढण्याचा कार्यक्रम क्रांतिवीर नागनाथ(अण्णा) नायकवडी यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिला होता. त्याचाच एक भाग म्हणून प्रथम वाळवे गावातून १९४६ च्या दरम्यान भूमिगत कार्यकर्त्यांची हत्यारबंद फेरी काढली होती.

२९ जुलै १९४४ साली नागनाथ अण्णांना पकडून देणाऱ्या दोन देशद्रोह्यांना वाळव्यातील शेतकऱ्यांनी जबरदस्त शिक्षा केल्या होत्या. त्यापैकी तिसरा पोलिस खबऱ्या रामू गोटखिंडीकर अजून स्वातंत्र्य सैनिकांच्या हाताला लागला नव्हता. त्याचा शोध स्वातंत्र्य सैनिकांच्या बर्हिजी नाईक या संघटनेतील गुप्त हेरांच्या मार्फत चालू होता. एक दिवस गुप्त हेरांच्याकडून रामू गोटखिंडे हा आष्टा पोलिस कचेरीच्या आवारात राहतोय आणि सतत पोलिसांच्या संरक्षणात आहे, त्याला पकडणे आणि शिक्षा करणे फार अवघड काम आहे असा निरोप भूमिगतांना मिळाला.

भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना आष्ट्यातून अनेक लोक सहकार्य करीत होते. त्यांपैकी धनगर समाजातील दोन तरुण मुलांना वाळव्यातील भूमिगतांनी रामू गोटखिंडे याच्यावर नजर ठेवायला सांगून क्रांतिकारकांनी शिराळा पेट्याकडे वाटचाल केली. काही दिवस असेच गेले, ती दोन मुले त्याच्यावर नजर ठेऊन होती. अचानक एक दिवस त्यांना तो पहाटे खांद्यावर घागर घेऊन निघाल्याचा दिसला म्हणून ते दोघे त्याच्या मागोमाग गेले. तो पोलिस स्टेशनच्या समोरच्या विहिरीतून पाणी घेऊन परत पोलिस स्टेशनच्या जवळ असलेल्या आपल्या घरी आला. त्या मुलांनी दोन दिवस सतत त्याच्यावर पाळत ठेवली. दररोज तो पहाटे पाणी भरण्यास जातो याची नक्की खात्री झाल्यानंतर त्या दोन मुलांनी ही बातमी वाळव्याच्या भूमिगतांना दिली.

बरेच दिवस हुलकावणी देणाऱ्या रामू गोटखिंडेला शिक्षा देण्यासाठी एक दिवस रात्री ११ च्या सुमारास खंडू सखाराम शेळके (दाजी), रामचंद्र संतू अहिर (मास्तर), तुकाराम नाना खोत (वस्ताद), महादेव अनुसे (देवास) हे चार जण आष्टा पोलिस स्टेशनच्या आवाराच्या बाहेर एका घरात दबा धरून बसले, ठरलेल्या वेळेप्रमाणे रामू गोटखिंडे पहाटे पाण्याची घागर खांद्यावर घेऊन पाणी आणण्यासाठी विहिरीकडे निघाला, विहिरीत उतरून त्याने घागर भरली. घागर खांद्यावर घेऊन पायऱ्या चढू लागला. निम्या पायऱ्या चढल्यावर रामूला भूमिगतांनी ललकारले, ''बोलव तुझ्या पोलिसांना'' म्हणत एक बंदुकीचा बार त्याच्यावर टाकला. बार वर्मी बसताच तो पायऱ्यावरून विहिरीत पडला. नेमकी त्याच वेळी एक म्हातारी विहिरीवर पाण्यासाठी आली होती. ती विहिरीत पडलेल्या रामूला म्हणाली ''कसा पडलांस बाबा'' म्हणून विहिरीत उतरू लागली. एवढ्यात दोन भूमिगत खाली विहिरीत उतरले आणि त्या म्हातारीला ओरडून विहिरीतून वर जाण्यास सांगितले व सदर घटनेची कुटेही वाच्यता न करण्याबाबत खडसावले. जखमी झालेला रामा गोटखिंडे भूमिगतांच्या हातापाया पडून जीवदान मागत होता. पण रागाने बेफाम झालेल्या भूमिगतांनी त्याला कायमचे संपवले, आणि तेथून त्यांनी पलायन केले व आपल्या सांकेतिक स्थळी सुखरूप पोहचले.

# चलो हैद्राबाद

१५ ऑगस्ट १९४७ रोजी अखंड भारताचे दोन तुकडे करून इंग्रजांनी भारतीय देशाला स्वातंत्र्य दिले. महात्मा गांधींनी व भारतीय जनतेने देशाच्या फाळणीला मोठा विरोध केला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांना आम्ही व्यापारासाठी भारतात आलो आहोत म्हणणाऱ्या इंग्रजांनी हाळूहळू आपल्या कुटिल कारस्थानातून प्राचीन भारतातील एकूण ७०० संस्थानिक व राजे यांच्याकडून सत्ता हस्तगत केली होती. ती सत्ता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेच्या रेट्यातून इंग्रजांना सोडावी लागली. ती सत्ता सोडताना त्यांनी देशातील हिंदू, मुस्लीम बांधवांत कायमचे तंटे बखेडे लावले.

१९४८ मध्ये भारत सरकारचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांनी भारतातील बहुतेक संस्थाने खालसा करून भारतात विलीन केली होती. परंतु हैद्राबादचा निजाम आपले संस्थान भारतात विलीन करायला तयार होत नव्हता. या निजामाच्या भूमिकेला संपूर्ण भारतातून मोठा विरोध होता. त्यासाठी हैद्राबाद मुक्ती संघटना स्थापन केलेली होती. परंतु निजाम धार्जिण रझाकारांची संघटना स्थानिक जनतेला खूप त्रास देत होती त्यांनी कित्येक मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांचे खून पाडले होते. चोऱ्या माऱ्या, लुटालूट करीत घरादारांना आगी लावत होते. येन-केन प्रकारे रझाकारांनी जनतेला हैराण केले होते.

हैद्राबाद मुक्ती संघटनेला सातारच्या 'प्रतिसरकारची' व क्रांतिसिंह नाना पाटलांची आठवण झाली. त्यांची त्यांना मदत पाहिजे होती. क्रांतिसिंहांना मदतीची हाक आल्या बरोबर स्वत: नाना पाटलांनी क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व काही कुंडल ग्रुप मधील  निवडक साथीदारांची फौज घेऊन हैद्राबादकडे कूच केली. इकडे वाळवा-शिराळा ग्रुपचे नेते क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांनी आपल्या फौजी संघटनेतील निवडक कार्यकर्ते व सोबत हत्यारे दारू गोळ्याची रसद घेऊन नाशिक-धुळे-करमाळा मार्गे हैद्राबाद जवळ करत होते. करमाळे गावातून पुढे जात असता पोलिसानी संशयाने त्यांना पुढे जाण्यास रोखले. क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे नाव व त्यांचे १९४२ च्या लढ्यातील योगदान महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातील कार्यकर्त्यांना माहीत होते. तसे धुळे जिल्ह्यात तर त्यांच्या खूप ओळखी होत्या. हा हा  म्हणता स्थानिक कार्यकर्त्यांना नागनाथ अण्णांना पोलिसाना आडवण्याची बातमी समजली. काही तासातच कार्यकर्ते हाजारो शेतकऱ्यांचा मोर्चा घेऊन पोलिस स्टेशनवर चालून गेले. लोकांचा जोश बघून पोलिस हातबल झाले त्यांनी क्रांतिवीर नागनाथ अण्णा व त्यांच्या कार्यकर्त्यांना सोडून दिले. पुढे हैद्राबादला पोहोचे पर्यंत रस्त्यात अनेक कार्यकर्त्यांनी अण्णांना मदत केली त्यांपैकी दिवान वकील सोलापूरचे, छन्नुसिंग, फुलचंद गांधी, श्रावीक आश्रमच्या सुमती शहा वगैरे.

हैद्राबाद मुक्ती संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी शंकराव चव्हाण व क्रांतिवीर नागनाथ अण्णांची तिथे भेट झाली. त्यांच्याकडे साताऱ्याहून लढ्यासाठी आणलेली हत्यारे व दारुगोळ्याची सामग्री सुपूर्त केली. आणि रझाकारांचा बिमोड करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन गनिमी काव्याने हल्ले चढवले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांचा जोर पाहून मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांना दुप्पट जोम आला. सातारचे प्रतिसरकारचे क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड, उद्धवराव पाटील, आण्णासाहेब गव्हाणे, नरसिंगराव देशमुख, नांदेडचे शंकराव चव्हाण व त्यांचे कार्यकर्ते मिळून हैद्राबाद संस्थान मुक्त करण्यासाठी निकराचा लढा देत होते. मुक्ती लढ्यामध्ये नांदेडच्या शंकराव चव्हाण यांचे मोठे योगदान आहे. अनेकवेळा त्यांना जीवावर बेतणाऱ्या संकटांना तोंड द्यावे लागले. तरीही ते न डगमगता शेवटपर्यंत लढत राहिले. त्याच वेळी भारत सरकारनेही कर्नल चौधरींच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद संस्थानात लष्कर (मिलिटरी)घुसवले आणि शेवटचा घाव घालून निजामाला वठणीवर आणून, हैद्राबाद संस्थान खालसा करून भारतात विलीन केले.

हैद्राबाद मुक्तीचा लढा संपला. हैद्राबादच्या मुक्ती संघटनेने क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड यांच्या नावाचा जयजयकार केला. यापूर्वी ज्यांची नावे ऐकत होते, त्यांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. भेटीनंतर हैद्राबाद मुक्ती संघटनेत व जनतेने त्यांचा मोठा सत्कार केला. त्यावेळी नाथाजी लाड, अण्णासाहेब गव्हाणे, भाई उद्धवराव पाटील, नरसिंगराव देशमुख यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती.

हैद्राबाद मुक्ती लढ्याच्यावेळी नागनाथ अण्णांची व शंकराव चव्हाण साहेबांची मैत्री झाली ती त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत होती. साहेब मुख्यमंत्री झाले, केंद्रात गृहमंत्री झाले, संरक्षण मंत्री झाले. ते काँग्रेसमध्ये होते आणि नागनाथ अण्णा विरोधी पक्षात होते म्हणून त्यांच्या मैत्रित मात्र कधीच अंतर आले नाही.

# क्रांतिसिंह सहकाऱ्यांसह प्रकट

सातारच्या प्रतिसरकारचं काम प्रसिद्धी पासून लांब होतं. त्या मंतरलेल्या धामधुमीच्या काळात प्रसिद्धीला फारसं महत्त्वच दिलं जात नव्हतं. जेवढ्या गोष्टी गुप्त रहातील तेवढ्या बऱ्या म्हणायचा तो काळ होता. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या सारखा एक खेडूत माणूस एवढ्या मोठ्या जनतेचा नेता होतो, स्वतः ग्रामराज्य स्थापन करतो, त्यांच्या पाठीशी संपूर्ण सातारा जिल्हा उभा रहातो ही काय सामान्य बाब नव्हे. पश्चिम महाराष्ट्रातील प्रतिसरकारची लोकप्रियता पाहून मुंबई इलाख्याच्या काँग्रेसच्या पोटात गोळा उठला होता. त्या काळातील काँग्रेसश्रेष्ठींनी सातारच्या भूमिगतांबाबत वाईट-साईट बातम्या दिल्लीला पोहचवल्या होत्या. त्यामुळे नेहरूंच्या बरोबर होणारी ऊठबस चांगली उपयोगी येत नव्हती. क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांची नेहरू, गांधी यांची प्रत्यक्ष ओळख नव्हती. मात्र गांधींचा संदेश सर्व सातारकरांच्या रोम-रोमांत भिनला होता. गांधींच्या मुखातून बाहेर आलेला हुकूम ऐकायचा, खांद्यावर तिरंगा झेंडा घेऊन बाहेर पडायचे हाच उद्योग गेली पंचवीस वर्षे सातारकर भूमिगतांचा होता. जंगल सत्याग्रह असो, असहकार असो, वैयक्तिक सत्याग्रह, चले जाव! हे सर्व आदेश अंमलात आणण्यासाठी नाना पाटलांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिवाचं रान केलं होतं. दिसली चळवळ की पेटले नाना हे गेले कित्येक वर्षांचं सूत्र होत. पण ते काँग्रेसचे नाहीत, देशभक्त नसून ते गुंड आहेत. हा निर्लज्ज प्रचार ऐकून सातारच्या भूमिगतांच्या अंगाची लाही-लाही होत होती. सातारी जनता पेटून उठत होती आणि नाना पाटलांच्या मागे आपल सामर्थ्य उभा करत होती.

आता स्वराज्य जवळ आलेले आहे, आता प्रत्यक्षात संघर्षाची चळवळीची गरज राहिलेली नाही म्हणून सातार्‍याच्या सर्व क्रांतिकारकांनी हजर व्हावे, आपापल्या ग्रुपकडे असणारी सर्व हत्यारे कलेक्टर ऑफिसमध्ये जमा करावीत असे आवाहन भूमिगतांना मुंबई इलाखा काँग्रेस श्रेष्ठींनी केले. त्या आवाहनास उत्तर सातार्‍यातून व काही दक्षिण सातार्‍याच्या ग्रुपने सहकार्य केले. त्यापैकी हजर झालेले ग्रुप बाबूराव चरणकर, गणपतराव पाटील, बिळासकर, किसन वीर अशी रोज निरनिराळ्या ग्रुपची नावे कळत होती. आपणही हजर व्हायचे का काय? या विचारासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विचार करण्यासाठी प्रतिसरकारचे सर्व भूमिगत स्वातंत्र्य सैनिक कुंडल येथे जमा झाले होते. मुरारजी देसाई व शंकरराव देव यांनी मुंबईयेथे सातार्‍याच्या प्रतिसरकार बाबत कुत्सित उदगार काढल्याने नाना पाटील त्यांच्यावर चिडून होते. त्यांनी सहकार्‍यांना विचारले, ''बोला कुणाला हजर व्हायचं हाय का?'' त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटलांना स्पष्टपणे क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी सांगितले, ''सर्व भूमिगतांची वॉरंट रद्द झाल्याशिवाय आम्ही बिलकुल हजर होणार नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही लढलो हा काय आमचा गुन्हा आहे? सर्वांची वॉरंट रद्द झालीच पाहिजेत नाहीतर आम्ही हजर होणार नाही. वॉरंट रद्द झाली नाही तर आम्ही पूर्वीगत देशासाठी लढत रानामाळात फिरत राहू.'' असा सर्व भूमिगतांनी हजर न होण्याचा निर्धार व्यक्त केला. नाना पाटलांनी या गोष्टीवर शिक्कामोर्तब केले. एवढ्यात मुंबई इलाख्याच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्या निवडणुकांच्या प्रचाराला सातारच्या भूमिगतांनी मोठा प्रतिसाद दिला. काँग्रेसला गठ्ठा मतदान पडले. निवडणुका संपल्या. प्रतिसरकारच्या इलाख्यात काँग्रेसला इतर भागापेक्षा जास्त मतदान पडले. तरी विशेषतः शंकरराव देव व मुरारजी देसाई यांनी लाखोली वाहिली. सातारच्या प्रतिसरकारवाल्यांनी आपल्यां बंदुका आणि शस्त्रे डी.एस.पी.कडे हजर करावीत असा आदेश मोरारजीने दिला. तेव्हा सर्व सातारकर स्वातंत्र्य सैनिक पेटून उठले. नाना पाटलांच प्रतिसरकार इंग्रजांच्या मशिनगन्स्ला कधी भीत नव्हतं पण स्वकीयांकडून पाठीत खुपसला जाणारा खंजिर पाहून ते व्यथित झाले. मुंबईची काँग्रेस कमिटी सातारकरांची देशभक्ती समजून घेत नव्हती. ते आम्हांला गुंड समजत आहेत. तुम्ही देशभक्त आहात तर मग सरकारात का हजर होत नाही असा सवाल होऊ लागला. नाना पाटील म्हणाले, ''आरं बाबानो, अजून देश स्वतंत्र झाला नाही, मग हे सरकार तुमच्या बापाचं हाय काय?'' असा खडा सवाल त्यांनी टाकला.

सातारच्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांच्याकडे श्री. मुरारजी देसाई व श्री.शंकरराव देव यांचा बघण्याच्या दृष्टीकोन बरोबर नव्हता. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी व त्यांच्या भूमिगत सहकाऱ्यांनी स्वातंत्र्याचा अरुणोदय दृष्टिक्षेपात आला त्याच वेळी शस्त्रे खाली ठेवली.

भाऊसाहेब सोमण व आप्पासाहेब लाड महात्मा गांधींना भेटले. करा किंवा मरा या आदेशाचे पालन करून देशासाठी लढणारे, मरणारे अशिक्षित शेतकरी ज्यांनी आपल्या प्राणांची बाजी देश स्वातंत्र्याशी लावली त्यांना आपण देशभक्त म्हणणार का? यावर गांधीजींनी नुसते स्मित केले.पंडित नेहरूंच्या कानावर या गोष्टी घातल्या. लवकरच मुंबईच्या एका जाहीर सभेत पंडितजींनी जाहीर केले ''ब्रिटिश साम्राज्या विरोधी सरळ दोन हात करणारे सातारचे वीर आमचेच आहेत. करा किंवा मरा या आमच्या आदेशाप्रमाणे स्वातंत्र्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या या शूरवीरांना स्वातंत्र्यप्रेमी कोण म्हणणार नाही?''

पंडित जवाहरलाल नेहरूंचे मुंबईचे भाषण वाऱ्यासारखे पसरले. सातारच्या सर्व क्रांतिकारकांची वॉरंट रद्द झाली. चोहीकडे आनंदी आनंद झाला. गुढ्या तोरण बांधून जनतेनं या निर्णयाचे स्वागत केले. फटाक्यांची घरा दारांत आतषबाजी झाली. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, क्रांति अग्रणी जी.डी.लाड, नाथाजी लाड अशा आपल्या अनेक धाडशी सहकाऱ्यांसह प्रकट झाले. गावोगावी मिरवणुकांना ऊत आला. गावोगावी स्वातंत्र्य सैनिकांचे लोकांनी स्वागत केले. या स्वागत समारंभात क्रांतिवीर नागनाथ अण्णा स्टेजवर गेले नाहीत व कुठेही हार-तुरे घेतले नाहीत. त्यांचे चार सहकारी स्वातंत्र्याच्या चळवळीत हुतात्मा झालेले होते. हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग, हुतात्मा बाबूराव कोकाटे व हुतात्मा प्रताप पाटील.

# क्रांतिवीर नागनाथअण्णा व एक लाखाचा निधी

स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारी भूमिगतांचा भाऊराव पाटील हा मोठा आधार होता. स्वातंत्र्यसैनिकांना भाऊरावांचे घर, कर्मवीरांची रयत शिक्षण संस्था म्हणजे विश्वासाचे ठिकाण वाटे. सातारचा अभेध्य असा तुरुंग फोडून क्रांतिवीर नागनाथ अण्णा साताऱ्यात आले ते तडक कर्मवीर भाऊराव पाटलांच्या घरातच येऊन विसावले होते. अशा कितीतरी क्रांतिवीरांना कर्मवीर भाऊराव पाटलांचा उपयोग झाला होता. राष्ट्रीय चळवळीला कर्मवीर अण्णांचे नेहमीच आशीर्वाद व प्रोत्साहन होते. पुढे क्रांतिसंग्राम संपला. भाऊरावांचे शैक्षणिक कार्य हे मूलगामी क्रांतिकार्यच होते. तसेच राष्ट्रबांधणीचे व रचनात्मक असे कार्य होते. ते अत्यंत कठीण अशा अवस्थेत करीत होते. भाऊराव अण्णांची ही खडतर तपश्चर्याच होती.भाऊरावांचे सत्यशोधक चळवळीतल काम, स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात केलेले काम आणि शिक्षण क्षेत्रातील बहुजनउपेक्षित लोकांच्यासाठी केलेले काम यांचा विचार करता त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा विचार कार्यकर्त्यांना वाटणे साहजिक होते. आपल्या माणसाचा आपण गौरव करायचा नाहीतर कुणी करायचा? शेवटी हा गौरव सत्कार सोहळा सातारा जिल्हा विद्यार्थी संघटनेमार्फत करायचे ठरले. या कामात क्रांतिवीर नागनाथ नायकवडी (अण्णा) यांनी पुढाकार घेतला.

१२ मे १९४५ रोजी कराड जवळ कापील या गावी नागनाथ अण्णांनी, आपल्या विद्यार्थी संघटनेमार्फत कर्मवीर भाऊराव पाटलांचा सत्कार करावयाचा, यासाठी या कार्य सोहळ्याची रूपरेषा व विचार विनिमयासाठी एक विद्यार्थी परिषद

संघटित करून घेतली. त्या परिषदेचे अध्यक्षस्थान परमपूज्य साने गुरुजींनी भूषविले होते व स्वागताध्यक्ष म्हणून बॅरिस्टर पी.जी.पाटील हे होते. या परिषदेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांच्या सत्काराबरोबर त्यांच्या शिक्षण संस्थेला एक लाख रुपयांचा निधी देण्याचा संकल्पही त्यांनी सोडला. या सत्कार सोहळ्याकरता एक कमिटी स्थापन केली. या कमिटीमध्ये सर्वश्री नागनाथअण्णा नायकवडी, गो.ज्ञा.तथा बापूजी साळुंखे, पी.जी.पाटील, दादासाहेब जगताप, वाय.सी.पाटील, राजूताई पाटील, धनपाल पाटील, डी.एस.चव्हाण, बाबूराव कोकाटे, आर.टी.शिंगटे आदी कार्यकर्ते होते.

भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण प्रसाराच्या शैक्षणिक चळवळीने सारा बहुजन समाज न्हाऊन निघाला होता. दीन-दलित व पीडितांच्या घरोघरी ज्ञानदान देण्याचे काम भाऊरावांनी केले होते. पण या कार्याची फारशी दखल तत्कालीन धुरिणांनी घेतली नव्हती. उलट त्यांना निंदवले जाई. पण नागनाथ नायकवडी, राजूताई पाटील, वाय.सी.पाटील, बाबूराव कोकाटे इ.तरुण कार्यकर्त्यांना याबद्दल बराच खेद वाटला. हे सर्वजण कर्मवीर भाऊरावांच्या शैक्षणिक कार्याचा मनोमनी आदर करीत होते. १९४५ साली कर्मवीर हृदयविकाराने आजारी होते. मुंबईला एका दवाखान्यात उपचार घेत होते. कर्मवीर अप्रत्यक्षरीत्या प्रतिसरकारच्या चळवळीला मदतच करीत होते. मुंबईला दवाखान्यात जाऊन नागनाथ नायकवडी, वाय.सी.पाटील,बाबूराव कोकाटे यांनी कर्मवीरांची भेट घेतली व एक लाखाचा निधी अर्पण करण्याची इच्छा त्यांच्या जवळ व्यक्त केली. त्यांनी संमती दिली. कर्मवीरांच्या सांगण्यानुसार प्रत्येकी एक रुपया वर्गणी काढून देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कमिटीच्या कार्यकर्त्यांनी झंझावती दौरा करून निधी गोळा करायला सुरुवात केली. वीस हजार विद्यार्थ्यांना सभासद करण्यात आले. भाऊरावांचे कार्य तसे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचले होते. सत्कार निधीस भरघोस यश मिळू लागले. वाळवे, आष्टा, दुधगाव, ऐतवडे वगैरे वाळवे तालुका दक्षिण साताराचा कराड, वडगाव, तांबवे भाग पिंजून काढला तरी १ लाख निधी होईना. म्हणून काही शेतकऱ्यांच्या नावावर त्यांनी दिलेल्या निधीत धुळे खजिन्यातील तेवढाच निधी त्यात घातला आणि याच दरम्यान अण्णांचे धाकटे बंधू शामराव (आप्पा) यांचे लग्न झाले होते.त्या लग्नात मिळालेला १००० रुपयांचा हुंडा त्यांनी या निधीमध्ये जमा केला. अशा पद्धतीने १ लाखाचा निधी पूर्ण केला. या निधीसाठी सत्कार समितीने सतत दोन ते अडीच वर्षे पायपीट केली होती.

महात्मा गांधीजींच्या हस्ते कर्मवीर भाऊरावांचा सत्कार करून एक लाखाचा निधी अर्पण करण्याचा मानस कमिटीच्या कार्यकर्त्यांचा होता. म्हणून निधी जमल्यानंतर

महात्मा गांधींना आमंत्रण देण्यासाठी बापूजी साळुंखे यांना दिल्लीला पाठवण्यात आले. महात्मा गांधी दिल्लीला भंगी कॉलनीत रहात होते. बापूजी साळुंख्यांनी तेथे जाऊन त्यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांनी एक लाख रुपये जमविले आहेत व आपल्या शुभहस्ते हा निधी भाऊरावांना अर्पण करावा अशी सर्वांची इच्छा असल्याचे सांगितले. या चांगल्या कामाबद्दल गांधीजींनी धन्योद्गार काढले. परंतु या सोहळ्यास आपणांस उपस्थित राहता येत नाही याबद्दल खंत व्यक्त केली. देशाला स्वातंत्र्य देऊन देशाचे दोन तुकडे ब्रिटिशानी केले होते. पाकिस्तानमध्ये जातीयतेचा उद्रेक झालेला होता तो उद्रेक शमविण्यासाठी महात्मा गांधींचा शांती दौरा नौरवाली भागात काढण्याचा कार्यक्रम अगोदरच ठरलेला होता. त्याप्रमाणे गांधीजी त्या भागात निघाले होते. गांधीजींनी बापूजी साळुंख्यांना सांगितले तुम्ही दुसरा पाहुणा पाहून कार्यक्रम उरकून घ्यावा. असा सल्ला त्यांनी दिला आणि या कार्यक्रमास त्यांनी शुभसंदेश दिला. शुभ संदेश पुढील प्रमाणे

''श्री भाऊराव पाटील कि सेवाही उनका कीर्तिस्तंभ है । फिरभी छात्रोंने जो प्रवृत्ति की है वह उनके लिए स्तुत्य है । श्री.भाऊराव पाटील दीर्घकाल तक सेवा करते रहे ।''

गांधीजी कार्यक्रमास येऊ शकत नाहीत म्हटल्यावर कार्यकत्यांची मोठी निराशा झाली. अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रबाबूंचा दौरा महाराष्ट्रात होता. परंतु काही कारणास्तव तोही दौरा रद्द झाला. शेवटी हा कार्यक्रम संत शिरोमणी, थोर संत पुरुष, सद्गुरू गाडगे महाराजांच्या हस्ते पार पडण्याचे ठरवले. कार्यक्रमाचे आमंत्रण गाडगे महाराजांना पाठवले. कार्यक्रमाची तारीख महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी दिनी म्हणजेच २७ नोव्हेंबर १९४८ निश्चित केली. त्या दिवशी सातारा शहरातून कर्मवीर भाऊरावांची व गाडगे महाराजांची भव्य मिरवणूक काढली. त्यासाठी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हत्ती आणला होता. हत्तीवर कर्मवीरांना बसवायचे ठरले होते पण अण्णा हत्तीवर बसले नाहीत. त्यांनी गाडगे महाराजांना हत्तीवर बसण्यास सांगितले; पण तेही हत्तीवर बसले नाहीत. लेझीम, हालगी, झांजपथकात वाजत गाजत प्रचंड मिरवणूक इतिहास प्रसिद्ध अशा धनीणीच्या बागेत आली आणि भव्य अशा सजवलेल्या शामियान्यात तेथे कार्यक्रमाला सुरुवात झाली.

प्रथम कर्मवीर भाऊराव पाटलांचा हार तुरे देऊन सत्कार केला. विद्यार्थी संघटनेमार्फत त्यांना मानपत्र दिले. यानंतर सद्गुरू गाडगेबाबांचे हस्ते एक लाख रुपयांचा निधी अर्पण केला. कर्मवीरांनी प्रथम भाषण केले. त्यांनी. आपल्या भाषणात ''गाडगेबाबांच्या हस्ते निधी दिल्याचा मला आनंद होतोय. आजपर्यंत

निरलसपणे केलेल्या सेवेचे हे फळ आहे. छत्रपती शाहू, फुलेंच्या प्रेरणेने मी हे कार्य सुरू केले. महर्षी शिंदे, सयाजीराव महाराज, सद्गुरू गाडगेबाबा यांना मी गुरूसमान मानतो. सामाजिक सुधारणेचे मूळ शिक्षण आहे. खेड्यापाड्यांतून अथांग पसरलेल्या बहुजन समाजाला आणि दीन दलितांना शिक्षण देणे हे माझे व्रत आहे. महात्मा गांधीजींच्या हस्ते हा समारंभ होणार होता. त्यांची भेट स्फूर्तिदायक झाली असती. दुर्दैवाने त्यांची हत्या झाली. त्यांच्या श्राद्धादिनी १०१ मोफत हायस्कूल्स काढण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. या पुढे जाऊन मला महात्मा गांधी ग्रामीण विद्यापीठ काढायचे माझे स्वप्न आहे. लाख लोकांनी लाख रुपये देऊन माझ्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. लाख लोकांच्या हृदयात माझे कार्य गेले आहे याचा मला आनंद आहे. या विश्वासाने माझ्यात दुप्पट काम करण्याची स्फूर्ती निर्माण झालेली आहे. ज्या कार्यकर्त्यांनी, माझ्या विद्यार्थी मित्रांनी या समारंभासाठी कष्ट घेतले त्याबद्दल धन्यवाद.'' असे विचार मांडले. या नंतर गाडगे महाराजांनी आशीर्वादपर भाषण केले.

''भाऊराव पाटलांनी ऋषिमुनींप्रमाणे ज्ञानगंगेचे पाट झोपडीपर्यंत पोहचविले. रयतेच्या पोरांना, गोरगरीब, दीन-दलित पोरांना शिकवून शहाणे केले. त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. मी माणसांची सेवा करतो; पण भाऊ पाटलांनी दगडालाच जिवंत केले. भाऊरावांसारखे असंख्य रयत सेवक निर्माण होतील तर देशाचा उद्धार होईल. भाऊरावांच्या कार्याला सर्व बंधूंनी सढळ हाताने मदत करावी. मला अध्यक्षपद दिलत, माझ्या हस्ते एक लाखाचा निधी दिलात व माझा तुम्ही सन्मान केलात. माझ्या बंधूचा सोहळा म्हणून मी धावत आलो. मला भाषण जमत नाही. माझ्या हातात खराटा व झाडू द्या ! मला झाडायला सांगा ! ते करायला मला आनंद वाटेल.'' शेवटी त्यांनी हात जोडून 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' म्हणत आपले भाषण संपवले.

समारंभाला विद्यार्थी, कार्यकर्ते, नागनाथ नायकवडी,वाय.सी.पाटील, बापूजी साळुंखे, राजूताई पाटील आदी निधी कमिटीचे मेंबर साताराचे व आसपासच्या खेड्यांतून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत अंतःकरण हेलावणारा असा हा कार्यक्रम झाला.

आचार्य प्रल्हाद केशव आत्रे
यांचा दै.'नवयुग' विशेषांक
दिनांक: १२ मे, १९४६

## सेनापती नागनाथ नायकवडी

लष्करी बाण्याला लागणारी दणकट प्रकृति, खंबीरता आणि त्याच्या जोडीला आदर्श राष्ट्रवाद यांचा त्रिवेणी संगम म्हणजे सेनापति नागनाथ नायकवडी हे होत. लाड आणि नागनाथ-म्हणजे प्रतिसरकारचे हरी-हर होत. दोघेही शाळेपासून एकत्र होते. 'पे-स्पेशल ट्रेनच्या' लुटीच्या पराक्रमाने अखिल साताऱ्याचेच नव्हे तर महाराष्ट्रचे लक्ष नागनाथ आणि त्यांचे सहकारी यांचेकडे लागले.

धुळे खजिना लुटीच्या केसमध्येही नागनाथ (उर्फ अण्णा) यांचे नाव दाखल होताच त्यांना पकडण्यासाठी पोलीसांनी जंग जंग केले. दोन देशद्रोह्यांनी पोलिसांना खबर दिल्यावरून १९४४ मध्ये नागनाथांना त्यांच्या राहत्या वाळवे गांवी घरांत झोपले असतां पोलीसांनी छापा घालून पकडले. तथापि वाळव्याहून ते इस्लामपूरला पोहोंचतात न पोहोचतात तोच त्यांच्या शूर सहकाऱ्यांनी त्या देशद्रोही 'पिसाळा'ना पकडून त्यापैकी एकाचा पाय व दुसऱ्याचा हात तोडून त्यांना जन्माची अद्दल दिली.

शिवाजीमहाराजांच्या सुटकेप्रमाणे आश्चर्यकारक अशा तऱ्हेने सातारा सब-जेलमधून पोलीसांच्या कडेकोट बंदोबस्ता मधून नागनाथांनी आपली सुटका करून घेतली. त्यामुळे त्यांना साताऱ्याचे 'जयप्रकाश' म्हणतात.

प्रतिसरकारचे सेनापती व शांतीदूत म्हणून अण्णांची कामगिरी अपूर्व आहे. वाळवे तालुक्यातील बंडखोर दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यांत अण्णांनी फारच मोठे यश मिळविले. बर्डे मास्तरांप्रमाणेच गुंडांचा व दरोडेखोरांचा त्यांनी पक्का बीमोड केला.

साताऱ्यातील खेडूत पूर्वी म्हणत असत, 'नागनाथाच्या आधी दिवस मावळतांच दरोडेखोरांच्या दिवट्या सर्वत्र नाचत होत्या.' पण त्या भुतांना नागनाथांनी गाडून पार जमीनदोस्त करून टाकले ! वाळवे तालुका म्हणजे रोज कोठे ना कोठे तरी आग लागायची नाही तर खून पडावयाचा ! हा शिरस्ता आण्णांनी बदलून टाकला व शांतीचे निर्भय राज्य तालुक्यात प्रस्थापित केले.

# अभिप्राय...

## क्रांतिअग्रणी जी. डी. बापू (लाड)

माझे जिवलग साथीदार, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील तेजस्वी सहभागाची, वास्तव माहिती घेऊन जयवंत अहिर यांनी ''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' हे पुस्तक लिहिले. याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

त्यांचे हे पुस्तक इतिहासाने दखल न घेतलेल्या स्वातंत्र्य योध्यांच्या कर्तृत्वाचा दस्ताऐवज आहे. इतिहास अभ्यासक, ध्येयवादी तरुण व क्रांतिकारक विचाराचे कार्यकर्ते, यांना हे पुस्तक चांगले मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

श्री. जयवंत अहिर यांनी मोठ्या परिश्रमाने माहिती संकलित करून हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यातून अनेक संशोधकांना प्रेरणा मिळो व खऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कर्तृत्वाला न्याय मिळो. हीच सदिच्छा....

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू (लाड)
कुंडल

## प्रखर देशभक्तीची मशाल !
## क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी

प्रा.डॉ.पी.बी.पाटील

द. महाराष्ट्रातील कृष्णा खोरे हे कर्तबगार इर्षेबाज रगेल आणि रंगेल माणसे निर्माण करणारे ऐतिहासिक खोरे आहे. धर्मवीर, कर्मवीर,स्वातंत्र्यवीर, क्रांतिवीर यांना जन्म देणारी ही भूमी आहे. इथल्या मातीत, पाण्यात, अन्नात आणि हवेत अशी काही चेतना आहे की,

ज्यामुळे इथे जन्माला येणाऱ्यांचे मन, उंच उंच भराऱ्या घेण्यासाठी सदैव उत्सुक, उतावळे, आसुसलेले असते. अडचणी, संकटे आली तर ते अधिकच स्फुरण पावते.

स्वातंत्र्य चळवळीतील अंतिम 'चले जाव' आंदोलन, इतिहासात लक्षवेधी करणारे प्रखर देशभक्त ५०-६० वर्षांपूर्वीच्या पिढीत इथेच जन्मले. त्यातले एक आघाडीवरचे सेनापती म्हणजे क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायवकडी ! त्यांनी जो इंग्रजी साम्राज्याविरोधी लोकलढा दिला, त्याची तुलना तीनशे वर्षापूर्वी, याच कृष्णाखोऱ्यांनी मोंगल सम्राट औरंगजेबाविरुद्ध यशस्वीपणे दिलेल्या, लोकलढ्याशीच होऊ शकते. दोन्ही लढ्यांतील सेनापतींनी दाखवलेली ध्येयनिष्ठा, त्याग, कष्ट, शौर्य, धैर्य, कार्यक्षमता ही पराकोटीची आहे. अनेक पिढ्यांना स्फूर्ती, प्रेरणा आणि इतिहास घडवण्याची चेतना देणारा आहे.

दुर्दैवाने अशा इतिहास घडवणाऱ्या तेजस्वी व्यक्तींची उपेक्षा, इतिहास लिहिणाऱ्या बुद्धिजीवी कोत्या वृत्तीच्या लेखणीबहाद्दरांनी, महाराष्ट्रात तरी, सातत्याने केली आहे. जातिवर्चस्वाच्या अहंकाराने लठ्ठ सुजलेल्या मनोवृत्तीतूनच पाहण्याची संभावित कृती प्रतिष्ठित झाली आहे. प्रत्येकाला आपल्या जातीचा हिरो आपला वाटतो. त्यामुळे या जात्यंध लेखणी बहाद्दरांनी, मारुतीचे माकड व माकडाचा मारुती करून इतिहासाच्या देव्हाऱ्यांत पूजेसाठी ठेवले आहेत.

या चरित्रपुस्तिकेचे लेखक श्री जयवंत अहिर हे कुणी धंदेवाईक बुद्धिजीवी लेखक  नाहीत. पण लहानपणापासून नागनाथ अण्णांचा सहवास लाभलेले व अण्णांचा विश्वास मिळवलेले निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. या त्यांच्या जवळकीचा अत्यंत चांगला उपयोग करून क्रांतिवीर अण्णांच्या प्रखर देशभक्तीची कारकीर्द , तपशीलवार प्रकाशात आणली आहे. भूमिगत चळवळीतील कितीतरी रोमांचक, थरारक गोष्टी अजूनपर्यंत अंधारातच होत्या. त्या नीटपणे प्रकाशात आणण्याचे अत्यंत

महत्त्वाचे काम श्री जयवंत अहिर यांनी केले आहे. शौर्य, धैर्य, साहस, निर्भयता, आत्मविश्वास, निर्धार, कष्ट आणि निर्णयक्षमता, संघटनकौशल्य, त्याग, सावधपण आणि ध्येयनिष्ठा यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे नागनाथ अण्णा. असे तेजस्वी व्यक्तिमत्त्व वाचकांपुढे उभे करण्यात जयवंत अहिर यशस्वी झाले आहेत. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. जातीपातींच्या डबक्यातील गारगोट्यांना, हिरे म्हणून रंगवून ठेवण्याच्या बाजारात, जयवंत अहिर यांनी समाज सागरातील अस्सल तेजस्वी हिरा कसा असतो, त्याची एक झलकच क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे अस्सल चरित्र लिहून नव्या पिढीपुढे ठेवले आहे.

**प्रा.डॉ. पी. बी. पाटील**
शांतिनिकेतन, सांगली

## आचार्य शांताराम (बापू) गरुड

देशाच्या स्वातंत्र्यासाठी कॉम्रेड नागनाथ (अण्णा) नायकवडी यांनी धाडशी क्रांतिकारकांच्या साथीने स्वातंत्र्य आंदोलनात केलेल्या रोमहर्षक कामगिरीचे वास्तव चित्रण ''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' या पुस्तिकेत, लेखक जयवंत अहिर यांनी प्रभावीपणे केले आहे.

स्वातंत्र्यासाठी झालेल्या या विराट लोकलढ्यातून आपण एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर आरूढ झालो आहोत; परंतु अजुनही अर्धी लढाई पुरी व्हायची आहे. आपल्या राज्यघटनेच्या सरनाम्यातील संपूर्ण स्वातंत्र्य लोकांचे सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही व संघराज्यीय एकात्मता ही मूल्ये आपणाला प्रस्थापित करायची आहेत. त्यासाठी स्वातंत्र्य मिळाल्यापासून ग्रामीण

कष्टकऱ्यांना संघटित करून त्यांचे लढे उभे करण्यात नागनाथ अण्णांचा वाटा मोठा आहे. त्यांच्या संबंधी लिहिलेल्या या पुस्तकामधून वाचकांना बरीचशी ऊर्जा मिळेल. अशी मला उमेद वाटते.

आचार्य शांताराम (बापू) गरुड
इचलकरंजी

## व्ही. वाय. (आबा) पाटील

"क्रांतिवीर नागनाथअण्णा" हे जयवंत अहिर यांनी लिहिलेले पुस्तक वाचून मी अक्षरश: भारावून गेलो. आदरणीय क्रांतिवीर अण्णा व त्यांच्या साथीदारांनी स्वातंत्र्य आंदोलनात तळ हातावर शिर घेऊन योजनाबद्ध पद्धतीने घडवलेल्या अनेक घटना व त्यांतील काळजाला हात घालणारे चित्तवेधक प्रसंग श्रीयुत जयवंत अहिर यांनी जसे घडले तसे बोलीभाषेत फार चांगले मांडले आहेत.

पुस्तक वाचताना तारुण्याच्या काळात या क्रांतिवीरांच्या नसानसात भिनलेली राष्ट्रभक्ती अन् राष्ट्रप्रेमाने रसरसलेली प्रखर राष्ट्रनिष्ठा मनाला धुंद बनविल्याशिवाय रहात नाही. अन् ही धुंदी राष्ट्रासाठी मलाही काहीतरी केले पाहिजे ही जाण देऊन जाते.

शोषणमुक्त समाज रचनेचे स्वप्न साकार करण्यासाठी सार्वजनिक कार्यकर्ते व नव्या पिढीला हे पुस्तक निश्चितपणे प्रेरणादायी ठरेल असे मला वाटते.

व्ही. वाय. (आबा) पाटील
नागराळे

## क्रांतिवीर डॉ. नागनाथ(अण्णा)नायकवडी

एक्स. एम. एल. ए.

जयवंतने माझ्याबद्दल १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रसंगांवर हे पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकातील घटनांची माहिती मी त्याला अनेकवेळा सांगितली होती. तो गेली ४०-४२ वर्षे माझ्या सतत सहवासात असल्यामुळे त्याने बारीकसारीक घटनांची नोंद या पुस्तकात घेतली आहे. मी सांगीतलेले महत्त्वाचे प्रसंग लिहिल्यानंतर त्याने मला वाचून दाखविले. सत्य घटनांना फाटा न फोडता भाषेचा कोणताही डामडौल न आणता अंत:करण ओतून जयाने लिखाण केले आहे. हे लिखान आ.ह.साळुंखे यांना दाखवून त्यांची या पुस्तकाला प्रस्तावना घेण्याबद्दलही मी त्याला सांगितले होते. त्या प्रमाणे त्याने प्रस्तावना घेतली. तसेच पुस्तक छपाईला देणेपूर्वी प्रा.पी.बी.पाटीलांना आवश्य दाखव म्हणून सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनाही दाखवले. मला आ.ह.साळुंखे, माझे मित्र क्रांतिअग्रणी श्री.जी.डी.(बापू)लाड, प्राचार्य पी.बी.पाटील, तसेच श्री.शांताराम गरुड व श्री.व्ही.वाय.पाटील (आबा-नागराळे) यांचे अभिप्राय वाचून दाखविले. छपाई नंतर पहिली प्रत साखर शाळेत प्रथम मला श्री. वसंत पवार व जयाने बघण्यासाठी दिली. ती पाहून मी त्याला म्हणालो, ''अरे जया, हे पुस्तक फार गाजणार आहे''

ज्यांनी-ज्यांनी हे पुस्तक वाचले त्या पैकी अनेक लोकांनी पुस्तक चांगले लिहिले असे सांगितले. तर कोण म्हणाले हे पुस्तक अप्रतीम आहे. लवकरच आम्हांला आपले स्वातंत्र्यानंतरचे जीवनही लवकरच वाचावयास मिळावे अशी इच्छा व्यक्त करत आहेत. म्हणून मी त्याला पुढील भाग लवकरच लिहिण्यास घे म्हणून सांगितले.

तुमचा,

नागनाथ नायकवडी.

## ना.सुशीलकुमारजी शिंदे

उर्जा मंत्री, भारत सरकार.

महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीचे प्रमुख नेते म्हणून नागनाथअण्णा नायकवडी सर्वांनाच गेली अनेक वर्षे परिचित आहेत. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात ते सहभागी होते, याचा उल्लेखही वारंवार होत असे. पण त्यांनी केलेल्या क्रांतिकार्यांची समग्र माहिती आजवर लोकांसमोर आली नव्हती. जयवंत अहिर यांच्या 'क्रांतिवीर नागनाथअण्णा' या चरित्रामुळे प्रथमच ती उजेडात येत आहे. हे चरित्र वाचताना ही विलक्षण रोमहर्षक कहाणी आजवर अंधारातच राहिली याचे आश्चर्य वाटत राहीले आणि म्हणूनच जयवंत अहिर यांचे कौतुक वाटते.

१९४२ च्या 'चले जाव' लढ्यात हजारो, लाखो कार्यकर्ते देशभर सहभागी झाले होते. तरी त्यांचा मुख्य केंद्रबिंदू महाराष्ट्रच राहीला. लढ्याला ६०-७० वर्षे उलटून गेली तरीही या लढ्यात सहभागी झालेल्यांची विस्तृत सविस्तर नोंद अद्यापही झाली नाही. अनेक छोट्या मोठ्या प्रसंगांची वर्णने प्रकाशित झालेली आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबद्दल खूप लिहिले गेले आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा यांचा पत्री सरकार मधला सहभाग सर्वांनाच माहित आहे, पण नागनाथअण्णांचे क्रांतिपर्व मात्र आजवर अप्रकाशित राहीले. अहिरांनी अण्णांशीच वेळोवेळी बोलून लिहिलेले हे चरित्र, लढ्यातला एक स्फूर्तिदायक भाग आहे.

नागनाथअण्णांचे काम १९४२ मध्येच संपत नाही. पुढे अखंड पाच वर्षे ते ब्रिटीश सरकारशी झुंजत राहतात. कधी सरकारी खजिने लुटतात, कधी शस्त्रे लुटतात. भारतीय सैनिकांच्या मदतीने स्वत:ची फौज निर्माण करतात. त्यांना शस्त्रे पुरविण्यासाठी गोव्यातून थेट पोर्तुगीजांच्या शस्त्रागारातील शस्त्रे आणि काडतुसे जंगल मार्गाने आणतात, हे सगळे एखाद्या चित्रपटात शोभावे असेच आहे.

या साऱ्या घटनांमधून अण्णांचे देशप्रेम, नेतृत्व, संघटन कौशल्य, स्वतंत्रपणे मोहिमा राबविण्याची ताकद आणि धाडसी आक्रमक वृत्ती असे अनेक गुण सहजपणे समोर येतात आणि अण्णांकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलून जातो.

जयवंत अहिर हे काही लेखक, पत्रकार नव्हेत. पण अण्णांबरोबर अनेक वर्षे राहीलेले कार्यकर्ते आहेत. हुतात्मा किसन अहिर यांची पार्श्वभूमी त्यांच्या मागे आहे. म्हणूनच हे क्रांतिपर्व अतिशय उत्कटतेने शब्दबध्द करण्यात ते यशस्वी झाले आहेत. भाषेचा कोणताही डामडौल न आणता अत्यंत सहज आणि थेट भिडणाऱ्या प्रसंगांमुळे पुस्तक एकदा हातात घेतले की संपविल्याशिवाय खाली ठेववतचं नाही. अहिरांच्या रुपाने एक नवा लेखक सरस्वतीच्या दरबारात आला आहे असे मला वाटते. अण्णांचे स्वातंत्र्यानंतरचे जीवनही आम्हाला लवकरच अहिरांकडून वाचायला मिळेल, अशी खात्री वाटते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात एका महत्त्वपूर्ण पर्वाची भर घातल्याबद्दल लेखकाचे पुन्हा एकदा अभिनंदन.

**(सुशीलकुमार शिंदे)**

**ग.गो.बाबर (गुरुजी)**

अण्णांचे वर्ग मित्र,व्हॉलंटरी शाळेतील शिक्षक

प्रिय जया मामा,

आपण लिहिलेले ''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' पुस्तक वाचले. आपण साहित्यिक नसतानाही जे लिखाण केले आहे ते औरच आहे. मी अनेक पुस्तके वाचली आहेत पण आपण अंत:करण ओतून केलेले लिखाण, सत्य घटना, कांही प्रसंग वाचून अंत:करण भरून येते. पुन्हा एकदा धन्यवाद !

कळावे, लोभ आहेच, वृध्दींगत होवो.

**ग.गो. बाबर (गुरुजी)**
गोटखिंडी

प्रा.(डॉ.) माणिकराव मा. साळुंखे
एम्.एस्सी.,पीएच्.डी.,एफ.आर.एस.सी.
कुलगुरू-शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाची विस्तृत माहिती देणारे ''क्रांतिवीर नागनाथ अण्णा'' भाग १- पूर्वार्ध हे चरित्रपर पुस्तक श्री.ज.य.अहिर यांनी लिहिले त्याबद्दल मी त्यांना प्रथम मन:पूर्वक धन्यवाद देतो.

भारताच्या स्वातंत्र्यामध्ये क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे योगदान आपणासर्वांना सुपरिचित आहेच. नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाचा इतिहास अत्यंत रोमहर्षक आणि प्रेरणादायी आहे. श्री. ज.य.अहिर यांनी या इतिहासाचे केलेले शब्दांकन हा एक महत्वाचा दस्तऐवज ठरणार आहे यात शंका नाही. हा चरित्रग्रंथ वाचत असताना मला अण्णांच्या तपस्वीतेचा, झुंजारपणाचा आणि द्रष्टेपणाचा वारंवार प्रत्यय आला. प्रस्तुत ग्रंथ सर्वांसाठीच अत्यंत प्रेरणादायी ठरेल, मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. आजच्या काळात अशा ग्रंथांचे मोल अधिकच वाढलेले आहे. या ग्रंथातून एक अत्यंत भारावलेला काळ जिवंत उभा राहतो. अण्णांच्या आठवणींमधून, त्यांच्या सहकार्यांच्या आठवणींमधून एक पर्व साकारले जाते. नव्या युगात प्रवेश करणाऱ्या भारतासाठी क्रांतिवीर अण्णांचे आठवणीरूप चरित्र एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देत राहील यात शंका नाही. शुभेच्छा.

(माणिकराव मा. साळुंखे)
कुलगुरू

**धोंडीराम(बापू) माळी**
सभापती- स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
महाराष्ट्र राज्य.

मा. श्री. जयवंतराव अहिर यांना प्रणाम,

आमचे स्नेही क्रांतिवीर डॉ.नागनाथ अण्णा नायकवडी यांचे जीवन चरित्र श्री. जयवंतराव अहिर यांनी लिहून प्रसिध्द केले आहे. श्री.जयवंतराव गेली चाळीस वर्षे अण्णांच्या सहवासात आहेत. त्यांनी अण्णांच्या क्रांती कार्याची ओळख आजच्या तरुण पिढी पुढे ठेविली आहे. अण्णांचे स्वातंत्र्यलढ्यातील अप्रतिम कार्य व त्याग तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रबांधणीकरिता केलेले यशस्वी प्रयत्न पुढील पिढीला खचितच मार्गदर्शक ठरतील अशी खात्री आहे. आज गोंधळलेल्या तरुणांपुढे अण्णांचे कार्य दीपस्तंभासारखे ठरावे असे आहे. लेखक जयवंतराव अहिर यांनी क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णांच्या चरित्राचा पुढील भाग लवकरच प्रसिध्द करावा. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा आहेत.

धोंडीराम माळी

**(धोंडीराम माळी)**
कुपवाड

**ॲड्.रावसाहेब पांडुरंग शिंदे,** स्वातंत्र्यसैनिक,
**चेअरमन**- रयत शिक्षण संस्था, सातारा.

श्री. जयवंत अहिर यांना सप्रेम नमस्कार,

मा.श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांचे जीवनावर स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वातंत्र्य चळवळीचा **'क्रांतिवीर नागनाथअण्णा'** (भाग १, पूर्वार्ध सन १९२२ ते १९४७) हा ग्रंथ तुम्ही असंख्य वाचकांपुढे ठेवला.

क्रांतिवीर अण्णांचा आणि माझा अनेक वर्षापासूनचा दृढ संबंध आहे. त्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे.

तरीपण या ग्रंथाद्वारे, स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीची गाथा तुम्ही वास्तवाशी नाते ठेवून भरभरून लिहिली. हा ग्रंथ मला खूपच भावला.

एका देशभक्ताची ही समर्पण जीवनाची वीरगाथा तरूण पिढीला दिशादर्शक ठरणारी आहे. क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी म्हणजे महाराष्ट्राच्या परिवर्तनशील जीवनाचा दीपस्तंभ आहे. हा ग्रंथ वाचताना मला तर माझ्या भूतकाळातील लढ्याची प्रखरतेने आठवण झाली. अनेक गोष्टींना उजाळा मिळाला.

लहानपणी दुसऱ्याच्या शेतातील भुईमुगाचा वेल उपटल्याबद्दल अण्णांच्या वडिलांनी रागाने हातातला विळा अण्णांच्या मानेवर इतका जोरात मारला की, त्यांनी हात मानेवर ठेवले नसते तर जीवावर बेतले असते. वडिलांचा राग शांत झाल्यावर "हे बघ नागनाथ आलं गेलं पै पावनं, रानच चिट पाखरू या समद्यांनी खाऊन जे राहील ते आपलं ! ते आपल्या पोटापुरतं हाय. तवा आपण कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही आणि कुणाच्या सुतळीच्या तोड्याची अपेक्षा करायची नाही" असा बहुमोल सल्ला त्यांनी अण्णांना दिला त्यामुळे प्रामाणिकपणे आणि सत्याने वागण्याची जाणीव अण्णांना लहानपणीच झाली. ही शिकवण त्यांनी आयुष्यभर जपली.

लहानपणी शाळेत असताना वयाच्या ८ व्या वर्षी क्रांतिसिंह नानापाटलांशी अण्णांचा जवळून संबंध आला. लहानपणीच त्यांनी त्यांच्या अनेक सभांच्यावेळी तिरंगी झेंडा अण्णांच्या हाती सोपवला, तो स्वातंत्र्यलढ्याच्या अग्नीकुंडात उडी घेण्यासाठीच होता, असेच दैवी संकेत असावेत.

शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा उपयोग करुन अण्णांनी वेषांतर केले व गणी अत्तारांनी दिलेल्या वाटाड्यासोबत अण्णा साताऱ्याहून पसार झाले. ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांची आगऱ्याहून सुटका झाली त्याप्रमाणे सातारा जेलमधून अण्णा निसटले. यात शिवाजी महाराजांच्या नीतीचा अवलंब केलेला आहे. हा प्रसंग या पुस्तकात चितारता तुमचे लेखन कौशल्य चांगलेच प्रकटले आहे.

अण्णांचे जीवन ही एका विराच्या शौर्याची, धैर्याची, त्यागाची, देशभक्तीची आणि लढ्याची अशी तेजोमय यशोगाथा आहे. तुम्ही ग्रंथरुपाने ती साकारली आहे. नव्या पिढींना ती सदैव प्रकाश देत राहिल असा मला विश्वास वाटतो. अण्णांचे जीवन आदर्श मानवी जीवन म्हणून किती सार्थ ठरले आहे याची प्रचिती ग्रंथ वाचकांना सदैव देत राहिल. अण्णांच्या कार्यकर्तृत्वाची मशाल अशीच दीर्घकाळ तेजाळत राहो. अण्णांच्या क्रांतिकारक कार्याला आणि त्यांच्या दैदिप्यमान व्यक्तिमत्त्वाला ग्रंथबद्ध करुन जन-माणसात एक प्रकारे चिरकाल स्वरुप दिले आहे.

अण्णांचा स्वातंत्र्यासाठी संघर्ष हा आजच्या पिढीला दिशादर्शक ठरेल. ग्रंथाच्या पूर्वार्धात अण्णांच्या जीवनाचा घेतलेला आढावा उत्तरार्धातही तितक्याच ताकदीचा असणार यात शंका नाही. अण्णांचे सहकार क्षेत्रातील विशेषत: सहकारी साखर कारखान्याच्या रुपाने उभे राहिलेले विधायक कार्य देखील तेवढेच क्रांतिकारक आहे. ग्रामीण भागाच्या विकासाचे ते एक Silent Revolution 'नि:शब्द क्रांति' म्हणावे असे आदर्शवत काम आहे. ह्या पुढील विधायक गाथेचे कार्यदेखील तुमच्या हातून ग्रंथरुपाने साकारले जावे ही अपेक्षा.

देशासाठी कार्य करण्याची प्रेरणा इतरांना देण्याची ताकद तुमच्या या ग्रंथ लिखाणात आहे. हा ग्रंथ त्यामुळे खूपच मोलाचा ठरणार आहे. लोकांत जास्तीत जास्त व्यापक स्तरावर या ग्रंथाचे वितरण होऊन तो वाचला जावा. अधिकाधिक आवृत्या निघाव्यात ही मनिषा. तुमच्या नव्या आवृत्तीला माझ्या शुभेच्छा !

**(रावसाहेब शिंदे)**
श्रीरामपूर

## डॉ. बाबा आढाव

प्रिय जयवंत अहिर,

आपण लिहिलेले ''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' पुस्तक वाचले. १९४२ च्या सालात अण्णा विशीत होते. १९४२ ते १९४५ हा काळ त्यांच्या विशी-पंचवीशीचा. देशातील प्रसिध्द क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर, बटुकेश्वर दत्त, बाबू गेणू इ. मंडळींनी याच वयात आयुष्याची बाजी लावली. अण्णा आजही त्याच वातावरणात व मानसिकतेत असतात याचा अनुभव त्यांच्याशी बोलताना येतो.

प्रत्येक लढ्याचा तपशील वाचून अनेक शंकांचे निरसन झाले. पुस्तक अण्णांच्या नावाने असले तरी अण्णांनी प्रत्येक सहकाऱ्याची 'याद' जागृत केली आहे. प्रतिसरकार, जनतेचे सरकार स्थापन करण्याचे त्यांचे स्वप्न अर्धवट राहीले. स्वातंत्र्योदय झाल्याने लोकशाही प्रशासनाचा स्वीकार करावा लागला त्या बद्दलचाही मनोमन स्वीकार अण्णांनी केला आहे. मात्र जिद्द अबाधित ठेवली आहे.

तुम्ही कृष्णा खोऱ्यातील क्षात्रतेजाबद्दल गौरवाने लिहिले आहे. अहिंसावादी म.गांधीचे नेतृत्व त्या काळातील क्रांतिकारकांनी मानले असते तरी त्यांनी सशस्त्र क्रांतिचा मार्ग चोखाळला आहे. म.गांधींचे 'ग्राम स्वराज्य' प्रतिसरकारच्या चळवळीमुळेच साकार झाले असते परंतु मोरारजी, देव, दास्ताने प्रभृतीना ते अभिप्रेत नव्हते, आजच्या वास्तवावर अण्णांना बोलते करावे एवढीच माफक अपेक्षा. बाकी पुस्तक उत्तम.

बाबा आढाव

**(बाबा आढाव)**
बिबवेवाडी, पुणे

## मा.बी. जी. कोळसे-पाटील

माजी न्यायमूर्ती

आपल्या देशाचा घडला तसा इतिहास लिहला गेला नाही. कारण ज्यांनी इतिहास लिहावयांस हवा होता त्यांना लिहणेवाचणेची कायद्यानेच बंदी होती. ज्यांनी लिहला तो त्यांच्या हितासाठी खोटा इतिहास लिहला. त्यामुळे देशाचे कधीही न भरून येणारे नुकसान झालेले आहे.

कॉ. नागनाथ अण्णांचा चरित्र रुपाने श्री. जयवंतरावांनी घडला तसा इतिहास लिहून एक आदर्श निर्माण केला आहे. नि:स्पृह माणसाने लिहलेला हा इतिहास (खरे चरित्र) पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरावा ही अपेक्षा. श्री. जयवंतराव स्वत:च २४ तास अण्णांच्या सेवेत असल्याने हे करणे त्यांना शक्य झाले आहे.

धन्यवाद !

(बी. जी. कोळसे-पाटील)
पुणे

**प्रा.श्री. बाबासाहेब पाटील,**
''ऋणानुबंधकार'' ऐतवडे खुर्द

एक संदर्भ ग्रंथ

भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या इतिहासात आदरणीय क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले गेले आहे. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारमधील एक प्रमुख सेनानी म्हणून नागनाथ अण्णांचा उल्लेख होतो. लेखकाने १९२२ ते १९४७ या कालावधीतील अत्यंत रोमहर्षक घटनांचा परामर्श घेतला आहे. ग्रंथातील हुतात्मा किसन अहिर व क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांचे फोटो पाहून मान आदराने झुकते. आदरणीय अण्णांचे हस्ताक्षर तसेच त्यांचे सहकारी यांचे संकलन पुस्तिकेत असल्याने वाचकाला सात्विक आनंद मिळतो. लेखकाने प्रस्तुत पुस्तक लिहून देश सेवेचेच कार्य केले आहे.

एक वाचनीय, स्फूर्तिदायक संदर्भग्रंथ म्हणून या पुस्तकाची नोंद निश्चित होईल.

(बाबासाहेब पाटील)
''ऋणानुबंधकार''ऐतवडे खुर्द

## ॲड. सुभाष भगवान पाटील,

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू

आपले पुस्तक वाचताना अक्षरश: भारावून गेलो. आपण फार मोठे काम केले आहे. क्रांतिवीर अण्णांच्या संबंधी लेखन फारच अभावाने केले आहे. त्यांच्या कामाचा हा इतिहास त्यांच्या बरोबरच लुप्त होईल की काय ? अशी भीती होती. आपल्या पुस्तकामुळे या इतिहासाचे जतन व संवर्धन होऊन पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. आपण सुरू केलेल्या पायवाटेचा राजमार्ग होईल याचा विश्वास आहे.

पुनश्च एकवेळ आपणास धन्यवाद !

**(सुभाष पाटील)**
विटा

## अरुण चव्हाण

प्रिय श्री. जयवंतराव,

त्यावेळच्या तरूण पिढीचे क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे नायकच होते. तुम्ही त्यांच्या ओजस्वी चरित्राचा आलेख तयार करून फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. विषयाला साजेसाच तुमच्या भाषेचा बाज आहे. त्यावेळचे राजकीय, सामाजिक वास्तव तुम्ही ओघवत्या भाषेत साकारले आहे. ४२ च्या लढ्याची जग बदलण्याची दुर्दम्य मनिषा जतन करून वाढीस लावण्याचा विचार तरूणांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी तुमच्या पुस्तकाचा खासच उपयोग होईल.

**(अरुण चव्हाण)**
कवठेपिरान

**एम. ए. मुक्तदीर**
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
पुणे.

मा. जयवंत यल्लाप्पा अहिर आपण लिहिलेल्या ''क्रांतिवीर नागनाथ अण्णा'' या पुस्तकात मा. अण्णासाहेबांचा पुर्ण जीवनपट उलगडण्यात आला आहे. मा. अण्णांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या जीवनात उन्नती होण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. हे पुस्तक वाचताना मी भारावून गेलो आहे.

**(एम. ए. मुक्तदीर)**
पुणे.

**मा.श्री. बी. आर. थोरात**
माजी प्राचार्य- ज्यु. कॉलेज, ऐतवडे खुर्द

प्रिय जयवंत,

''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करून अण्णासाहेबांच्या क्रांतिकारी, संघर्षमय जीवनकार्यावर प्रकाश टाकलात. नव्या पिढीला स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासातील अण्णासाहेबांचे क्रांती पर्वातील धाडसी कार्य देश प्रेमाची प्रेरणा सदैव देत राहील यात शंकाच नाही.

हा ग्रंथ स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीतील जणू ऐतिहासिक ठेवा आहे हा महान ठेवा जपून ठेवण्याचे कार्य आपण केले आहे. ग्रंथातील दुर्मिळ फोटोग्राफ्स मन मोहून टाकतात. प्रत्येक प्रकरण हे जणू इतिहासाचे पान आहे.

धन्यवाद !

**(बी. आर. थोरात)**
ऐतवडे खुर्द

## प्राचार्य विश्वास सायनाकर

धडाडी, निर्णयक्षमता, प्रसंगावधान, बेडरपणा, निरपेक्षपणा, समर्पणवृत्ती, नाठाळाचे माथा हाणू काठी हा बाणा, स्वराज्यासाठी टोकाचा त्याग करण्याची तयारी, अंन्यायझुगारणारी बंडखोरी, निकराच्या-जिवावरच्या प्रसंगी आघाडीवर पण श्रेयवादात सगळ्यांच्या मागे राहणारे, जिवाला जीव देणारे सहकारी घडवणारे, जन्मजात सेनानी असणारे, ब्रिटीशांचा, गुंडांचा कर्दनकाळ असणारे आणि गोरगरीब, नडल्या-पिडल्यांचे रक्षणकर्ते अण्णा म्हणजे इतिहासाच्या गरजेतून घडलेले एक स्वयंभू व्यक्तिमत्व एक नररत्न.

या ब्रिटीशा विरुध्द एल्गार करणाऱ्या अबोल, अनुत्सुक क्रांतिकारकाचे चरित्र लिहिणे म्हणजे शिवधनुष्यपेलणे. पण अभिजन प्रस्थापितांच्या लेखणीने त्याना हेतुपुरस्सर न्यायदिला नाही. स्वबांधवाने कणभर केले मणभर मांडणारी ही मंडळी पण त्यांचा निकटचा सहवास लाभलेले श्री. जयवंत अहिर यांनी ही जबाबदारी समर्थपणे पेललेली आहे. त्यांच्यातील जवळिकीमुळे या चरित्रलेखनाला अस्सलपणा लाभलेला आहे. यात अण्णांची जडणघडण करणारे निकटवर्तीययांचा अण्णांच्या जीवनातला प्रभाव, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे ठळक पैलु घडवण्यातले योगदान समर्थपणे रेखाटलेले आहे. घटनाप्रधान असलेले हे चरित्र अदभुतापेक्षाही रोमांचकारी आहे. एकदा हातात घेतल्यावर ते खाली ठेववत नाही.

छत्रपतींचा गनिमीकावा, संभाजीराजांचा निधडेपणा, राजर्षि शाहूंची बंडखोरी, कर्मवीराचे न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड या ब्रीदाचे अदभूत मिश्रण म्हणजे क्रांतिवीर नागनाथ अण्णा. अण्णांच्या डोक्याला पडलेली खोक, खबऱ्याची खबर, सोनवड्याची लढाई, बेरकी, क्रूरकर्मा गिल्बर्टला पुन्हापुन्हा चकवा, खजिन्यांची हिकमती लूट, सातारा जेल फोडून ब्रिटीशांच्या दराऱ्याला लावलेला सुरूंग, या सर्व घटनांचे जिवंत, हुबेहुब चित्रण करताना चरित्रलेखकाची लेखणी बहरुन

येते. कर्मवीरांना दिलेला १ लाखाचा निधी अण्णांच्या विधायक दृष्टीची साक्ष देतो. हळद नुकती निघालेल्या शेवंताने अण्णांच्यासाठी लावलेली जिवाची बाजी अण्णांच्या लोकनायकपदाची साक्ष आहे. एकएक घटना म्हणजे डोळे दिपवणारा तेजस्वी मोती.

सुबोध, साधी, रसाळ भाषा विषयाशी तादात्म्यओघवते निवेदन, छोटेखानी, आटोपशीर, नेमकी उठाव देणारी घटनांची मांडणी यामुळे हे चरित्र वाचनीयआणि प्रेरणादायी आहे. खरेतर यातील काही कथा प्राथमिक, माध्यमिक शिक्षणात भाषेच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करणे म्हणजे क्रांतिची ऊब, धग आणि प्रकरण नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ठरले. चरित्रलेखक श्री. जयवंत अहिर यांचे याबद्दल अंतकरणपुर्वक अभिनंदन ! आगे बढो !!

**(विश्वास सायनाकर)**

इस्लामपूर

## मा.श्री. वि.पां.राणे

आय.ए.एस.(रिटायर्ड)

प्रिय जयवंतरावजी,

''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' हे आपण लिहिलेले पुस्तक अगत्यपूर्वक आणून दिल्याबद्दल आपले आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

पुस्तक वाचायला जरा वेळ लागला. परंतु वाचून झाल्यानंतर माझ्या स्वतःच्या अज्ञानाबद्दल मन शरमिले. स्वातंत्र्य लढ्याबद्दलची आमच्या सारख्यांची माहिती म्हणजे त्या विषयावरच्या शाळा/ कॉलेजमधील पुस्तकांत नमूद केलेली. परंतु आपल्या सारख्या पुस्तकात आपण दिलेल्या माहितीवरुन खरा स्वातंत्र्य संग्राम कळला. वाळव्याच्या एका कुलवंत शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेला, आभाळा एवढं मन मोठं असलेला, हिमालयासारखा धीर गंभीर असलेला, अथांग महासागरासारखा शांत स्वभावाचा आणि गोर गरिबांच्या अस्मितेला कोणी हात घातला तर तितक्याच जोरात उसळी मारणाऱ्या या मुलाने बेचाळीस

साली विद्याभ्यासाचा त्याग करुन देश स्वातंत्र्याच्या संग्रामात भाग घेतला व त्यात हरपून ते जगले पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते खऱ्या-खुऱ्या अर्थाने राबविण्यासाठी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी अनेक आदर्श निर्माण केले. अशा अण्णांच्या समवेत काम करण्याची मला संधी मिळाली हे मी परमभाग्य समजतो.

(वि.पां.राणे)
पुणे.

## मा.श्री.आप्पासाहेब शि. माने

कन्सलटंट.

श्री. जयवंत अहिर हे माझे जवळचे स्नेही ''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' हे त्यांनी लिहीलेलं पुस्तक वाचलं. हे पुस्तक हातात पडल्यावर सलग २-३ वेळा वाचून काढलं. एकदा वाचून बाजूला ठेवणे अशक्यच !

ति.अण्णांच्या बद्दल नितांत प्रेम व श्रध्दा असणारा मी. जून १९६८ मध्ये अण्णांची ओळख झाली आणि त्या दिवसापासून अण्णांच्या बद्दल प्रेम व श्रध्दा दिवसागणिक वाढतच गेली. स्वातंत्र्यपूर्व काळातील अण्णांच्या कार्याची माहिती ही छोट्या छोट्या तुकड्यात ऐकली होती. स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या कार्याचा अवाका मी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. त्यांचं कुशल नेतृत्व, काम पूर्णत्वास नेण्याची धडपड व चिकाटी, या सर्वात आर्थिक व्यवहारातील पारदर्शकपणा हा अत्यंत वाखाणण्यासारखा आहे. वाळव्यातील १९७० साली केलेली ९०० एकरासाठी शेतीच्या पाण्याची स्कीम, सोनवड्यातील शाळा, साखर कारखान्याची उभारणी व तो कायम एक आदर्श कारखाना रहावा म्हणून चालवण्यासाठी कार्यकर्त्यांची उभी केलेली फळी, कामगार व शेतकरी

ह्या दोघांच्याही हितासाठी झटणारा कारखाना, गरीबातील गरीब मुलामुलीना पदवी, पदव्युत्तर शिक्षण मोफत मिळाव म्हणून काढलेल्या शाळा, कॉलेज, वसतिगृह, हुतात्मा दूध संघ, हुतात्मा सह. बँक, हुतात्मा बझार, वगैरे वगैरे हे सर्व आपापल्या क्षेत्रात एक आदर्श निर्माण करुन कार्यरत आहेत. दुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठी अण्णांनी केलेली आंदोलनं म्हणजे एक वेगळं पर्वच ! ऊना-तानात, उपाशी-तापाशी, नेतृत्व करणारे अण्णा म्हणजे जगाला ऊर्जा देणारा तळपता सूर्यच !

या सर्व जडण घडणीत अण्णा म्हणजे एक जिवंत दीपस्तंभच: सर्व सहकार क्षेत्रासाठी, महाराष्ट्रासाठी किंबहूना संपूर्ण भारतासाठी!

स्वातंत्र्यपूर्व काळ जयवंतरावानी तंतोतंत एकसंघ ऊभा केला आहे. हे पुस्तक वाचताना आपण तो काळ स्वत: अनुभवतो आहोत इतकं जिवंत ऊभा केलाय. त्यातील कांही शब्द उदा. दुधाची कासांडी, वईल (चुलीचाच एक भाग), आलकट पालकट (मांडी घालून बसणे) अगदी त्या वातावरणात घेऊन जातात.

महाराष्ट्रातील वाळव्याच्या वीर भूमीतील इतका जिवंत इतिहास लिहून जयवंतरावानी पुढील पिढीसाठी एक अत्यंत मोलाचं काम केलय. हे पुस्तक वाचताना मला कवीयत्री बहिणाबाई चौधरींची आठवण झाली. अत्यंत साध्या व सरळ बोली भाषेतील शब्दांचा वापर करुन मनातील भावना कागदावर उतरविल्या. एक आदर्श साहित्य निर्माण झालं. हे दर्जेदार साहित्य अगदी बावनकशी सोन्यासारखं शुध्द आहे.

जयवंतरावाच्या हातून असेच निर्भेळ साहित्य निर्माण व्हावं ही प्रामाणिक अपेक्षा !

धन्यवाद !

**(आप्पासाहेब शिं. माने)**

पनवेल

## मा.श्री. विश्वास धुमाळ,

प्रिय जयंत,

माझी व क्रांतिवीर अण्णांची ओळख महाराष्ट्रराज्याचा साखर आयुक्त असताना झाली. हुतात्मा किसन अहिर ह्या कारखान्याने सहकार चळवळी मधले आदर्श व मुळतत्व टिकवून ठेवले आहेत म्हणून साहजिकच ह्या मागे कोण व्यक्ती आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा झाली त्यातूनच अण्णांचा परिचय झाला.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला त्यातील बरेच जण महाराष्ट्रात जन्मले. त्यांनी ब्रिटीशांशी कशी झुंज दिली त्यावर फार कमी साहित्य उपलब्ध आहे. त्यांचे कर्तृत्व पडद्याआड जाऊ नये म्हणून जयंत अहिर यांनी क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्यावर पुस्तक लिहिले आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक वाटते.

महात्मा गांधी व लोकमान्य टिळक या दोघांच्या विचारसरणीचा पगडा अण्णांच्यावर झालेला होता. शत्रुला साधुत्वाने जिंकता आले नाही तर त्याचा प्रतिकार कसा केला पाहिजे. एखादा आपले नाक कापत असेल तर त्याचा गळा धरण्यापेक्षा, त्याला नि:शस्त्र करायचे म्हणजे जशास तसे नाहीतर जितक्यास तितका अशी त्यांची विचारसरणी दिसते. जेव्हा उद्दिष्ट व ध्येय स्पष्ट असते तेव्हा अपुरे मनुष्यबळ, सत्ता, संपत्ती व इतर साधनसामुग्री कमी असली तरी विधायक नेतृत्वाचे गुण असणाऱ्यांना त्यांची तमा नसते, या गुणवैशिष्ट्यांची मांडणी जयंत अहिर यांनी उत्कृष्टरितीने केली आहे. पुस्तकाची मांडणी सुबक आहे. त्यामुळे पुस्तक वाचायला घेतले की, पुर्ण वाचून झाल्याशिवाय खाली ठेवावेसे वाटत नाही.

देश स्वतंत्र झाला, लोक अडाणी राहून चालणार नाही म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचे स्वरूप वटवृक्षाचे होण्यासाठी अण्णांनी हातभार लावला. साखर कारखान्यामुळे समाजकारण, राजकारण व अर्थकारण यात कडूपणा न आणता त्यांची गोडी कशी टिकावी यासाठी अण्णांनी केलेल्या कार्यावर जयंत अहिर यांनी लिखाण करावे. परकियांपेक्षा स्वकियांशी व स्वत:शी कसे झटावे लागते याची जाणिव समाजाला होईल व प्रेरणादायक ठरेल. सहकारातील पैसा सहकाराने कसा वाढवून सर्व अर्थाने सामर्थ्यवान

समाज कसा करता येऊ शकतो यावर अण्णा व साखर कारखाना ह्याबद्दल जयंत अहिर यांनी लिहावे. लिखाण चालू ठेवा. समाजापुढे आदर्श व्यक्तीबद्दल माहितीतूनच अनेक अण्णा तयार होतील.

(विश्वास धुमाळ)

मुंबई

**मा.श्री. पी. डी. गुणे,**

प्रिय जया,

तू क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या ४२ सालच्या क्रांती लढ्यातील अलौकिक कार्याचा इतिहास पुस्तक रुपाने लिहून मला दिलास, तो मी तात्काळ वाचून काढला. वाचताना अनेकवेळा अंगावर काटे उभे राहीले. नागनाथ अण्णा आणि त्यानी जमा केलेले स्वातंत्र्य मिळविण्याच्या भावनेने भारावलेले कार्यकर्ते यानी जिवावर उदार होऊन केलेल्या कार्याची इतकी जवळून पाहिलेली माहिती फारच थोड्या समाजातील घटकाना असेल, ते कार्य तू केलेस या बद्दल तुझे हार्दिक अभिनंदन ! लिखाणातील भाषा सोपी ओघवती व रचना एखांद्या कादंबरी सारखी, ती वाचून तुझ्या लेखन कौशल्याचे खरोखरच अभिनंदन केले पाहिजे. पुस्तक उत्तमच झाले आहे. आता अण्णांच्या स्वातंत्र्या नंतरच्या काळातले सामाजिक कार्य, की जे खरोखरच प्रचंड आहे. त्याचा इतिहास लवकरच तू लिहावास असे मनापासून वाटते. अण्णांचा प्रज्वलीत स्वातंत्र्य संग्राम, त्यांची माणसांची पारख करण्याची क्षमता, शुध्द आयुष्य, पिडीत लोकांच्या बद्दलचा जिव्हाळा समाज कंटकांच्या संबंधीचा तिरस्कार आणि त्यांना शासन करण्याची तळमळ व त्यासाठी लागणारी धडाडी, प्रामाणिकपणा ह्या सर्वांच तुझ्या पुस्तकामध्ये उत्तमरित्या प्रकटन झाले आहे. अभिनंदन व आशीर्वाद !

(पी. डी. गुणे)

पुणे

## मा.सौ. अरुणाताई पी. गुणे

चि. जया,

कितीतरी दिवस झाले ति. नागनाथ अण्णांचे तुम्ही लिहीलेले पुस्तक वाचून. तेव्हांपासून पत्र लिहीण्याचे मनात होते. पण कांही कारणामुळे व खूपशा आळशीपणामुळे ते राहूनच गेले.

प्रथम असे अगदी खऱ्या घटना लिहून पुस्तक फारच आकर्षक झाले आहे. एक घटना वाचून झाली की, आता पुढे काय झाले, काय केले असे प्रश्न मनात येऊन पुस्तक कधी एकदा सर्व वाचतो असे झाले.

मी पण किर्लोस्करवाडीला त्यावेळी असल्याने सारी चित्र पुढे डोळ्यासमोर येतात. अर्थात त्यावेळी केवळ १२,१३ वर्षांची होते. कळत कांहीच नव्हते. आम्ही प्रतिसरकारला पत्रीसरकार म्हणत होतो.

आता मात्र वाटतय, त्यावेळी किती धाडसांनी, कष्टांनी व जिद्दीने ह्या साऱ्यालोकांनी कार्य केलंय ह्याची जाणीव होते. त्यावेळी रस्ते नव्हते, वाहने नव्हती पण मनात स्वातंत्र्य मिळवायचेच हे ध्येय होते. ह्या स्वातंत्र्य सैनिकांना भारत देश स्वतंत्र झाल्यावरचा आनंद आपण अनभवू शकत नाही. त्या सर्वांना शतश: प्रणाम !

जया, तू हे पुस्तक लिहून मोठे कार्यच केले आहे. त्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

ति. अण्णांचे पुढील आयुष्यासंबंधीपण लौकरच असे पुस्तक काढले तर तरुण पिढीला त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वागता येईल. ''निस्वार्थी ह्या शब्दाचा अर्थ म्हणजे अण्णा''

पुन: एकदा अभिनंदन करते, निरोगी आयुष्य लाभूदे तुम्हा सर्वांना असा आशीर्वाद देऊन पत्र पुरे करते.

सौ. अरुणाताई

(सौ. अरुणाताई पी. गुणे)

पुणे

मा.डॉ. जयसिंगराव पवार
संस्थापक-संचालक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

प्रिय जयवंतराव अहिर,

आपण लिहीलेला "क्रांतिवीर नागनाथ अण्णा" हा चरित्रग्रंथ एका दमात वाचून काढला. अतिशय प्रासादिक व ओघवत्या भाषाशैलीत तो उतरला आहे. वर्ण्यविषयाबद्दलचे प्रेम व भाषाशैली यामुळे तो मनापासून आवडला. त्याबद्दल आपले अभिनंदन करावे तितके कमीच आहे.

माझ्या दृष्टीने या ग्रंथाची दोन वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास घडत असता त्या प्रक्रियेत मोलाचे योगदान करणाऱ्या एका नेत्याचे हे चरित्र आहे. दुसरे म्हणजे या नेत्याच्या निकटच्या सहवासात सतत असणाऱ्या व्यक्तीने लिहिलेले हे चरित्र आहे. चरित्रनायक अण्णा यांच्या संमतीनेच हा ग्रंथ प्रकाशित झाला असणार, म्हणजे त्यांनी तो प्रथम वाचला असणार, हे स्पष्टच आहे. हे एवढ्यासाठीच नमूद करतो आहे की, त्यामुळे या ग्रंथाचे ऐतिहासिक मूल्य वाढले आहे. हा एक महाराष्ट्राच्या इतिहासाचा, विशेषत: ४२ च्या लढ्याचा, सातारा जिल्हयातील प्रतिसरकारचा एक महत्त्वाचा दस्ताऐवजच झाला आहे. ४२ च्या लढ्यातील आपल्या असामान्य कामगिरीने क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिअग्रणी जी.डी.लाड, क्रांतिवीर नागनाथ अण्णा आदी नेते लोकांच्या दृष्टीने 'दंतकथा'च बनून राहिले होते. आजही त्यांचा करिश्मा तसाच आहे. आता असे नेते निर्माण होणार नाहीत. कारण परिस्थितीच बदलली आहे. महापुरूष परिस्थितीच बदलून टाकतो. पण पुन्हा एकदा देश असाच संकटात सापडला तर मग या महापुरूषांची चरित्रे सामान्य जनास प्रेरणादायी ठरतात. म्हणून महात्माजी आजही कालबाह्य झालेले दिसत नाहीत.

या दृष्टीकोनातून अण्णांच्या चरित्राकडे पाहिल्यास ते आजच्या पिढीलाच नव्हेतर भावी पिढ्यांनाही प्रेरणादायी ठरावे. आपणास अण्णांचे

चरित्र लिहावेसे वाटले, ही सुध्दा मराठी समाजात अभावानेच दिसणारी गोष्ट आहे. आपल्याच माणसाचे महत्त्व बऱ्याच वेळेला आपणास समजत नाही. तुम्ही त्याला अपवाद ठरलात. त्याबद्दल तुमचे अभिनंदन !

अण्णांनी स्वराज्यासाठी, स्वातंत्र्यासाठी लढा दिला; पण नंतर स्वराज्याचे रुपांतर शेतकरी, कामगार, दलित, विस्थापित यांच्यासाठी 'सुराज्यात' व्हावे यासाठी अनेक लढे अविरतपणे दिले. या लढ्यांचा इतिहास म्हणजे अण्णांच्या चरित्राचा उत्तरार्धही आपल्या हातून लवकरच प्रकाशित व्हावा, अशी अपेक्षा बाळगून आहे.

**(डॉ. जयसिंगराव पवार)**

कोल्हापूर

## मा.श्री. इंद्रजित भालेराव

श्री.जयवंतराव अहिर,

आपण लिहिलेला नागनाथ अण्णा यांच्या चरित्राचा पुर्वार्ध वाचला आणि उत्तरार्ध लगेच समोर का नाही याचे फार वाईट वाटले. ही अधुरी कहाणी तुम्ही आता तातडीने पूर्ण करावी. अणांच्या माघारी आता अण्णांच्या भेटीचा आनंद तुमचे हे ग्रंथच देणार आहेत. स्वातंत्र्यपुर्व काळात देशभक्त होणे तसे सोपे होते पण स्वातंत्र्योत्तर अण्णांनी आपले जे चारित्र्य सिद्ध केले त्याला तोड नाही. ती कहाणी यापेक्षाही जास्त उत्कट होणार आहे यात शंका नाही.

आपल्या लेखणीत एक जिव्हाळा आणि स्वत:कडे खेचून घेणारी शक्ती आहे. त्यामुळे हे पुस्तक हातात पडूनही वाचणार नाही असा वाचक विरळाच. कुठलेही पान उघडले तरी तिथूनच ते वाचकांना पकडून ठेवतं आणि उत्सुकतेने आधीचाही मजकूर वाचायला भाग पाडते. अण्णांचे धैर्य, अण्णांचे धाडस, जाज्वल्य देशभक्ती याला तोड नाही हेच खरे.

१९८६ साली म्हणजे सव्वीस वर्षापुर्वी मी अण्णांना पाहिले होते. मी एम.ए.च्या वर्गात होतो आणि वाळवा इथे झालेल्या नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दलित, आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलनात माझ्या कवितेला प्रथम पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर पंचवीस वर्षांनी मागच्या वर्षी एका व्याख्यानमालेसाठी आलो तेव्हा आजारी अण्णांना भेटलो होतो.

तुमचे पुस्तक वाचतांना हा सगळा पट डोळ्यासमोरुन सरकला, तुम्ही उत्तरार्ध पूर्ण करावा म्हणून वाट पाहणारा तुमचा वाचक.

(इंद्रजित भालेराव)

एकनाथनगर, परभणी.

**मा.कॉ. किशोर सोपानराव ढमाले**

राज्यसंघटक- सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा,
सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष,
विद्रोही सांस्कृतिक चळवळ

श्री.जयवंतराव मामा,

परिवर्तनाच्या चळवळीतील आमचे सहकारी मित्र मा.जयवंत य. अहिर यांनी लिहिलेले 'क्रांतिवीर नागनाथअण्णा' हे क्रांतिवीराचे चरित्र म्हणजे स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहास लेखनातील तसेच मराठी चरित्रलेखन परंपरेतील महत्त्वपूर्ण पान म्हटले पाहिजे, मराठीमध्ये विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात वि.का.राजवाडे, न.र.फाटक, सत्यशोधक गुरूवर्य कृ.अ.केळूस्कर, पंढरीनाथ पाटील असे नामवंत चरित्रकार होऊन गेले. ज्यांनी ब्राम्हणी सनातनी, सुधारणवादी, सत्यशोधकी अशा विविध दृष्टींनी महानायकांची चरित्रे लिहिली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात धनंजय कीर, गं.बा.सरदार, वा.सी.बेंद्रे, चां.भ.खैरमोडे, य.दि.फडके, कॉ.शरद पाटील, डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ.बाबा आढाव यांनी महाराष्ट्राच्या इतिहासावर, स्वातंत्र्यचळवळीवर प्रकाशझोत टाकणारे महत्त्वपूर्ण लेखन

केले. जयवंत अहिर यांनी 'क्रांतिवीर नागनाथअण्णा' हे क्रांतिवीराच्या १९२२ ते १९४७ या पहिल्या पर्वातील घडामोडींवर पहिले व अधिकृत चरित्र लिहून महाराष्ट्रातील पुढील पिढ्यांवर मोठे उपकार केले आहेत. कारण 'लिखित इतिहास तोच खरा घडलेला इतिहास' असे म्हणून ज्यांचा लिखित इतिहास उपलब्ध नाही त्यांना भूतकाळ नव्हताच असे म्हणण्याची साम्राज्यवादी ब्राम्हणी टूम मध्यंतरी आली होती. भारतात इथल्या सनातनी ब्राम्हणी धर्मशास्त्रानी बहुजनांना वाचन-लेखनाची परवानगीच नाकारली होती. त्यामूळे ते इतिहासविहीन ठरतात किंवा फार तर ब्राम्हणांनी त्यांच्याबद्दल लिहलेल्या बऱ्यावाईट गोष्टींचे धनी ठरतात ! या पार्श्वभूमीवर क्रांतिवीरांच्या ऐतिहासिक कार्याचे जयवंत अहिर यांनी केलेले लिखाण महत्वाचे ठरते.

दूसरी गोष्ट इतिहास घडविणाऱ्या शक्ती, व्यक्ती, त्याबद्दल काही लिहून ठेवण्याकडे दुर्लक्ष करतात त्यामूळेही मोठी हानी होते. जयवंत अहिर यांनी अण्णांकडून सर्व माहिती घेऊन ती लिहून अण्णांना पुन्हा वाचून दाखवली व त्यावर त्यांची सही घेऊन अण्णांच्या सल्ल्याने इतरांना दाखवून मग ती छापली, यादृष्ठीनेही या चरित्रलेखनाची अस्सलता आपल्यात दिसते. हे चरित्रलेखन त्यामूळेच शास्त्रीय कसोट्यांवर टिकून राहिल याबद्दल खात्री आहे.

सत्यनिष्ठ शेतकरी वडील रामचंद्र बापू आणि क्रांतिमाता लक्ष्मीबाई यांच्या संस्कारांनी अण्णांच्या मनाची मशागत झाली. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी त्यांच्या मनात क्रांतिची आकांक्षा पेरली आणि मग स्वातंत्र्यपूर्व काळात समांतर वहाणाऱ्या सत्यशोधकी समतेचा गांधीवादी अहिंसक चळवळीचा आणि भगतसिंहप्रणित सशस्त्र क्रांतीवादी अशा तीन प्रवाहांचे जबरदस्त मिश्रण क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या व्यक्तिमत्वात झाले. क्रांतिसिंह नाना पाटील आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा यांची स्वातंत्र्याची कल्पना फक्त ब्रिटीशांना हाकलण्यापुरती मर्यादित नव्हती तर सामाजिक, राजकीय, आर्थिक असे सर्वंकष स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते ही बाब जयवंत अहिर यांनी लिहलेल्या प्रस्तुत चरित्रातून समोर येते. शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी

१६ व्या वर्षी गोव्यापर्यंत मारलेली धडक, पे स्पेशल ट्रेन लुटीपासून धुळे खजिना लुटीपर्यंत अनेक प्रसंगात जिवाची बाजी लावून स्वातंत्र्यासाठी लढलेले क्रांतिवीर अण्णा या ग्रंथातील पानापानावर आपणास दिसतात. मन थरारून जाते आणि भानावर येऊन त्यांच्या स्मृतीपुढे नतमस्तक होते. ब्रिटीशांनाही न सापडलेले वादळी व्यक्तिमत्व शब्दात पकडणे, कागदावर उतरवणे हे सोपे काम नाही. ही चरित्रलेखनाची जोखमीची कामगिरी लेखनाची कोणतीही परंपरा व अनुभव नसूनही जयवंत अहिर यांनी अत्यंत उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे. याच पध्दतीने क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या हुतात्मा किसन अहिर विद्यालय ते दुष्काळनिमूर्लनाच्या समन्यायी पाणी वाटपापर्यंतच्या सामाजिक, राजकीय लढ्याबद्दल, स्वातंत्र्योत्तर संघर्षाबद्दल गेली ४०-४२ वर्षे अण्णांच्या सानिध्यात असलेल्या जयवंतरावांनी लेखन करावे अशी समस्त महाराष्ट्राच्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना विनंती. क्रांतीकारी सत्यशोधकी समाजवादाचे तत्वज्ञान उरी बाळगून शेतकरी-कष्टकरी जनतेची सत्ता आणण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे स्फूर्तीदायी चरित्र लिहल्याबद्दल जयवंत अहिर यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करून दूसऱ्या भागाच्या लेखनासाठी शुभेच्छा ! क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या स्मृतींना क्रांतीकारी सलाम ! सत्य की जय हो !

**(कॉ. किशोर सोपानराव ढमाले)**

धुळे

(''क्रांतिवीर नागनाथअण्णा'' या ग्रंथाबद्दल अनेक मान्यवरांनी आपले अभिप्राय दिले आहेत. काही अभिप्राय जसेच्या तसे घेता आले नाहीत त्याबद्दल दिलगिरी ! )

# कांही महत्त्वपूर्ण मुलाखती

१) क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी ............... वाळवा

२) धोंडीराम बापू माळी .................................. कुपवाड

३) वाय. सी. पाटील ..................................... मांगले

४) राजूताई बिरनाळे ..................................... अंकलखोप

५) क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी ................... वाळवा

६) बी. टी. पोरवाल (बच्चू)............................. आष्टा

७) खंडू सखाराम शेळके................................. वाळवा

८) शेवंता साळसकर ..................................... वाळवा

# संदर्भ ग्रंथ सूची


| अ.नं. | ग्रंथाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १) | स्वातंत्र्याच्या हिमाचलावर मावळलेले दोन दिव्य तारे.... | विप्लवी चामुंडराय |
| २) | जीवन संग्राम................................................ | सा.बा. सनदे |
| ३) | क्रांतिवीर नागनाथ नायकवडी ............................ | डॉ. भारत पाटणकर |
| ४) | राजमती पाटील-बिरनाळे एक क्रांतिकारी............. | डॉ.सौ. पद्मजा पाटील |
| ५) | रणरागिणी राजूताई........................................ | विजय कोगनोळे |
| ६) | कोल्हापूर जिल्हा स्वातंत्र्य लढा सुवर्ण महोत्सवी ग्रंथ... सन (१९९१-९२) | बापूसाहेब कृष्णा सुतार |
| ७) | कर्मवीर भाऊराव पाटील .................................. | बा. ग. पवार |
| ८) | क्रांतिपर्व.................................................... | डॉ. उत्तमराव पाटील |
| ९) | जळते दिवस पेटलेली माणसे.............................. | राजाभाऊ कुलकर्णी केळकर, इंदुमती केळकर |
| १०) | महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा इतिहास. | |

# वंशावळ बाबत माहिती

दिनांक ३.९.२००३ रोजी श्री. बाबुराव शिवाप्पा हेळवी, मु.पो. कागवाड, ता. अथणी, जि. बेळगाव, यांच्या कडून माहिती घेतली.

---

मूळगाव - मुंगी पैठण - ३२ एकर वतन होते.

मुसलमानांच्या बरोबर युद्ध केले. ७ मुसलमान मारले गेले

इ.स. ९६७ साली मुंगी पैठण सोडून

↓

कराडला आले. तिथे ३० एकर वतन

↓

येलूर - बोगर पाटील म्हणून वतनी काम केले.

ब्राम्हणांशी भांडण करून कुलकर्णी यांचे पाय काढून त्यांच्यातील

एक भाऊ येलूर येथे राहिले व

एक भाऊ वाळव्यास आले.

टोपण नाव - नाईकाचे काम करीत होते त्यावरून नायकवडी हे नाव पडले.

**मूळ पुरुष - रायाजी**

# वंशावळ

- संकलक -
श्री. बाबुराव शिवाप्पा हेळवी
मु.पो.कागवाड, ता.अथणी, जि.बेळगाव.

**रायाजी** (मूळगाव – मुंगी पैठण इ.स.९६७)

**येसाजी**
(बोगर पाटील–येलूर)

**कुशाजी**(वाळव्यास आले)
↓
**आप्पाजी**
↓
**बाळू**

**पिराजी** **शिवाजी** **जोती** **केदारी** **लिंबाजी**

**पिराजी**
↓
**नारायण**
↓
**जोती**
↓
**गणपती**

**कृष्णा**(दत्तक गेले) **रामचंद्र** (लक्ष्मीबाई) **चंद्रोजी** (निवृत्ती) **ईश्वरा** (यशवंत) वंश नाही

**रामचंद्र**

**नागनाथ** (कालखंड १५/०७/१९२२ ते २२/०३/२०१२)
**सौ.कुसुमताई** (९ एप्रिल १९३२)

**शामराव** मयत ४.७.१९९०
**हौसाबाई** (काकी)

**नागनाथ – सौ.कुसुमताई**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **किरण**–सुपुत्र | **अरुण**–सुपुत्र(स्व.२४.२.२००५) | **वैभव**–सुपुत्र | **सौ.विशाखा**– कन्या | **सौ.प्रगती**– कन्या |
| शेती | एम्.एस्सी.(ॲग्री) | एम्.ए.(राज्यशास्त्र) | एम्.ए.बी.एड. | एम.ए. |
| **सौ.सुमन**–सून | **डॉ.सुषमा** –सून | **सौ.नंदिनी**– सून | डॉ. सुरेश य.कदम– जावई | उमाजी गो.पाटील–जावई |
| | एम.एस्सी.पी.एच.डी. | बी. कॉम | एम्.बी.बी.एस. | एम.ई |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| **चि.गौरव**– नातू | **कु.अनुभूती**– नात | **चि.वीरधवल**– नातू | **कु.सुप्रिया**– नात<br>एम्. बी. बी. एस. | **चि.मोहिल**– नातू<br>बी.ई. (कॉम्प्यूटर–इंजिनिअर). |
| **कु.प्रतिमा** – नात | **चि.केदारज्योती**– नातू | **कु. मधुरा**– नात | **चि.डॉ.दिग्विजय**– नातू | |
| | **चि.अभिजित**–नातू | | **चि.जयदीप**– नातू | |

## हस्ताक्षर

सचिवालय मुंबई
७ ऑगस्ट १९६५

प्रिय :- जयवंत
सप्रेम नमस्कार,

आतांच स्कीमचे कागदपत्रं येथून
दिल्लीस रजिस्टर ए.डी. ने रवाना
झाले. मी येथून आज रात्री-
येथून निघून सकाळी पुण्यात
आणि चिमाताईना भेटणार आहे
व नंतर उद्यां रात्री कोल्हापु-
रास मुक्कामास जाईन त्यांचा मिरज.
तरी तूं उद्यां रात्री म्हणजे रविवा-
री रात्रीं कोल्हापूरात प्रिन्स
शिवाजी बोर्डिंगमध्ये ये
येताना आमच्या घरुन जेवण
आणणे

निःदत्ताचे तेव्हा पत्रे मिळाले.

ता. कऱ्हाडच्या पोलीसांस

बोलवून घेऊन त्रास वगैरे द्यावयास

लावावे व योग्य 'बारकावा'

नोंदून घ्यावे.

सोबत वकीलांस ऑफिसरच्या चिठ्ठी-

ताब्यातील बंदुकी मिळवून त्यांचा ति-

तिकडे गरज पडेल तेव्हा व

आवश्यक तेव्हा पगार द्यावे.

आज रात्री निघत आहे.

तुमचा,

नागनाथ.



# क्रांतिवीर ....

आजच्या तरुण पिढीला स्फूर्तिदायक ठरणारा असा क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा १९४२ चा स्वातंत्र्य लढ्याचा रोमहर्षक इतिहास आहे. त्याची नोंद इतिहासकारांनी फारशी घेतली नाही. पण जनतेने घेतली. त्या संबंधित एक पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या लिखाणातून अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा परिचय होईल.

१५ ऑगष्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नागनाथ अण्णांना संधी असतानाही सत्तेच्या आणि भौतिक सुखाच्या मोहात ते अडकले नाहीत. हुतात्मा भगतसिंग, हुतात्मा बाबू गेनू, हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग, हुतात्मा बाबुराव कोकाटे, हुतात्मा प्रताप पाटील या हुतात्म्यांना व साथीदारांना न विसरता त्यांच्या स्वप्नातील भारत देश सुजलाम, सुफलाम करण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांना द्रष्टेपणाची, तत्त्वज्ञानाची आणि बुद्धिनिष्ठ तर्कशुद्धतेची सांगड घालून धर्ममार्तंडांनी, हजारो वर्षांची जातीयतेची बनवलेली चौकट उखडण्यासाठी, नव्या विचारांचा नवा समाज घडविताना क्रांतिवीर अण्णा स्वतःला विसरून जिवंत हुतात्म्यांचे जीवन जगले आहेत. शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, कामगार, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांचे प्रश्न सोडवणे हा क्रांतिवीर अण्णांचा आत्मा व बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी हुतात्म्यांच्या नावे चालवलेल्या शिक्षण संस्था व मोफत वसतिगृहे अखंडपणे कार्यरत ठेवणे हा त्यांचा प्राण आणि हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना दुमदुमत ठेवणे हा त्यांचा श्वास. असा हा महामानव अखेर पर्यंत बहुजनांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक समृद्धीसाठी फुले, शाहू, आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवून तरुणांना लाजवेल अशा उत्साहाने काम करत होता.

धन्य त्यांचे कार्य ! धन्य त्यांचे जीवन !!

-जयवंत अहिर.

# अण्णांचे सहकारी








क्रांतिवीर नागनाथ अण्णा



दिली .... आपुलकीची छाया...
स्वतः उन्हात राहूनी....



# लेखक परिचय

पूर्ण नांव : **स्व. जयवंत यल्लाप्पा अहिर**

- जन्म : १ मार्च १९४५ वाळवा, जि. सांगली.
- वडिल : यल्लाप्पा अहिर (शेतकरी)
- आई : कृष्णाबाई
- लहानपणी वडिलांचे छत्र हरवले, आईने सांभाळ केला.
- एकूण आठ भावंडे, लेखक शेवटचे अपत्य.
- तिसरी पर्यंतचे शिक्षण मुंबई दादर येथे झाले.
- सातवी पर्यंत व पुढे माध्यमिक शिक्षण हुतात्मा किसन अहिर विद्यालय वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली
- आजोळ : वाटेगांव
- १९५७ च्या निवडणुकीत पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचा संबध आला.
- १९६४-६५ मध्ये संबध दृढ झाले.
- १९६५ पासून हुतात्मा किसन अहिर विद्यालय,वाळवा येथे लेखनिक म्हणून रुजू
- सेवानिवृत्त : दिनांक ३१/०३/२००३
- निधन : शुक्रवार, दिनांक २३/०२/२०१८
- शेवटच्या क्षणा पर्यंत हुतात्मा संकुलाचे निष्ठावंत कार्यकर्ते
- **लेखन :**

  १) पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी चरित्र – खंड १ व २

  २) क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी चरित्र.